Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

डिसीज बिमारीरोग गोट वात लिवर अस्थमा
फिवर ज्वरताप येग कंपज्वर कफ खांसी
इनडिजेसशन अजीर्ण डिसेण्टरी अतिसा
रपचर गोल्लो एपिलेप्सी मृगी पाइलस बवा
ष्टोन पथरी वार्ट मसो हेमिक्रेनिया आधा
कोलेरा हैजामरी लेप्रसी कुष्ठ वोरमस कृमि
चेन गलगंड रिउम्याटिजम गंठीयावाय
डायरीया ग्रहनी सोर घाव प्रिकलिहीटस अल
वोमिट उलटी चे चहादाग रिंगवोरम द
इनफ्लेमेशन दाहवलत फिफ्रिउला भगंद
पलजी पक्षाघातलकवा इचे खुजलि
स्मोलपोक्स माताचेचक वोइल फोडा
फलेम कफ वलडिफलक्स रक्तातिसार
विनिरीएल गरमीफिरंगवाय विउवो वागीव
पोउर चूर्ण डिकोकशन काढा
क्लिष्टार पिचकारी कालाकस भस्म
पिल गोलि इभ्यापरेशन सेकना
कोमेंठेशन वफारा गार्गल कुलिकरना

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

490

चिकित्सासार.

हा ग्रंथ

विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचे

वारसाचे परवानगी-

नें

रावजी श्रीधर गोंधळेकर याणीं मर्म-

ज्ञ विद्वानांकडून शुद्ध-

करवून

पुणें पेठ शनवार मेहुणपुरा

येथें

आपल्या जगद्धितेच्छु छापखान्यांत छापिला.

तारीख ११ मार्च सन १८८१

सन १८४७ चा आक्ट २० व
सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या ग्रंथाचा स-
र्व हक्क विठ्ठल सखाराम अग्निहोत्री
यांचा आहे.

आवृत्ति ३री. किंमत २ रुपे.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

प्रस्तावना.

पूर्वी हिंदुस्थानांत, गोपालदास या नामें करून वैद्यक्रियेमध्यें निपुण व जगप्रसिद्ध असा एक विद्वान् पुरुष होता; त्यानीं सुश्रुत वाग्भट्टादि पुरातन वैद्यक ग्रंथ अवलोकन करून व त्यांतील जें सारभूत तें घेऊन वैद्यकावर चिकित्सासार यानामें करून ग्रंथ केला होता. तो ग्रंथ, पूर्वी हिंदुस्थानांत छापण्याची कला माहीत नव्हती या कारणामुळें प्रतीचा विस्तार न होतां तो मागें पडला आणि त्यावर विद्वज्जनांचें अवलोकन नसल्यामुळें अशुद्धही होत चालला होता. परंतु दैववशात् तो ग्रंथ आमच्या हातीं कांहीं दिवसा मागें लागला; आणि ग्रंथ प्रसिद्ध नसून चांगला आहे, असें वाटल्यावरून आह्मांस अशी इच्छा उत्पन्न झाली कीं तो छापून त्याचा विस्तार करावा, परंतु ग्रंथ आजपर्यंत छापलेला नाहीं, तो छापून निरुपयोगी ग्रंथाचा विस्तार करून लोकांस निरर्थक खर्चांत घालावें हें योग्य न वाटल्यामुळें हा ग्रंथ निरुपयोगी आहे, किंवा उपयोगी आहे, याची आपण प्रथमतः आपल्या मनाची खात्री करावी ह्मणून, त्यांत ज्या रोगांवर जीं औषधें योजिलीं आहेत, त्यांतून बहुतेकांचा अनुभव, आमच्या जवळ ज्या ज्या रोगांचे जेजे रोगी आजपर्यंत आले त्यांस त्या त्या रोगावर औषधें देऊन घेतला आणि आपल्या मनाची पूर्ण खात्री करून घेऊन हा ग्रंथ अशुद्ध होता तो शुद्ध करून प्रसिद्ध केला आहे.

हा ग्रंथ, पूर्वीचा केवळ संस्कृत आहे, परंतु पूर्वीचा होता तसा संस्कृतांत छापल्यास, ज्यास ती भाषा अवगत आहे, त्यांस मात्र समजेल; व इतरांस ह्या पासून कांहीं फायदा होणार नाहीं, असें वाटल्यावरून हा ग्रंथ संस्कृत येणारास व संस्कृत न येणारासही समान उपयोगीं व्हावा ह्मणून त्याजवर प्राकृत टीका करून त्या टीके सुद्धां छापिला आहे; तर हा ग्रंथ सर्वांस मान्य होईल अशी आशा बाळगितों.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

श्री॰

अथचिकित्सासारस्थानुक्रमणिका॰

विषयः	पृष्ठं॰	विषयः	पृष्ठं॰
उपोद्घातः	१	मंथनवनीतघृतगुणाः	२१
दूतपरीक्षा	२	मध्वादिगुणाः	२२
शकुनाः	२	तैलगुणाः	२३
नाडीपरीक्षा	३	मद्यगुणाः	२४
मूत्रपरीक्षा	४	वमनरेचनाः	२५
कालज्ञानं	५	इच्छाभेदी चिंतामणिरसः ..	२६
ऋतुप्रकोपः	८	नस्यं	२७
दोषत्रयचिन्हानि	९	नस्यनिषेधरक्तस्रावौ	२७
व्याधिसामान्यलक्षणं	१०	रसोपरसशोधन मारणे	२८
दोषत्रयशमनं	१०	पारदादिशुद्धिः	२८
दोषोत्पत्तिः	११	मणिमुक्तादिशुद्धिः	३०
आमादिजयः	११	स्वर्णादिशुद्धिः	३१
शाल्यादिगुणाः	१२	स्वर्णादि मारणं	३१
वास्तूकादिशाकगुणाः ..	१३	अभ्रकशोधन मारणं	३४
सूरणादिकंदगुणाः	१४	रससिंदूरः	३५
दाडिमादिगुणाः	१५	पारदीनां गुणा अगुणाश्च	३६
चारोल्यादिगुणाः	१६	ज्वरनिदानं	३८
मंडादिलक्षणगुणाः	१७	वातज्वरलक्षणोपचारः	३९
मूत्रवर्गगुणाः	१७	श्लेष्मज्वरलक्षणोपचारः	४०
शृतशीतोदकगुणाः	१८	वातपित्तज्वरलक्षणोपचारः	४३
शीतोदकगुणाः	१८	वातश्लेष्मज्वरलक्षणोप॰	४४
उदकविशेषगुणाः	१९	पित्तश्लेष्मज्वरलक्षणोप॰	४४
गोक्षीरादिगुणाः	१९	सन्निपातज्वरलक्षणोप॰ ..	४६
गोतक्रादिगुणाः	२०	सन्निपातमर्यादालंघनादि	४७

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

विषयः	पृष्ठं.	विषयः	पृष्ठं.
लंघनगुणनिषेधौ	४८	अजीर्ण लक्षणोपचारः	७८
ज्वरे औषधकालः	४९	अजीर्णभेदाः	७८
नस्यादि	४९	रसोपचारः	८०
स्वेदादि केषु उपचारः	५१	कृमिलक्षणोपचारः	८१
कर्णमूलादि केषु उपचारः	५२	पांडुरोगलक्षणोपचारः	८३
सन्निपातप्रकाराः	५३	कामलाकुंभकामलालक्षणो०	८५
आगंतुकज्वरलक्षणोपचारः	५४	हलीमकलक्षणरसोपचारः	८७
विषमज्वरलक्षणोपचारः	५५	यवगोधूमादिपथ्यं	८५
चातुर्थिकादिज्वरलक्षणोप०	५६	हंसमंडूरादिःउपचारः	८७
वर्धमानपिप्पल्यादिःउपचारः	५८	रक्तपित्तलक्षणम्	८८
सुदर्शनचूर्णं	५९	राजयक्ष्मलक्षणोपचारः	९१
ज्वरमुक्तलक्षणंज्वरे वर्ज्यंच	६०	शिलाजत्वाद्युपचारः	९३
रसोपचारः	६१	कासलक्षणोपचारः	९५
विषमेरसाः	६३	क्षयकासलक्षणादिः	९७
अतिसारलक्षणोपचारः	६४	आनंदभैरववटिकादि	९८
अतिसारेवर्ज्यं	६६	मनःशिलाधूमपानाद्युपचारः	९८
शोफातिसारोपचारः	६६	हिक्काश्वासलक्षणोपचारः	१००
आमातिसाररक्तातिसारोप०	६७	स्वरभेदलक्षणोपचारः	१०४
रसोपचारः	६९	अरोचकलक्षणम्	१०६
संग्रहणीलक्षणोपचारः	७०	छर्दिलक्षणोपचारः	१०८
भल्लातकक्षारः	७१	तृष्णालक्षणोप०	११०
कनकसुंदरग्रहणीकपाटे	७२	मूर्छालक्षणोपचारः	१०१
अर्शोलक्षणोपचारः	७३	मदात्ययलक्षणोपचारः	११४
एकदोषादिलक्षणं	७३	दाहलक्षणोपचारः	११५
सूरणकंदपुटपाकादि	७४	उन्मादलक्षणोपचारः	११७
गुंजासूरणकूष्मांडवर्त्यादि	७५	अपस्मारलक्षणोपचारः	११८
मंत्रजपरसौपचारवर्ज्याणि	७६	वातव्याधिलक्षणोपचारः	१२०

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

विषयः	पृ.	विषयः	पृ.
रास्नापंचकंमहारास्नादिः	१२२	न्यग्रोधादिचूर्णं	१५८
वातगजसिंहः	१२४	प्रमेहे वर्ज्यादिः	१५८
वातरक्तलक्षणोपचारः	१२४	मेदलक्षणोपचारः	१६०
वातरक्तभेदादिमंजिष्ठादिः	१२५	उदरलक्षणोपचारः	१६२
माहिषगुग्गुल्वादिः	१२६	जलोदरलक्षणं	१६३
कैशोरगुग्गुल्वादिः	१२८	रक्तस्रावाद्युपचारः	१६३
ऊरुस्तंभलक्षणोप०	१२९	क्षुधाक्षीरलेपाद्युपचारः	१६४
आमवातलक्षणोः	१३१	शोफलक्षणोपचारः	१६७
वैश्वानरचूर्णादि	१३२	शोफासाध्यत्वलक्षणं	१६८
शूललक्षणोपचारः	१३३	गोधूमादिपोलिकाद्युपचारः	१६९
त्रिफलाक्वाथादि	१३४	अंत्रवृद्धिमुष्कवृद्धिलक्षणो०	१७१
हिंग्वादिचूर्णं	१३६	शिरावेधाद्युपचारः	१७३
आमशूलचिकित्सा	१३७	पुनर्नवादितैलं	१७३
आनाहोदावर्त्तलक्षणोः	१३८	कुरंडलक्षणोपचारः	१७४
गुल्मलक्षणोपचारः	१४०	गंडमालापचीग्रंथ्यर्बुदलक्ष०	१७६
नाराचरसादि	१४१	कटुतुंब्याद्यंतैलादि	१७७
वज्रक्षारादि	१४२	दाहक्रियादि	१७८
हृद्रोगलक्षणोपः	१४४	भल्लातकादिलेपादि	१७९
उदयमार्त्तंडादि	१४५	अजमोदादितैलाद्युपचारः	१८१
मूत्रकृच्छ्रलक्षणोपचारः	१४६	श्लीपदलक्षणोपचारः	१८२
लघुलोकेश्वरादि	१४९	विद्रधिलक्षणोपचारः	१८३
मूत्राघातलक्षणोपचारः	१४९	व्रणादिलक्षणोपचारः	१८५
मूत्राश्मरीलक्षणोपः	१५०	दुष्टव्रणलक्षणो०	१८९
अश्मरीसामान्यलक्षणो०	१५३	रक्तस्रावेविशेषः	१९०
पाषाणभेदीरसः	१५३	जात्यादिवर्त्याद्युपचारः	१९०
वरुणाद्यंघृतं	१५४	भगंदरलक्षणोप०	१९०
प्रमेहमधुमेहपिटिकालक्षणो	१५४	उपदंशोपलक्षणोपचारः	१९२
चंद्रकलावटिकादिः	१५७		

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

विषय.	पृ.	विषय.	पृ.
कुष्ठचिकित्सा	१९३	अंगस्फुरणंधीकरणं	२११
खदिरादिक्काथाद्युपचारः	१९४	मुखरोगचिकित्सा	२१२
शक्लुकरवीरादितैलाद्युपचा०	१९५	कटुतिक्तकषायदंतकाष्ठादि०	२१३
मनःशिलादिलेपाद्युपचारः	१९६	जातीपत्रादिक्काथाद्युपचा०	२१४
शीतपित्तलक्षणोपचारः	१९८	कर्णरोगलक्षणोपचारः	२१६
स्पर्शवातलक्षणोः	१९९	नासारोगचिकित्सा	२१७
अम्लपित्तलक्षणोपचारः	२००	नेत्ररोगचिकित्सा	२१९
अम्लपित्तशोधनाद्युपचारः	२०२	शिरोरोगलक्षणोप०	२२१
विसर्पविस्फोटलक्षणोपः	२०३	करंजबीजादिशिरोविरेच०	२२१
मसूरिकास्मायुकलक्षणोप०	२०५	स्त्रीरोगलक्षणोपचारः	२२३
क्षुद्ररोगलक्षणोपचारः	२०६	बालरोगचिकित्सा	२२६
अरुंषिकालेपादि	२०७	विषोपचारः	२२८
दारुणोपचारः	२०८	कृत्रिमविषचिकित्सा	२३०
इंद्रलुप्तचिकित्सा.	२०९	सर्पदंशचिकित्सा	२३१
केशकृष्णीकरणं	२०९	श्वानदंष्ट्राविषहरणम्	२३३
पामाचिकित्सा	२१०	रोगगणना	२३३
अग्निदग्धेउपचारः	२११	उपसंहारः	२३५

इत्यनुक्रमणिका.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

श्री

उपोद्घातः

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वत्यैनमः अथचिकित्सासारं लिख्यते परात्परोयः पुरुषः पुराणः सनातनो योपिचविश्वकर्त्ता यस्यांतपारंनसुरादयोपिविदुर्हि देवंतमहंस्मरामि १ षडंगवेदाःसकलोपवेदायतःप्रजाताउतसृष्टिकाले येनात्रसर्वेप्रकटीकृतास्तेपरोपकारायतमुद्भजेहं २ ऋग्वेदस्योपवेदोयमायुर्वेदंप्रचक्षते तस्यसंख्याप्रमाणंहिलक्षैकंग्रंथतोविदुः ३ संहिताचरसग्रंथदेशभाषादिभेदतः विस्तृतोबहुमात्रोहितत्सारंकेऽपिनोययुः ४ परंपरोपकारार्थंयद्दृष्टंयच्छ्रुतंमया लिख्यतेतच्चसंक्षिप्तंवैद्यानांयशदायकं ५ चिकित्सासारनामायंग्रंथःपरमदुर्लभः श्रीमद्गोपालदासेनक्रियतेपंडितप्रियः ६

अर्थ:- ग्रंथारंभीं ग्रंथ निर्विघ्नपणें सिद्धीस जावा ह्मणून ग्रंथकार इष्टदेवतास्मरणरूप मंगल करितो तें मंगल अनुरूप असावें यास्तव कर्त्तव्य जो वैद्यग्रंथ याला मूलभूत जो आयुर्वेद त्याची उत्पत्ति ज्यापासूनत्या देवाचें भजनरूप मंगल करून वैद्यक प्रकरणीं ग्रंथ कर्त्तव्य हें सूचविण्या करितां मंगलश्लोक आरंभीं लिहितो. परात्परेति,जो अत्यंत श्रेष्ठ,अनादि,नित्य,जगत्कर्त्ता,ज्याचा देशतः आणि कालतः अंतदेवादिकही जाणते नाहीं झाले त्यातें मी स्मरतों. १ षडंगेति सहा अंगांसहित वेद आणि उपवेद ज्या पासून उत्पन्न झाले आणि सृष्टि समयीं ज्याणें सर्व वेद प्रगटकेले त्या देवातें मी प्रीतीनें भजतों. २ ऋग्वेदेति ऋग्वेदाचा जो उपवेद ज्याला आयुर्वेद असें ह्मणतात तो ग्रंथ संख्येनें एक लक्ष आहे. ३ संहितेति तो संहिता रसग्रंथ देशभाषा इत्यादि भेदें करून पृथ्वीवर बहुत विस्तृत झाला आहे, त्याचा अंत कोणासही लागला नाहीं. ४ परंतु परंपरेनें लोकांवर उपकार व्हावेयासाठीं संहितादि ग्रंथांतील जें पाहिलेलें आणि ऐकलेलें तें संक्षेपें करून वैद्यांला यश देणारें असें लिहितों. ५ कर्त्तव्य ग्रंथाची नामाभिधानपूर्वक प्रशंसा करितो; चिकित्सेति हा चिकित्सासार नामक ग्रंथ अत्यंत दुर्मिळ, पंडितांस प्रिय

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अशा ग्रंथाग्रन श्रीमत् गोपालदास करितो.

अथ दूत परीक्षा.

व्यंगंभीतंद्रुतंदीनंरूक्षामंगलवादिनम्॥ अमंगलंचमलिनंशस्त्रिणंदंडपाणिनं १ व्याधितंक्रूरकर्माणंरक्तमाल्यानुलेपनम्॥ तैलपंकविलेपाढ्यमशुचिंकृष्णचामरं २॥ अनेकंजटिलंशीर्णंविवर्णार्द्रैकवाससम्॥ स्त्रियंखरोष्ट्रमहिषारूढंकष्टस्वरंतथा॥०॥ नानुगच्छेद्विषद्दूतमाह्वयंतंचदूरतः॥३॥

अर्थ- अंग विकल ह्मणजे आंधळा पांगळा इत्यादि प्रकारचा; प्यालेला, त्वरेनें आलेला, दीन, कर्कश, आणि अमंगळ असें बोलणारा, अमंगळ, घामट, शस्त्रधारी, दंडयुक्त, रोगी, क्रूरकर्मा, रक्तपुष्पांच्या माला आणि रक्तगंध इत्यादिकें-करून युक्त, तेल लावलेला, चिखलाच्या लेपानें युक्त, अपवित्र, काळें चामर धारण करणारा, अनेक ह्मणजे दुसऱ्यास बरोबर घेऊन येणारा, जटा वाढविलेला, जर्जर झालेला, विवर्ण वस्त्री, ओलेता, एकवस्त्री, स्त्री, उंट, गाढव, टोणगा, इतक्यांतून कोणा एकावर बसून आलेला कष्टानें बोलणारा दुरून हांक मारणारा असा दूत बोलावूं आला असतां त्याचेकडे वैद्यानें जाऊं नये. इति दूत परीक्षा॥

अथ शकुनानि.

दुर्गंधंसकषायंचदुर्वाक्यंलवणंक्षतम्॥ हाहाक्रंदितमुष्कंकृष्णधान्यंगुडोवमी॥१॥ इंधनादितृणंशुष्कंपुरीषंपूतिदुर्मदम्॥ क्रूरपक्षिमृगाणांचरूक्षाःप्रतिदिनंगिरः॥ २॥ समरंकलहोहानिःपंकतैलंससर्पिषम्॥ भंगोवापूर्णपात्राणांप्रासादध्वजशोभिनाम्॥ ३॥ चांडालःक्रूरपाशांश्चनिःसारंजालवागुरे॥ शयनासनयानानामुत्तानानांचदर्शनम्॥ ४॥ मार्गच्छेदोहिमार्जारगोधासरटवानरैः॥ रोगिद्वाराभिनिर्गच्छेन्मंगलंतदमंगलं॥५॥

अर्थ- दुर्गंधिपदार्थ, तुरट पदार्थ, दुर्वाक्य बोलणारा, मीठ, शिंकणारा, हाहाकारें करून दीर्घ स्वरानें रुदन, काळें धान्य ह्मणजे उडीद, तीळ इत्यादि, गुळ, ओका-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

री, काष्ठें, गोंवऱ्या, वाळलेलें तृण, विष्ठा, पूतिदुर्मद म्हणजे फार दुर्गंधियुक्त कुजलेला पदार्थ, क्रूरपक्षी, जनावरें यांचे दिशांच्याठायीं रूक्ष शब्द, युद्ध, कज्जा, नाश, विखल, तेल, तूप भरलेल्या भांड्यांचा नाश, वाडा, घर, पताकांनीं शोभणाऱ्या वस्त्र यांचा नाश, चांडाल, क्रूर, पाश, रिकामीं जाळीं, वागुरा, शयन म्हणजे पलंग इत्यादिक, आसन म्हणजे चवरंग इत्यादिक, यान म्हणजे घोडा इत्यादिक हीं उताणीं पाहणें; मांजर घोरपड सरट वानर हे मार्गांत आडवे जाणें, रोग्याचे घरांतून मंगळ बाहेर पडणें इतक्यांतून कांहीं पदार्थ दृष्टीस पडणारे आणि कांहीं श्रुत होणारे असे शकुन वैद्याला रोग्याकडे जातानां झाले असतां अशुभ असें जाणा॰

आतांशुभशकुन सांगतों.

पुन्नाभावामतःश्रेष्ठोगजखर्चरवर्जितः ॥
स्त्रीनाभीदक्षिणेश्रेष्ठाशिवाश्यामाविवर्जिता १

अर्थः- पुरुषजाति डावे बाजूनें गेला असतां चांगला परंतु हत्ती आणि खेचर हे खेरीज करून. तशीच स्त्रीजाति उजवे बाजूनें गेली असतां चांगली. परंतु कोल्ही व महिषी ह्या खेरीज करून.

छत्रंगोद्विजकन्यकाऽमिषसुरापण्यांगनारोचनंमांगल्यंनृपवाजिवारणदधिस्तोत्रादिपाठःशुभः॥ संगीतंकरुणाभयानकमहारौद्रैर्विहीनस्मरक्रीडाभावमनोहरंकिमपिचेद्बालानिसद्योगिनः॥२॥

अर्थः- छत्र, गाय, ब्राह्मण, कन्या, मांस, मद्य, वेश्या स्त्री, गोरोचन, मांगल्य पदार्थ, तूप, घोडा, हत्ती, दहीं, स्तोत्रादिकांचा पाठ, करुणा, भयानक आणि रौद्र यारसांनीं रहित व स्मरक्रीडांचे भावांनीं रम्य असें गायन, बालकें व उत्तमयोगी इतके शकुन शुभदायक आहेत असें जाणावें. ह्या शुभदायक शकुनांमध्यें हत्ती डावे बाजूस वाईट, असें मागें सांगितलें तो समोर शुभदायकच आहे. इतिश॰

अथ नाडी परीक्षा.

वातेवक्रातदनुचपलाश्लेष्मरोगेस्थिरास्यात्सर्पाकारा प्रभवतिनदावातपित्तप्रभावे॥नाडीहंसीकफपवनयोर्दर्दुराश्लेष्मपित्तेछिन्नासूक्ष्मापि विषमगदेसन्निपाते-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥ त्वलक्ष्या॥१॥

अर्थ:- वातरोग असतां नाडी वांकडी चालते. पित्तरोग असतां चंचळ असते. कफरोग असतां स्थिर चालते. वातपित्त उभयात्मक रोग असतां सर्पासारिखी चालते. कफपित्तात्मक असतां हंसा सारिखी; कफवातात्मक असतां बेडका सारिखी चालते. खंडगति व सूक्ष्मगति अशी विषम रोगाचे ठायीं असते सन्निपाताचे ठायीं अलक्ष्य म्हणजे तिची गति बराबर कळत नाहीं.

॥ अथांतरं॥ ०॥ वाते वक्रगतानाडीचपला पित्तवाहिनी
॥ स्थिराश्लेष्मवतोज्ञेया द्वंद्वजा सन्निपातजा॥ १ ॥

अर्थ:- वायुरोगाची नाडी वक्र. पित्तरोगाची चपळ. कफरोगाची स्थिर. तशीच द्वंद्वज, आणि सन्निपात या रोगांची स्थिर असते.

काष्ठकुट्टोयथाकाष्ठंकुट्टतेचातिवेगतः॥ स्थि-
त्वास्थित्वातथानाडीसन्निपातेभवेद्ध्रुवं॥२॥

अर्थ:- काष्ठें फोडणारा जसा वेगानें काष्ठें फोडतो तशी राहून राहून चालणारी नाडी सन्निपातामध्यें होत्ये.

मंदं मंदं शिथिलं शिथिलं व्याकुलं व्याकुलंवा स्थित्वास्थि
त्वा वहतिधमनीयातिनाशंचसूक्ष्मा॥ नित्यंस्कंधे वहति
पुनरप्यंगुलीः संस्पृशेद्वाभावैरेवं बहुविधतरैः सन्नि-
पातेत्वसाध्या॥३॥

अर्थ:- अत्यंत मंद, फार शिथिल, व्याकुल, राहून राहून चालणारी, सूक्ष्म, नाश पावणारी, खांद्याचे ठायीं स्फुरण पावणारी, पुनः अंगुलीचे ठायीं स्पर्श करणारी अशी जी नाना तऱ्हांची नाडी सन्निपाताचे ठायीं असते ती असाध्यजा०

प्रातःश्लेष्मयुतानाडीमध्याह्नेचापिपैत्तिकी॥
अपराण्हेवातकीचपुनः पित्तंनिशार्धके॥४॥

अर्थ:- प्रातःकाळीं नाडी कफयुक्त असते. मध्याह्नीं पित्तयुक्त, अपराण्हीं वातयुक्त, पुनः मध्यरात्रीस पित्तयुक्त या प्रमाणें अहोरात्र जाणावें. इतिनाडीपरी०

॥ अथमूत्रपरीक्षा॥

रक्तंपीतंतथाश्वेतंकृष्णंचैवयथाक्रमम्॥
वातेपित्तेकफेप्रोक्तंसन्निपातेचमूत्रकम् १

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ– वात,पित्त,कफ आणि सन्निपात ह्मणजे तिन्ही दोष मिश्र झालेले या दोषानुक्रमें करून तांबडें,पिवळें,पांढरें,व काळें असें मूत्र होतें.

पाठांतरं॥०॥ वाते तु रक्तमूत्रं स्यात् पीतवर्णं तु पित्तजे
पांडुवर्णं कफे प्रोक्तं कृष्णवर्णं त्रिदोषजे॥ ॥२॥ ७॥

अर्थ– पूर्वीचाच.

धूमलं वातपित्तेन फेनिलं कफमारुते॥श्लेष्म
वातसमुद्भूतं मूत्रं कुंकुमपांडुरम्॥ ३॥ ७॥

अर्थ– द्विदोषानें मूत्र कसें होतें त्याचें लक्षण,वातपित्तानें धूम्रवर्ण,वात कफानें फेंसट. पित्तकफानें तांबुस असून पांढरें.

प्रातर्मध्यभवांधारां धृत्वा मूत्रस्य रोगिणः॥
तत्र तैलबिंदुक्षिप्त्वा साध्यासाध्यं विचिंतयेत् ४

अर्थ– प्रातःकाळीं मोठ्या पाहांटेस कांचेचे किंवा कांशाचे पात्रांत पहिली व शेवटची धारा सोडून,मधली धारा धरून त्यांत तेलाचा बिंदु टाकून साध्यासाध्य विचार करावा.

वाते विस्तरति छाया पित्ते भवति बुद्बुदः॥श्ले-
ष्मणा चोदयाकारमसाध्यं तलगं यदि॥ ५॥

अर्थ– वातानें पातळ छाये सारखें पसरतें.पित्तानें बुडबुडे येतात. कफानें स्वच्छ प्रभा पडते तसें दिसतें.असाध्य असेल तर तळास जातें.

विस्तृते बहुशः साध्य ऊर्ध्वगे कृच्छ्रसाध्यगः॥
तलगे म्रियते रोगी ब्रह्मणापि चिकित्सितः ६

अर्थ– तेल टाकतांक्षणींच विकास पावलें ह्मणजे रोग साध्य असें बहुत करून जाणावें.जर उंचपणा असेल तर कष्टसाध्य. आणि जर तळास गेलें तर रोगी मरेल.जरी ब्रह्मदेव औषध देईल तरीही वांचणार नाहीं.असें जाणावें.

॥ इति मूत्रपरीक्षासमाप्ता.

॥ अथ कालज्ञानम्.

अरुंधतीं ध्रुवं चैव विष्णोस्त्रीणि पदानि च॥
आयुर्हीनान पश्यंति चतुर्थं मातृमंडलम्॥१

अर्थ– अरुंधती,ध्रुव,विष्णूचीं तीन पदें,चवथें मातृमंडल,हे चार पदार्थ

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ज्याचें आयुष्य संपलें असेल तो पहात नाहीं. आतां अरुंधती इत्यादिक चार पदार्थांचा अर्थ सांगतों.

अरुंधतीभवेज्जिह्वा ध्रुवोनासाग्रमेवच ॥ विष्णुस्तद्भ्रूद्वयोर्मध्येभ्रूद्वयंमातृमंडलम् ॥२॥

अर्थ:- अरुंधती ह्मणजे जिह्वा, ध्रुव ह्मणजे नासिकेचें अग्र (नाकाचा शेंडा), विष्णु दोन भिवयांमध्यें असें सांगितलें तेव्हां अर्थात् दोन भिवयांचा मध्य हींच विष्णूचीं तीन पदें. आणि दोन भिवया हें मातृमंडल या प्रकारें जाणावें. ॥ ७॥

नासाग्रंभ्रूयुगंजिह्वांमुखंचैवनपश्यति ॥
कर्णघोषंनजानातिसगच्छेद्यममंदिरम् ३

अर्थ:- नाकाचा शेंडा, भिवया, जिह्वा, मुख इतकीं जो पहात नाहीं आणखीं कान दाबून धरले असतां आंत जो शब्द होतो तो ज्याला ऐकूं येत नाहीं तो यममंदिराप्रत जाईल.

नवभ्रूःपंचचक्षुस्तुसप्तकर्णस्त्रिनासिका ॥ जिह्वाचदिनमेकंतु कालचिन्हंदिनेदिने ॥ ४ ॥७

अर्थ:- जिह्वा इत्यादिक सांगितलें त्यांचे दिवसांचा नियम सांगतों. भृकुटी पाहात नाहीं तो नऊ दिवसांनीं मरेल. याच रीतीनें भृकुटी-मध्य, कर्णघोष, नासिकाग्र, जिह्वा यांचा क्रमें करून पांच, सात, तीन, एक हा दिवसनेम जाणावा. हें कालचिन्ह दररोज पहावें.

अकस्माद्धिभवेत्स्थूलोह्यकस्माच्चकृशोभवेत्
अकस्मादन्यथाभावे षण्मासेश्चविनश्यति ५

अर्थ:- जो अकस्मात् शरीरानें जाडा किंवा बारीक होतो आणि ज्याची प्रकृति अकस्मात् बदल होते ह्मणजे रागीट असला तर शांत किंवा शांत असला तर रागीट या प्रमाणें प्रकृतीनें बदल झालेला तो साहा महिन्यांनीं मरण पावेल.

रसनायाःकृष्णभावोमुखंकुंकुमसन्निभम् ॥
जिह्वास्पर्शंनजानातिदुर्लभंतस्यजीवितम् ६

अर्थ:- जिह्वा काळी, मुख तांबडें, जिह्वेला स्पर्श कळत नाहीं, अशा मनुष्याचें वांचणें कठीण.

सूर्येकेंद्रेज्वरमनितरंशीतवातंचचंद्रेभौमेरक्तंज्ञगुरुभृगवोरोगनिर्मुक्तकाःस्युः ॥ मंदेमंदंशिथिलमरणंजी-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वनाशंचराहौलग्नंशस्तंग्रहबलयुतंयातुवैद्योविलोक्य७

अर्थ:- वैद्य रोग्याकडे जातेवेळेस जें लग्न असेल त्या लग्नापासून पहिलें १, चवथें ४, सातवें, ७, दहावें १०, जें स्थान त्यास केंद्र असें ह्मणतात. त्या स्थानीं सूर्य असेल तर अत्यंत ज्वरयुक्त रोगी होईल. या प्रमाणें केंद्रीं चंद्र मंगळ असतील तर क्रमें करून कफ, वात, रक्त हे दोष रोग्यास होतील असें जाणावें. बुध, गुरु, शुक्र, हे केंद्रीं असले तर रोगी रोगापासून निर्मुक्त होईल. शनि केंद्रीं असेल तर दुखणें लांबणीं खालीं पडून मरण दूर होईल. राहु केंद्रीं असेल तर रोगी मरेल. हेंच फळ केतूचें पृथक् सांगितलें नसेल तेथें राहूसारखें जाणावें असें ज्योतिःशास्त्रांत आहे. या सारीं प्रशस्त लग्न व ग्रहबल हीं पाहून वैद्यानें रोग्याकडे जावें.

रात्रौदाहोभवतिचदिवाजायतेशीतलत्वंकंठेश्लेष्माविरस
वदनंःकुंकुमाकारनेत्रे॥ जिह्वाकृष्णावहतिचसदास्थूल
सूक्ष्माचनाडीतद्वैषज्यंस्मरणमधुनारामरामेतिनाम८

अर्थ:- ज्या रोग्यास रात्रीस दाह होतो, दिवसास थंडी वाजते, घशांत कफ, तोंडास अरुचि, डोळे लाल, जिह्वा काळी. कांहीं वेळ नाडी फुगलेली आणि कांहीं वेळ अति बारीक अशीं लक्षणें झालीं असतां त्याला राम राम हें औषध जाणावें.

सौम्यादृष्टिर्वदतिविमलंहस्तपादौसदोष्णौस्वल्पोदाहः
स्फुरसवदनःकोमलायस्यजिह्वा॥ नासाश्वासोवहति
सरलंस्वेदहीनोज्वरोसौसाध्योरोगीभवतिनियतंवैद्य
भैषज्ययोग्यः॥९॥

अर्थ:- पाहणें सौम्य, भाषण यथास्थित, हात, पाय गार नाहींत, दाह थोडा, तोंडास रुचि, जिह्वा मऊ, नाकांतला श्वास सरळ वाहतो, ज्यांत घाम नाहीं असा ज्वर इतकीं लक्षणें ज्या रोग्यास असतील तो रोगी साध्य व वैद्याला चिकित्सा करण्यास योग्य होय.

औषधंमंगलंमंत्राद्यन्याश्चविविधाःक्रियाः
यस्यायुस्तस्यसिद्ध्यंतिनसिद्ध्यंतिगतायुषः१०

अर्थ:- औषध, मंगळ, मंत्र, अन्य नानाप्रकारचीं कृत्यें ज्याला आयुष्य आहे त्याचींच सफल होतात. ज्याचें आयुष्य सरलें त्याचीं विफल होत असें जाणावें.

अग्निमूलंबलंपुंसांरेतोमूलंतुजीवितम्॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तस्मात्सर्वप्रयत्नेन वन्हिंशुक्रंचरक्षयेत् ॥११॥

अर्थ:- अग्नि हा बळाला कारण आहे आणि वीर्य हें वांचण्याला कारण. या साठीं मनुष्याचा अग्नि, शुक्र (धातु) हीं सर्व प्रयत्नानें रक्षावीं.

॥ अथ ऋतुप्रकोपः ॥

मार्गेपौषेतथामाघेआषाढेश्रावणेपिच ॥ भाद्रेमासि चिकित्साज्ञैर्वातोराजाप्रकीर्तितः ॥१॥ आश्विनेकार्तिकेमासेवैशाखज्येष्ठयोर्ध्रुवम् ॥ सर्वशास्त्रार्थसारज्ञैः पित्तंराजाप्रकीर्तितः ॥२॥ फाल्गुनेचैत्रमासेचजंतुपीडाकरोमतः ॥ शीतलांबुसमुद्भूतः श्लेष्माराजाप्रकीर्तितः ३

अर्थ:- मार्गशीर्ष, पौष, माघ, आषाढ, श्रावण, भाद्रपद या सहा महिन्यांत वायु राजा असें सांगितलें म्हणजे या महिन्यांत वायूचा प्रकोप असतो तसा आश्विन कार्तिक वैशाख ज्येष्ठ या चार महिन्यांत पित्त राजा असें सर्व शास्त्रांमध्यें निपुण याणीं सांगितलें. म्हणजे या चार महिन्यांत पित्ताचा प्रकोप. तसाच फाल्गुन, चैत्र या दोन महिन्यांत सर्व जंतूंला पीडा करणारा कफ राजा सांगितला म्हणजे कफाचा प्रकोप असतो.

संधारणाध्यशनजागरणोच्चभाषाव्यायामयानकटुतिक्तकषायरूक्षैः ॥ चिंताव्यवायभयलंघनशोकभीतैर्वायुःप्रकोपमुपयातिघनागमेच ॥ ४ ॥ छ ॥

अर्थ:- संधारण म्हणजे मूत्रादिकांचा अवरोध करणें म्हणजे मूत लागलें असतां न जाणें इत्यादिक, अध्यशन म्हणजे एकदां जेऊन पुनः लागलेंच जेवणें, जागरण म्हणजे जागणें, उच्च भाषण म्हणजे मोठ्यानें ओरडणें किंवा बोलणें, व्यायाम म्हणजे फार श्रम करणें, यान म्हणजे अश्वादिकांवर बसून जाणें, तिखट, कडु, तुरट, रूक्ष यांचें भक्षण करणें, चिंता, व्यवाय म्हणजे मैथुन हीं फार करणें, भय बाळगणें, लंघन म्हणजे कांहीं न खाणें, शोक करणें भीति बाळगणें इतक्या प्रकारांनीं वायु कुपित होतो आणि पर्जन्याचे आरंभकाळीं हीं कुपित होतो.

कट्वम्लमद्यलवणोष्णविदाहितीक्ष्णैः क्रोधातपानलपरिश्रमशुष्कशाकैः ॥ क्षारादजीर्णविषमाशनभोजनैश्च

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पित्तंप्रकोपमुपयातिघनात्ययेच॥ ५॥ ७.

अर्थ:- तिखट, आंबट, मद्य, खारट, उष्ण, विदाहि, तीक्ष्ण ह्मणजे मिरच्या, हिंग इत्यादिकांच्या भक्षणें करून आणि क्रोध, आतप ह्मणजे ऊन घेणें, अनल ह्मणजे शेक घेणें, श्रम फार करणें, शुष्कपदार्थ भक्षण करणें, भाजी फार खाणें, किंवा वाळलेली भाजी खाणें, क्षार ह्मणजे शाकण खारादिक खाणें, अजीर्ण विषमाशन ह्मणजे अकाळीं फार खाणें, अशा प्रकारांनीं पित्त कुपित होतें. आणि पर्जन्य काळ सरल्यावरही कुपित होतें.

स्वप्नाद्दिवामधुरशीतलमत्स्यमांसैर्गुर्वम्लपिच्छलतिलेक्षु पयोविकारैः॥ स्निग्धातितृप्तिलवणोदकपानभक्ष्यैः श्लेष्माप्रकोपमुपयातितथावसंते ६

अर्थ:- दिवसास झोंप घेणें, गोड, थंड, मत्स्य, मांस, जड, आंबट, चिकट, बुळबुळीत, तीळ, ऊंस, दुधापासून झालेला पदार्थ, ओशट इतक्यांचे भक्षणानें, पोट भरल्यावर ज्यास्ती खाणें, मीठ उदक हीं फार सेवन करणें, विरुद्ध भक्षण ह्मणजे दुधावर पाणी पिणें इत्यादिक. इतक्या कारणांनीं कफ कुपित होतो. आणि वसंत ऋतूमध्येंही होतो. इति वातादिप्रकोप.

॥तदेवमेतेक्रमशोविशोध्यादोषाःप्रदुष्टायुगपत्त्रयोपि॥ कुर्वंतिरोगान्विविधान्शरीरे संस्थानसंज्ञाविगतानने कान्॥ १॥

अर्थ:- कुपित झालेले वातादि दोष क्रमानें शोधावे, किंवा एकदांच तिन्ही शोधावे. नाहीं तर दुष्ट झालेले वात, पित्त, कफ हे शरीराचे ठायीं नानाप्रकारचे रोग उत्पन्न करितात. ज्यांना नांव नाहीं व लक्षण नाहीं असे.

पारुष्यसंकोचनतोदशूलान् श्यामत्वमंगव्यथचेष्टभावान्॥ स्तब्धत्वशीतत्वखरत्वशोफाःकर्माणिवायोःप्रवदंतितज्ज्ञाः॥२॥

अर्थ:- रूक्षपणा, आखडणें, पोटांत टोंचल्यासारखें होणें, तिडीक, काळेपणा, आंग दुखणें, हात, पाय हालणें, हालचाल न होणें थंडपणा, खरखरीतपणा, सूज इतकीं कर्में वायूचीं असें दोष जाणणारे ह्मणतात.

परिश्रमस्वेदविदाहरागोवेगांध्यसंक्लेदविषादकोपान्॥ प्रलापमूर्छाभ्रमपीतभावान्पित्तस्यकर्माणिवदंतितज्ज्ञाः३

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- भोंवळ, घाम, दाह, लाली, दुर्गंध, चिकचिकीतपणा, खेद, कोप, बडबड, भान नसणें, भ्रांति, पिवळेपणा, इतकीं पित्ताचीं कर्में असें दोष जाणणारे म्हणतात.

श्वेतत्वशीतत्वगुरुत्वकंडूस्नेहप्रसेकस्तिमितावलेपान्॥
उत्सेधसंधानचिरक्रियाश्चकफस्यकर्माणिवदंतितज्ज्ञाः४

अर्थ:- पांढरेपणा, थंडपणा, जडपणा, कंड, जाडेपणा, सांधणें, वेळानें कृत्य करणें, हीं कर्में कफाचीं असें दोष जाणणारे म्हणतात.॥ इति दोषत्रयचिन्हानि..

एतानिलिंगानिचतत्कृतानांसर्वामयानांचविभिन्नना
म्नाम्॥ कश्चिद्भवेत्याप्तिविशेषएवसंज्ञांतरंयेनतुसं
प्रयाति॥१॥

अर्थ:- पूर्वीं सांगितलीं जीं वायु, पित्त, कफ, यांचीं चिन्हें तींच त्यांपासून झालेले जे ते ते सर्व रोग त्यांचीं जाणावीं. एकादा रोग विशेष कारणांनीं होतो म्हणून त्याला विशेष नाम प्राप्त होतें.

आलस्यतंद्रात्वदयाविशुद्धिदोषप्रवृत्तिर्घनताचमूत्रे॥
अल्पक्रियात्वंचविसृप्तताचसामान्यतोव्याधिमुपादि-
शंति॥२॥

अर्थ:- आळस, डोळ्यांवर झांपड, ऊर दाटलेला, जांभया, नाकास पाणी इत्यादिक, मूत दाट, कांहीं क्रिया करण्या विषयीं अल्प सामर्थ्य, झोंप नसणें, सामान्य रोगास जाणावितात. इति सामान्यलक्षणानि.

स्निग्धोष्णास्थिरवृष्यभोज्यलवणास्वादूम्लतैलातप
स्नानाभ्यंजनबस्तिमांसमदिरासंवाहनोन्मर्दनैः॥स्ने
हस्वेदनिरूहणैश्चशयनैस्तीव्रोपनाहादिभिः पानाहा
रविहारभेषजमिदंवायुंप्रशांतिंनयेत्॥१॥

अर्थ:- स्निग्ध, उष्ण, गुरु, खारट, गोड, आंबट, तेल हे पदार्थ खाणें, ऊन घेणें, स्नान करणें, डोळ्यांत अंजन, बस्तिकर्म, मांस खाणें, मद्य पिणें, रगडणें, मळणें, अंगास तेल तूप लावणें घाम काढाडणें, निरूह, बस्ति करणें, निजणें, पेंड बांधणें, लेप लावणें, योग्य खाणें, पिणें, फिरणें, हीं औषधें याणीं वायु शमवावा.

स्निग्धस्वादुकषायशीतपवनछायानिशाव्यंजनंज्यो-
त्स्नाभूगृहवारियंत्रजलजस्त्रीगात्रसंस्पर्शनम्॥स-
र्पिःक्षीरविरेकसेकरुधिरस्रावप्रलेपादिकंपानाहार

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

विहारभेषजमिदंपित्तंप्रशांतिंनयेत्॥२॥

अर्थ- स्निग्ध, गोड, तुरट, थंड हे पदार्थ खाणें, शीतळ वायु, छाया घेणें, रात्रीं-ची हवा घेणें, मुरंबा लेह इत्यादिक खाणें, चांदणें, तळघर, कारंजें, कंबळ, तरुण स्त्रियांच्या अंगाचा स्पर्श, इतक्यांचें सेवन करणें; तूप, दूध, पिणें; रेच घेणें; रक्त काढणें; अंगास चंदनादिकांचा लेप करणें, पंखाचा वारा घेणें, इत्यादिक योग्य खाणें, पिणें, फिरणें, हीं औषधें याणीं पित्त शमवावें.

रूक्षक्षारकषायतिक्तकटुकव्यायामनिष्ठीवनंस्त्रीसेवा ध्वनियुद्धजागरजलक्रीडापदाघातनं॥धूमस्तापशिरोविरेकवमनंस्वेदोपवासादिकंपानाहारविहारभेषजमिदंश्लेष्माशमंगच्छति॥३॥

अर्थ- रूक्ष, खारट, तुरट, कडु, तिखट, इतक्या पदार्थांचें भक्षण, श्रम करणें, वरचेवर खाकेरा टाकणें, स्त्रीसंग करणें, मार्ग चालणें, खुस्ती करणें, जागरण करणें, पोंहोणें, ऊठबशा करणें, धूर घेणें, शोकणें, मस्तक विरेचन करणें, ओकारी काढणें, घाम काढणें उपास करणें योग्य खाणें, पिणें, फिरणें, हें औषध याणें कफ शमतो.

॥ इति दोषत्रयशमनं ॥

हेमंतवर्षाशिशिरेषुवायोःपित्तस्यतोयांतनिदाघयोश्च॥कफस्यकोपःकुसुमागमेषुकुर्वीतयत्नंविहितंयदेषाम्॥१॥

अर्थ- हेमंत, वर्षा, शिशिर या ऋतूंमध्यें वायु कुपित असतो. शरत्, ग्रीष्म या ऋतूंमध्यें पित्त कुपित असतें, वसंत ऋतूमध्यें कफ कुपित असतो, यानां विहितयत्न असेल तो करावा.

इति दोषोत्पत्तिः

आमंजयेल्लंघनकोष्णपेयालघ्वल्पसूक्ष्मौदनतिक्तयूषैः॥निरूहणास्वेदनपाचनैश्चसंशोधनैरूर्ध्वमधस्तथाच॥१॥

अर्थ- लंघन, किंचित् उष्णा, अशी पेया म्हणून पेजे सारखी पातळ ज्यांतथोडें अन्न असतें ती, फुलेला, मऊ, असा भात; कडू मंड, निरूह बस्ति, घाम काढणें, पाचन, रेच, ओकारी इतक्यांनीं आम जिंकावा.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

कफप्रकोपे वमनं सनस्यं विरेचनं पित्तभवे विकारे॥ वातामये बस्तिविशोधनं च संसर्गजे च प्रविमिश्रमेतत् २

अर्थ:- कफ कुपित झाला असतां ओकारी येण्याचें औषध आणि नस्य हें घ्यावें. पित्ताचा विकार झाला असतां रेचन घ्यावें. वातरोगाला बस्तिकर्म किंवा रेचन हा उपाय करावा. आणि जर दोन दोषांचा विकार असेल, तर दोन्ही उपाय करावे. ह्मणजे वातपित्त आहे तर बस्तिकर्म आणि रेचन. जर कफपित्त आहे तर वमन आणि रेचन, कफवात आहे तर वमन आणि बस्तिकर्म.

बुध्वा तदन्यदपि तत्तदनुक्रमेण चेष्टां स्वयं समधिगम्य यथानुरूपम्॥ रोगेषु भेषजमनल्पमतिर्विदध्याच्छास्त्रं हि किंचिदुपदेशबलं करोति॥३॥

अर्थ:- शास्त्रांत सांगितल्या पेक्षां जे जे निराळे व्याधि होतील ते ते त्या त्या लक्षणांनीं जाणून त्यांवर अनुरूप औषध मोठा बुद्धिमान् असेल त्याणें करावें. कारण शास्त्र केवळ दिक्प्रदर्शन करितें.

अथ शाल्यादिगुणाः

श्वेतारक्तास्थूलसूक्ष्माये चान्ये शालयः शुभाः
स्वादुपाकरसाः स्निग्धा तृष्या बद्धाल्पवर्चसः१

अर्थ:- पांढरे, तांबडे, जाडे, बारीक, आणखीही कितीएक प्रकारचे शाळी आहेत ते चांगले आहेत. ज्यांचा पाक व रस मधुर आणि ते स्निग्ध व पुष्टिकारक, बळ देणारे, बांधलेला थोडा असा मळ करणारे आहेत असें जाणावें.

कषायानुरसाः पथ्या लघवो मूत्रला हिमाः॥
षष्टिकाव्रीहिषु श्रेष्ठा गौरश्चासितगौरतः२॥

अर्थ:- बारीक साळी पथ्य आहेत. ज्यांचा रस पाठिमागून किंचित् तुरटलागतो त्या मूत्र करणाऱ्या थंड आहेत. साठ दिवसानीं पिकणाऱ्या साळी सर्वांत उत्तम. त्यां मध्यें पांढऱ्या, काळसर असून पांढऱ्या असतात त्या श्रेष्ठ आहेत असें जाणावें.

सूक्ष्मशीतो गुरुः स्वादुः सरो विट् वातकृद्यवः

अर्थ:- सातु, थोडा थंड, हलका, गोड, सारक, मळ करणारा, वात करणारा, असा आ:

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

संधानकारीमधुरोगोधूमःस्थैर्यकृत्सरः॥३॥

अर्थः- गहूं सांधणारा, मधुर, स्वच्छता करणारा, सारक असा आहे असें जा॰

युगंधरस्त्रिदोषघ्नः स्वादुपथ्योरसायनः॥

अर्थः- जोंधळा त्रिदोष नाशक, गोड, पथ्य रसायन ह्मणजे जरा, व्याधि नाशक, वयाचें स्थैर्य करणारा, डोळ्यांस हित कारक, बळ, पुष्टि, हर्ष, यांतें करणारा स्निग्ध, मधुर असा आहे.

मुद्गादकीमसूरादिशिंबीधान्यंविबंधकृत्४ कषायं स्वादुसंग्राहिकटुपाकंहिमंलघु॥मेदःश्लेष्मास्रपित्तेषुहितंलेपोपसेकयोः॥५

अर्थः- मूग, तुरी, मसूरा, इत्यादिक शेंगेचें धान्य पोट फुगविणारें, तुरट, गोड, हगवण बंद करणारें, पाककाळीं कडू, थंड आणि लघु, मेद, कफ, रक्त, पित्त, इतक्यांचे ठायीं हितकारक, लेप आणि पोचुंडीनें शेकणें याविषयीं चांगलें असें आहे.

वरोत्रमुद्गोल्पचलःकलायस्त्वतिवातलः॥ चणकोवातलोरूक्षःकुलित्थःकफवातहृत्६

अर्थः- पूर्वीं सांगितलेल्या शेंगेचे धान्यामध्यें मूग किंचित् वातकर, आणि वाटाणा अतिवातुल, हरभरा वातुल आणि रूक्ष, कुलित्थ ह्मणजे हुलगा, कफ आणि वात यांतें हरण करणारा.

वास्तूकंग्रहणीकुष्ठत्रिदोषार्शहरंपरम्॥ तद्वल्लघुदलाचिल्लीकाकमाचीचमेथिका॥७

अर्थः- चाकवत, संग्रहणी, कुष्ठ, त्रिदोष, मुळव्याध यांचा नाशक आहे. तशीच बारीक पानांची घोळ आणि कावळी व मेथी आहे.

तंदुलीयोहिमोरूक्षोविषपित्तास्रकासजित्

अर्थः- तांदुळजा, थंड, रूक्ष, विष, पित्त, रक्त, खोकला यांचा नाशक आहे अ॰ जा.

चांगेरीकफवातास्रसंग्रहण्यतिसारजित्॥८

अर्थः- चुका, कफ, वात, रक्त, संग्रहणी आणि अतिसार यांचा नाशक आहे.

तद्वद्यंपटोलंकृमिजित्स्वादुशीतंरुचिप्रदम्। पित्तलंदीपनंभेदीवातघ्नंबृंहतीहृयम्॥९

अर्थः- पटोल ह्मणजे पडवळ, तद्वद्य, कृमिनाशक, स्वादु, रुचिप्रद, थंड, आहे.

CC-0: All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

रिंगणी, डोर्ली पित्तकारक, दीपन, भेदक, वातनाशक आहे.

कारवेल्लंसतिक्तंस्याद्दीपनंकफजित्परम् ॥

अर्थ:- कारलें कडू, दीपन व कफनाशक आहे.

कर्कोटकंज्वरश्वासदद्रुकुष्ठविषापहम् १०

अर्थ:- कर्टोलें ज्वर, श्वास, खरूज, कुष्ठ, विष यांचें नाशक आहे.

वार्ताकंकफवातघ्नंकिंचिद्वातप्रकोपनम् ॥
सरंचमूत्रलंप्रोक्तंबलकृद्बालमेवतत् ॥११

अर्थ:- वांगें, कफ, वात, यांचें नाशक आहे. आणि कोंवळें वांगें किंचित् वातप्रकोप करणारें, सारक, मूत्र करणारें आणि बळ करणारें असें आहे.

बिंबीफलंस्वादुशीतंस्तंभनंलेखनंगुरु॥पि-
त्तास्रदाहशोफघ्नंवाताध्मानविबंधकृत् १२

अर्थ:- तोंडलें, गोड, थंड, स्तंभन, लेखन, गुरु, पित्त, रक्त, शोफ, यांचें नाशक व वात-पोट फुगणें आणि अवरोध यांतें करणारें आहे.

वृष्यंवर्णकरंबलोपजननंपित्तापहंवातजिन्मूत्राघात
हरंप्रमेहशमनंकृच्छ्राश्मरीछेदनम् ॥ विण्मूत्रग्लप-
नंतृषार्तिशमनंक्षीणांगपुष्टिप्रदंकूष्मांडंप्रवरंवदंति
भिषजोवल्लीफलानांपुनः ॥१३॥

अर्थ:- कोंहळा, वीर्यवृद्धिकर, वर्ण, बल कारक, पित्त, वात, मूत्राघात, प्रमेह, मूत्रकृच्छ्र, मूत्राश्मरी, इतक्यांचा नाशक, मल, मूत्र शोधन करणारा, तृषेची पीडा दूर करणारा, पुष्टिकारक आणि वल्लीफलामध्यें श्रेष्ठ असें वैद्य ह्मणतात.

जलजंपद्मकंदादिग्राहिपित्तास्रदद्रुरु ॥

अर्थ:- कमळ आणि कमळकंद इत्यादि ग्राहि, पित्त, रक्त नाशक, गुरु असे आ०

दीपनःसूरणोरुच्यःकफार्शोघ्नोस्रजिल्लघुः १४

अर्थ:- सूरण अग्निदीपक, अरुचि, कफ, मुळव्याध, रक्त, यांचा नाशक आणि लघु आहे.

आर्द्रंपाचनदीपनंरुचिकरंवृष्यंकटूष्णंवरंस्वर्यंमेहहरं-
कफामयहरंशोफापहंशूलजित् ॥ जिह्वाकंठविशोधनंमल
वणंपथ्यंसदाभोजनेनिंबूतोयविमिश्रितंरुचिकरंसदीप-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

नंसारणं १५

अर्थ:- आलें पाचन, दीपन, रुचिकर, हृष्य, तिखट, उष्ण, स्वर नीट करणारें, मेह, कफ, रोग, शोफ, शूल यांचें नाशक, आणि लवणासहित जिव्हा, कंठ, यांचें शुद्धि करणारे, नित्य भोजना विषयीं हित करणारें आणि लिंबाचे रसानें मिश्रित केलें असतां अत्यंत रुचिकर, दीपन, सारक आहे.

भूकंदस्त्वतिवातलोबलकरःश्लेष्माणमत्यर्थकृद्दिष्टं-
भीगुरुमेदसोपिविषमोवातामयंदीपयेत् ॥ मेहंकु-
ष्ठरुजंकरोतिसततंतद्वातरक्तंमहत्पिंडालुःकृमिकृ-
च्छ्रकुष्ठमलहृत्पित्तामयध्वंसकः १६

अर्थ:- डुक्करकंद अतिवातुळ, बलप्रद, अत्यंत कफकारक, अवष्टंभ करणारा, गुरु, मेदोरोग्यास विरुद्ध, वातरोग वाढविणारा, मेह, कुष्ट, वातरक्त यांतें करणारा असा आहे. रताळें कृमि, कुष्ठ, मूत्रकृच्छ्र, पित्तरोग यांचें नाशक आहे.

उर्वारुकंपित्तशीतंमूत्रघ्नंरुचिकारकम् ॥

अर्थ:- चिबूड पित्तकारक, थंड, मूत्र साफ करणारें आणि रुचिप्रद असें आहे.

पत्रे पुष्पे फले नाले कंदेच गुरुताक्रमात् ॥

अर्थ:- पान, फूल, फळ, देंट, आणि कांदा, इतक्यां मध्यें क्रमें करून अधिकअधिक गुरुत्व आहे म्हणजे पानांपेक्षां फूल गुरु आणि फुलापेक्षां फळ गुरु याप्रमाणें जाणावें.

कंदास्तुवातलाःसर्वेकफाजीर्णकराजडाः ॥ १७

अर्थ:- संपूर्ण कंद वातुळ, गुरु, कफ, अजीर्ण यांतें करणारे असे आहेत.

दाडिमंग्राहिदोषघ्नंहृद्यंरोचनदीपनम् ॥
तद्वदामलकंपथ्यंमधुराम्लरसंसरम् ॥ १८

अर्थ:- डाळिंब, ग्राहि, त्रिदोष शामक, हृदयास प्रिय, रुचिप्रद दीपन असें आहे. आंवळा पूर्वी सांगितलेले गुण असून, हितकारक, गोड, आंबट, सारक असा आहे.

दोषकृल्लकुचंस्वादुपित्तघ्नंमृगलेंडिकम् ॥

अर्थ:- रानफणस दोषकारक, गोड असा आहे. मृगलेंडिक पित्तशामक आ-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

गुल्मवातकफश्वासकासघ्नंबीजपूरकम् ॥१९॥

अर्थ:- महाळुंग, गुल्म, वात, कफ, श्वास, खोकला यांचा नाश करणारें आहे.

चाराक्षारुष्करांतस्थंहृष्यंपित्तानिलाग्निजित् ॥

अर्थ:- चारोळ्या, बेहडा, बिब्बा यांचा मगज पित्त, वायु, अग्नि यांचा शामक आहे.

द्राक्षापरूषकाम्राद्यमामंपित्तकफप्रदम् ॥२०॥

अर्थ:- द्राक्ष, फालसा, आंबा इत्यादिक हिरवें फळ, पित्त आणि कफ यांचें जनक आहे.

द्राक्षामधुकखर्जूरकाश्मर्यसपरूषकम् ॥
वातपित्तास्रजिद्धृष्यंकेशघ्नंचशमीफलम् २१

अर्थ:- द्राक्ष, ज्येष्ठीमध, खजूर, शिवणीचें फळ, फालसा हीं हृष्य आणि वात, पित्त, रक्त, यांचीं नाशक आहेत. आणि शमीचें फळ केशनाशक आहे अ० जा०

अल्पसिक्थाभवेत्पेयाबहुसिक्थाविलेपिका ॥ स्फुनिषिक्थोभवेन्मंडःप्रभूतस्तोदनःस्मृतः ॥२२॥

अर्थ:- ज्यांत बारीक बारीक शितें असतात ती पेया जाणावी. जिला कण्हेरीअसें ह्मणतात. ज्यांत पुष्कळ शितें असतात ती विलेपिका जाणावी. ज्याला आटवल ह्मणतात. ज्यांत मुळींच शीत नाहीं तो मंड जाणावा. ज्याला कोळअसें ह्मणतात. केवळ शितेंच ज्यांत असतात ती ओदन जाणावा. ज्याला भात असें ह्मणतात.

मंडश्चतुर्दशगुणेतोयेसिद्धोप्यसिक्थकः ॥ पेयासिक्थयुतासिद्धाचतुर्दशगुणेंभसि २३ विलेपीघनसिक्थास्यात्सिद्धातोयेचतुर्गुणे ॥ मंडपेयाविलेपीनामोदनस्यचलाघवम् २४

अर्थ:- एकपट तांदुळ व चवदापट पाणी यांपासून सिद्ध होतो आणि ज्यांत शितें नाहींत तो मंड. एकपट तांदूळ आणि चौदापट पाणी यांपासून सिद्ध होणारी, जींत अल्प शितें असतात ती पेया. एकपट तांदूळ आणि चौपट पाणी यांपासून सिद्ध होणारी जींत पुष्कळ शितें असतात ती विलेपी; मंड, पेया, विलेपी यांमध्यें ओदन लघु ह्मणजे हलका असेंजाणावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

यथापूर्वंशिवस्तत्रमंडोवातानुलोमनः॥ तृट्दाहग्लानि
दोषघ्नः पाचनो धातुसाम्यकृत् ॥ २५ ॥ स्रोतोमार्दवकृ
त्स्वेदीसंधुक्षयतिचानलम्

अर्थः- मंड, पेया, विलेपी आणि ओदन हे यथापूर्व ह्म० ओदनापेक्षां विलेपी ल-
घु, विलेपीपेक्षां पेया लघु असें जाणावें. त्यांत मंड वाताला सरविणारा, तृषा, दा-
ह, ग्लानि यांचा दोषनाशक; पाचन, धातु साम्य करणारा, स्रोत ह्मणजे अन्न व
मल इत्यादिकांचे मार्गास मृदुत्व देणारा, स्वेदक असून अग्नीस प्रदीप्त कर०आ०

क्षुत्तृष्णाग्लानिदौर्बल्यकुक्षिरोगज्वरापहा २६
मलानुलोमनीज्ञेयापेयापाचनदीपना ॥ ७ ॥

अर्थः- क्षुधा, तृषा, ग्लानि, दुर्बलता, कुक्षिरोग, ज्वर यांची नाशक, मलाचें अनु
लोमन, पाचन, दीपन यांतें करणारी अशी पेया आहे.

विलेपीग्राहिणीहृद्याज्ञेयापाचनदीपनी॥२७॥

अर्थः- विलेपी ही ग्राहक, हृदयास प्रिय, पाचक आणि दीपक अशी आहे॥७

व्रणाक्षिरोगसंशुद्धदुर्बलस्नेहपायिनाम्॥सु-
धौतः प्रश्रुतः स्विन्नस्त्यक्तोष्माचौदनोलघुः॥२८॥

अर्थः- भात स्वच्छ धुतलेल्या तांदुळांचा, पेज काढलेला, मऊ, निवालेला, कि-
चित् उष्णा असा व्रण झालेला, अक्षिरोगी, रेचादिकें करून शुद्ध झालेला, दुर्ब-
ल आणि स्नेह प्यालेला इतक्यांस (लघु) हितावह आहे.

मौद्गस्तूपथ्यः संशुद्धव्रणकंठाक्षिरोगिणाम्

अर्थः- मुगांचें कढण रेचादिकें करून शुद्ध, व्रण झालेला, कंठरोगी, अक्षिरोगी
इतक्यांस हितावह आहे.

वातानुलोमीकौलित्योगुल्मतूनिप्रतूनिजित्२९

अर्थः- हुलग्याचें कढण वायूला अनुलोम करणारें गुल्म, तूनि, प्रतूनि-(मलाशय
व मूत्राशय यांपासून जी वेदना टोंचीत गुदापर्यंत जाते ती तूनि आणि गुदापा
सून मलाशयापर्यंत जी वेदना उलटी येते ती प्रतूनि.) यांचें नाशक आहे. इति पं०वर्गः

मूत्रंगव्यंतथाजंमनुजभवमपिस्वेदकंडूविनाशंतिक्तं
तीक्ष्णंलघूष्णंसलवणकटुरसंपित्तलंमेदरूक्षम् ॥ हृ
द्यं रुच्यंकृमिघ्नंहुतवहजननंकुष्ठमेदोविनाशंगुल्मा
र्शोनाहशूलोदरकफविषजिच्छोफपांडुप्रणाशम्१

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- गाय, बैल, शेळी, बोकड, मनुष्य इतक्यांचें मूत्र, घाम, कंडू यांचें नाशक. कडू, तीक्ष्ण, लघु, उष्ण, खारट, रूक्ष, पित्तकारक, मेदी, रूक्ष, हृद्य, रुचिकारक, कृमिनाशक, अग्निजनक, कुष्ठ, मेद, गुल्म, अर्श, अनाह, शूल, उदर, कफ, विष, शोफ, आणि, पांडु, इतक्यांचें नाशक आहे असें जाणावें. इतिमू. व.

पित्तोत्तरेपित्तरोगेपित्तास्रकफपित्तयोः॥ मूर्छाछर्दिज्वरेदाहेतृष्णातीसारपीडिते॥१॥ धातुक्षीणेविषार्तेचसन्निपातेविशेषतः॥ शस्तंविरोधिरोगेचशृतशीतंजलंसदा॥२॥

अर्थ:- तापून थंड झालेलें जल पित्ताधिकरोग, पित्तरोग, पित्तरक्त, कफपित्त व मूर्छा, ओकारी, ज्वर, दाह, तृषा, अतिसार, धातुक्षय, विष व सन्निपात पीडा, विरोधिरोग इतक्यांचे ठायीं प्रशस्त आहे. इति शृतशीतोदगुणाः॥

पार्श्वशूलेप्रतिश्यायेवातरोगेगलग्रहे॥ आध्मानेस्तिमितेकोष्ठेसद्यःशुद्धौनवज्वरे॥ हिक्कायांस्नेहपीतेच शीतांबुपरिवर्जयेत्॥३॥

अर्थ:- बरगड्यांतील शूल, पडसें, वातजन्यरोग, गळचोंडें, पोट फुगणें, स्तब्ध कोष्ठ, रेचादिकें करून नुकाच शुद्ध झालेला, नवज्वर, उचकी, स्नेहपान केलेला पित्त इतक्यांचे ठायीं थंड पाणी देऊं नये. इति शीतोदक गुणाः॥

गुल्मार्शोग्रहणीक्षयेषुजठरेमंदानलाध्मानकेशोफेपांडुगलग्रहेव्रणगदेमेहेचनेत्रामये॥ वातारुच्यतिसारकेकफयुतेकुष्ठेप्रतिश्यायकेउष्णंवारिसुशीतलंहितकरं स्वल्पंप्रदेयंबुधैः॥१॥

अर्थ:- गुल्म, मुळव्याध, संग्रहणी, क्षय, उदर, मंदाग्नि, पोट फुगणें, शोफ, पांडु, गळचोंडें, व्रण, मेह, नेत्ररोग, वायु, अरुचि, अतिसार, कफ, कुष्ठ, पडसें इतक्यांचे ठायीं तापवून निवालेलें पाणी स्वल्प प्यालें असतां हितकारक आहे. इतिउष्णशीतो.

अजीर्णेचौषधंवारिजीर्णेवारिबलप्रदम्॥ भोजनेचामृतंवारिशत्रौवारिविषोपम्॥२॥

अर्थ:- खाल्लेल्या अन्नाचें पाचन होण्या करितां पाणी हें औषध आहे. अन्न जिर-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ल्यावर बळ देणारें आहे, भोजनांत अमृत आहे आणि रात्रीस विषतुल्य आहे.

पिबेद्घटसहस्रंतुयावन्नास्तमितोरविः॥अ
स्तंगतेदिवानाथेबिंदुरेकोघटायते॥२॥

अर्थ:- जों पर्यंत सूर्य अस्तास गेला नाहीं तों पर्यंत सहस्र घागरी पाणी प्यावें, सूर्यास्त झाल्यावर एक बिंदु घागरीप्रमाणें होतो.

तप्तायःपिंडसंसिक्तंलोष्ठनिर्वापितंजलम्
सर्वदोषहरंपथ्यंसदानैरुज्यकारकम्॥३॥

अर्थ- तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यावर ओतलेलें आणि मातीचें ढेकूळ तापवून विझविलेलें असें दोन प्रकारचें पाणी त्रिदोषशामक, पथ्य, निरोगी करणारें असें आहे.

उशीरमांस्योचकचूरमेलालवंगकंकोलस
वारिकोष्ठम्॥हरीतकीगंधमिदंसमंचजला
धिवासःपृथिवीश्वराणाम्॥४॥

अर्थ- वाळ्याचें मूळ, जटामांसी, कचोरा वेलदोडे लवंग कंकोळ नागरमोथे, कोष्ठ, हरीतकी व चंदन हीं समभाग घेऊन राजेलोकांच्या पिण्याच्या पाण्यास वासलावावा.

इतिजलवर्गः

गोःक्षीरमनभिष्यंदिस्निग्धंगुरुरसायनं॥
रक्तपित्तहरंशीतंमधुरंरसपाकयोः॥१॥

अर्थ- गायीचें दूध स्रोतस्राव न करणारें, स्निग्ध, गुरु, रसायन, ह्मणजे जराव्याधिनाशक, रक्तपित्तनाशक थंड रसकाळीं आणि पाककाळीं मधुर असें आहे॥१॥

गव्यतुल्यगुणंत्वाज्यंविशेषाच्छोषिणेहितम्॥दीपनंलघुसंग्राहिविशेषाच्चापरंशृणु॥२॥अजानामल्पकायत्वात्कटुतिक्तनिषेवणात्॥नात्यंबुपानाच्छ्यायामात्सर्वव्याधिहरंपयः॥३॥

अर्थ- शेळीचें दूध गुणानें गायीच्या दुधासारखें असून विशेषें करून क्षयरो-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ग्याम हितकारक, दीपन, लघु, हगवण बंद करणारें असें आहे. मुख्यत्वें करून या चें कारण असें आहे कीं, शेळ्यांचें शरीर लहान असून त्या निरवट कडू या पदार्थांचें भक्षण करितात. पाणी फार पीत नाहींत. व्यायाम करितात. इतक्या कारणांनीं त्यांचें दूध सर्व व्याधिनाशक आहे असें जाणावें.

महाभिष्यंदिमधुरंमाहिषंवन्हिनाशनम् ॥
निद्राकरंशीतकरंगव्यात्स्निग्धतरंगुरु ॥४॥

अर्थ- म्हशीचें दूध स्रोतःस्राव करणारें, गोड, अग्निमंद करणारें, निद्रा व शैत्यकरणारें आणि गायीच्या दुधापेक्षां अत्यंत स्निग्ध व गुरु (जड) असें आहे. ॥७॥

इतिक्षीरवर्गः

गव्यंचदीपनंतक्रंमेध्यमर्शास्त्रिदोषनुत् ॥
माहिषंश्लेष्मलंतक्रंसांद्रंशोफकरंगुरु ॥१॥

अर्थ- गायीचें ताक, दीपन, बुद्धिप्रद, मुळव्याध, त्रिदोष, यांचें नाशक असें आहे.

स्रस्निग्धंछागलंतक्रंलघुदोषत्रयापहम्
गुल्माशोर्ग्रहणीशोफपांड्वामयविनाशनं २

अर्थ- शेळीचें ताक अति स्निग्ध लघु (हलकें), त्रिदोष शामक; गुल्म, मुळव्याध, संग्रहणी, शोफ व पांडु यांचें नाशक आहे.

घोलंमारुतपित्तहारिमथितंवातापहंश्लेष्मलंसिन्नश्लेष्मविनाश्युदश्विदधिकंतक्रंत्रिदोषापहम् ॥ मंदाग्नावरुचौतथैवनितरामन्येषुरोगेष्वपिश्रेष्ठंतक्रमिदंवदंतिमुनयस्तेनोत्तमंप्राणिनाम् ॥ ३ ॥

अर्थ- घोल म्हणजे पाणी घातल्यावरीज दहीं घुसळून लोणी न काढतां जें करावें तें ज्याला मट्ठा असें म्हणतात, हा वायु आणि पित्त यांचा हारक आहे. मथित म्हणजे पाणी घातल्या खेरीज दहीं घुसळून लोणी काढून घेऊन जो मट्ठा करावा तो; हा वात, कफ यांचा हारक आहे. उदश्वित् म्हणजे दह्यांचे बरोबरीनें पाणी घालून घुसळून लोणी काढून जें ताक करावें तें. हें पित्त, कफ यांचें हारक आहे. तक्र म्हणजे दह्यांच्या तिप्पट पाणी घालून घुसळून लोणी काढून जें ताक करावें तें. हें सर्वांत श्रेष्ठ, त्रिदोषशामक, मंदाग्नि, अरुचि, इ

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

त्यादि सर्व रोगांवर प्रशस्त असें मुनि ह्मणतात. म्हणून हें प्राण्यास उत्तम आ॰

वातेम्लंसैंधवोपेतंस्वादुपित्तेसशर्करम् ॥
पिबेत्तक्रंकफेचाग्निव्योषक्षारसमन्वितम्॥४

अर्थ- वायूवर आंबट आणि सैंधवयुक्त असें तक्र प्यावें. पित्तावर मधुर आणि शर्करायुक्त असें तक्र प्यावें. कफावर चित्रक, सुंठ, मिरीं, पिंपळी, सैंधव इतक्यांनीं युक्त असें तक्र प्यावें.

तक्रालघुतरोमंथ्यः कूर्चिकादधितक्रवत् ॥
गोजामहिषिकांतक्रेतद्वद्गुणाःपृथक्५

अर्थ- मंथ ह्मणजे दह्यांतून काढलेलें पाणी हें तक्रापेक्षां अत्यंत लघु (हलकें) आहे. कूर्चिका ह्मणजे दुधांत दहीं घालून तापवून करितात ती. गुणानें दहीं आणि ताक यां प्रमाणें आहे. गायीच्या, शेळीच्या, महिषीच्या तक्राचे जे गुण सांगितले तेच त्यांचे त्यांचे दह्याचे जाणावे.

इतिदधितक्रगुणाः

गव्यंवामाहिषंवापिनवनीतंनवोद्धृतम्॥शस्यतेबालवृद्धस्यबलकृद्धातुवर्धनम्॥१॥शीतंबलाढ्यंमधुराम्लवृष्यंश्लेष्मापहंपित्तमरुत्प्रणाशम्॥शोषक्षयक्षीणकृशातिवृद्धबालेषुपथ्यंनवनीतमुक्तम्॥२॥ ७॥ ७

अर्थ- गायीचें किंवा ह्मशीचें ताजें लोणी बालकाला किंवा वृद्धाला बल देणारें, धातुवर्धक असें आहे. आणि शीत, बलप्रद, गोड, आंबट, वृष्य (पौष्टिक), कफ, पित्त, वायु यांचें नाशक आणि शोषी, क्षयानें क्षीण, कृश, अतिवृद्ध, बाल इतक्यांस हितकारक असें आहे.

इतिनवनीतगुणाः

सर्पिर्गवांचाप्यमृतंविषघ्नंचक्षुष्यमारोग्यकरंचवृष्यं॥
रसायनंमंदमतीवमेध्यंस्नेहोत्तमंचेतिबुधाःस्तुवंति॥१

अर्थ- गायीचें तूप अमृत तुल्य, विषनाशक, नेत्रांस हितकारक, आरोग्य करणारें, वृष्य, रसायन सौम्य, अतिशुद्ध, स्नेहामध्यें श्रेष्ठ असें आहे म्हणूनच याची पंडित स्तुति करतात.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सर्पिर्माहिषमुत्तमंधृतिकरंसौख्यप्रदंकांतिदंवातश्लेष्म-
निबर्हणंबलकरंवर्णप्रसादक्षमम्॥ दुर्नामग्रहणीवि-
कारशमनंमंदानलोद्दीपनंचक्षुष्यंनवगव्यतःपरमिदं
हृद्यंमनोहारिच२॥

अर्थ:- म्हशीचें तूप उत्तम, धैर्यकर, सौख्यप्रद, कांतिकर, वायु व कफ यांचें नाशक, बलप्रद, वर्ण स्वच्छ करण्या विषयीं समर्थ, मुळव्याध, संग्रहणी यांचें नाशक अग्निदीपन, नेत्रांला हितकर, गायीच्या नव्या तुपापेक्षां हृद्य, मनोहर असें आहे.

दीपनीयमजासर्पिश्चक्षुष्यंबलवर्धनम्॥
कासेश्वासेक्षयेवापिपथ्यंपानेषुतल्लघु॥३

अर्थ:- शेळीचें तूप अग्निदीपक, चक्षुष्य, बलवर्धक, खोकला, श्वास, क्षयरोग, इतक्यांचे ठायीं पथ्य व पिण्यास लघु म्हणजे हलकें आहे

॥इतिघृतवर्गः॥

त्रिदोषघ्नंमधुप्रोक्तमन्यत्स्यात्सन्निपातहम्॥
हिक्काश्वासकृमिच्छर्दिमोहतृष्णाविषापहं१

अर्थ:- मध, वात, पित्त, कफ, सन्निपात, उचकी, श्वास, कृमि, ओकारी, मोह, तृषा, व विष यांचा नाशक आहे.

इतिमधुगुणाः

शर्करासमवीर्यस्तुदंतनिष्पीडितोरसः॥गु-
रुर्विदाहिविष्टंभीयांत्रिकस्तुप्रकीर्तितः॥१

अर्थ:- दांतांनीं चावलेल्या उंसाचा रस वीर्यानें साखरेसारखा थंड आहे. आणि चरकांत पिळलेल्या उंसाचा रस गुरु (जड), विदाही व विष्टंभी (अवरोधक) असा आहे.

सक्षारोमधुरोऽतिमूत्रबहुलोरक्तस्यसंशोधनोमेदोहा-
निकरोतिपित्तशमनोवातघ्नविष्टंभनः॥श्लेष्माणंजन
यंश्चबृंहणकरोबल्यःसदास्वास्थ्यकृच्छोषघ्नोविषहा-
स्रपित्तशमनःसेव्योविरेकेसदा२

अर्थ:- क्षारयुक्त, मधुर, अतिमूत्रकर, रक्तशोधक, मेदोनाशक, अत्यंत पित्तशामक, वातहारक, अवष्टंभ करणारा, कफजनक, पुष्टिकारक, बलप्रद, सर्वदां स्वस्थता करणारा, शोष शमविणारा; विष, पित्त, रक्त यांचा नाशक आणि रेचन

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

घेतल्यावर सेवन करण्यास योग्य असा ऊंस आहे. या प्रकारें ऊंसाचे गुण जा॰

इतिइक्षुगुणाः

विण्मूत्रामयनाशनोग्निजननः कंडूप्रमेहांतकृत्स्निग्धः
स्वादुतरोलघुश्रमहरः पथ्यः पुराणोगुडः ॥

अर्थ:- जुना गूळ हगवण, बहुमूत्र यांचा नाशक, अग्निजनक, कंडूप्रमेह, यांचा नाशक, स्निग्ध अत्यंत गोड, लघु, श्रमहारक, आणि पथ्य असा आहे. ७

दाहंनिवारयतिपित्तमपाकरोतितृष्णांछिनत्तिविनिहंतिचमोहमूर्छाम् ॥ शोषंविनाशयतिशोधयतींद्रियाणि
शीतासदासमधुरारवलुशक्रूरखंडा ॥ २ ॥

अर्थ:- खडीसारवर दाह, पित्त, तृषा, मोह, मूर्छा, शोष इतक्यांची नाशक आणि इंद्रियें शक्रू करणारी शीत व मधुर अशी आहे.

मूर्छामोहतृषास्यशोषशमनी दाहज्वरध्वंसनीश्वासच्छर्दिमदात्ययक्लमहरीहृद्याचसंतर्पणी ॥ क्षीणेरेतसिपावकेचविषमेक्षीणेक्षतेदुर्बलेदुर्वारेपिचरक्तपित्तकगदेसेव्यासिताशर्करा ३

अर्थ:- पांढरी पिठी सारवर, मूर्छा, मोह, तृषा, तोंडाची कोरड, दाह, ज्वर, श्वास, ओकारी, मदात्यय, (मद्यादिकांच्या अतिसेवना पासून होणारा रोग), ग्लानि, यांची नाशक, हृदयप्रिय, तृप्तिकारक असून क्षीण धातु, विषमाग्नि, अति दुर्बलपणा, क्षत, अशक्तता, दुर्वार रक्तपित्त इतक्यांचे ठायीं सेवन करण्यास योग्य आहे ॥ ७॥

इतिगुडखंडसितशर्करागुणाः

कंडूहरंकांतिविवर्धनंचवर्चोविवृद्धिंतनुरोपणंच ॥ कृमिंनिहन्याद्बलशक्रकारितेलंकृतश्लेष्मरुत्प्रणाशं १

अर्थ:- तिळांचें तेल कंडूहारक, कांति वाढविणारें, बलवृद्धि करणारें, शरीरास साफ करणारें, कृमिनाशक; बल, शक्र यांतें करणारें, कफकारक व वायु नाशक असें आहे.

कटूष्णंसार्षपंतैलंकफशक्रानिलापहम् ॥
लघुचोष्णंसकृत्स्पर्शाल्कुष्ठार्शोव्रणजंतुजित् २

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- शिरसांचें तेल तिखट,उष्ण,कफ,शुक्र,वायु यांचें नाशक,व लघु आहे. तें उष्ण करून लावलें असतां कुष्ठ,मूलव्याध,व्रण,जंत यांचें नाशक आहे.

एरंडतैलंकृमिनाशनंचसर्वत्रशूलभ्रमरुत्प्रणाशम्॥
कुष्ठापहंचापिरसायनंचपित्तप्रकोपानिलशोधनंच ३

अर्थ:- एरंडेल कृमि,शूल,वात,कुष्ठ,यांचें नाशक;रसायन,पित्तकोप व वायुयांचें शोधक असें आहे.

॥वर्ध्मगुल्मानिलकफानुदरंविषमज्वरम्॥
॥वातशूलगजेंद्राणामेरंडस्नेहकेसरी॥४॥

अर्थ:- अंडवृद्धि,गुल्म,वात,कफ,उदर,विषमज्वर यांचें नाशक.वातशूल हेच गजेंद्र ह्मणजे हत्ती यांला एरंड तेल हा सिंह आहे.

आमवातगजेंद्रस्यशरीरवनचारिणः॥ए
कएवाग्रणीर्हंताएरंडस्नेहकेसरी॥ ५॥

अर्थ:- आमवात हाच गजेंद्र ह्मणजे हत्ती तो कसा कीं, शरीर हेंच वन ह्मणजे अरण्य याचे ठायीं संचार करणारा याला मुख्य हनन करणारा एरंडाचा स्नेह ह्मणजे तेल हा केसरी ह्मणजे सिंह आहे.

कटीतटनिकुंजेषुसंचरन्वातकुंजरः॥ए-
रंडतैलसिंहस्यगंधमाघ्रायगच्छति॥६

अर्थ:- कंबरेचा प्रदेश हाच निकुंज ह्मणजे जाळी याचे ठायीं संचार करणारा वात हाच कुंजर ह्मणजे हत्ती तो,एरंडाचें तेल हाच सिंह याचा गंध घेऊनजा॰

इतिएरंडतैलं

॥सर्वधान्यसमावर्त्तजातानिफलजानिच॥
॥तैलवत्तानितल्लेपःखर्जूकंडूविनाशनः॥१॥

अर्थ:- सर्व धान्यें एकत्र करून त्यांपासून काढलेला स्नेह आणि फलांपासून काढलेला स्नेह हे तेला सारिखे गुणकारी आहेत.यांचा लेप खरूज व कंडू यांचा नाशक आहे. ॥इतितैलवर्गः॥

॥व्रणशोधनसंधानंरोपणंवातलंमध॥त्रि-
दोषघ्नंमधुप्रोक्तंछर्दिश्वासविषापहम्॥१॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- मद्य व्रणशोधक, संधानकारक ह्मणजे हाड वगेरे सांधणारें, जखम भरून आणणारें वातुळ असें आहे. आणि मद्य त्रिदोष ओकारी श्वास व विष यांचा नाशक आहे.

इतिमद्यगुणाः

अथवमनम्

गुडेनतुल्यकंदद्यादुष्णंवारिपिबेन्मुहुः॥पी-
त्वाराठकषायंवासिंधुकृष्णासमन्वितं॥वमेत् १

अर्थ:- गुळाबरोबर शुद्ध केलेलें मोरचूत द्यावें. आणिवरवारंवार ऊन पाणी प्यावयास द्यावें. ह्मणजे ओकारी होईल. अथवा गेळफळाचा काढा सैंधव आणि पिंपळी याणीं युक्त करून द्यावा म्हणजे ओकेल असें जाणावें.

रंगंटंकणतुल्यानिमर्दयेद्वटिकात्रयम् ॥ जीमूतिफ-
लतोयेननीलकंठोभषेद्रसः॥२॥ सशर्करंवल्लयुग्मंछर्द
नाज्वरंनाशनम्॥ पित्तादींश्चज्वरश्वासहिध्माकासादि
दोषजित्॥३

अर्थ:- (रसगंधक टंकण तुत्थ देवडांगरी फलरसेन मर्दनं) पारा, गंधक, मोरचूत ही शुद्ध घेऊन देवडांगरीच्या फळाचे रसांत तीन घटिका खलावीं. ह्मणजे हा नीलकंठ-संज्ञक रस होतो. नंतर दोन दोन वाल प्रमाणाच्या गोळ्या करून साखरे बरोबर एक गोळी घ्यावी. ह्मणजे वमन होऊन, पित्त, कफज्वर, श्वास, कास, इत्यादि दोष दूर होतात. मूलामध्यें (रंगं) असें आहे त्याचा अर्थ (रं) शब्दें करून रस. (गं) शब्दें करून गंधक घेऊन रसगंधक असा केला आहे. तोच अर्थ प्राकृतांत पारागंधक असा केला आहे असें जाणावें.

॥इतिनीलकंठवमनम्॥

॥अथरेचनम्॥

॥त्रिवृत्सैंधवशुंठीनांचूर्णमुष्णांबुरेचनम्॥
॥व्योषदंतित्रिवृत्पथ्यानीलीनिर्गुंडिकाथवा॥

अर्थ:- पांढरें तेड, सैंधव, सुंठ या तिहींचें चूर्ण उष्ण पाण्या बरोबर द्यावें म्हणजे रेच होतील. अथवा सुंठ, मिऱ्यें, पिंपळी, दंतिमूळ, तेड, हिरडा, नील आणि निर्गुंडी इतक्याचें चूर्ण ऊन पाण्यांत द्यावें म्हणजे रेच होतील.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

हरीतकीभिः क्वथितं कषायं दंत्यग्निकृष्णाविडचूर्णमिश्रम्॥ विरेचनं तद्बुतैलमिश्रं निरत्ययं योज्यमथामयघ्नम्॥ २॥

अर्थ:- बाळहिरड्यांचा काढा, दंतिमूळ, चित्रक, पिंपळी, बिडलोण, इतक्या चूर्णानीं मिश्रित करून त्यांत एरंडतेल घालून घ्यावा. ह्मणजे रेच होईल. हा रेच विकार न करितां रोगनाशक आहे.

रसगंधं च मरिचं टंकणं नागराभया॥ जेपाल बीजसंयुक्तं क्रमेणाद्विगुणं भवेत्॥ ३॥ मर्दयेद्दंतिनीरेण तिच्छाभेदीरसः स्मृतः॥ वल्लद्वयप्रमाणेन पिबेच्चोष्णोदकं मुहुः॥ ४॥ रेचनं ज्वरगुल्मस्य वातशूलनिवारणम्॥ ५॥

अर्थ:- पारा, गंध, मिऱ्यें, टाकणखार, सुंठ हिरडा जेपाळ हीं औषधें क्रमानें द्विगुणित घ्यावीं. ह्मणजे पारा एकभाग, गंधक दोन भाग, मिऱ्यें चार भाग या प्रमाणें घेऊन दंतिमूलाचे काढ्यांत खल केल्यानें हा इच्छाभेदी रस होतो. तो दोन वाल प्रमाणानें द्यावा. वर वारंवार ऊन पाणी प्यावयास द्यावें. ह्मणजे रेच होतील. आणि ज्वर गुल्म वात शूल यांचें निवारण होईल. ७

इति इच्छाभेदीरसः.

रसभागो भवेदेको गंधं च द्विगुणं भवेत्॥ टंकणस्य त्रयो भागाः शृंगवेरं च तुर्गुणम्॥ १॥ मरीचं पंचभागं च षट्भागा च हरीतकी॥ जेपालं सप्तभागं स्यात् सूक्ष्मचूर्णानि कारयेत्॥ २॥ भृंगराजरसेनैव खल्वे निक्षिप्य मर्दयेत्॥ चणप्रमाणा वटिका गुडेन सह भक्षयेत्॥ ३॥ उष्णांसे कादिकं कुर्यादुष्णं वारि पिबेन्मुहुः॥ आमांतरेचनं कुर्यादजीर्णज्वरनाशनम्॥ ४॥ जलोदरं कामलां च शोफशूलविनाशनम्॥ रसश्चिंतामणिः ख्यातः शूलपांडूदरं हरेत् ५

अर्थ:- एक भाग पारा, दोन भाग गंधक, तीन भाग टांकणखार, चार भाग सुंठ, पांच भाग मिऱ्यें, सहा भाग हरीतकी, सात भाग जेपाळ हीं औषधें घेऊन बारीक चूर्ण करून माक्याच्या रसांत खलामध्यें खलून चण्या प्रमाणें

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

गोळ्या कराव्या. गुळा बरोबर एक गोळी भक्षण करावी. नंतर ऊन पाण्याचे पोचंड्याने वगैरे शेकावें. वारंवार ऊन पाणी प्यावें. ह्मणजे आंव पडे तों पर्यंत रेच होतील. आणि जलोदर, कामीण, सूज, निडीक, पांडू, उदर, शूल, यांचा नाश होईल. याला चिंतामणि रस असें ह्मणतात.

इति चिंतामणिरसः

स्तंभनंरेचनांतेचदध्योदनघृतोदनम्॥ अहिफेनोथवानंदभैरवोवानियोजयेत्॥१॥

अर्थ:- रेच पुरेसे झाल्यावर दहींभात किंवा तूपभात खावा. अथवा अफु खावी. अथवा आनंदभैरव मात्रा खावी.

अथनस्यम्

नस्यंविधेयंगुडनागरेणजलेनवासैंधवपिप्पलीनाम्
घ्राणास्यमन्याहनुबाहुपृष्ठशिरोक्षिकंठश्रवणामयेषु१

अर्थ:- आल्याचे रसांत गूळ घालून नाकांत घालावा. अथवा पिंपळी आणि सैंधव पाण्यांत उगाळून नाकांत घालावें. त्याला नस्य असें ह्मणतात. हें नस्य नाक, तोंड, मान, हनवटी, बाहु, पाठ, डोकें, डोळे, गळा आणि कान इतक्या ठिकाणीं रोग झाला असतां करावें.

नस्यनिषेधः

भुक्तवत्यथवास्नातेनस्यंयोज्यंनकर्हिचित्
कृतेनस्येशिरःस्नानंरोगादींश्चवियोजयेत्१

अर्थ:- नस्य जेवल्यावर किंवा स्नान केल्यावर लागलेंच घालूं नये. आणि नस्य घातल्यावर डोक्यावरून स्नान करूं नये. केले असतां रोगादिक उत्पन्न होतील.

अथरक्तस्रावः

रक्तप्रभावात्प्रभवंतिरोगास्तद्दूषितादूषयतेज्वरादीन्॥तन्मोक्षणंतुंबिकयाचशृंग्याजलौकयावापिशिराविमोक्षात्१॥

अर्थ:- रक्ताच्या आधिक्याने रोग उत्पन्न होतात. ते दुष्ट झालें असतां ज्वरादिक रोग उत्पन्न करितें. ह्मणून भोंपळा किंवा शिंग किंवा जळवा किंवा

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

शिरावेध इतक्या प्रकारांतून जो जेथें योग्य असेल त्या प्रकारानें रक्तकाढा:

इतिरक्तस्राव:

इतिचिकित्सासारेवैद्यकौशल्यंसमाप्तम्॥७

अथरसोपरसशोधनमारणगुणाधिकार:॥

कुमारीत्रिफलाव्योषचित्रकंनिंबुकंरसम्
दिनेकंमर्दितंकृत्वाशुद्धोभवतिपारद:॥१

अर्थ:- कोरफडीचा रस, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिऱ्यें, पिंपळी, आणि चित्रक यांचा काढा, लिंबुरस, पारा यांचा एक दिवस खल करावा. म्हणजे पारा शुद्ध होतो.

कर्कोटीमुसलीकन्याद्रवंदत्वाविशोधयेत्

अर्थ:- कर्टोलीचा रस, सफेद मुसळीचा काढा, कोरफडीचा रस इतक्यांबरोबर पारा खलावा म्हणजे शुद्ध होतो.

कुमार्याचनिशाचूर्णैर्दिनमध्येविशोधयेत् २

अर्थ:- कोरफडीचा रस, हळदीची भुकटी यांच्या बरोबर अर्धा दिवसपर्यंत पारा खलावा म्हणजे शुद्ध होतो.

कुरंटकांबुसंयोगादातपेमर्दयेद्रसम्॥शुद्धोभवेत्ततःसूतःसर्वकार्याणिसाधयेत्॥३

अर्थ:- कोरांट्याच्या पाल्याच्या रसाबरोबर उनामध्यें पारा खलावा म्हणजे शुद्ध होईल, आणि सर्व कार्यांत उपयोगीं पडेल. इति पारद शुद्धि:॥

सदुग्धभांडेचविलंब्यवस्त्रस्थितंनिरुध्याथबलिंपुटेत॥दुग्धंगतोसौरसजारणायरसेचयोग्यःसकलक्रियासु॥१॥७

अर्थ:- भांड्यांत दूध घालून त्यांत गंधकाची पोचंडी दुधांत बुडेल अशी लोंबती ठेवावी. नंतर तोंड बंद करून तो पचवावा. दुधांत पडेल तो पाऱ्याचे जारणास, मात्रा वगैरे करण्यास योग्य आहे. इतिगंधकशुद्धि:

मेषीदुग्धेनदरदमम्लवर्गेणभावितम्॥सप्तवारंप्रयत्नेनशुद्धिमायातिनिश्चितम्॥१

अर्थ:- मेंढीच्या दुधांत एकवेळ खल करून लिंबु अम्लवेतस वगैरे अम्लवर्गाचे रसांत सातवेळ खलावा. म्हणजे हिंगुळ शुद्ध होतो. इति दरदशुद्धि:॥७

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथतालकशुद्धिः

तालकंपोटलींबध्वासमूत्रेकांजिकेपचेत्॥ दोलायंत्रेण यामैकंततः कूष्मांडजेरसे॥१॥ तिलतैलेपचेद्यामंयामं- चत्रिफलारसे॥ दोलायंत्रेचतुर्यामेवंशुध्य तितालकः२

अर्थ- हरताळाची पोचंडी बांधून दोलायंत्रामध्यें गोमूत्र आणि कांजी एके जागीं मिळवून त्यांत प्रहरभर शिजवावा. नंतर कोहळ्याचे रसांत प्रहर- भर, तिळांचे तेलांत प्रहरभर, त्रिफळ्याचे काढ्यांत प्रहरभर, या प्रमाणें दो- लायंत्रांत चार प्रहर शिजवला असतां हरताळ शुद्ध होतो असें जाणावें.

इतितालकशुद्धिः

जयंतिकाद्रवेदोलायंत्रेशुध्येन्मनःशिला
दिनमेकमजामूत्रेभृंगराजरसेपिवा॥१॥

अर्थ- ऐरणीचे रसांत दोलायंत्रामध्यें मनशिळेची पोचंडी बांधून एक दिवस शिजवावी. नंतर शेळीच्या मुतांत अथवा माक्याच्या रसांत शिज- वावी. म्हणजे शुद्ध होते.

इतिमनःशिलाशुद्धिः

टंकणेनसमंपिष्ट्वाऽथवालघुपुटेपचेत्॥
तुत्थंशुद्धंभवेत्क्षौद्रेपुटितंवाविशेषतः॥१॥

अर्थ- मोरचूत टंकणखाराचे बरोबर खलून लघु पुट द्यावें. अथवा म- धांत खलून लघु पुट द्यावें. म्हणजे शुद्ध होतो.

इतितुत्थशुद्धिः

नरमूत्रेचगोमूत्रेजंभाम्लेचससैंधवम्॥स
प्ताहंत्रिदिनंवापिपक्वंशुध्यतिखर्परम्॥१॥

अर्थ- मनुष्याचें मुतांत किंवा घोड्याचे मुतांत, किंवा गायीच्या मुतांत सा- त दिवस किंवा तीन दिवस कलथापरी भिजत घालावी. मूत रोज नवें अ- सावें. किंवा लघु ईड लिंबाचे रसांत सैंधव घालून सात दिवस किंवा तीन दिवस भिजत घालावी. ह्मणजे शुद्ध होतो.

इतिखर्परशुद्धिः

अगस्तिपत्रनिर्यासैःशिग्रुमूलंसुपेषितम्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तन्मध्येपुटितंशुद्धंनिंबुजाम्लेनपाचितम्१

अर्थ- अगस्त्याचे पानांचा रस काढून त्यांत शेवग्याचें मूळ उगाळून त्याचें पुट माक्षिकास द्यावें. म्हणजे माक्षिक शुद्ध होतें. अथवा लिंबाच्या रसांतभिजवून पक्व करावें. म्हणजे लाल होई तों पर्यंत तापवावें. म्हणजे शुद्ध होतें.

इतिमाक्षिकशु०

गोदुग्धेत्रिफलाक्वाथेभृंगद्रावेश्चमर्दयेत्
आतपेदिनमेकैकंशुष्कंशुध्येच्छिलाजतु॥१

अर्थ- गायीच्या दुधांत, त्रिफळ्याचे काढ्यांत व माक्याच्या रसांत उनामध्यें एक एक दिवस शिलाजिताचा खल करावा. शुष्क झाला म्हणजे शुद्ध होतो. छ

इतिशिलाजतुशुद्धिः

स्वेदयेद्दोलिकायंत्रेजयंत्यास्वरसेनतु॥म
णिमुक्ताप्रवालानितथारत्नान्यशेषतः॥क्ष-
णाद्विविधवर्णानिम्रियंतेनात्रसंशयः॥१

अर्थ- दोलायंत्रामध्यें ऐरणीचा रस घालून हिरा, मोतीं, प्रवाल, इत्यादि संपूर्ण रत्नें यांनां स्वेदन करावें. म्हणजे त्या रसाची वाफ त्यांनां द्यावी. म्हणजे शुद्ध होऊन मारण होतें.

अन्यच्च॥ उक्तमाक्षिकवन्मुक्ताप्रवालानिचमारयेत्
वज्रवत्सर्वरत्नानिशोधयेन्मारयेत्तथा॥ ॥२॥ छ

अर्थ- माक्षिका प्रमाणें मोतीं, प्रवाल यांचें मारण करावें. आणि हिऱ्या प्रमाणें सर्व रत्नांची शुद्धि व मारण करावें.

इतिमणिमुक्ताप्रवालरत्नशुद्धिः

म्लेच्छंस्याद्विमलाम्लसैंधवजलेपक्वंविशुद्धंभवेत्
तुत्थंटंकणसंयुतंसमुदितंक्षौद्रेणवासंयुतम्॥नि
र्दोषंविषतिंदुकंतुषजलेक्षिप्त्वात्रिघस्रंविषंतेनैवा
थबिभीतकस्यनिहितंकुंकुष्ठकंटंकणात्॥१॥छ

अर्थ- तांबें, लिंबादिकांच्या रसांत सैंधव घालून त्यांत भिजत टाकावें. म्हणजे शुद्ध होतें. मोरचूत टाकणखारा बरोबर खलावें अथवा मधाबरोबर खलावें म्हणजे शुद्ध होतें. कुचला, भाताचा कोंडा पाण्यांत घालून

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

त्यांत तीन दिवस भिजत राकावा, ह्मणजे शुद्ध होतो. विष ह्मणजे बचनाग अफु इत्यादिक कुचल्या प्रमाणें शुद्ध होतें. अथवा बेहेड्याच्या काल्यांत भिजत घालावें, म्हणजे शुद्ध होतें. कंकुष्ठ ह्मणजे बाळलेंड हें टांकणाकारानें शुद्ध होतें.

कासीसंटंकणंशंखवराटागेरिकंष्टथक्
नीलांजनंघनंघर्मेशुद्धंस्याज्जंभनीरगं२

अर्थः- हिराकस, टांकणखार, शंख, कवडी, गेरु व सुरमा हीं लिंबाच्या रसांत घालून उनांत ठेवावीं. घट्ट झालीं ह्मणजे शुद्ध होतात असें जाणा.

विद्रुमंमौक्तिकंशुक्तिसौराष्ट्रीचभुजंगमः
इत्याद्यम्लेनशुद्ध्यंस्याच्छुद्धंचोपरसादिकं३

अर्थः- पोंवळें, मोतीं, शिंप, तुरटी, सिसें इत्यादिक अंबटरसानें धुतलीं असतां शुद्ध होतात. आणि उपरसादिक म्हणजे गेरु, शिलाजीत इत्यादिकहीं आम्लरसानें धुतलीं असतां शुद्ध होतात.

जेपालंनिस्तुषंकृत्वादुग्धेदोलायुतंपचेत्
अंतर्जिह्वांपरित्यज्ययुज्याच्चरसकर्मणि४

अर्थः- जेपाळाचें बीं याचा मगज काढून दोलायंत्रांत दुधामध्यें शिजवावा आणि आंतल्या जिह्वा काढून टाकाव्या. म्हणजे शुद्ध होतो असें जा.

इतिउपरसादिशुद्धिः

अथस्वर्णादिधातुशोधनमारणं

स्वर्णतारौताम्रनागौवंगंकांतंचतीक्ष्णकम्॥ मुंडांतमष्टधालोहंकांस्यारंपचकंत्रिधा॥१॥ तैलेतक्रेगवांमूत्रेकांजिकेचंकुलित्थके॥सप्तधातप्तनिर्वापात्सर्वलोहंविशुध्यति२

अर्थः- सोनें, रुपें, तांबें, शिसें, कथिल, कांतलोह, तिखें, लोखंड, हीं आठ प्रकारचीं लोहें; कांसें पांच प्रकारचें, पितळ तीन प्रकारचें, या सर्व धातूंनां लोह असें ह्मणतात. हे सर्व लोह, तेल, ताक, गोमूत्र, कांजी, कुलित्थांचा काढा, या प्रत्येकांत तापवून सातवेळा विझवावें ह्मणजे शुद्ध होतात.

इतिस्वर्णादिधातुशोधनम्.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

स्वर्णपत्रसमंनागभस्मनिंबुजलेपितम् ॥
त्रिवारंवैगजपुटेस्फवर्णभस्मतांव्रजेत् ॥ १

अर्थः- सोन्याचे पत्रे करून त्याचे बरोबर शिशाचें भस्म घेऊन लिंबाच्यारसांत कालवून त्या पत्र्यानां लेप करावा. नंतर तीन वेळ पुट द्यावें ह्मणजे भस्म होतें.

॥ इतिस्फवर्णमारणं ॥

माक्षिकंदरदनिंबुजप्लुतंलेप्यरौप्यदलसं-
चयंपुटेत् ॥ द्वित्रिवारमथभस्मतांव्रजेत्
पातकौघइवशंकरस्मृतेः ॥ १ ॥

अर्थः- माक्षिकभस्म, हिंगुळ हीं लिंबाच्या रसांत कालवून रुप्याचे पातळ पत्र्यांनां लेप करावा. आणि दोन तीन पुटें द्यावी, म्हणजे भस्म होतें. जसें शंकराचे स्मरणानें पातकाचें भस्म होतें.

॥ इतिरौप्यमारणम् ॥

ताम्रपादांशतःसूतंताम्रतुल्यंचगंधकम् ॥ कन्यारसे-
नसंपिष्ट्वाताम्रपत्राणिलेपयेत् ॥ १ ॥ निक्षिप्यहंडि-
कामध्येशरावेणनिरोधयेत् ॥ हंडिकांपटुनापूर्यपचे-
द्यामत्रयंभिषक् ॥ २ ॥ स्वांगशीतंविचूर्ण्यायथवांतिदो-
षविवर्जितम् ॥ अन्यच्च ॥ गंधकत्रिगुणेनाथगज
पुटेनमारणम् ॥ ३ ॥ अन्यच्च ॥ ताम्राद्विगुणभा-
गेनबलिनागजपुटेपचेत् ॥ स्वांगशीतंभवेच्छुद्धंरस
कर्मणियोजयेत् ॥ ३ ॥

॥ इतिताम्रमारणम् ॥ ७

अर्थः- तांब्याचे चतुर्थांश पारा आणि तांब्याचे बरोबर गंधक घेऊन दोघांची कज्जली करून कोरफडीच्या रसांत कालवून तांब्याचे पत्र्यांस लेप करावा नंतर ते पत्रे शरावांत घालून मात कपडा करून एका हंडीमध्येंखालीं वर मीठ घालून तो शराव ठेवावा. नंतर ती हंडी चुलीवर ठेवून तीन प्रहर अग्नि द्यावा. थंड झालें ह्मणजे खलून ठेवावें. वांतिरहित होतें. दुसरा प्रकार- तांब्याचे तिप्पट गंधक घेऊन पूर्वी प्रमाणें कृति करून गजपुट

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

द्यावें स्वांगशीत झाल्यावर खलून ठेवावें. इति ताम्रमारणम् ॥

घोषालवर्तुलैस्ताम्रं सत्वं हन्याच्चयुक्तितः

अर्थ:- कांसें, हरताळ, आणि टांकणखार व तांबें हीं एकत्र करून मुशींत घालून फुंकावें ह्मणजे सत्व निघतें.

सत्वंचरसकादीनांनिहन्यात्ताम्रवत्सदा १

अर्थ:- कलखापरी इत्यादिकांचें सत्व ताम्राचे सत्वाप्रमाणें काढावें. इ. स. म.

ताम्रवद्घोषमारंचशोधयेन्मारयेद्भिषक् ॥

अर्थ:- तांब्याप्रमाणें कांसें आणि पितळ यांचें शोधन आणि मारण करावें.

इतिकांस्यपित्तलमारणं

मनःशिलागंधयुताटरूषतोयप्लुतंनागदलंविमृष्टम्
त्रिभिःपुटैःकुंभमितैःप्रयातिभस्मत्वमेतत्प्रवदंतित-
ज्ज्ञाः॥१॥

अर्थ:- मनशीळ, गंधक हे अडूळशाचे रसांत खलून शिशाचे पत्रे शरूद करून त्यांनां लेप करावा. आणि तीन गजपुटें द्यावीं. ह्मणजे भस्म होतें.

वंगंसार्कपयस्तालसंशुष्कंपुटैस्त्रिभिः
म्रियतेभ्राष्ट्रकेब्रह्मकाष्ठघर्षणयोगतः१

अर्थ:- रुयीच्या चिकांत हरताळ खलून कथिलाचे पत्र्यांना लेप करून शुष्क झालें ह्मणजे खापरांत घालून चुलीवर ठेवून खालीं अग्नि द्यावा आणि पळसाचे लांकडानें घोंटावें अशीं तीन पुटें द्यावीं ह्मणजे वंगभस्म होतें.

पलाशद्रवयुक्तेनवंगपत्राणिलेपयेत्॥
तालेनपुटितंभस्मत्रिवारंजायतेध्रुवम् ३

अर्थ:- पळसाचे रसांत हरताळ खलून कथिलाचे पत्र्यांनां लेप करून तीन पुटें द्यावीं ह्मणजे भस्म होतें.

॥इतिवंगमारणम्॥

कांतंतीक्ष्णंचमुंडंचपत्रीकृत्यप्रयत्नतः॥त्रिफलाक-
ल्कतोयांतस्तप्तंनिर्वापितंपुनः॥१॥यावच्छीर्यंति
पत्राणिकुर्यात्तावदतंद्रितः॥त्रिफलाकल्कसंमिश्रंश-
रावेत्रिश्चवापुटेत्॥२॥लोहंवारितरंतेनजायतेसर्व

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥ रोगजित् ॥ ३

अर्थ:- लोहकांत, पोलाद, लोखंड, या तिहींतून ज्याचें भस्म कर्त्तव्य असेल त्याचे पत्रे करून त्रिफळ्याचे कल्काचे पाण्यांत तापवून विझवावे. जों पर्यंत पत्रे शीर्ण होतील ह्मणजे तुकडे पडतील तों पर्यंत. नंतर तें चूर त्रिफळ्याचे कल्कांत मिश्र करून शरावांत घालून तीन पुटें द्यावीं, ह्मणजे पाण्यावर तरेल असें भस्म होईल. आणि तें सर्व रोगांनां जिंकील.

इतिलोहमारणं

सूक्ष्मचूर्णमयःकिट्टंतापितंखर्परस्थितम् ॥ निर्वापितंतुगोमूत्रेशुद्धंस्यात्त्रिफलापुटैः ॥ १ ॥ सप्तभिर्योजयेद्वैद्योमंडूरोरोगनाशनः ॥

अर्थ:- लोखंडाचे किटाचें चूर्ण बारीक करून खापरांत तापवून गोमूत्रांत विझवावें ह्मणजे शुद्ध होतें. नंतर तें त्रिफळ्याच्या काढ्यांत भिजवून सात पुटें द्यावीं, ह्मणजे रोगनाशक मंडूर होतो तो वैद्यांनीं योजावा.

इतिकिट्टमारणं.

क्षिप्त्वाक्षिप्त्वारनालेतत्तसंकुर्याच्चखर्परे ॥ त्रिःसप्तधापुटंचाथकृत्वाशुध्यतिचाभ्रकः १

अर्थ:- अभ्रकाचे पत्रे खापरांत तापवून कांजींत विझवावे. या प्रमाणें एकवीसवेळा केलें असतां अभ्रक शुद्ध होतो.

भागद्वयंहिशालीनामेकैकंकांजिकाभ्रयोः ॥ गृहीत्वाकर्पटेबध्वाकराभ्यांमर्दयेत्ततः ॥ २ ॥ स्फुटंसजलेपात्रेतलेपतितचूर्णकम् ॥ तस्माद्गृहीत्वायत्नेनशुष्कंधान्याभ्रमुच्यते ३ ॥

अर्थ:- दोन भाग साळी, एक भाग अभ्रक, एक भाग कांजी असें घेऊन फडक्यामध्यें पुरचुंडी बांधून ती पुरचुंडी पातेल्यांत पाणी घेऊन त्यांत हातांनीं रगडून चोळावी. ह्मणजे पातेल्याचे तळास अभ्रकाचें चूर्ण पडतें. तें त्यांतून युक्तीनें घेऊन वाळवावें. त्याला धान्याभ्रक असें ह्मणतात. ४

धान्याभ्रकंरविक्षीरैरविमूलद्रवेणवा ॥ ५ ॥ पिष्ट्वापिष्ट्वापुटेत्वाकात्सप्तधाम्रियतेभ्रकः ४

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- धान्याभ्रक रुईचे चिकांत किंवा रुईचे मुळाचे रसांत खलून पुट द्यावें. अशीं सात पुटें दिलीं असतां अभ्रक मरतो. (दुसरा प्रकार:-)

कृष्णाभ्रंदहनेविशाध्यतिभृशंतत्कांजिकेतापितम्
शक्तंतद्रविवारिणाघनतरंपिष्ट्वादिनांतेपुटेत्॥का-
सघ्नस्वरसेनवाथवरयामूत्रेणभाव्यंपुनर्निश्चंद्रोपि
मृतोभवेल्लघुतरःक्षीरात्पुटैःपंचभिः॥५॥ ७॥ ७

अर्थ:- कृष्णाभ्रक अग्नीमध्यें फार तापवून कांजीमध्यें विझवावा. ह्मणजे शक्त होतो. नंतर शक्त झाल्यावर रुईचे चिकांत पुष्कळ खलून पुट द्यावें. अथवा कासविंद्याचे रसांत खलून पुट द्यावें. नंतर त्रिफळ्याचे काढ्यांत खलून पुट द्यावें. नंतर गोमूत्रांत खलून पुट द्यावें. निश्चंद्र जरी झाला तरी रुईचे चिकांत खलून पांच पुटें द्यावीं. म्हणजे फार सूक्ष्म होतो. असें जाणा.

॥इतिअभ्रकमारणं॥

पलमानंरसंशाध्यंतावन्मात्रंचगंधकम्॥विधिवत्कज्ज
लींकृत्वान्यग्रोधांकुरवारिणा॥१॥भावनात्रितयंदत्वा-
काचकुप्यांनिधापयेत्॥निधायकच्छपीयंत्रेवालुका-
भिःप्रपूरयेत्॥२॥दद्यात्तदनुमंदाग्निंभिषग्यामचतु
ष्टयम्॥जायतेरससिंदूरंतरुणारुणसन्निभम्॥३॥

अर्थ:- चार तोळे पारा शुद्ध घेऊन तितकाच गंधक घेऊन दोघांची कज्जली करून वडाचे अरगड्यांचा रस काढून त्याच्या तीन भावना द्याव्या. नंतर कुपींत भरून ती कुपी वालुका यंत्रांत ठेवून वाळूनें पुरून चार प्रहर मंदाग्नि द्यावा. ह्मणजे सकाळीं जसा सूर्य लाल दिसतो या प्रमाणें लाल रससिंदूर होतो.

(दुसराप्रकार)

रसगंधकयोःकृत्वाकज्जलींसमभागयोः॥नवसा-
गरकंदत्वाकिंचिज्जंबीरवारिणा॥४॥विमर्द्यत्रिदि-
नंयत्नात्कांजिकेनपुनःपुनः॥मृत्कर्पटावृतायांतुका-
चकुप्यांविनिक्षिपेत्॥५॥संरोध्यवालुकायंत्रेसच्छि
द्रेत्रिदिनंपचेत्॥समुद्धरेन्नालकस्थंभस्मेंद्रगोपस
न्निभम्॥६॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः- पारा आणि गंधक समभाग घेऊन त्याची कज्जली करून त्यांत किंचित् नवसागर टाकून लिंबाचा रस आणि कांजी यांचा तीन दिवस पर्यंत खल करून माल्कापड केलेले कुपींत भरून ती कुपी वालुका यंत्रांत पुरून तीन दिवस अग्नि द्यावा. नंतर कुपीचे गळ्याला लागलेला, इंद्रगोप ह्मणून मृगाचे किडे असतात त्यांचे सारखा लाल असतो तो काढून द्यावा.

॥ इतिरससिंदूरः ॥

॥ इतिशोधनमारणादिप्रकारः समाप्तः ॥

अथोपयोगिनांगुणाअगुणाश्च ॥

स्तूतोशुद्धतयागुणंनकुरुतेकुष्ठाग्निमांद्यंकृमिच्छर्द्यारोचकजाड्यदाहमरणंधत्तेनृणांसेवनात् ॥ शुद्धः स्यात्सकलामयैकशमनोदृक्पुष्टिकांतिप्रदोवृष्योमृत्युविनाशनोबलकरः कांताजनानंदनः ॥ १ ॥

अर्थः- अशुद्ध पारा सेवन केला असतां गुण तर करीत नाहीं. परंतु कुष्ठ, अग्निमांद्य, कृमि, ओकारी, अरुची, जाड्य, दाह, मरण इतके दोष करितो. शुद्ध पारा सेवन केला असतां सर्वरोग नाशक, दृष्टि स्वच्छ करणारा, कांतिप्रद, धातुवर्धक, मृत्युनाशक, बलप्रद आणि कामवर्धनानें स्त्रियांस आनंद करणारा असा होतो.

तापस्फोटांगसंकोचकफमारुतमेहकृत् ॥ अशुद्धस्तालकःशुद्धोमृतःप्राग्रोगहामृतं २

अर्थः- अशुद्ध हरताळ सेवन केला असतां ताप, फोड, अंग आखडणें, कफ, वायु, मेह यांतें करतो. आणि शुद्ध सेवन केला असतां हेच रोग दूर करितो. हा केवळ अमृततुल्य आहे.

॥ इतितालकगुणाः ॥

॥ त्यान्रोगान्घ्नंतिलोहानिसंसिद्धानिमृतानिच ॥
तानेवकुर्वतेशुद्धान्यमृतानिगुरूणिच ॥ १ ॥

अर्थः- शुद्ध मारलेलीं लोहें ह्मणजे सर्व धातु हीं ज्या रोगाचा नाश करितात त्याच रोगाप्रत अशुद्ध, कच्चीं आणि गुरु अशीं लोहें उत्पन्न करितात. ॥ छ

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

आयुर्लक्ष्मीप्रभाधीस्मृतिकरमखिलव्याधिविध्वंसिपु-
ण्यंभूतावेशप्रशांतिस्मरइवसुखदंसौख्यपुष्टिप्रकाशि,
गांगेयंचाश्मरीघ्नंगदहरमजराकारिमेहप्रहारिक्षीणा-
नांपुष्टिकारिस्फुटमतिकरणंकारणंवीर्यवृद्धेः॥ २॥७

अर्थः- सोनें आणि रुपें आयुष्य, लक्ष्मी, प्रभा, धी, स्मृति यांनें करणारें, संपूर्ण रोगनाशक, पुण्यकारक, भूतसंचार दूर करणारें, कामाप्रमाणें सुख देणारें सौख्याची पुष्टि करणारें, जरा नाशक, मेह नाशक, क्षीणाला पुष्ट करणारें, बुद्धि स्वच्छ करणारें, आणि वीर्यवृद्धीला कारण असें आहे.

॥ इतिसुवर्णरौप्यगुणाः ॥

गुल्मपांडुपरिणामशूलजिल्लेखनंकृमिहरंविशोधनं॥
प्लीहकुष्ठजठरव्रणापहंश्लेष्मवातज्वरहंशुचिताम्रं॥१

अर्थः- शुद्ध केलेले तांब्याचें भस्म, गुल्म, पांडु, परिणामशूल यांचें नाशक, लीन मलाचें बहिर्निःसारक, कृमिनाशक, शुद्धिकारक, प्लीहा, कुष्ठ, उदर, व्रण, कफ, वायु, ज्वर यांचें नाशक आहे.

॥ इतितास्रगुणाः ॥

वंगंदाहहरंपांडुजंतुमेहविनाशकम्॥तद्व-
न्नागंचदुर्नामवातल्लिंचिदुष्णकृत्॥१॥

अर्थः- वंगभस्म, दाह, पांडु, जंत, मेह यांचें नाशक आहे. या प्रमाणेंच नाग-(शिसें) भस्म, असून मूळव्याध, वायू यांचें नाशक आणि किंचित् उष्णआहे.

लोहंजंतुविकारपांडुपवनक्षीणत्वपित्तामयस्थौल्या
र्शोग्रहणीज्वरार्तिकफजिच्छोफप्रमेहप्रणुत्॥ गु-
ल्मप्लीहविषापहंबलकरंकुष्ठाग्निमांद्यप्रणुत्सौख्या
लंबिरसायनंमृतिहरंकांतादिकिट्टंतथा॥२॥श्रीशाम्

अर्थः- लोहकांत, पोलाद, लोखंड, कीट यांचें भस्म, जंतविकार, पांडु, वायु, क्षीणता, पित्तरोग, स्थूळपणा, मूळव्याध, संग्रहणी, ज्वर, कफ, शोफ, मेह, गुल्म, पांथरी, विष यांचें नाशक, बलप्रद, कुष्ठ, अग्निमांद्य यांचें नाशक, सौख्यकारक रसायन, मृत्यु दूर करणारें असें आहे. इति लोहगुणाः॥७॥

अशुद्धमायुर्गगनंनिहन्याल्लूफानिलोत्थानकरंतथै-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

व॥ सचंद्रिकंजंतुकरंतदत्र छेदायमंदानलदंनृणां-
स्यात्॥३॥

अर्थः अशरूद्ध अभ्रक भस्म आयुष्याचें नाशक; कफ वायु यांतें करणारें अ-
सें आहे. चंद्रिका ह्मणजे चमक ज्या मध्यें आहे तें जंत, मंदाग्नि यांतें करणा-
रें, मनुष्यास मारणारें असें आहे.

इत्यभ्रकगुणाः

अशरूद्धगंधोभ्रमजाड्यकुष्ठदाहार्तिशोषंकुरुतेयशरू-
द्धः॥ विशेषतोमृत्यहरोग्निकर्त्तारसायनः कुष्ठहरो-
रुजापहृत्॥१॥

अर्थः अशरूद्ध गंधक भ्रम, जाड्य, कुष्ठ, दाह, शोष यांतें करणारा असा आहे.
आणि शरूद्ध गंधक विशेषें करून मृत्यनाशक, अग्निदीपक, रसायन, कुष्ठ,
शूल यांचा नाशक आहे.

अन्यच्च॥ गौरीतेजःपरममृतंवातपित्तक्षयघ्नंप्र-
ज्ञाबोधिप्रशमितजरंवृष्यमायुष्यमग्र्यम्॥ बल्यंस्नि-
ग्धंरुचिदमकफंदीपनंशीतवीर्यंतत्तद्रोगैःसकलगद
त्वद्ध्योमसूतेंद्रबंधि॥२॥

अर्थः गंधक अमृततुल्य, वात, पित्त, क्षय, यांचा नाशक, बुद्धिप्रद, जरानाशा-
क, वृष्य, आयुष्य, शक्र वाढविणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, बलप्रद, स्निग्ध, रुचिकार-
क, कफ न करणारा, अग्निदीपक, शीतवीर्य, त्या त्या अनुपानें करून सर्व रोग
नाशक, अभ्रक आणि पारा यांचा बंध करणारा असा आहे. इति गंधकगुः

इतिचिकित्सासारेरसोपरसशोधनमारणगुणाधि-
कारःसमाप्तः॥

अथज्वरादीनांनिदानचिकित्साभाह.

दक्षापमानसंक्रुद्धरुद्रनिश्वाससंभवः॥ ज्वरोष्टधा
पृथग्द्वंद्वसंघातागंतुजःस्मृतः॥१॥

अर्थः दक्षानें अपमान केला ह्मणून क्रुद्ध झालेला जो शिव त्याचे श्वासापा-
सून आहे उत्पत्ति ज्याची असा आठ प्रकारचा ज्वर, वातज्वर, पित्तज्वर, कफज्व-
र, वातपित्तज्वर, वातकफज्वर, पित्तकफज्वर, सन्निपातज्वर आगंतुकज्वर;

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

या प्रकारें करून आहे.

मिथ्याहारविहाराभ्यांदोषाह्यामाशयाश्रयाः
बहिर्निरस्यकोष्ठाग्निंज्वरदास्यूरसानुगाः॥

अर्थ- मिथ्या आहार, विहार ह्मणजे अकाळीं खाणें किंवा शक्तीपेक्षां अधिक खाणें हा मिथ्या आहार आणि शक्तीपेक्षां अतिव्यायाम करणें किंवा अति फिरणें हा मिथ्या विहार. या मिथ्या आहार विहारें करून आमाशयाचाआश्रय करून असणारे जे दोष ते जठराग्नीला बाहेर काढून रस धातुगत होऊन ज्वर उत्पन्न करितात.

सर्वेषामेवरोगाणांनिदानंकुपितामलाः॥२

अर्थ- संपूर्ण रोगांला मल (वातपित्त कफ) कुपित होणें हें कारण आहे.

अत्यंबुपानाद्विषमाशनाच्चदिवाशयाज्जागरणाच्चरात्रौ॥ संधारणान्मूत्रपुरीषयोश्च
षड्भिःप्रकारैःप्रभवंतिरोगाः॥३

अर्थ- अति पाणी पिणें, अकाळीं अति खाणें, दिवसास निजणें, रात्रीस जागणें, मूत्र, मल यांचा अवरोध करणें या साहा प्रकारांनीं रोग उत्पन्न होतात.

॥अथवातज्वरोपलक्षणोपचारः॥

देहःकंटकितःसवारिनयनंहृत्कंदराकर्षणंकंडुष्णाश्वसनंचशोषवमनंमूत्रंसुवर्णप्रभं॥ शैथिल्यंकटिशोधनंस्थिरतनुःकुक्षौचवातग्रहः स्याद्गौल्यंमुखमम्लमिच्छतिगुणैरेभिश्चवातज्वरः॥१॥

अर्थ- शरीरावर कांटा, डोळे पाण्यानें भरलेले, हृदयास ओढ, कंड, उष्णश्वास, शोष, ओकारी, मूत्र पिवळें, शिथिलपणा, कंबर हलकी पडणें, शरीर स्तब्ध, कुशींत वारा मारणें, मुख गोडीळ, अंबट पदार्थावर इच्छा इतक्या लक्षणांनीं वातज्वर जाणावा.

नवज्वरेदिवास्वप्नेस्नानाभ्यंगान्नमैथुनं
क्रोधप्रवातव्यायामकषायांश्चविवर्जयेत्॥३

अर्थ- नूतन ज्वरामध्यें दिवसास निजणें, स्नान, अभ्यंग, अन्न, मैथुन, क्रोध वारा घेणें, व्यायाम, काढा इतकें वर्ज करावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

शठीपुष्करमूलंचभार्ङ्गीशृंगीदुरालभा॥ गुडूचीनागरंपाठाकिरातंकटुरोहिणी॥४॥ एषशठ्यादिकः क्वाथः सर्ववातज्वरापहः॥ कासादिषुचसर्वेषु दद्यात्सोपद्रवेषुच॥५॥

अर्थ- कचोरा, पोरवरमूळ, भारंगमूळ, कांकडशिंगी, धमासा, गुळवेळ, सुंठ, पाहाडमूळ, किराईत, कुटकी, इतक्यांचा काढा सर्व वातज्वर, खोकला, इत्यादिक उपद्रवसहित जरी असले तरी त्यांवर द्यावा. याला शठ्यादिकाढा असें ह्मणतात. इति शठ्यादिः॥६॥

किरातोद्दामृतोदीच्यबृहतीद्वयगोक्षुरैः॥
सस्थिराकलशीविश्वैः क्वाथो वातज्वरापहः॥१॥

अर्थ- किराईत, नागरमोथे, गुळवेल, वाळा, रिंगणी, मोठरिंगणी, गोखरू, सालवण, पिठवण, सुंठ, इतक्यांचा काढा वातज्वराचा नाशक आहे.

॥पिप्पलीसारिवाद्राक्षाशतपुष्पाहरेणुभिः॥
कृतः कषायः सगुडो हन्यात्सवनजंज्वरं॥२॥

अर्थ- पिंपळी, श्वेत उपळसरी, मनुका, बडीशेप, रेणुकाबीज, इतक्यांचा काढा करून गूळ घालून द्यावा, ह्मणजे वातज्वराचा नाश करील. पिप्पल्यादिः

त्रिफलाव्योषसगुडाशर्करात्रितुतार्धकम्॥
मोदकंभक्षयित्वातुपिबेच्चोष्णंजलंपुनः॥
पार्श्वशूलेरुचौकासेज्वरेचानिलसंभवे॥३॥

अर्थ- हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरे, पिंपळी, गूळ, साखर हीं सर्व एकेक भाग आणि तेड अर्धाभाग घेऊन यांचा लाडू करून खावा. नंतर उष्ण पाणी प्यावें ह्मणजे कुक्षिशूल, अरुची, खोकला, वातज्वर हे दूर होतात. इ. त्रिः

॥अथपित्तज्वरलक्षणोपचारः॥

पित्तेसंभ्रमतामुखेकटुकताश्वासोष्णतारक्तताभूत्रे तीव्रशिरोर्तिरंगदहनंपार्श्वेचबाधारतिः॥ शोषःपश्यतिनीलपीततिमिरेरक्तेचनेत्रेभ्रमिः कंपोरोचकविस्मयोविलपनैः पित्तज्वरंलक्षयेत्॥१॥

अर्थ- पित्तज्वराचे ठायीं भ्रांति, तोंड कडू, श्वास, उष्णा, मूत्र लाल, डोकें फार दुखणें, अंगाचा दाह, कुक्षिशूल, अस्वच्छता, शोष, डोळ्यांपुढें काळें, पिवळें,

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

काजवे, डोळे लाल, भोंवळ, कंप, अरुचि, विस्मय, आणि बडबड इतकीं लक्षणें होतात. त्या लक्षणांनीं पित्तज्वर जाणावा.

द्राक्षाभयापर्पटकाब्दतिक्ताक्वाथः सशम्याकफलोविदध्यात्॥ प्रलापमूर्छाभ्रमदाहशोषतृष्णान्वितेपित्तभवेज्वरेच॥३॥

अर्थः- मनुका, हिरडा, पित्तपापडा, नागरमोथा, कुटकी बाहाव्याचा मगज, इतक्यांचा काढा, बडबड, मूर्छा, भोंवळ, दाह, शोष, तृषा इतक्यांनीं युक्त जो पित्तज्वर त्याचे ठायीं द्यावा. इति द्राक्षादिः॥७॥

दुरालभापर्पटकप्रियंगुभूनिंबवासाकटुरोहिणीनां॥ क्वाथंपिबेच्छर्करयावगाढंतृष्णास्रपित्तज्वरदाहयुक्तः१॥

अर्थः- धमासा, पित्तपापडा, गडुला, किराईत, अडुळसा, कुटकी, इतक्यांचा काढा करून त्यांत साखर घालून तृषा, रक्त, पित्तज्वर, दाह इतक्यांनीं जो युक्त असेल त्याणें घ्यावा. दुरालभादिः

एकएवखलुपैत्तिकज्वरंहंतिपर्पटकृतःकषायकः॥ चंदनोदकमहौषधान्वितश्चेत्तदाकिमुपुनर्विचारणा॥१॥

अर्थः- नुसताच पित्तपापड्याचा काढा पित्तज्वराचा नाश करील. मग चंदन, वाळा, सुंठ याणीं युक्त केला असतां नाश करील यांत काय संशय आहे? इति पर्पटादिः॥७॥

विदारिदाडिमंलोध्रंदाधित्थंबीजपूरकम्॥ एभिःप्रदिग्धान्मूर्धानंतृट्दाहार्तस्यदेहिनः१

अर्थः- भुईकोंहळा, डाळिंब, लोध्र, कवठ, माहळुंग इतकीं वांटून तृषेनें व दाहानें पीडित झाला असेल त्याच्या मस्तकास लेप करावा.

केसरंमातुलिंगस्यमधुसैंधवसंयुतम्॥ जिह्वातालुगलक्लोमशोषेमूर्धनिदापयेत्॥२॥

अर्थः- माहळुंगाचे केशर, मध, सैंधव, घालून कालवून जिह्वा, तालु, गळा, क्लोम (पिपासास्थान) इतक्यांचे ठायीं शोष पडला असतां मस्तकावर ठेवावें.

उदुंबरशिफाछिन्नातज्जलंसितयान्वितम्॥ पीतंपित्तज्वरंहंतिपटोल्यावाशिफाजलम्३

अर्थः- उंबराच्या मुळ्या, गुळवेल यांचा काढा साखर घालून घ्यावा. अथवा कडू

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पडवळाचा काढा अथवा बडीशोफेचा काढा घ्यावा ह्मणजे पित्तज्वराचा नाश होईल. अथवा उंबराची मुळी कापून त्यांतून जें पाणी निघेल त्यांत साखर घालून तें खावें.

अथश्लेष्मज्वरलक्षणोपचारः

नेत्रेवारियुतेगलग्रहयुतःश्वासोमुखेक्षारतापादौदाहयुतौकरौचबहुलंमूत्रंशिरोरोधनम्॥ शोषःसर्वशरीरसंधिषुमहात्रासावबाधारतिःस्वल्पस्वेदमिदंकलेवरमहोसोयंकफाख्योज्वरः॥१॥

अर्थ:- डोळ्यांस पाणी, गळा दाटलेला, श्वास, तोंड खारट, हातापायांनां दाह, बहुमूत्र, मस्तक जड, शोष, शरीराच्या संधीला त्रास, आंग जड, अस्वच्छता, घाम फार थोडा, इतक्या लक्षणांनीं कफज्वर जाणावा.

पिप्पलीपिप्पलीमूलंचव्यंचित्रंचनागरम्॥ मरीचेलाजमोदेंद्रपाठारेणुकजीरकम्॥२॥ भार्ङ्गीमहानिंबफलंहिंगुरोहिणिसर्षपम्॥ विडंगातिविषामूर्वागणोयंकफनाशनः॥३॥

अर्थ:- पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, मिरें, एलची, ओंवा, इंद्रजव, पहाडमूळ, रेणुकाबीज, जिरें, भारंगमूळ, कडुलिंबफळ, हिंग, कुटकी, शिरस, वावडिंग, अतिविष, मोरवेल त्या औषधांचा गण कफनाशक आहे. म्हणून कफज्वरावर त्यांचा काढा द्यावा.

पिप्पलीपिप्पलीमूलंचव्यंचित्रकनागरम्॥
पंचकोलमिदंप्रोक्तंशोधनंकफनाशनम्॥४॥

अर्थ:- पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ हें पंचकोल असें सांगितलें आहे. हें शोधन कफनाशक आहे. हेंही कफज्वरावर योग्य आहे.

कटुकीपिप्पलीमूलंमुस्ताचैवहरीतकी॥गिरमालसमःक्वाथःसर्वज्वरविनाशनः॥५॥

अर्थ:- कुटकी, पिंपळमूळ, नागरमोथे, हिरडा, बाहावा इतक्यांचा काढा सर्वज्वरांचा नाशक आहे. इति आरग्वधपंचकम्

पटोलत्रिफलातिक्ताशठीवासामृताभवः॥
क्वाथोमधुयुतःपीतोहन्यात्कफकृतंज्वरं॥१॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- कडू पडवळ, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, कुटकी, कचोरा, अडूळसा, गुळवेल इतक्यांचा काढा मध घालून घेतला असतां कफज्वराचा नाश करील. इतिपटोः

निदिग्धिकाच्छिन्नरुहोपकुल्याविश्वौषधैः साधितमंबु पीतम्॥ हंतिज्वरंश्वासबलासकासशूलाग्निमांद्यंजठरानिलंच॥१॥

अर्थ- रिंगणी, गुळवेल, पिंपळी, सुंठ, इतक्यांचा काढा करून प्यालें असतां ज्वर, श्वास, कफ, खोकला, शूल, अग्निमांद्य, पोटांतला वायु यांचा नाश करील. इतिनिः

भूनिंबनिंबपिप्पल्यःशठीशुंठीशतावरी॥गुडूचीबृहतीचेतिक्वाथोहन्यात्कफज्वरम्॥१॥

अर्थः- किराईत, कडूनिंब, पिंपळी, कचोरा, सुंठ, शतावरी, गुळवेळ, रिंगणी इतक्यांचा काढा कफज्वराचा नाश करील. इति भूनिंबादिः

अथवातपित्तज्वरलक्षणोपचारः

हृत्कंठेदहनंशिरोर्तिवमनंकुक्षौचवातग्रहःश्वासोदाहविमोचनंतृडरुचिर्दाहःसदानेत्रयोः॥ कंडूस्वेदमतीव विस्मयकरंकट्वम्लभास्यंसदामूत्रंधूमलशामवर्णमथवावातेसपित्तज्वरे॥१॥

अर्थ- उरांत आणि घशांत जळजळ, डोकें दुखणें, ओकारी, कुशींत वारा मारणें, श्वास, दाह, जीव, गुंडाळणें, तृषा, अरुची, डोळ्यांची आग, कंड, घाम, कडू, अंबट, असें चमत्कारिक तोंड; मूत्र धूम्रवर्ण अथवा काळें इतकीं वातपित्तज्वराचीं लक्षणें होतात.

गुडूचीपर्पटंमुस्ताकिरातंविश्वभेषजम्॥वातपित्तज्वरेदेयंपंचभद्रमिदंशृभम्॥२॥७॥

अर्थ- गुळवेल, पित्तपापडा, नागरमोथे, किराईत, सुंठ, इतक्यांस पंचभद्र असें ह्मणतात. याचा काढा वातपित्तज्वरावर द्यावा. इतिपंचभद्रः॥

द्राक्षाकिरातामृतवासकाशठीक्वाथंपिबेत्पित्तमरुज्वरंहरेत्॥

अर्थ- मनुका, किराईत, गुळवेल, अडूळसा, कचोरा इतक्यांचा काढा प्यावा ह्मणजे वातपित्तज्वर नाश पावेल.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

छिन्नाकिरातात्वद्सविश्वपर्पटाःसवातपित्तज्वरहृन्निपीताः॥१॥

अर्थ- गुळवेल, किराईत, नागरमोथे, सुंठ, पित्तपापडा इतक्यांचा काढा वातपित्तज्वराचा नाशक आहे.

अथवातश्लेष्मज्वरलक्षणोपचारः

स्निग्धंक्षारमुखंशिरोव्यथयतेसर्वांगपीडा भवे नेत्रेवारि युतेकरोतिवमनंरोमांचताश्लेष्मणि॥दीर्घं निश्वसतेतथा-तिदहनंचानिद्रदोषाकुलंमूत्रंफेनिलपल्वलंनिगदितंवात ज्वरेश्लेष्मणि॥१॥

अर्थ- बुळबुळीत, खारट असें मुख, मस्तकास पीडा, सर्वांग दुखणें, डोळ्यांस पाणी, ओकारी, अंगावर रोमांच, नाकास शेंबूड, दीर्घश्वास, अतिदाह, निद्रानाश, मूत्र फेंसट, गढूळ इतकीं लक्षणें वातश्लेष्मज्वराचीं जाणावीं.

मुस्तापर्पटकेशुंठींगुडूचीसदुरालभा॥ कफवातारुचिच्छर्दिदाहशोषनिवारणा॥२॥

अर्थ- नागरमोथे, पित्तपापडा, सुंठ, गुळवेल, धमासा इतक्यांचा काढा कफ, वायु, अरुचि, ओकारी, दाह आणि शोष यांचा नाशक आहे.

आरग्वधग्रंथिकमुस्ततिक्ताहरीतकीभिःक्वथितःकषायः सामेसशूलेकफवातयुक्तेज्वरेहितोदीपनपाचनश्च॥३॥

अर्थ- बाहवा, (मगज) पिंपळमूळ, नागरमोथे, कुटकी, हिरडा इतक्यांचा काढा आमांश, शूल, कफ, वात यांनीं युक्त जो ज्वर त्याचे ठायीं हितकारक आणि दीपन पाचनही आहे. आरग्वधादिः॥

क्षुद्रामृतानागरपुष्कराह्वैःकृतःकषायःकफमारुतोत्तरे॥ सश्वासकासारुचिपार्श्वशूलेज्वरेत्रिदोषप्रभवेपिशस्यते॥

अर्थ- रिंगणी, गुळवेल, सुंठ, पोखरमूळ इतक्यांचा काढा श्लेष्मवातज्वर, श्वास, कास, अरुचि, कुक्षिशूल, त्रिदोषज्वर यांचा नाशक आहे.

अथपित्तश्लेष्मज्वरलक्षणोपचारः

नेत्रैःपश्यतिनीलपीततिमिरैरोम्णांतथोद्धर्षणम्कंपोरोचकविस्मयोनचरतिर्वक्त्रेकटुक्षारता॥पादोदाहयुतोतदागलग्रहश्चोन्निद्रवांतीसदामूत्रंकुंकुमपांडुरंभिषगिदंपित्तेकफाख्येज्वरे॥१॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः- डोळ्यांनीं निळें, पिवळें, काजवें पाहणें, रोमांच उभे राहणें, कंप, अरुचि, विस्मय, अस्वास्थ्य, तोंड निरवट, खारट, पायांचा दाह, घसा धरलेला, निद्रानाश, ओकारी, मूत्र तांबूस, पांढरें इतक्या लक्षणांनीं पित्तश्लेष्मज्वर जाणावा.

कंटकार्यमृताभार्ङ्गीनागरेंद्रयवासकम्॥भू-
निंबचंदनमुस्तापटोलंकटुरोहिणी॥२॥कषा-
यंपाययेदेतंपित्तश्लेष्मज्वरापहम्॥ दाहतृ-
ष्णारुचिर्हिक्काकासहृत्पार्श्वशूलहृत्॥३॥

अर्थः- रिंगणी, गुळवेल, भारंग, सुंठ, इंद्रजव, धमासा, किराईत, चंदन, नागरमोथा, कडू पडवळ, कुटकी इतक्यांचा काढा पित्तश्लेष्म ज्वराचा नाशक आहे आणि दाह, तृषा, अरुचि, उचकी, खोकला, हृदयशूल, कुक्षिशूल यांचा नाशक आहे.

पटोलंचंदनंमूर्वातिक्तापाठामृताकणाः॥
पित्तश्लेष्मारुचिच्छर्दिज्वरकंडूविषापहः॥४॥

अर्थः- कडू पडवळ, चंदन, मोरवेल, कुटकी, पहाडमूळ, गुळवेल, पिंपळी इतक्यांचा काढा पित्त, कफ, अरुचि, ओकारी, ज्वर, कंडू, विष यांचा नाशक आहे.

इतिपटोलादिः॥

अमृतारिष्टकटुकामुस्तेंद्रयवनागरैः॥पटोलचंदनाभ्यां-
चपिप्पलीचूर्णयुक्तस्मृतः॥१॥अमृताष्टकमेतच्चपित्त-
श्लेष्मज्वरापहं॥छर्द्यरोचकहृल्लासदाहतृष्णानिवारणं२

अर्थः- गुळवेल, कडूलिंब, कुटकी, नागरमोथे, इंद्रजव, सुंठ, कडू पडवळ, चंदन इतक्यांचा काढा पिंपळीचे चूर्णासहित घ्यावा. याला अमृताष्टक असें ह्मणतात. हें अमृताष्टक पित्तश्लेष्म ज्वराचें नाशक आहे. आणि ओकारी, अरुचि, उर दाटणें, दाह, तृषा यांचें नाशक आहे.

तिक्तोशीरबलाधान्यपर्पटांभोधरैःकृतः॥का-
थःपुनःसमायातंज्वरंशीघ्रंनिवारयेत्॥३॥

अर्थः- कुटकी, वाळा, चिकणा, धणे, पित्तपापडा, नागरमोथा इतक्यांचा काढा उलटलेल्या ज्वरावर द्यावा. ह्मणजे ज्वराचें निवारण लौकर होईल.

जीरकंकारवेल्लाबुशीतपूर्वज्वरेहितम्॥

अर्थः- जिरें आणि कारलीचा रस थंडी वाजून ज्वर येतो त्यावर द्यावा. ह्मणजे ज्वर दूर होईल.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथसन्निपातज्वरलक्षणोपचारः

कासश्वासप्रमोहारुचिभ्रमकृशताः कर्णयोर्गंसनादं,
निद्रानाशोतितृष्णागुरुतरमुदरंशीर्षसंध्यस्थिपीडा॥
दाहःशीतंक्षणेवैसततगलविरुक्लोचनेस्रावयुक्ते,नि-
र्झग्नेचातिरक्तेप्रलपनमुदितंलक्षणंसन्निपाते॥१॥

अर्थ- खोकला,श्वास,मोह,अरुचि,भोंवळ,कृशता,कानांत शब्द होणें,निद्रानाश,अतितृषा,पोट अत्यंत जड,डोकें,संधि,हाडें यांचे ठायीं पीडा;क्षणानें दाह,क्षणानें थंडी,नेहेमीं गळ्यांत शब्द,डोळे स्रावयुक्त,कुटिल,अतिलाल आणि बडबड त्या लक्षणांनीं सन्निपात ज्वर जाणावा.

लक्षणांतरम्॥

क्षणेदाहःक्षणेशीतमस्थिसंधिशिरोरुजा॥सास्रावेक-
लुषेरक्तेनिर्झग्नेचापिलोचने॥१॥सस्वनौसरुजौकर्णौ
कंठःशूकैरिवावृतः॥तंद्रामोहःप्रलापश्चकासश्वासोरु-
चिर्भ्रमः॥२॥परिदग्धारवरस्पर्शाजिह्वास्रस्तांगतापरं
ष्ठीवनंरक्तपित्तस्यकफेनोन्मिश्रितस्यच॥३॥शिरसो-
लोटनंतृष्णानिद्रानाशोहृदिव्यथा॥स्वेदमूत्रपुरीषाणां
चिरादर्शनमल्पशः॥४॥कृशत्वंचातिगात्राणांसततंक
ण्ठकूजनम्॥कोठानांश्यावरक्तानांमंडलानांचदर्शनं॥५
मूकत्वंस्रोतसांपाकोगुरुत्वमुदरस्यच॥चिरात्पाकश्च
दोषाणांसन्निपातज्वराकृतिः॥६

अर्थ- क्षणांत दाह,क्षणांत शैत्य,हाडें,संधि,डोकें इतक्या ठिकाणीं व्यथा डोळे स्रावयुक्त,लाल,गढूळ,वक्र;कानांत शब्द आणि तिडीक,गळ्यांत कांटे टोंचल्या प्रमाणें,खरे,डोळ्यांवर झांपड,मोह,बडबड,खोकला,श्वास,अरुचि,भोंवळ,जिह्वा भाजल्या प्रमाणें आणि खररखरीत,अंगांत शिथिलपणा खाकेरा रक्तपित्त आणि कफयुक्त,डोकें फिरणें,तृष्णा,निद्रानाश,उरांत दुखणें;घाम,मूत्र,मल,हें एखादे वेळेस थोडेसें असणें;शरीराला अतिकृशता एकसाररवा घसा वाजणें,अंगावर भगवट तांबड्या अशा गांधी चट्टे दिसणें,मुकेपणा स्रोतांचा पाक,पोट जड,चिरकालें करून दोषांचा पाक इतकीं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सन्निपात ज्वराचीं लक्षणें होतात.

दोषेविवृद्धेनष्टेग्नौसर्वसंपूर्णलक्षणः॥सन्नि
पातज्वरोसाध्यःकृच्छ्रसाध्यस्ततोन्यथा॥७॥

अर्थः- दोष वाढलेले आणि अग्नि अतिमंद असें असतां संपूर्ण लक्षणांनीं युक्त असा सन्निपातज्वर असाध्य जाणावा. आणि याहून भिन्न प्रकारचा असेल तर तो कष्टसाध्य जाणावा.

सन्निपातज्वरस्यांतेकर्णमूलेसुदारुणः॥शो-
फःसंजायतेतेनकश्चिदेवविमुच्यते॥ ८॥

अर्थः- सन्निपातज्वराचे अंतीं कर्णमूलाचे ठायीं भोगा भयंकर शोथ ह्मणजे सूज उत्पन्न होते त्या पासून एखादाच मुक्त होतो.

पित्तकफानिलवृद्ध्यादशदिवसद्वादशाहसप्ताहात्॥
हंतिविमुंचत्याशुत्रिदोषजोधातुमलपाकात्॥९॥ ७॥

अर्थः- पित्त अधिक आहे तर दाहा दिवसांनीं, कफ अधिक असेल तर बारा दिवसांनीं आणि वायु अधिक असेल तर सात दिवसांनीं सन्निपातज्वर, धातुपाक झाला असतां मारील आणि मलपाक झाला असतां सोडील.

सप्तमेदिवसेप्राप्तेदशमेद्वादशेपिवा॥पुनर्घो
रतरोभूत्वाप्रशमंयातिहंतिवा॥१०॥

अर्थः- सात दिवसांनीं किंवा दाहा दिवसांनीं किंवा बारा दिवसांनीं सन्निपातज्वर अतिघोर होऊन शांत होतो किंवा मारतो.

सप्तमीद्विगुणायावन्नवम्येकादशीतथा॥एष
षात्रिदोषमर्यादामोक्षायचवधायच॥११॥

अर्थः- मतांतरीं सात दिवस, चवदा दिवस, नऊ दिवस, अक्रा दिवस, ही मर्यादा सन्निपात ज्वरास सोडण्यास किंवा मारण्यास सांगितली आहे.

दाहःस्वेदोभ्रमस्तृष्णाकंपोविड्भिदसंज्ञता॥
कूजनंचातिवेदग्ध्यमाकृतिर्ज्वरमोक्षणे॥१२

अर्थः- दाह, घाम, भ्रम, तृष्णा, कंप, विट्भेद, ह्मणजे मळ पातळ असणें, भान नसणें, कण्हणें, अंगास घाण फार ही लक्षणें ज्वर निघण्याचीं आहेत.

सन्निपातज्वरेपूर्वंकुर्यादामकफापहम्॥प-
श्चाच्छ्लेष्मणिसंक्षीणेशमयेत्पित्तमारुतौ १३

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- सन्निपातज्वरामध्यें पूर्वी आम, कफ यांचें नाशक औषध द्यावें. नंतरकफ क्षीण झाल्यावर पित्तवायु हे शमवावे.

लंघनं वालुकास्वेदो नस्यं निष्ठीवनं तथा ॥ अव
लेहांजनं चैव प्राग्व्यो ज्यं त्रिदोषजे ॥ १४ ॥ ७

अर्थ:- लंघन, वाळूची वाफ, नस्य, ओकारी येण्यास औषध, अवलेह, अंजन इतके उपाय सन्निपातज्वरामध्यें पूर्वी करावे.

त्रिरात्रं पंचरात्रं वा दशरात्रमथापि वा ॥ लंघनं
सन्निपाते तु कुर्यादारोग्यदर्शनात् ॥ १५ ॥ ७

अर्थ:- तीन दिवस किंवा पांच दिवस किंवा दाहा दिवस आरोग्यदर्शन होईतों पर्यंत सन्निपातज्वरामध्यें लंघन करावें.

दोषाणामेव सा शक्तिर्लंघने या सहिष्णुता ॥ क-
श्चिद्दोषविमुक्तोपि लंघनं सहते नरः ॥ १६ ॥

अर्थ:- लंघनाविषयीं जी सहिष्णुता ती दोषांचीच शक्ति आहे. कोणी एखादा दोषांपासून मुक्त झाला तथापि लंघन सहन करितो.

आदौ चामविनाशाय द्वितीये पित्तनाशनम् ॥ तृतीये कफ
नाशश्च चतुर्थे वातनाशनं ॥ १७ ॥ पंचमे चक्षुधोत्पत्तिः षष्ठे च
लघुगात्रता ॥ सप्तमे ज्वरपाकः स्यादष्टमे ज्वरनाशनम् ॥
नवमे सर्वदोषघ्नं लंघनं कथ्यते बुधैः ॥ ॥

अर्थ:- पहिले लंघनानें आमनाश, दुसरे लंघनानें पित्तनाश, तिसऱ्यानें कफनाश, चवथ्यानें वातनाश, पांचव्यानें क्षुधा उत्पन्न होते, साहाव्यानें शरीर हलकें होतें, सातव्यानें ज्वराचा पाक होतो, आठव्यानें ज्वरनाश, नवव्यानें सर्व दोषांचा नाश, याप्रमाणें लंघनाचे गुण पंडितांनीं सांगितले आहेत.

ज्वरे लंघनमेवादावुपदिष्टमृतेज्वरात् ॥ क्षया-
निलभय क्रोधकामशोकश्रमोद्भवात् ॥ १८ ॥

अर्थ:- ज्वराचेठायीं पूर्वी लंघनच सांगितलें आहे; परंतु क्षय, वायु, भय, क्रोध, काम, शोक, श्रम इतक्यांपासून ज्वर उत्पन्न झाला असतां लंघन करूं नये. ७

आमाशयस्थो ह्यग्निं सामो मार्गान्निधाय च
विदधाति ज्वरं दोषस्तस्मात् कुर्वीत लंघनम् ॥

अर्थ:- आमाशयाश्रित दोष अग्नीला स्वस्थानापासून भ्रष्ट करून आमसहित

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

रसादिकांचे मार्ग आच्छादित करून ज्वर उत्पन्न करतो. या साठीं लंघन करावें. म्हणजे आमादिकांचा नाश होऊन ज्वर निघतो. इति लंघनहेतुः

प्राणाविरोधतश्चैनंलंघयेन्नोपवासयेत् ॥
बलाधिष्ठानमारोग्यंयद्यर्थेसत्क्रियाक्रमः२१॥

अर्थः- प्राण व्याकूळ न होतां लंघन होत असल्यास करवावें. केवळ, लंघन म्हणजे उपास करावा असें तात्पर्य नाहीं. कारण कीं, बल, आरोग्य, सत्क्रिया हींज्यासाठीं तो प्राण रक्षण केला पाहिजे.

तच्चमारुतक्षुत्तृष्णामुखशोषभ्रमान्विते॥कार्यंबालेनवृद्धेवागर्भिण्यांनचदुर्बले॥ २२ ॥

अर्थः- क्षयादि ज्वरां खेरीज लंघन निषेध, वायु झालेला, क्षुधा, तृषा, मुखशोष, भ्रम इतक्यांनीं युक्त, बाल, वृद्ध, गर्भिणी, दुर्बल यांणी लंघन करूं नये.

इतिद्वितीयलंघननिषेधः

मृदुर्ज्वरोलघुर्देहश्चलिताश्चयदामलाः॥पक्वं
दोषंविजानीयाज्ज्वरेदेयंतदौषधम्॥ १ ॥

अर्थः- ज्वर कमी, देह हलका, मलप्रवृत्ति इतकें जेव्हां होईल तेव्हां दोष पक्व झाले म्हणून समजावें. मग ज्वरावर औषध द्यावें.

ऊष्मापित्तादृतेनास्तिज्वरोनास्त्यूष्मणाविना॥
तस्मात्पित्तविरुद्धानिपिबेत्पित्तेधिकेधिकं॥२

अर्थः- ऊष्मा पित्ता वांचून नाहीं आणि ज्वर ऊष्म्या वांचून नाहीं. यास्तव पित्तविरुद्ध औषध प्यावें. पित्त अधिक असल्यास अधिक औषध प्यावें.

मातुलिंगार्द्रकरसंकोष्ठंत्रिलवणान्वितम् ॥
नस्याद्वासिंधुविहितंनस्यंतीक्ष्णंप्रयोजयेत् ३

अर्थः- महाळुंग आणि आलें यांचा रस, कोष्ठकोलिंजन, मीठ, सेंधेलोण, पादेलोण यांचें नस्य करावें. याणें कार्य न होईल तर दुसरें तीक्ष्ण नस्य योजावें.

मधूकसारसिंधूत्थवचोषणकणाःसमाः॥श्लक्ष्णंपिष्टांभसानस्यंकुर्यात्संज्ञाप्रबोधनम्॥४

अर्थः- मोहाचा डीक, सैंधव, वेरवंड, मिरें, पिंपळी हीं समभाग घेऊन बारीकवांटून पाण्या बरोबर नस्य करावें म्हणजे बेशुद्ध झालेलें मनुष्य शुद्धीवर येतें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

शिरीषबीजगोमूत्रकृष्णामरिचसैंधवैः॥अं-
जनंस्यात्प्रबोधायसरसोनशिलावचैः॥५॥

अर्थः- शिरस, गोमूत्र, पिंपळी, मिरें, सैंधव, लसूण, मनशीळ, वेखंड, इतक्यांचें अंजन करावें, ह्मणजेशुद्धि गेली असतां येते.

कट्फलंपुष्करंशृंगीकृष्णाचमधुनासह॥श्वा-
सकासज्वरहरःश्रेष्ठोलेहःकफांतकः॥६॥

अर्थः- कायफळ, पोखरमूळ, कांकडशिंगी, पिंपळी, मध इतक्यांचा लेह, श्वास, खोकला, ज्वर, कफ यांच्या नाशा विषयीं श्रेष्ठ आहे.

भूनिंबदारुदशमूलमहौषधाब्दतिक्तेंद्रबीजधनिकेभकणा-
कषायः॥तंद्राप्रलापकसनारुचिदाहमोहश्वासादियुक्त-
मखिलज्वरमाशुहंति ७

अर्थः- किराईत, देवदार, दशमूलें ९ ह्मणजे शालिपर्णी, पृश्निपर्णी, रिंगणी, डोरली, सरांटे, बेल, ऐरण, टेंटू, पहाडमूळ, शिवण हीं दशमूलें १ सुंठ नागरमोथे, कुटकी, इंद्रजव, धणे, गजपिंपळी इतक्यांचा काढा, तंद्रा, प्रलाप, खोकला, अरुचि, दाह, मोह, श्वास इत्यादिकें करून युक्त सर्व प्रकारचा ज्वर याचा नाशक आहे.

भार्ङ्गीभूनिंबनिंबैर्धनकटुकवचाव्योषवासाविशाला
रास्नानंतापटोलीसुरतरुरजनीपाटलातिंदुकैश्च॥ब्राह्मी
दार्वीगुडूचीत्रिवृतमतिविषापुष्करत्रायमाणैर्व्याघ्रीसिंही
कलिंगैस्त्रिफलशठियुतैःकल्पितस्तुल्यभागैः८ क्वाथोद्वा
त्रिंशनामात्रिभिरधिकदशान्सन्निपातान्निहंति शूलंकासा-
दिहिक्काश्वसनगुदरुजाध्मानविध्वंसकारी॥ऊरुस्तंभांत्रवृ-
द्धीगलगदमरुचिंसर्वसंधिग्रहार्तिंमातंगोघंनिहन्यान्मृग
रिपुरिहचेद्रोगजालंतथैव.९॥

अर्थः- भारंग, किराईत, कडुनिंब, नागरमोथे, कुटकी, वेखंड, सुंठ, मिरें, पिंपळी, अडूळसा, वृंदावन, रास्ना, धमासा, कडू पडवळ, देवदार, हळद, पांढरी पाडळ, टेंबुरणी, ब्राह्मी, दारुहळद, गुळवेल, तेड, अतिविष, पोखरमूळ, भेंदी, वाघंटी, डोरली, इंद्रजव, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, कचोरा इतकीं समभाग घेऊन काढा करावा. त्याला द्वात्रिंशनामा असें ह्मणतात. हा काढा तेरा सन्निपात, शूल, खोकला, उचकी, श्वास, गुदरोग, आध्मान, ऊरुस्तंभ, अंत्रवृद्धि, गलरोग, अरुचि, सर्व

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

संधिग्रह यांचा नाशक आहे. जसा सिंह हत्तीचे समुदायाप्रत नाशितो त्या प्रमाणें हा काढा रोगांचे समुदायाप्रत नाशितो.

स्वेदोद्गमेभ्रष्टकुलित्थचूर्णंनिपातनंशस्तमितिब्रुवंति॥मृत्युश्चतस्मिन्बहुपिच्छलत्वाच्छीतस्यजंतोःपुरतःसरत्वात् १०

अर्थः- घाम आला असतां कुलित्थ भाजून त्यांचें पीठ अंगास लावावें. कारण सन्निपात ज्वरामध्यें शैत्य झालें असतां मृत्यू पुढें उभा आहे. घाम आलाह्मणजे आंग चिकट होऊन शैत्य होतें, यास्तव करावें.

दार्व्यंबुदस्त्रिफलत्रिकंचक्षुद्रापटोलीरजनीसनिंबा॥क्वाथोविदध्याज्ज्वरसन्निपातेनिश्चेतनेपुंसिविबोधनार्थम्॥११

अर्थः- दारुहळद, नागरमोथा, कुटकी, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, रिंगणी, कडू पडवळ, हळद, कडुलिंब इतक्यांचा काढा द्यावा. ह्मणजे सन्निपातज्वरामध्यें निश्चेतन जरी झाला तरी शुद्धी येऊन बरा होतो.

लशुनंतिक्तकंकांडंभार्ङ्गीचातिविषातथा॥
नरमूत्रेणचक्वाथःसन्निपातेसुदारुणः१२॥

अर्थः- लसूण, किराईत, कांडवेल, भारंग, अतिविष इतक्यांचा काढा मनुष्याचे मूत्रांत करावा. हा तीक्ष्ण होतो. सन्निपात ज्वरांत द्यावा. ॥लशुनादिः॥

विषभागोभवेदेकोमरीचानांत्रयोमताः॥आरण्योपलजंभस्मषोडशांशसमन्वितम्॥१३॥एकत्रमिलितंचूर्णंधूर्तस्वरसभावितम्॥आतपेशोषितंतच्चशीतस्वेदहरंपरं१४॥

अर्थः- बचनाग एक भाग, मिरें तीन भाग, रानशेणीचें भस्म सोळा भाग, तिहींचें चूर्ण एकत्र करून धोत्र्याचे रसांत भिजवून वाळवावें, आणि अंगास लावावें म्हणजे शैत्य, घाम यांतें दूर करितें.

अथवाचणकाभ्रष्टायवानीचूर्णमिश्रिताः॥
वचोषणरजोयुक्ताःस्वेदसंशोषणामताः॥१५

अर्थः- भाजलेले हरभरे, ओंवा, वेखंड, मिरें इतक्यांचें चूर्ण अंगास चोळावें ह्मणजे घाम बंद होतो.

उच्छूकांस्फुटितांजिह्वांद्राक्षयामधुपिष्टया॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

प्रलेपयेत्सघृतयासन्निपातात्मकेज्वरे॥१६॥

अर्थः- सन्निपातज्वरा मध्यें जिव्हेला कांटा आला किंवा फुटली तर मनुकामधांत रवलून तूप घालून जिव्हेला चोळावें म्हणजे बरी होईल.

सनागरंदेवदारुरास्नाचित्रकपेषितम्॥प्रले-
पनमिदंश्रेष्ठंगलशोफविनाशनम्॥ १७ ॥

अर्थः- गळ्याला सूज आली असतां सुंठ, देवदार, चित्रक, रास्ना यांचा लेपकरावा. इतक्यानेंच नाश होईल.

कुलित्थंकट्फलंशुंठीकारवीचसमांशकैः॥सु
खोष्णालेपनंकार्यंकर्णमूलेमुहुर्मुहुः॥ १८ ॥

अर्थः- हुलगे, कायफळ, सुंठ, कडू जिरें हीं समांश. इतक्यांचा लेप कर्णमूलावर सहन होईल असा उष्णा वारंवार करावा.

इंगुदिनिशाविशालासैंधवसुरदारुरविदुग्धैः
दत्तः क्रमेणलेपोहरतिमहाकर्णकग्रंथिम्॥१९

अर्थः- हिंगणबेट, हळद, कडूइंद्रावण, सैंधव, देवदार, रुईचा चीक यांचा लेप कर्णमूलावर एकावर एक असा वारंवार करावा. म्हणजे कर्णमूल बरें होतें.

किरातंकटुकापथ्याकणाकायफलंवचा॥ उ-
द्धूलनंत्रिदोषेचसदाशैत्येचशस्यते॥ २० ॥

अर्थः- किराईत, कुटकी, हिरडा, पिंपळी, कायफळ, वेरवंड इतक्यांचें बारीक चूर्ण सन्निपातामध्यें अंगास लावावें. याला उद्धूलन असें ह्मणतात. हें नेहमीचे शैत्यांतही प्रशस्त आहे. इति उद्धूलनम्.

कस्तूरीमरिचंवाजिलालाचमधुनांजनम्॥
तंद्रांनिवारयत्याशुव्योषप्रधमनंतथा॥२१

अर्थः- कस्तूरी, मिरें, घोड्याची लाळ आणि मध यांचें अंजन करावें. ह्मणजे तंद्रा दूर होते. आणि सुंठ, मिरें, पिंपळी हीं फार बारीक चूर्ण करून नाकांत फुंकावीं ह्मणजे तंद्रा दूर होते.

तुरंगलालासहितामनःशिलानिहंतितंद्रांसकृदंजनेन॥

अर्थः- घोड्याची लाळ आणि मनशीळ त्यांचें अंजन एकवेळ केलें असतां तंद्रा दूर होते.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

बब्बूलपत्राणि हरीतकीच संस्वेदिनास्वेदविकारहंत्री ॥२२॥

अर्थः- बाभळीचीं पानें आणि हिरडा यांचा वाफारा द्यावा म्हणजे घर्मजन्य विकार होत नाहींत.

बिल्वोग्निमंथः श्योनाकः काश्मरीपाटलातथा
शालिपर्णीपृश्निपर्णीबृहतीद्वयगोक्षुरैः॥ उ
भयंदशमूलंस्यात्सन्निपातहरोगणः॥२३॥

अर्थः- बेल, ऐरण, टेंटू, शिवण, पाडळ, साल्वण, पिठवण, रिंगणी, डोरली, गोखरू इतक्यांचीं मूळें त्यांस दशमूळ असें म्हणतात. यांचा काढा सन्निपातनाशक आहे. इति दशमूलं

आर्द्रकस्वरसोपेतंसैंधवंसकटुत्रयम्॥आकं-
ठंधारयेच्चास्येनिष्ठीवेच्चपुनःपुनः२४तेनास्य
हृदयश्लेष्मामन्यापार्श्वशिरोगलात्॥ लीनो
व्याकृष्यतेशुष्कोलाघवंचास्यजायते॥ २५॥

अर्थः- आल्याचा रस, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी यांची गोळी करून तोंडांत धरावी आणि वरचेवर खाकरा टाकावा. म्हणजे कुशींत, उरांत, घशांत, मानेंत, मस्तकांत जमून अडकलेला कफ बाहेर निघून शरीर हलकें होतें.

सद्यस्त्रिपंचसप्ताहाद्द्वादशाद्वादशादपि॥
एकत्रिंशद्दिनैःशुद्धः सन्निपातीसजीवति॥२६

अर्थः- तात्काळ किंवा तीन दिवसांनीं किंवा पांच दिवसांनीं किंवा सात, दहा, बारा, एकवीस दिवसांनीं दोषनिर्मुक्त झालेला सन्निपाती मनुष्य वांचतो.

अम्लस्निग्धोष्णतीक्ष्णैः कटुमधुरसुरातापसेवाकषायैः
स्वादुक्रोधातिरूक्षैर्गुरुतरपिशिताहारसौहित्यशीतैः॥
शोकव्यायामचिंताग्रहगणवनितात्यंतसंगप्रसंगैः प्रायः
कुप्यंतिपुंसांमधुसमयशरद्वर्षणेसन्निपाताः॥ २७ ७॥

अर्थः- आंबट, स्निग्ध, उष्ण, तीक्ष्ण, तिखट, मधुर, मद्य, ऊन घेणें, तुरट, रुचिकर, अतिरूक्ष, अति गुरु मांस, तृप्तिकारक, थंड, असे पदार्थ सेवन करणें, क्रोध, शोक, व्यायाम, चिंता, अनिष्टग्रह, बहुत स्त्रियांशीं संग म्हणजे मैथुन इतक्या कारणांनीं बहुत करून वसंत, शरत्, वर्षा या तीन ऋतूंमध्यें मनुष्याचे सन्निपात कुपित हो-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

इतिसंपाताः

॥ अथागंतुकज्वरलक्षणोपचारः ॥

॥ अभिचाराभिघाताभ्यामभिषंगाभिशापतः ॥
॥ आगंतुर्जायते दोषैर्यथास्वंतं विभावयेत् ॥१॥

अर्थ:- अभिचार ह्मणजे मांत्रिक प्रयोग, अभिघात ह्मणजे काष्ठ पाषाणादिकांचा प्रहार, अभिषंग ह्मणजे पिशाचाची बाधा, अभिशाप म्हणजे शापत्या कारणांनीं आगंतुक ज्वर उत्पन्न होतो, तो त्या त्या लक्षणांनीं जाणावा.

॥ अभिचाराभिशापाभ्यां मोहस्तृष्णाच जायते ॥
॥ भूताभिषंगात्कुप्यंति भूतसामान्यलक्षणाः ॥२॥

अर्थ:- अभिचार आणि अभिशाप यांपासून जो ज्वर होतो त्यांत मोह, तृषा असते. भूताभिषंगापासून ज्वर होतो त्यांत भूतासारखीं ज्यांचीं लक्षणें असे दोष कुपित होतात.

वमनमरुचि शोषः सर्वदोद्गारतृष्णा हृदयजठरबाधा-
दाहसंतापमूर्छाः ॥ वदनविरसतास्याद्गात्रभंगोथकर्कं
वदतिपरवशत्वं दोषसंभूततापं ३

अर्थ:- ओकारी, अरुचि, शोष, ढेंकरा, तृषा, पोटांत, उरांत, दुखणें, दाह, क्रोध, मूर्छा, तोंड विरस, आंग मोडून येणें, बोलणें कर्कश, बडबड इतक्या लक्षणांनीं भूताभिषंगाचा ज्वर जाणावा.

॥ अभिचाराभिशापोत्थौ ज्वरौ होमादिनाजयेत् ॥
॥ दाहः स्वस्त्ययनात्तीर्थैरुत्सातग्रहपीडनैः ॥४॥

अर्थ:- अभिचार आणि अभिशाप यांचे ज्वर होम, देवपूजा इत्यादिकें करून जिंकावे आणि पुण्याहवाचन, तीर्थयात्रा, उत्सात ह्मणजे तारे पडणें इत्यादिक, ग्रहण यांचे ठायीं स्नान यांणीं शांत करावा.

भूतविद्यासमुद्दिष्टैर्बंधावेशनताडनैः ॥ ज-
येद्भूताभिषंगोत्थमनुशांत्याच मानवः ॥५॥

अर्थ:- पंचाक्षरी, देवऋषी, इत्यादि आणून त्यांकडून ताईत गंडा उतारे इत्यादि करून भूताभिषंगापासून आलेला ज्वर घालवावा.

मधूकसारं मरिचं सैंधवं पिप्पली वचा ॥ सं-
ज्ञाप्रबोधनं नस्यं देयं भूतज्वरे सदा ॥ ६ ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- मोहाचा डीक, मिरें, सैंधव, पिंपळी, वेरवंड, यांचें नस्य भूतज्वरामध्यें रुद्धि येण्यास द्यावें.

निदिग्धिकानागरिकामृतानांक्वाथंपिबेन्मिश्रितपिप्पली-
कम्॥ जीर्णज्वरारोचककासशूलश्वासाग्निमांद्यार्दित
पीनसेषु॥७॥

अर्थ:- रिंगणी, सुंठ, गळवेल, यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा. म्हणजे जीर्णज्वर, अरुचि, श्वास, खोकला, शूल, अग्निमांद्य, अर्दितवायु, पीनस हे जातात.

॥अथविषमज्वरलक्षणोपचारः॥

॥दोषोल्पोहितसंभूतोज्वरोत्सृष्टस्यवापुनः॥
॥धातुमन्यतमंप्राप्यकरोतिविषमज्वरम्॥१॥

अर्थ:- ज्वर निघालेल्या मनुष्यास कुपथ्यापासून अल्पदोष उत्पन्न होतो. तो सात धातूंपैकीं कोणत्या एका धातूप्रत प्राप्त होऊन विषमज्वर करितो.

शीतपूर्वःसविज्ञेयोदाहपूर्वोनिरंतरम्॥ एकद्वित्रिच
तुर्थःस्यात्विषमोन्यस्तुजीर्णकः॥ एतेपंचज्वराःपी
डांकुर्वंतिबहुवासरम्॥२॥

अर्थ:- थंडी वाजून येतो, किंवा दाह होऊन येतो, आणि नेहेमीं असतो हा एक. आणि एक दिवसांनीं, दोन दिवसांनीं, तीन दिवसांनीं, चार दिवसांनीं, येणारे असे चार त्यांस जीर्ण असें ह्मणतात. मिळून पांच प्रकारचे विषमज्वर बहुत दिवस पीडा करितात.

॥यःस्यादनियतात्कालाच्छीतोष्णाभ्यांतथैवच॥
॥वेगतश्चापिविषमोज्वरःसविषमोमतः॥३॥

अर्थ:- ज्या ज्वराला वेळेचा नेम नाहीं आणि शीतानें किंवा उष्णानें अधिक होतो हाही नेम नाहीं. कधीं अधिक येतो कधीं कमी येतो अशा ज्वरास विषम ह्मणतात.

॥मुस्तामलकगुडूचीविश्वापिचकंटकारिकाक्वाथः॥
॥पीतःसकणाचूर्णेमधुभ्यांविषमज्वरंहंति॥४॥

अर्थ:- नागरमोथे, आंवळकाठी, गळवेल, सुंठ, रिंगणी यांचा काढा मधपिंप-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ळीचें चूर्ण घालून घ्यावा म्हणजे विषम ज्वराचा नाश होतो.

महौषधामृतामुस्तांचंदनोशीरधान्यकैः॥
क्वाथस्तृतीयकं हंति शर्करामधुयोजितः॥५

अर्थ- सुंठ, गळवेल, नागरमोथा, चंदन, वाळा, धणे यांचा काढा साखर, मध घालून घेतला असतां तृतीयक ज्वराचा नाश होतो.

वासाधात्रीस्थिरादारुधान्यनागरसाधितं
सितामधुफलं कुर्याच्चातुर्थकनिवारणं॥६

अर्थ- अडूळसा, आंवळकाठी, सालवण, देवदारु, धणे, सुंठ, यांचा काढा, मध, साखर घालून घ्यावा. म्हणजे चातुर्थिक ज्वराचा नाश होतो.

कन्याकर्तितसूत्रेणत्वपामार्गस्यमूलिका॥
रवौबद्धाज्वरं हंति तृतीयकचतुर्थकौ ॥७॥

अर्थ- कुमारीचे हातून काढलेलें सूत घेऊन त्या सूतानें आघाड्याची मूळी-हातास बांधावी म्हणजे तृतीयक चातुर्थिक ज्वर हे जातात.

काकजंघाबलाश्यामाभृंगराजोपमार्गकाः
एकैकं पुष्ययोगेन बध्वाचातुर्थिकं हरेत्॥८

अर्थ- कांग, चिकणा, पिंपळी, तेड, आघाडा, त्यांतून एकेक पुष्य नक्षत्राचेठा-यीं हातास बांधलें असतां चातुर्थिक ज्वराचा नाश करील.

कृष्णांबरे दृढोबद्धोगुग्गुलूकपुच्छजः॥
धूपश्चातुर्थिकं हन्यात्तमःसूर्यइवोदितः॥९

अर्थ- गुग्गूळ काळे फडक्यांत बांधून त्याला घुबडाचे शेंपटीचा धूप द्यावा. म्हणजे चातुर्थिकाचा नाश करील. जसा सूर्य उदयास आला म्हणजे अं-धकाराचा नाश करितो तसा.

शोकात्क्रोधात्तथाजीर्णात्संतापाद्बलहानितः
अंतकालेचमर्त्यानांजायंते दारुणाज्वराः॥१०

अर्थ- शोक, क्रोध, अजीर्ण, संताप, बलहानि, यांपासून अंतकाळीं मनुष्यां-स भयंकर ज्वर उत्पन्न होतात.

सर्वज्वरापहंनीलीमूलंरात्रिज्वरापहम्॥
दुग्धिकामूलिकाकर्णे हंति वेलाज्वरं तथा ११

अर्थ- निळीचे झाडाचें मूळ रात्री येणाऱ्या ज्वराचें नाशक आहे. तशीच दु-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

धीची मुळी कानांत ठेवली असतां नेमलेल्या वेळांनीं येणारा जो ज्वर त्याचा नाशक आहे.

आतंकमुक्तेकृशताश्रयाणांविमुक्तपथ्यानुचितक्रियाणां
अल्पोपिदोषोविषमंविदध्याज्ज्वरंविवृद्धं प्रतिपक्षरुद्धं १२

अर्थ:- ज्वरापासून मुक्त झालेले आणि कृश झालेले व पथ्य सुटलेले अशा मनुष्यांस अल्पदोष देखील विषमज्वराप्रत उत्पन्न करितो. कारण तो प्रतिपक्षांनीं ह्मणजे औषधादिकांनीं रुद्ध ह्मणजे प्रतिबद्ध झालेला असतो. त्याला थोडेंसें निमित्त मिळालें ह्मणजे फार वाढतो.

पटोलयष्टीमधुतिक्तरोहिणीघनाभयाभिर्विषमज्वरघ्नः
कृतःकषायस्त्रिफलामृताविषैःपृथक्पृथग्वा विषमज्वरघ्नः १३

अर्थ:- कडू पडवळ, ज्येष्ठ मध, कुटकी, नागरमोथा, हिरडा, यांचा काढा विषमज्वराचा नाशक आहे. तसाच हिरडा, बेहडा, आंवळकाठी, गळवेल, अडूळसा, यांचाही काढा विषमज्वराचा नाशक आहे. इति पटोलपंचकम् ॥ छ

आमलंचित्रकंपथ्यासैंधवंपिप्पलीतथा ॥ चूर्णतोयंगणोद्वेष सर्वज्वरविनाशनः ॥ मेदीरुचिकरःश्लेष्मजेतादीपनपाचनः ॥ १४

अर्थ:- आंवळकाठी, चित्रक, हिरडा, सैंधव, पिंपळी यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर द्यावें हें सर्व ज्वरांचें नाशक आहे. आणि मेदी, रुचिकर, दीपन, पाचन, कफनाशक असें आहे.

पथ्यास्थिरानागरदेवदारुधात्रीवृषैरुत्क्वथितःकषायः ॥ सितोपलामाक्षिकसंप्रयुक्तश्चातुर्थिकंहंत्यचिरेणपीतः ॥ १५

अर्थ:- हिरडा, साल्वण, सुंठ, देवदार, आंवळकाठी, अडूळसा यांचा काढा खडीसाखर व मध घालून द्यावा. ह्मणजे चातुर्थिकाचा लवकर नाश करी.

इतिपथ्यादिः

त्रिभिरथपरिवृद्धंपंचभिःसप्तभिर्वादशभिरथविवृद्धंपिप्पलीवर्द्धमानम् ॥ इतिपिबतिपयोयस्तस्यन-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥ श्वासकासज्वरजठरगुदार्शोवातरक्तक्षयाः स्युः १६

अर्थः- प्रथम दिवशीं तीन, दुसरे दिवशीं पांच, तिसरे दिवशीं सात, चवथे दिवशीं दहा या प्रमाणें पिंपळ्या टाकून दूध आणि दुधाचे समभाग पाणी घालून पाणी आटवून जो पितो त्याला श्वास, खोकला, ज्वर, उदर, मुळव्याध, वात, रक्त, क्षय हे होत नाहींत. आणि असतील तर जातील ॥ ५॥

॥ क्षीरेणपिप्पलीपंचक्षीरान्नंभुज्यतेतुयत्
॥ दशाहंपंचवृद्धिःस्यादपकर्षस्तथैवच १७॥

अर्थः- प्रकारांतरें करून वर्धमान पिंपळी सांगतो. दूध पाणी समभाग घेऊन त्यांत पिंपळ्या टाकून पाणी आटवून बाकी दूध प्यावें. पिंपळ्या टाकण्याचा प्रकार. पहिले दिवशीं पांच. दुसरे दिवशीं सहा. तिसरे दिवशीं सात. चवथे दिवशीं आठ. पांचवे दिवशीं नऊ. सहावे दिवशीं दहा. सातवे दिवशीं नऊ. आठवे दिवशीं आठ. नववे दिवशीं सात. दहावे दिवशीं सहा. पुनः पांच. या प्रमाणें करावें. यास पथ्य दूध भात खावा. गुण पूर्वी प्रमाणें जाणावे.

॥ ज्वरेंजनंनिशातैलकृष्णामरिचसैंधवैः॥व-
॥ चाहरीतकीसर्पिर्धूपःस्याद्विषमज्वरे॥१८

अर्थः- हळद, तिळांचें तेल, पिंपळी, मिरें, सैंधव यांचें अंजन विषमज्वरांत करावें. आणि वेरवंड, हिरडा, तूप यांचा धूप द्यावा. इति अंजनधूपौ॥

॥ अजायाश्चर्मरोमाणिवचाकुष्ठंपलंकषा॥
॥ निंबपत्राणिमधुचधूपनंज्वरनाशनं॥१९॥

अर्थः- शेळीचें कातडें, आणि केंश, वेरवंड, कोष्ठकोलिंजन, गुग्गूळ, कडूलिंबाचीं पानें, मध यांचा धूप ज्वरनाशक आहे. इति धूपनम्॥

॥ पलंकषानिंबपत्रवचाकुष्ठंहरीतकी॥स-
॥ र्षपाःसयवाःसर्पिर्धूपनंज्वरनाशनं॥२०

अर्थः- गुग्गूळ, कडू लिंबाचीं पानें, वेरवंड, कोष्ठकोलिंजन, हिरडा, शिरस सातु, तूप, यांचा धूप ज्वरनाशक आहे. इत्यष्टांगधूपः

॥ सर्पत्वचासर्षपहिंगुनिंबपत्राण्यमीषांसमचूर्णधूपः
॥ विनिघ्नंराक्षसडाकिनीनांकरोतिरक्षांविषमज्वरस्य २१

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः सर्पाची मेंग, शिरीस, हिंग, कडुलिंबाचीं पानें यांच्या समभाग चूर्णाचा धूप राक्षस, डाकिनी यांचा निग्रह म्हणजे प्रतिबंध करितो. आणि विषमज्वराची रक्षा करितो. म्हणजे विषमज्वर येऊं देत नाहीं. इति धूपनं॥

कुमारीमूलकर्षेकंपीलाकोलजलैर्वमेत्॥ विषमंतुज्वरंहंतिवातश्लेष्मगदानपि॥ १ ॥

अर्थः कोरफडीचें मूळ तोळाभर पिंपळीचे काढ्यांत प्यावें. म्हणजे ओकारी होऊन विषमज्वर, वातरोग, कफरोग यांचा नाश होईल.

त्रिफलारजनीयुग्मंकंटकारीफगंसटी॥ त्रिकटुग्रंथिकंमूर्वागुडूची धन्वयासकः॥२॥ कटुकापर्पटोमुस्तात्रायमाणाचवोलकम्॥ निंबपुष्करमूलंचमधुयष्टीचवत्सकः ३ यवानींद्रयवाभार्ङ्गीशिग्रुबीजंसुराष्ट्रजा॥ वचात्वक्पद्मकोशीरचंदनातिविषाबला॥४॥ शालिपर्णीपृष्ठिपर्णीविडंगंतगरंतथा॥ चित्रकंदेवकाष्ठंचचव्यंद्राक्षापटोलजम्॥५॥ जीवकर्षभकौचैवलवंगंवंशरोचना॥ सुंडरीकंचकाकोलीपत्रजंजातिपत्रकं॥६॥ तालीसपत्रंचतथा समभागानिचूर्णयेत्॥ सर्वचूर्णस्यचार्धांशंकेरातंप्रक्षिपेत्सुधीः॥७॥ एतत्सुदर्शनंनाम्नाचूर्णंदोषत्रयापहम्॥ ज्वरांश्चनिखिलान्हंतिनात्रकार्याविचारणा॥८॥ पृथक्कुंद्वागंतुकांश्चधातुस्थान्विषमज्वरान्॥ सन्निपातभवांश्चापिपीनसानपिनाशयेत्॥९॥ शीतज्वरैकाहिकादीन्मोहंतंद्रांभ्रमंतृषाम्॥ श्वासकासौचपांडुंचहृद्रोगंहंतिकामलाम्॥१०॥ त्रिकपृष्ठकटीजानुपार्श्वशूलनिवारणम्॥ शीतांबुनापिबेत्धीमान्सर्वज्वरनिवृत्तये॥११॥ सुदर्शनंयथाचक्रंदानवानांविनाशनम्॥ तद्वज्ज्वराणांसर्वेषामिदंचूर्णंप्रणाशनम्॥१२॥

अर्थः हिरडा, बेहडा, आंवळकाठी, हळद, दारुहळद, रिंगणी, डोरली, कचोरा, सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, मोरवेल, गळवेल, धमासा, कुटकी, पित्तपाडा, नागरमोथा, मेंदीचें बीज, वाळा, कडुलिंब, पोरवरमूळ, ज्येष्ठमध,

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पांढरा कुडा, ओंवा, इंद्रजव, भारंगमूळ, शेवग्याचें बीज, तुरटी, वेरवंड, दालचिनी, पद्मकाष्ठ, काळा वाळा, चंदन, अतिविष, चिकणामूळ, साल्वण, पिठवण, वावडिंग, नगर, चित्रक, देवदार, चवक, कडू पडवळ, जीवक, ऋषभक, यांच्या अभावीं झयकोहळा, लवंग, वंशलोचन, पांढरें कमळ, काकोळी, तिचे अभावीं जेष्ठीमध, तमालपत्र, जायपत्री, तालीसपत्र हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करावें. आणि सर्व चूर्णाचे निमें काडेकिराइताचें चूर्ण त्यांत मिसळावें. याला रुद्रदर्शनचूर्ण असें ह्मणतात. हें रुद्रदर्शन चूर्ण संपूर्ण वात, पित्त, कफ, ज्वरयांचें नाशक आहे. या विषयीं विचार करूंनये. तेच संपूर्ण ज्वर पुढील गुण पाठांत सांगतो. वातज्वर, पित्तज्वर, कफज्वर, वातपित्तज्वर, वातकफज्वर, पित्त कफज्वर, आगंतुकज्वर, धातुगतज्वर, विषमज्वर, सन्निपातज्वर, पीनसज्वर, ऐकाहिकादिज्वर, मोह, तंद्रा, भ्रम, तृषा, श्वासकास, पांडुहृद्रोग, कावीळ, माकडहाड, पाठ, कंबर, गुडघे, कुशी इतक्यांचे ठिकाणचा शूल या सर्वांचा नाशक आहे. हें चूर्ण थंड पाण्या बरोबर प्यावें, म्हणजे सर्व ज्वरांचा नाश होतो. जसें रुद्रदर्शनचक्र दानवांचें नाशक तसें हें चूर्ण सर्व ज्वरांचें नाशक आहे. इति रुद्रदर्शनचूर्णं॥ ७॥

जीर्णेज्वरेकफेक्षीणेक्षीरंस्यादमृतोपमम्॥
तदेव तरुणेपीतंविषवद्धंतिमानवम्॥१॥

अर्थ:- ज्वर जीर्ण आणि कफ क्षीण असतां दूध अमृततुल्य आहे. तेंच दूध तरुण ज्वरामध्यें प्यालें असतां विषाप्रमाणें मनुष्यास मारतें असें जाणा॥

अन्नकांक्षाशिरःकंडूःक्षवथुर्गात्रलाघवम्
प्रस्वेदोमुखपाकश्चज्वरमुक्तस्यलक्षणं॥२

अर्थ:- अन्नावर इच्छा, डोक्याला कंड, शिंक, आंग हलकें, घाम, तोंड येणें, इतकीं ज्वर निघाल्याचीं लक्षणें आहेत.

व्यायामंचव्यवायंचस्नानंचक्रमणंतथा॥
ज्वरमुक्तोनसेवेतयावन्नबलवान्भवेत्॥३

अर्थ:- व्यायाम ह्मणजे कांहीं श्रम करणें, मैथुन, स्नान, फिरणें इतकीं ज्वरा पासून मुक्त झालेल्या मनुष्यानें जों पर्यंत चांगली शक्ति आली नाहीं तों पर्यंत करूंनयेत.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥ अथ रसोपचारः ॥

रसहिंगूलजेपालवृक्ष्यादंत्यंबुमर्दयेत्॥ दि-
नार्द्धेनज्वरंहंतितमःसूर्योदयोयथा॥ १॥

अर्थः- १ पारा, २ हिंगूळ, ३ जेपाळ हीं औषधें दांतिमूळाचे रसांत खलून दोन गुंजा वजनाच्या गोळ्या बांधाव्या. एक गोळी भक्षण केली ह्मणजे अर्धे दिवसांत ज्वर जातो. जसा सूर्योदय झाला असतां अंधकार जातो तसा.॥

॥ इति बालार्करसः ॥

शक्रसूतंविषंगंधंधूर्तबीजंत्रिभिःसमम्॥ चतुर्णांद्विगु
णंव्योषंचूर्णंगुंजाद्वयंहितं॥ १॥ पक्वजंबीरकद्रावैर्यु-
क्तार्द्रस्यद्रवैर्युतम्॥ महाज्वरांकुशोनामज्वराणामंत-
कोभवेत्॥ २॥ एकाहिकंद्व्याहिकंवात्र्याहिकंवाचतुर्थ-
कम्॥ विषमंवात्रिदोषोत्थंनाशयेद्यामसात्रतः॥ ३॥

अर्थः- पारा, गंधक, बचनाग, हीं तीन समभाग घेऊन या तिहींचे बरोबर धोत्र्याचें बीज मिळवावें व या चहूंचे दुप्पट सुंठ, मिरें, पिंपळी यांचें चूर्ण घ्यावें. आणि सर्व एकत्र करून लिंबाचे आणि आल्याचे रसांत खलावें. आणि दोन गुंजांप्रमाणें भक्षण करावें. ह्मणजे एका प्रहरानें एकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चतुर्थक, विषम, सन्निपातज्वर यांचा नाश करील. यास महाज्वरांकुश असें ह्मणतात. हा सर्व ज्वरांचा नाश करणारा आहे.॥ ४॥

सूतशक्रल्बत्रिवृताबलितिक्तादंतिबीजचपलाविष-
तिंदुः॥ पथ्ययासहविचूर्ण्यसमांशंहेमवारिसहितंदि-
नमेकम् ५ वल्लयुग्मगुटिकार्द्रकवारानाशयेदभिन-
वज्वरमाशु॥ विश्वतापहरणोत्रचपथ्यंमुद्गयूषस-
हितंदिनमेकं॥ ५॥

अर्थः- पारा, ताम्र भस्म, तेड, गंधक, कुटकी, जेपाळ, पिंपळी, कुचला, हिरडा हीं सर्व समांश घेऊन चूर्ण करावें. आणि धोत्र्याचे रसांत दिवसभर खलावें. नंतर दोनवाल वजनाची गोळी करावी. ती गोळी आल्याचेरसा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

बरोबर मध घालून खाल्ली असतां नवीन ज्वराचा नाश करील. याला विश्व-ताप-हरण असें ह्मणतात. याला मुगांचें काढण आणि भात एक दिवस खावा हें पथ्य आहे. इति विश्वतापहरणः॥

सूतंगंधंलोहकिट्टंविमर्द्यसर्वैस्तुल्यंवत्सनाभंविचुं-
ज्यात्॥ आर्द्रभृंगंबीजपूरंजयंतीनिर्गुंडीकाभृंगराज-
द्रवैश्च॥१॥ युक्त्यावेद्योभावयित्वाविधेयाशाणार्धार्द्धं
सन्निपातस्यनूनम्॥ शीतंवातंनिर्मलंस्नानपानंपथ्यं
दुग्धंशर्कराभिर्घृतंच॥२॥

अर्थः- पारा, गंधक, मंडूर-भस्म, तिहींचे बरोबर बचनाग, हीं सर्व आलें, माका, माहाळुंग, भांग, निर्गुंडी, इनक्यांचे रसांत एकेकवेळ खलून भावना द्या-व्या. आणि एक माशा प्रमाणें गोळी भक्षण करावी. ह्मणजे सन्निपाताचा नाश करील. गार पाण्याचें स्नान करावें. वारा घ्यावा. थंड पाणी प्यावें. या सपथ्य दूधभात आणि साखर. इतिसन्निपातभैरवः॥

हिंगूलंचविषंव्योषंटंकणंमागधीशिफा॥संचूर्ण्यभा-
वयेत्मेधास्फुरसार्द्रकहेमभिः॥१॥ रसस्त्रिभुवनेकीर्ति
र्गंजेकार्द्रद्रवेणवै॥ सर्वज्वरविनाशंचसन्निपातांस्त्रयो
दश॥२॥

अर्थः- हिंगूळ, बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, टांकणखार आणि पिंपळमूळ हीं सर्व औषधें बारीक करून तुळस, आलें, धोत्रा यांचे रसांत निर-निराळीं खलावीं. याला त्रिभुवनकीर्तिरस असें ह्मणतात. हा एक गंज-भार आल्याच्या रसा बरोबर खावा. ह्मणजे सर्व ज्वर, तेरा प्रकारचे सन्नि पात यांचा नाश करील

रसंगंधकंटंकणंवत्सनाभंसमंमर्दयेत्सूत
बीजेनयामं,ततोवत्सनागेनहेमैश्चबीजैर-
सैर्भावयेच्चत्रिवारंत्रिवारं॥ कटुत्र्यादिकंपंच
वारंततःस्यादयंसूतराजोमृतप्राणदायी॥३॥

अर्थः- पारा गंधक टांकणखार बचनाग हीं सर्व समभाग घेऊन धोत्र्याच्या

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

बियांचा काढा करून प्रहरभर खलावें. नंतर बचनागाच्या काढ्यानें तीनभावना द्याव्या. नंतर सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचे काढ्याच्या भावना पांचवार द्याव्या. ह्मणजे हा सूतराज, मृतप्राणदायी रस होतो.

ज्वरेसन्निपातेज्वरेनूतनेवामहाश्लेष्मरोगेचगुंजाप्रमाणम्॥ पयःपायसंदाधिकंतक्रभक्तंसितावानवेहिज्वरेचार्द्रनीरैः॥४॥ ज्वरेचातिसारेघनद्रावयुक्तेग्रहण्यर्शसांक्षौद्रसंसीतयावा॥ ज्वरेवायुनाग्निचित्रकङ्गिपीतंप्रकंपेचबाहूकएकांगवाते॥५॥ अपस्मारमुन्मादवातंनिहंतिप्रयुक्तःसिता पंचभिर्धूर्तबीजैः॥

अर्थ-सन्निपातज्वर, नूतनज्वर, मोठा कफरोग, यांचे ठायीं गुंजप्रमाण आल्याच्या रसांत द्यावा. पथ्य दूधभात, क्षीर, दहिंभात, ताकभात आहे. आणि हा रस ज्वरातिसार, आमातिसार, संग्रहणी, मुळव्याध यांच्या ठायीं मधअथवा सारवर यांच्या बरोबर द्यावा. वातज्वर, प्रकंपवायु बाहुकवायु, एकांग-वायु यांचे ठायीं सुंठ, मिरें, पिंपळी, चित्रक, यांच्या चूर्णाबरोबर द्यावा. आणि अपस्मार वायु, उन्माद वायु यांच्याठायीं सारवर आणि पांच धोत्र्याच्या बिया यांच्या बरोबर द्यावा. इति मृतप्राणदायीरसाचीं अनुपानें॥७

अथविषमेरसाः॥

तालकरवर्परमूषकयुग्मंकांचनपल्लवजरसेघृष्टं॥,मर्दयमर्दयपुनरपिमर्दयशीतभयादिनिवारणगुटिका १

अर्थ:- हरताळ, कलरवापरी, मूषकयुग्म ह्मणजे लहान उंदीरकानी, थोरउंदीरकानी हीं कांचनपल्लवरसांत खलून तारतम्य पाहून मात्रा द्यावी. ह्मणजे हिंवज्वर निवारण होईल.

पिष्ट्वातालकमेकभागममलंशंबूकचूर्णंक्षिपेत्दत्वाचाथनवांशतोपिचशिखिग्रीवंपुनःपेषयेत्॥ कौमारीरसमर्दितोगजपुटेपाकंचशीतंततोगृण्हीयादथगुंजयाज्वरहरःखंडेनसंयोजयेत्॥१॥ एकद्वित्रिभवंचतुर्थकमथंवेलाज्वरंनाशयेत्शीतारिश्चपलायतेज्वरइमंभानुंयथाशर्वरी॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- हरताळ एकभाग, शंखभस्म एक भाग, मोरचूत $\frac{1}{2}$ नवमांश या तिहींचें चूर्ण कोरफडीच्या रसांत खलून गजपूट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर दोन गुंजा खडीसाखरे बरोबर खावा. म्हणजे ऐकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चतुर्थक, वेलाज्वर यांचा नाश करितो. याला शीतारी असें ह्मणतात. यातें पाहून ज्वर पळतो. जशी सूर्यास पाहून रात्र पळते. इतिशीतारिः॥७॥ ७॥ ॥

तुत्थंटंकणनालकंबलिविषंस्यात्वर्परंपारदःसर्वंख-
ल्वतलेविमर्द्यमतिमांस्तत्कारवल्लीरसैः॥ गुंजैकप्रमि-
ताचशार्करयुतासाजीरकेणाथवात्येकद्वित्रिचतुर्थ
शीतहरणःशीतांकुशोनामतः॥१॥

अर्थ- मोरचूत, टंकणखार, हरताळ, गंधक, बचनाग, कलखापरी, पारा हीं सर्व बारीक करून कारलीच्या रसांत खलून एक गुंज गोळी साखरे बरोबर किंवा जिऱ्या बरोबर खावी ह्मणजे एकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चतुर्थक असा जो शीतज्वर यांची नाशक आहे. याला शीतांकुश असें ह्मणतात.

॥इतिशीतांकुशः॥

चलदलतरुसेवाहोममंत्रौत्रिनेत्रद्विजगुरुजनपूजा
विष्णुनाम्नांसहस्रम्॥ मणिधृतिरपिदानान्याशिषस्ता-
पसानांसकलमिदमरिष्टंयक्तमष्टज्वराणाम्॥ १॥७

अर्थ- पिंपळाची सेवा, होम, मंत्रजप, सांब, ब्राह्मण, गुरुजन यांची पूजा, विष्णुसहस्रनामपाठ, मणिधारण, दान, तपस्वी यांचे आशीर्वाद इतकीं अष्टप्रकारचे ज्वरानां अरिष्टें आहेत. म्हणजे त्यांचीं नाशक आहेत.

समुद्रस्योत्तरेतीरेद्विविदोनामवानरः॥तस्य
स्मरणमात्रेणज्वरोयातिदिगंतरम्॥ २॥७

अर्थ- या मंत्राचा जप करावा म्हणजे ज्वर जातो. इति चिकित्सासारे ज्वर लक्षणोपचारः समाप्तः॥७॥

॥अथातीसारलक्षणोपचारः॥

अरुणंफेनिलंरूक्षमल्पमल्पंमुहुर्मुहुः॥ शब्दामंसरु-
कशब्दंमारुतेनातिसार्यते॥१॥ पित्तात्सीतंहारितंलोहितं
वातृष्णामूर्छादाहपाकज्वरार्तः॥ शुक्लंसांद्रंश्लेष्मणाश्ले-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

भृशं कृष्टं विस्रंशी तं हृष्टरोमा मनुष्यः ॥ २ ॥ वाराहस्नेह-
मांसांबुसदृशं सर्वरूपिणम् ॥ कृच्छ्रसाध्यमतीसारं वि-
द्याद्दोषत्रयोद्भवम् ॥ ३ ॥ ज्वरातिसारयोरुक्तं निदानं-
च पृथक् पृथक् ॥ तस्माज्ज्वरातिसारस्य तेन नात्रो-
दितं पुनः ॥ ४

अर्थ:- तांबूस, फेंसट, रूक्ष, थोडें थोडें, वारंवार, आमभिश्रित, वारा सरून जें शौचास होतें त्याला वातातिसार असें ह्मणतात. पित्तापासून असला ह्मणजे पिवळें, हिरवें, तांबडें, यांतून एक प्रकारचें असतें. आणि तृषा, मूर्छा, दाह गुदपाक, ज्वर इतक्यांनीं पीडित मनुष्य असतो. कफापासून असला ह्मणजे पांढरें, दाट, कफमिश्रित, आमसाण घाण असतें थंडी, अंगावर रोमांच असें मनुष्यास होतें. त्रिदोषापासून असला ह्मणजे डुकराचे तेला प्रमाणें किंवा मांसरसा प्रमाणें आणि सर्व रंगांचें असतें, तो अतिसार कष्टसाध्य जाणावा. ज्वर आणि अतिसार यांचें निरनिराळें निदान सांगितलें ह्मणून ज्वरातिसाराचें पुनः निदान सांगितलें नाहीं.

आमपक्वक्रियां हित्वा नातिसारे क्रिया हिता
अतः सर्वातिसारेषु ज्ञेयं पक्वामलक्षणं ॥ ५ ॥

अर्थ:- आमपक्व करण्याची क्रिया सोडून दुसरी अतिसारावर क्रिया हितावह नाहीं. या साठीं सर्वातिसाराचे ठायीं आम, पक्व आहे किंवा नाहीं हें पहा:

आमे विलंघनं शस्तमादौ पाचनमेव च ॥ का-
र्यं वा नशनस्यांते सद्रवं लघु भोजनम् ॥ ६ ॥

अर्थ:- आमातिसाराचे ठायीं पूर्वीं लंघन आणि पाचन प्रशस्त आहे. अथवा लंघना-नंतर पातळ लघु असें भोजन करावें.

नागरातिविषामुस्ताभूनिंबामृतवत्सकैः ॥
सर्वज्वरहरः क्वाथः सर्वातीसारनाशनः ॥ ७

अर्थ:- सुंठ, अतिविष, नागरमोथा, किराईत, गळवेल, कुडा यांचा काढा सर्व ज्वर आणि सर्व अतिसार यांचा नाशक आहे.

धान्याद्वालकबिल्वनागरैः साधितं जलं
दद्यात्पाचनकं पूर्वमामातीसारनाशनं ८

अर्थ:- धणे, नागरमोथा, वाळा, बेलफळ, सुंठ इतक्यांचा काढा आमाति-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सारावर पाचन द्यावा। हा आमातिसार नाशक आहे.

नागरंदेवकाष्ठंचधान्यकंबृहतीद्वयम्॥ द
द्यात्साचनकंपूर्वंज्वरितायज्वरापहम्॥९॥

अर्थः- सुंठ, देवदार, धणे, रिंगणी, डोरली यांचा काढा पाचन, ज्वरनाशक आ०

सवत्सकःसातिविषःसबिल्वःसोदीच्यमुस्तश्चकृतःक-
षायः॥ सामेसशूलेचसशोणितेचचिरप्रवृत्तेपिहितोऽ
तिसारे॥१०॥

अर्थः- कुडा, अतिविष, बेलफळ, वाळा, नागरमोथे यांचा काढा आम, शूल, रक्त याणीं युक्त पुष्कळदिवसांचा जरी अतिसार असला तरी त्यावर हितकारक आहे.

स्नानाभ्यंगावगाहंचगुरुस्निग्धादिभोजनं
व्यायाममग्निसंतापमतिसारीविवर्जयेत्॥११॥

अर्थः- स्नान, अभ्यंग, बुडी मारणें, गुरु, स्निग्ध इत्यादिक भोजन, व्यायाम, शेक घेणें इतकीं अतिसारी याणें वर्ज करावीं.

सदेवदारुःसविषःसपाठःसजंतुशत्रुःसघ-
नःसतीक्ष्णः॥ सवत्सकःक्वाथउदाहृतोसौ
शोफातिसारांबुधिकुंभजन्मा॥१२॥ छ॥

अर्थः- देवदार, अतिविष, पहाडमूळ, वावडिंग, नागरमोथा, भिरें, कुडा यांचा काढा शोफातिसार हाच समुद्र याला अगस्ति ऋषीसारखा आहे॥ छ॥

विडंगातिविषामुस्तादारुपाठाकलिंगकम्
मरीचेनसमायुक्तंशोथातीसारनाशनम्॥१३॥

अर्थः- वावडिंग, अतिविष, नागरमोथा, देवदारु, पहाडमूळ, कुडा, भिरें यांचा काढा शोथातिसार नाशक आहे. इतिविडंगादिः

नतुसंग्रहणंदद्यात्पूर्वमामातिसारिणाम्
दोषोत्थादोवर्धमानोजनयत्यामयान्बहून्॥१४॥

अर्थः- आमातिसारावर पूर्वी बंदाचें औषध देऊं नये. कारण प्रथमतः बंदाचे औषधानें आम बंद झाला ह्मणजे दोष वाढून बहुत रोग उत्पन्न करितो.

डिंभजःस्थाविरोवापिवातपित्तात्मकश्चयः॥क्षीणधातु-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

बलार्तस्य बहुदोषोतिविश्रुतः॥ आमोपिस्तंभनीयस्या
त्याचनान्मरणंभवेत्॥१५

अर्थ:- लहान किंवा मोठे मनुष्यास झालेला, वायूपासून किंवा पित्तापासून झालेला आणि ज्यामध्यें धातु बलही क्षीण आणि अनेक दोषांनीं युक्त फार वाढलेला असा आम जरी आहे, तथापि बंद करावा. पाचन देऊं नये. पाचन दिलें असतां मरण होईल.

किरातात्ब्दामृताविश्वचंदनोशीरवत्सकैः॥
शोथातिसारशमनंविशेषाज्ज्वरनाशनं१६

अर्थ:- किराईत, नागरमोथा, गुळवेल, सुंठ, चंदन, वाळा, कुड्याचें बीं, इंद्रजव) यांचा काढा शोथातीसार आणि विशेषें करून ज्वर यांचा नाशक आहे. किरातादिः॥७॥

सल्लकीबदरीजंबूप्रियाल्वाम्रार्जुनत्वचः॥
पीताःक्षीरेणमध्वाढ्याःपृथक्शोणितनाशनाः१

अर्थ:- हरपरेवडी, बोर, जांबूळ, चारोळी, आंबा, अर्जुन, सांदडा इतक्या झाडांतून कोणा एकाची साल दुधांत बांटून मध घालून प्यालीं असतां रक्तातिसार नाशक आहे.

जंब्वाम्रामलकीनांच पल्लवैश्चरसोजयेत्॥
मध्वाज्यक्षीरसंयुक्तोरक्तातीसारनाशनः२

अर्थ:- जांबूळ, आंबा, आंवळी यांच्या पल्लवांचा रस, मध, तूप, दूध, इतक्यांनीं युक्त करून प्यावा ह्मणजे रक्तातिसार नाशक आहे.

पुटपाकेनविपचेत्सुपक्वंदाडिमीफलम्॥
तद्रसोमधुसंयुक्तःसर्वातीसारनाशनः॥३॥

अर्थ:- कोंवळें डाळिंब घेऊन त्याला वरून पानें गुंडाळून शेण माती लावून फुपाट्यांत चांगलें भाजावें आणि ठेंचून त्याचा रस काढावा. त्यांत मध घालून प्यावा. म्हणजे सर्व प्रकारच्या अतिसारांचा नाश होतो॥७

चूर्णंकिंचिद्धृताभ्यक्तंशुंठ्याएरंडजैर्दलैः॥वेष्टितंपुट
पाकेनविपचेच्चंदवन्हिना॥४॥ततउद्धृत्यतच्चूर्णंग्राह्यं
प्रातःसितासमं॥तेनयातिशमंपीडाआमातीसारसंभवा५

अर्थ:- सुंठीचें चूर्ण तुपाचें मोहन लाऊन एरंडाचे पानांत गुंडाळून वरून शेण-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

माती लाऊन कुपाट्यांत भाजावें. आणि साखरे बरोबर प्रातः काळीं खावें ह्मणजे आमातिसार दूर होतो.

गुडेनखादयेद्बिल्वंरक्तातीसारनाशनम्॥आ-
मशूलविबंधघ्नं कुक्षिरोगविनाशनम्॥ ६॥

अर्थ- गुळा बरोबर बेलफळ खावें ह्मणजे रक्तातिसार, आम, शूल, मलाचा अवष्टंभ, कुक्षिरोग ह्मणजे अतिसार यांचा नाश होतो.

पीत्वाशतावरीकल्कंपयसाक्षीरभृग्जयेत्॥
रक्तातिसारंपीत्वावातथासिद्धंघृतंनरः॥७॥

अर्थ- शतावरीच्या मुळ्या वांटून दुधाबरोबर प्याव्या, आणि दूधभात खावा. ह्मणजे रक्तातिसार दूर होईल. अथवा शतावरीचे रसांत तूप घालून रस आटवून तसें सिद्ध झालेलें तूप प्यावें.

गुददाहेप्रपाकेवापटोलमधुकांबुना॥सेका
दिकंप्रशंसंतिछागेनपयसाथवा॥ ८॥ ७॥॥

अर्थ- गुदपाक किंवा गुददाह झाला असतां कडू पडवळ, ज्येष्ठीमध यांच्या काढ्यानें किंवा शेळीच्या दुधानें किंचित् किंचित् गुद शेकावें किंवा धुवावें. ॥७

कल्कस्तिलानांकृष्णानांशर्करात्र्यश्चभागिकः
आज्येनपयसापीतःसद्योरक्तंनियच्छति॥९

अर्थ- काळे तीळ वांटलेले एक भाग, साखर दोन भाग, शेळीचें दूध चार भाग या प्रमाणें एकत्र करून प्यावें. ह्मणजे रक्त बंद होतें.

मध्वंलीढ्वाकपित्थस्यसव्योषक्षौद्रशर्करम्
कट्फलंमधुयुक्तंवामुच्यतेजठरामयात् १०

अर्थ- कवठाचा गीर, सुंठ, मिरें, पिंपळी, मध, साखर, हीं एकत्र करून खावीं. अथवा कायफळ मधाबरोबर खावें ह्मणजे अतिसार रोग नाशा पावतो.

कर्षोन्मितातुगाक्षीरीचातुर्जातंत्रिकर्षिकम्॥ यवानीधा-
न्यकाजाजीग्रंथिव्योषपलांशकम्॥ ११॥ फलानिदाडि-
मान्यष्टौसितायाश्चैकतःकृतम्॥ गुणैःकपित्थाष्टकव
च्चूर्णेदंदाडिमाष्टकम् १२॥

अर्थ- वंशलोचन एक तोळा, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर, मिळून तीन तोळे; ओंवा, धणे, जिरें, पिंपळमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, मिळून

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

चार तोळे, डाळिंबें बत्तीस तोळे, साखर बत्तीस तोळे, हीं सर्व एकत्र करून चूर्ण करावें. याला दाडिमाष्टक चूर्ण असें ह्मणतात. गुणांनीं कपित्थाष्टका सारखें आहे. इति दाडिमाष्टकचूर्णं॥

॥अथरसोपचारः॥

हिंगुलंवत्सनागंचटंकणंमरिचंकणा॥ मर्द-
येदहिफेनेनरसोत्यानंदभैरवः॥१॥ ७॥

अर्थ- हिंगूळ, बचनाग, टंकणखार मिरें पिंपळी अफू हीं सर्व एकत्र खलावीं. त्याला आनंदभैरव ह्मणतात.

गुंजैकंवाद्विगुंजंवाबलंज्ञात्वाप्रयोजयेत्॥ मधुनालेह-
येच्चानुकुटजस्यत्वचाफलं॥ चूर्णितंकर्षमात्रंतुत्रिदोषो-
त्थातिसारजित्॥२॥

अर्थ- एक गुंज किंवा दोन गुंजा बल पाहून द्यावा. आणि एक कर्ष ह्मणजे दाहा मासे कुड्याची साल किंवा इंद्रजव मधाबरोबर चाटवावें. ह्मणजे त्रिदोषापासून झालेल्या अतिसाराचा नाश होतो. इत्यानंदभैरवः॥७॥

॥जातीफलंसैंधवहिंगुलंचवराटशुंठीविषहेमबीजम्
सपिप्पलीकंवटिकांचकुर्याद्गुंजाप्रमाणाजठरामयघ्नी॥१
निहंतिवातंकफशूलमात्रमामातिसारंग्रहणीविकारम्
निहंतिशुष्कंसितयासमेतंरसोयमानंदइतिप्रदिष्टः॥२

अर्थ- जायफळ, सैंधव, हिंगूळ, कवडीचें भस्म, सुंठ, बचनाग, धोत्र्याचें बी, पिंपळी हीं सर्व एकत्र खलून गुंजभर गोळी साखरे बरोबर खावी. ह्मणजे अतिसार रोग, वात, कफ, शूळ, आमातिसार, संग्रहणी यांचा नाशा करील. याला आनंदरस असें ह्मणतात. इत्यानंदरसः॥७॥

जातीफलंसर्पफेनंटंकंगंधकजीरके॥एतानिसमभागा-
निबालदाडिमबीजकैः॥१॥पेषयेत्तेनकल्केनपूरयेद्दा
डिमीफलम्॥ अंगारेतच्चगोधूमचूर्णेनालेपितंपचेत्॥॥
अतिसारस्तंभनंस्यात्परंदीपनपाचनम्॥२

अर्थ- जायफळ, अफू, टंकणखार, गंधक, जिरें, हीं समभाग आणि यांच्या बरोबर कोंवळ्या डाळिंबाच्या बिया घेऊन एकत्र खलून तो कल्क ह्मणजे खलेला गोळा त्या कोरलेल्या डाळिंबांत भरून बाहेरून कणीक लावून निखाऱ्यांतभा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

जावें म्हणजे अतिसाराचें स्तंभन करणारें, दीपन, पाचन असें होतें. शक्ति पाहून वाल दोन वाल द्यावें. त्याला च दाडिमी पुटपाक म्हणतात.

अतिसारेज्वरेचैवरक्तपित्तेदृगामये॥ आ-
दौनप्रतिकुर्वीतव्याधिवेगोहि दुस्तरः॥ ३॥

अर्थः- अतिसार, ज्वर, रक्तपित्त, नेत्ररोग इतक्यांचे ठायीं प्रथमतः प्रतीकार करूंनये. कारण व्याधीचा वेग कठिण आहे. तो कमी झाला म्हणजे करा.

॥अथसंग्रहणीलक्षणोपचारः॥

अतीसारेनिवृत्तेपिमंदाग्नेरहिताशिनः॥ भूयःसंदूषितो
वह्निर्ग्रहणीमभिदूषयेत्॥१॥पक्वंवासरुजंपूतिमुहु-
र्बद्धंमुहुर्द्रवम्॥ग्रहणीरोगमाहुस्तमायुर्वेदविदोजनाः२

अर्थः- अतिसार निवृत्त जरी झाला तरी ज्याचा अग्नि मंद आहे आणि कुपथ्य करणारा त्याचा अग्नि पुनः दूषित होऊन ग्रहणी म्हणून साहावी पित्तधरानामक कला आहे तिला दूषित करितो आणि पक्व अथवा अपक्व शूल युक्त, दुर्गंधयुक्त, बांधलेला, पुनः पातळ पुनः बांधलेला असा मळ ज्या रोगांत होतो त्याला ग्रहणी रोग असें आयुर्वेद जाणणारे लोक म्हणतात. ॥ ७

एकैकशःसर्वशश्चदोषैरत्यर्थमुच्छ्रितैः॥
सादुष्टाबहुशोमुक्तमाममेवविमुंचति॥३॥

अर्थः- एका एका दोषानें किंवा सर्व दोषांनीं दूषित होते, ते दोष अत्यंत वाढून ती दुष्ट झाली म्हणजे बहुत करून खाल्लेलें अन्न अपक्वच सोडिते.

ग्रहणीमाश्रितंदोषमजीर्णवदुपाचरेत्॥
अतिसारोक्तविधिनातस्यामामंविपाचयेत्४

अर्थः- ग्रहणीचा आश्रय करून जो दोष राहतो त्यावर अजीर्णवत् उपचार करावा आणि संग्रहणी मध्यें जो आम असतो त्याचें पाचन अतिसारा प्रमाणें करावें.

शुंठींसमुस्तातिविषागुडूचींपिबेज्जलेनक्वथितांसमांशां॥
मंदानलत्वेसतवामवातेसामानुबंधेग्रहणीगदेच॥५॥

अर्थः- सुंठ, नागरमोथा, अतिविष, गळवेल यांचा काढा मंदाग्नि, आमवात, आमसहित संग्रहणी यांचा नाशक आहे.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥चूर्णंचव्यकचित्रश्रीविश्वभेषजनिर्मितम् ॥
॥तक्रेणसहितंहंतिग्रहणींदुःखकारिणीं॥ ६॥

अर्थः- चवक,चित्रक,बेलफळ,सुंठ यांचें चूर्ण ताकाबरोबर खावें ह्मणजे फार दुष्ट संग्रहणीचा नाश करील.

॥रुचकाग्निमरीचानांचूर्णंतक्रेणसेवितम् ॥
॥ग्रहण्युदरगुल्मार्शःक्षुन्मांद्यप्लीहनाशनं ७

अर्थः- पादेलोण,चित्रक,मिरें यांचें चूर्ण ताकाबरोबर सेवन करावें. ह्मणजे संग्रहणी,उदर,गुल्म,मुळव्याध,अग्निमांद्य,पांथरी यांचें नाशक आहे.

आम्रमाम्रातकंजंबूत्वक्कषायेपचेद्भिषक्॥
यवागूंशालिभिर्युक्तांभक्त्वातांग्रहणींजयेत्॥८॥

अर्थः- आंबा,आंबाडा,जांबूळ,यांच्या झाडाच्या सालींचा काढा करून त्यांत सालीच्या तांदुळांची पेज शिजवून खावी. ह्मणजे संग्रहणी दूर होईल.॥

भल्लातकंत्रिकटुकंत्रिफलालवणत्रयम्॥ अंतर्धूमंहिंगुपलिकंगोपुरीषाग्निनादहेत्॥९॥ सक्षारःसर्पिषापीतोभोज्येवाप्यवचूर्णितः॥ हृद्रोगपांडुग्रहणीगुल्मोदावर्तशूलनुत्॥१०॥

अर्थः- बिब्बा,सुंठ,मिरें,पिंपळी,हिरडा,बेहडा,आंवळकाठी,शेंदेलोण,पादेलोण,मीठ हीं सर्व दोन दोन पळें ह्मणजे आठ तोळे घेऊन मडक्यांत घालून तोंड बंद करून रानशेणीचें पुट द्यावें नंतर तो क्षार तुपाबरोबर अथवा भातावर पेरून खावा ह्मणजे हृद्रोग,पांडु,ग्रहणी,गुल्म,उदावर्त,शूल यांचा नाश होईल.

इतिभल्लातकक्षारः

चित्रकंपिप्पलीमूलंह्वौक्षारौलवणानिच॥ व्योषंहिंग्वजमोदंचचव्यमेकत्रचूर्णयेत्॥१॥ स्फटिकामातुलिंगस्यदाडिमस्यरसेनवा॥ कृताविपाचयत्यामंदीपयत्याशुचानलं॥२॥

अर्थः- चित्रक,पिंपळमूळ,सज्जीखार,जवक्षार,मीठ,सेंधेलोण,पादेलोण,सुंठ,मिरें,पिंपळी,हिंग,ओंवा,चवक हीं एकत्र कुटून माहाळुंगाचे किंवा डाळिंबाचे रसांत गोळ्या करून शक्त्यनुसारें खाव्या. ह्मणजे आमाचें

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पाचन आणि मंदाग्नीचें दीपन होईल.

॥ ग्रहणीदोषिणांतक्रंदीपनंग्राहिलाघवात्॥
पथ्यंमधुरपाकित्वान्नचपित्तप्रकोपनम्३॥

अर्थ- ज्याला संग्रहणी आहे त्याला ताक दीपन, ग्राही, (मलावष्टंभक) लघु आहे ह्मणून पथ्यकारक आहे, मधुर पाक आहे ह्मणून पित्तप्रकोप करीत नाहीं असें आहे.

॥ बिडंयवानीविष्टंभेपिबेदुष्णेनवारिणा॥

अर्थ- पोट फुगलें असल्यास बिडलोण, ओंवा ऊन पाण्या बरोबर खावा. ४

हिंगूलंमरिचंगंधंपिप्पलीटंकणंविषम्॥क-
नकस्यचबीजानिसमांशंविजयाद्रवैः॥४॥
मर्दयेद्यामसात्रंतुचणमात्रावटीकृता॥भ-
क्षणाद्ग्रहणींहंतिरसःकनकसंदरः॥५॥अग्नि
मांद्यंज्वरंतीव्रमतिसारंचनाशयेत्॥दध्यन्नं
दापयेत्पथ्यंतथातक्रोदनंचरेत्॥६॥ ७॥

अर्थ- हिंगूळ, मिरें, गंधक, पिंपळी, टाकणखार, बचनाग, धोत्र्याचें बीं, सर्व समांश घेऊन भांगेच्या काढ्यांत प्रहरभर खल करावा. आणि हरभऱ्या एवढी गोळी खावी. म्हणजे संग्रहणी, अग्निमांद्य, ज्वर, अतिसार यांचा नाश होतो. याला दहींभात किंवा ताकभात हें पथ्य आहे. याला कनकसंदररस असें ह्मणतात. इति कनक संदरः

॥ शुद्धैःकर्कवराटकैर्गणनयाभल्लातकांस्तत्समान्प्रोतान्
बब्बुलकंटकैर्लघुपुटेपक्वांघ्रिभागंरसं॥लेलीनेनसमं
विचूर्ण्यविजयासप्तानुभाव्यंशिवप्रोक्तोयंग्रहणीकपा
टकरसस्त्रैवल्लकस्तोषधः१॥

अर्थ- पांढऱ्या कवड्या आणि संख्येनें त्यांच्या बराबर बिब्बे घेऊन बिब्ब्यांस बाभळीचे कांटे टोंचून कवड्या आणि बिब्बे एका मडक्यांत किंवा परळांत ठेऊन लघुपुट द्यावें. नंतर त्या भस्माचे चतुर्थांश पारा आणि गंधक घेऊन त्याची कज्जली त्यांत घालून भांगेच्या काढ्याच्या सात भावना द्याव्या. ह्मणजे ग्रहणीकपाटरस होतो. हा शिवानें सांगितला आहे. तीन वाल प्रमाणें खावा. म्हणजे अग्निमांद्य, ज्वर, अतिसार यांचा नाशक आहे.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पथ्य दहींभात, किंवा ताकभात खावा. ॥ इति ग्रहणी कपाटः ॥ इ. सं. रो. प्रती.

॥ अथार्शोलक्षणोपचारः ॥

पृथक्दोषैः समस्तैश्च शोणितात्सहजानिच ॥ अर्शांसि षट् प्रकाराणि विद्याद्गुदवलित्रये ॥ प्रसारिणी सर्जनी च ग्राहिकेति बलित्रयम् १ ॥

अर्थः- पृथक् दोषांनीं ह्मणजे वातानें, पित्तानें, कफानें आणि समस्त ह्मणजे वात, पित्त, कफ या तिहीं दोषांनीं, आणि रक्तापासून, सहज ह्मणजे जन्म होण्या बरोबर झालेलीं अर्शीं सहा प्रकारचीं, अर्शा म्हणजे मुळव्याध आहे. ती गुदाचे ठिकाणीं तीन वळ्या आहेत त्यांचे ठायीं होते. त्या तीन वळ्यांचीं नावें प्रसारिणी, सर्जनी आणि ग्राहिका अर्शीं आहेत.

गुदादावंकुरास्तेस्युः सहजाः शोणितोद्भवाः

अर्थः- सहा प्रकारची मुळव्याध सांगितली त्यापैकीं रक्तापासून आणि सहज जी मुळव्याध म्हं० मोड असतात ते बहुतकरून गुदाचे आंतले वळीला असतात.

एकदोषाबाह्यबलौसाध्याअन्यास्त्वसाध्यकाः २

अर्थः- एक दोषानें जे मोड येतात ते बाहेरचे वळीला ते साध्य. आणि द्विदोषापासून अथवा त्रिदोषापासून जे मोड येतात ते असाध्य जाणावे. ॥ ७ ॥

अर्शोतिसारग्रहणीविकाराः प्रायेणचान्योन्यनिदानभूताः ॥
शांतेनलेसंतिनसंतिदीप्तेरक्षेदतस्तेषुविशेषतोग्निम् ॥ ३

अर्थः- मुळव्याध, अतिसार, संग्रहणी हे रोग परस्पर कारणभूत आहेत ह्मणजे मुळव्याधीपासून संग्रहणी होते. किंवा संग्रहणीपासून मुळव्याध होते. या प्रमाणें जाणावें. ते पुनः अग्निमंद असल्यामुळें होतात. आणि अग्निदीप्त असतां होत नाहींत. यासाठीं विशेषें करून अग्नि प्रदीप्त राखावा.

दुर्नाम्नांसाधनोपायश्चतुर्धापरिकीर्तितः ॥
भेषजक्षारशस्त्राग्निसाध्यत्वंयाप्यमुच्यते ४

अर्थः- मुळव्याध बरी होण्यास उपाय चार प्रकारचा सांगितला आहे. एक औषध, दुसरा क्षार लावणें, तिसरा शस्त्रानें कापणें, चवथा अग्नीनें भाजणें. हा व्याधि याप्य आहे ह्मणजे जों पर्यंत उपाय करूं आहेत तों पर्यंत बरा असतो. उपाय बंद केले म्हणजे पुनः उद्भवतो. निःशेष जात नाहीं. ॥ ७ ॥

तिलभल्लातकंपथ्यागुडश्चेतिसमांशकम्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

दुर्नामश्वासकासघ्नंप्लीहपांडुज्वरापहम् ५

अर्थ- तीळ, बिब्बा, हिरडा, गूळ हीं समांश घेऊन गोळी करून शक्तीप्रमाणें खावें ह्मणजे मुळव्याध, श्वास, खोकला, पांथरी, पांडुज्वर यांचा नाश होईल.

कृष्णाशिरीषबीजार्कक्षीरैः सामरसैंधवैः॥ हरिद्राकृष्ण-
विड्गुंजागोमूत्रैः पिप्पलीयुतैः॥ एतल्लेपत्रयंयोज्यंशी-
घ्रमर्शोविनाशनम् ६

अर्थ- जटामांसी, शिरस, रुईचा चीक आणि देवदार; सैंधव आणि हळद, आस्वलीची विष्ठा, गुंज, गोमूत्र व पिंपळी असे तीन लेप करावे म्हणजे मुळव्याधीचा लोकर नाश होईल.

गुडेनशुंठीमथवोपकुल्यांपथ्यांतृतीयामथदाडिमंवा॥
आमेष्वजीर्णेषुगुदामयेषुवर्चोविबंधेषुचनित्यमिष्टं ७

अर्थ- गुळाबरोबर सुंठ, पिंपळी, हिरडा, डाळिंब यांतून कोणतें एकखावें म्हणजे आम, अजीर्ण, मुळव्याध, मलावष्टंभ दूर होतील. असें जा०.

ज्योतिष्कबीजकल्केनलेपोरक्तार्शसांहितः

अर्थ- मालकांगोणीचें बीं वांटून लेप करावा. ह्मणजे रक्तापासून झालेली मुळव्याध दूर होते.

स्नुह्यग्निलांगलीदंतीमूलैर्लेपोर्शसांहितः ८

अर्थ- निवडुंगाचा चीक, चित्रक, कळलावी, दांतीचें मूळ, यांचा लेप मुळव्याधीवर हितकारक आहे.

सौरणंकंदमादायपुटपाकेनपाचयेत्॥स-
तैलगुडसंयुक्तोरसश्चार्शोविकारनुत्॥ ९॥

अर्थ- सूरणाचा कांदा पुटपाकें करून पक्व करावा. आणि शिरसाचें तेल, गूळ यांच्या बरोबर खावा म्हणजे मुळव्याधीचा विकार दूर करील.

अपामार्गस्यबीजानांकल्कस्तंदुलवारिणा॥
पीतोरक्तार्शसांनाशंकुरुतेनास्तिसंशयः॥१०

अर्थ- आघाड्याचें बीं तांदळाचे धुणांत वांटून प्यावें म्हणजे रक्ताचे मुळव्याधीचा नाश करील.

विदारीमूलकल्केनतिलकल्कस्तुयोजयेत्॥
मधुक्षीरयुतःकुर्याद्रक्तातीसारनाशनम् ११

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- मुयकोंहळा, तीळ हे वाटून मध आणि दूध यांच्या बरोबर प्यावें म्हणजे रक्तातीसाराचा नाश करील.

नवनीततिलैः कल्कोजेतारक्तार्शसांमतः ॥
नवनीतसितानागकेसरैश्चापितद्विधः॥१२॥

अर्थ:- लोणी, तीळ एके जागीं वांटून खावे म्हणजे रक्ताची मुळव्याध बरी होईल. तसेंच लोणी, साखर, नागकेशर, हे एके जागीं वांटून प्यावे. म्हणजे रक्तमुळव्याध जाईल.

आर्कपयः स्नुहीकांडंकटुकालाबुपल्लवाः॥
करंजोबस्तमूत्रेणलेपनंश्रेष्ठमर्शसाम्॥१३

अर्थ:- रुईचा चीक, निवडुंगाचें कांडें, कुटकी, कडू भोंपळ्याचे पल्लव, कंजीचें बीं बोकडाचे मुतांत यांचा लेप मुळव्याधीवर श्रेष्ठ आहे.

कटुतुंब्यास्तथादंत्याः शक्रुच्चकुक्कुटस्यच॥मुसल्याश्चाश्वगंधायाश्चित्रकस्यचयत्नतः॥१४॥मूलैस्तल्यैःकृतंचूर्णमर्कक्षीरेणभावयेत्॥स्नुहिक्षीरेणमतिमान्वारिणापरिपेषयेत्॥१५॥वस्त्रवर्त्यागुदंतेनसमालिप्यसमंततः॥गुदेविनिक्षिपेद्यत्नात्प्रातःसायंचबुद्धिमान्१६वेदनाचभवेत्तीव्रावन्हिनास्वेदयेद्गुदम्॥नोपशाम्येद्यदातेनतदाचैवोष्णवारिणि॥१७॥विनिवेश्यगुदंतिष्ठेद्वेदनाशमकारणात्॥अद्याद्दृष्यमथान्नंचशिशिरंजलमापिबेत्॥१८॥गुदजानांविनाशार्थंससाहंतुसमाहितः॥विधिनेनंप्रकुर्वीतगतशंकस्तुमानवः॥१९॥

अर्थ:- कडू भोंपळ्याचे पल्लव, दांतीमूळ, कोंबड्याची विष्ठा, सफेदमुसळी, आस्कंद, चित्रक हीं समभाग घेऊन चूर्ण करून त्याला रुईचे चिकाची आणि निवडुंगाचे चिकाची भावना द्यावी, नंतर पाण्यांत वांटून वस्त्राचे वातीनें गुदास लेप करावा आणि ती वात गुदामध्यें प्रातःकाळीं, सायंकाळीं घालावी वेदना फार होईल या साठीं गुदास शेक घ्यावा. शेक घेऊन वेदना शांत न झाली तर ऊन पाण्यांत बसावें आणि पौष्टिक अन्न भक्षण करावें. थंड पाणी प्यावें. या प्रमाणें सात दिवस करावें. म्हणजे मुळव्याधीचा नाशहोईल.

गुंजासूरणकूष्मांडबीजैर्वर्तिस्तथागुणा॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- गुंज, करण, कोंहड्याचें बीं हीं पाण्यांत वांटून वस्त्राचे वातीनें लेप करावा. वात गुदांत ठेवावी. म्हणजे मुळव्याधीचा नाश करील.

नृकेशाः सर्पनिर्मोकं वृषदंशस्यचर्मच ॥
अर्कमूलंशमीपत्रमर्शोघ्योधूपनंहितं॥ २०

अर्थ- मनुष्याचे केंश, सर्पाची मेंग, आणि मांजराचें कानडें, रुईचें मूळ, शमीचीं पानें यांची धुरी मुळव्याधीस हितावह आहे.

स्नुहिक्षीरनिशालेपस्तथागोमूत्रकल्कितः॥ योजितोगोभवक्षीरवन्हिमूलावचूर्णितं२१पिबंस्तदेवतेनैवभुंजानोगुदजांकुरान्

अर्थ- निवडुंगाचा चीक, हळद, गोमूत्र, यांचा लेप करावा. आणि गायीच्या दुधाबरोबर चित्रकाचें चूर्ण खावें. याला पथ्य दूधभात जेवावा. म्ह० मुळव्या० ब० हो०

पिबेदहरहस्तक्रंनिरन्नोवातनाशनः२२सप्ताहंवादशाहंवामासार्धं मासमेववा॥ बलकालविकारज्ञोभिषक्तक्रंप्रयोजयेत्॥ २३

अर्थ- ज्याला वायूचा रोग असेल त्याणें अन्न न खातां तक्र पिऊन रहावें. तें सात दिवस, किंवा दहा दिवस, किंवा पंधरा दिवस, किंवा महिना भर जसें आपलें बल, विकार असेल त्या प्रमाणें तक्र प्यावें. म्हणजे वायूचा विकार मोडेल. ॥

गौरीपाषाणकर्षैकंस्नुहीकांडेविनिक्षिपेत्॥ पाचयेत्पुटपाकेनततउद्धृत्ययत्नतः॥२४॥ रेवाचिनीचकुष्ठंचकल्कीकृत्यत्रयंसमं॥ लेपयेत्तेनचार्शांसिनिवार्यंतेनसंशयः॥२५

अर्थ- सोमल निवडुंगाचे कांड्यामध्यें भरावा. आणि पुटपाकानें पक्व करावा. नंतर रेवाचिनी, कोष्ठ कोलिंजन हीं तिन्ही समभाग घेऊन वांटून मुळव्याधीस लेप करावा. म्हणजे मुळव्याध जाईल.

दग्ध्वान्यग्रोधपत्राणितैलेनसहलेपयेत्॥

अर्थ- वडाचीं पानें जाळून त्याची राख तेलांत खलून मुळव्याधीस लेप करावा. म्हणजे मुळव्याध जाईल.

त्वचंचित्रकमूलस्यपिष्ट्वाकुंभंप्रलेपयेत्॥
तक्रंवादधिवातत्रजातमर्शोहरंपिबेत्॥२६

अर्थ- चित्रकाचे मुळाची साल कुटून त्याचा लेप मडक्याला आंतून करावा आणि त्यांत दही किंवा तक्र ठेऊन मुळव्याध झाली असेल त्याणें प्यावें. म्हणजे मुळव्याध जाईल.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

गुडव्योषवराबेल्लतिलारुष्करचित्रकैः॥ अर्शां-
सिहंतिगुटिकात्वग्विकारंचशीलिता॥ २७॥

अर्थ:- गुळ, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, बावडिंग, तीळ, दिब्बा, चित्रक यांची गुटिका म्हणजे गोळी खाल्ली असतां मुळव्याध, त्वचेचा विकार यांची नाशक आहे.

अरलुत्वक्वन्हिसुरेंद्रयवान्चिरबिल्वमसेंधवशुंठियुता-
न्॥ मथितेनपिबेद्यदिसप्तदिनमर्शांसिपतंतिसमूलमरं २८

अर्थ:- टेंटू, दालचिनी, चित्रक, इंद्रजव, करंजाचें बीं सैंधव, सुंठ यांचें चूर्ण मडुआबरोबर सात दिवस प्यावें म्हणजे मूळासहित मुळव्याध गळून पडेल. ॥२८

कांचनीविषपाषाणंयवक्षारंचहिंगुलं॥ जलेपिष्ट्वान्य-
सेद्गुल्वेएवंकुर्याद्दिनत्रयम्॥२९॥ क्षीरस्वेदंतथाकुर्यात्
क्षीराहारीघृतोदनं॥ अर्शरोगंनिहंत्याशुसिद्धयोगउदा-
हृतः॥३०॥

अर्थ- कांचनाची साल, सोमल, जवखार, हिंगुळ यांची पाण्यांत वांटून गोळी करून गुदांत ठेवावी. आणि दुधाची वाफ गुदास घ्यावी. दूध प्यावें. तूपभातखावा. या प्रमाणें तीन दिवस केलें असतां मुळव्याधीचा नाश होतो हा सिद्ध योग सांगितला आहे.

अथमंत्रः॥

कंकरकुरंकरंतरकंताझिलमिलतिरीयेराजकरंतरआर-
क्तासारक्ताजोजाणेइहमंत्राताकेबसनहोयअरिसाजा-
णबुझप्रकटनकरितांकेसप्तकपिलामरकिहत्या॥ १॥

अस्य मंत्रस्य प्रत्यहं जपं कुर्यात्॥ ॥या मंत्राचा जप रोज करावा॥ ७॥

समूलपत्रकोकंबंपलद्वयमितंशुभं॥ भल्लातफलमज्जा
यामरीचस्यपलंपलं॥ ३१॥ एतच्चूर्णीकृतंसूक्ष्मंभक्षयेत्
कर्षसंमितम्॥ अर्शांकुरांन्निहंत्याशुसबाह्याभ्यंतरान-
पि॥ ३२॥ ७

अर्थ:- कोकंबाचें पंचांग म्हणजे मूळ, पानें, फलांसहित झाड दोन (पळें) ८० मासे, बिब्याचा मगज म्हणजे गोडंब्या एक (पळ) ४० मासे मिरें (पळ) ४० मासे यांचें चूर्ण कर्षप्रमाण म्हणजे १० मासे खावें. म्ह० आंतले बाहेरले मोडनाश पावतील.

अथरसोपचारः

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

संमर्द्यप्रतिसारिताबहुरसौताभ्यांचगंधंसमं लांगल्या
सितसूरणेनचएथक्कृत्वाचतावत्सचेत्॥ गोलंज्वालमुपे-
तिभांडनिहितंचूल्यामथस्वौषधैः सस्यादर्शकुठारकोस्त्र
पवनार्शःपूर्वकव्याधिषु १

अर्थ:- प्रतिसारिता आणि बहुरस म्हणजे जेपाळ आणि पारा या दोघांचे बराबर गंधक घेऊन मर्दन करावें. नंतर कुहिली आणि पांढरा सूरण त्यांत मिळवून खलावें. नंतर गोळा करून भांड्यांत घालून पेट घेई तों पर्यंत पक्वकरावें. याला अर्शकुठार असें म्हणतात. हा रक्तवात मुळव्याध इत्यादिकांचे ठायीं प्रशस्त आहे. ॥इत्यर्शकुठारः॥

वेगावरोधस्त्रीपृष्ठयानान्युत्कटकासनम्॥
यथास्वंदोषलंचान्नमर्शसांपरिवर्जयेत्॥ १

अर्थ:- वेगाचा अवरोध, स्त्रीसंग, अश्वादिकांवर बसणें, उकिडवें बसणें वरील दोषांची मुळव्याध असेल तो दोष करणारें अन्न हें मुळव्याधीला वर्ज करावें.

अथअजीर्णलक्षणोपचा०

अत्यंबुपानाद्विषमाशनाद्वासंधारणात्स्वप्नविपर्ययाच्च॥
कालेपिसात्म्यंलघुचातिभक्तमन्नंनसम्यक्परिणाममेति १

अर्थ:- अतिपाणी पिणें, अकालीं खाणें, शौचादिक होत असतां न जाणें, वेळ सोडून भलते वेळेस झोंप घेणें, शक्तीपेक्षां अति खाणें इतक्या कारणांनीं अन्नाचा परिपाक चांगला होत नाहीं.

यच्चावलंबतेभक्तंस्थिरंचापिनजीर्यते॥आ-
मंविदग्धंविष्टब्धंरसशेषमजीर्णकम्॥२॥॥

अर्थ:- अन्न खाल्लें असतां पडतें आणि पडलें नाहीं तरी राहिलेलें जिरत नाहीं. त्याला अजीर्ण असें म्हणतात. तें अजीर्ण चार प्रकारचें, आमाजीर्ण, विदग्धाजीर्ण, विष्टब्धाजीर्ण, रसशेषाजीर्ण. ज्यांत अपक्व मळ पडतो आणि ओकारी होऊन अन्न पडतें तें आमाजीर्ण. ज्यांत कपट ढेंकर येतात तें विदग्धाजीर्ण, ज्यांत पोट फुगलेलें असतें तें विष्टब्धाजीर्ण, ज्यांत केवळ अन्नावरील इच्छा जाते तें रसशेष अजीर्ण जाणावें.

सूचीभिरिवगात्राणितुदन्संतिष्ठतेनिलः॥
यस्याजीर्णेनसावेद्यैर्विषूचीतिनिगद्यते॥३

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- ज्या अजीर्णामध्यें रूया टोंचल्या प्रमाणें वेदना सर्वांगांत होतात त्याला विषूची असें वैद्य ह्मणतात.

सामुद्रसौवर्चलसैंधवानांक्षारोयवानांचतथाजमोदा॥ह-
रीतकीपिप्पलिशृंगबेरंहिंगुर्विडंगंचसमानिकुर्यात्॥४
एतानिचूर्णानिघृतप्लुतानिभुंजीतग्रासान्प्रथमंचपंच॥अ-
जीर्णवातंगुदगुल्मवातंवातप्रमेहंविषमंचवातम्॥ विषू-
चिकाकामलपांडुरोगंश्वासंचकासंचहरेत्प्रयुक्तम्॥५

अर्थ:- मीठ, पादेलोण, सैंधव, जवखार, ओंवा, हिरडा, पिंपळी, सुंठ, हिंग, वा-
विडिंग, हीं समभाग घेऊन चूर्ण करून त्याला तूप लावावें. आणि भोजन स-
मयीं प्रथम पांच घांस त्या चूर्णाबरोबर खावे. ह्मणजे अजीर्णवात, गुद-
वात, गुल्मवात, वातप्रमेह, विषमवात, विषूचिका, कावीळ पांडुरोग, श्वास,
खोकला यांचा नाश करील. इति सामुद्राद्यंचूर्ण॥७॥

त्रिकटुकमजमोदासैंधवंजीरकेहेसमधरणधृतानामष्ट-
मोहिंगुभागः॥प्रथमकवलभोजीसर्पिषाचूर्णमेतज्ज-
नयतिजठराग्निंवातगुल्मंनिहंति१

अर्थ:- सुंठ, मिरें, पिंपळी, ओंवा, सैंधव, जिरें, शहाजिरें हीं समभाग घेऊन यां-
च्या आठव्या हिशानें हिंग भाजून त्यांत मिळवून तें चूर्ण तूप लावून भो-
जन समयीं पहिले घांसाबरोबर खावें, ह्मणजे अग्नि प्रदीप्त होतो. आ-
णि वात गुल्माचा नाश होतो. इति हिंग्वष्टकं॥७॥

विषूच्यामतिवृद्धायांपाष्यर्योर्दाहःप्रशस्यते
गंधकंकुंकुमंवापिदद्यान्निंबुजलेनवा॥१॥

अर्थ:- विषूची फार वाढली असतां पायांचे तळवे ओरपावे. अथवा गंधक
किंवा केशर लिंबाचे रसांत पाजावें.

व्योषंकरंजस्यफलंहरिद्रानिंबुकद्रवैः॥नस्यां-
जनेप्रयोक्तव्येकुर्याच्चजलसेचनम्॥२॥७॥

अर्थ:- सुंठ, मिरें, पिंपळी, करंजाचें बीं, हळद हीं लिंबाचे रसांत उगाळून नस्य
आणि अंजन करावें व अंगावर पाणी शिंपावें ह्मणजे विषूचिका उतरते॥७

लशुनजीरकसैंधवसंचलंत्रिकटुरामठचूर्णमिदंसमम्
सपदिनिंबुरसेनविषूचिकांहरतिभोरतिभोगविचक्षणः३

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- लसूण, जिरें, सैंधव, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग यांचें चूर्ण लिंबाच्या रसांत कालवून खावें. म्हणजे विषूचिकेचा नाश होतो.

विडंगभल्लातकचित्रकाभयाः सनागराश्चूर्णगुडेन सर्पिषा॥ निहंतियेमंदहुताशनानराभवंतितेवाडवतुल्यवन्हयः ॥४॥ ७

अर्थ- बावडिंग, बिब्बा, चित्रक, हिरडा, सुंठ यांचें चूर्ण आणि त्याचे बराबर गूळ व तूप घालून खावें म्हणजे मंदाग्नीचा नाश होऊन वडवाग्नीसारखा ज्यांचा अग्नि असे मनुष्य होतात. इति विडंगाद्यवलेहिका॥

कुष्ठसैंधवयोः कल्कं चुक्रतैलसमन्वितम्॥
विषूच्यांमर्दनं कोष्णं खल्लीशूलनिवारणम् ५

अर्थ- कोष्ठकोलिंजन, सैंधव यांचें चूर्ण आमसलाचे तेलांत कालवून मंदोष्ण करून अंगास चोळावें म्हणजे विषूचिका आणि खल्लीशूल (हातांपायांला विळखा पडून वरूळ होतो तो) यांचें निवारण होतें असें जाणावें॥

निंबूरसंचिंचिणिकासमेतंविषूचिकाशोषहरंकफंच॥ दुग्धेनपीतोयदिटंकणोसौप्रशाम्यतेयंवमनंनिरुध्यात् ६

अर्थ- निंबाचे रसांत ऊनी चिंच कुवळून पाजावी. म्हणजे विषूचिका, शोष, कफ, यांचा नाश होतो. आणि दुधांत टंकणखाराची लाही घालून पाजावें म्हणजे विषूचिका (मोडशी) व ओकारी बंद होईल.

॥अथरसोपचारः॥

शुद्धसूतंविषंगंधंप्रत्येकंचसमंसमं॥ मरीचंसर्वतुल्यांशंकंटकारीफलद्रवैः॥१॥ मर्दयेद्भावयेद्यत्नाद्येकविंशतिवारकं॥ गुंजात्रयमिदंखादेत्सर्वाजीर्णप्रशांतये॥ सर्वोपद्रवसंयुक्तांविषूचिमपिनाशयेत्२॥

अर्थ- पारा, गंधक, बचनाग हीं समभाग, यां तिघांचे बरोबर मिरें हीं एकाजागीं खलून रिंगणीचे फळाचे रसाच्या एकवीस भावना द्याव्या. नंतर तीन गुंजाप्रमाणें खावें. म्हणजे सर्व अजीर्ण आणि सर्व उपद्रवांनीं युक्त अशी विषूचिका हिंचा नाश होईल.

रसेनगंधंसहटंकणेनसमंविषंयोज्यमतस्त्रिभागम्॥ कपर्दशंखावपिनेत्रभागोमरीचकंचाष्टगुणंविमर्द्य॥३॥सु-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पक्वजंबीररसेनखल्वेशुद्धोभवत्यग्निकुमारकोयम्॥ अ-
जीर्णवातंगुदगुल्मवातंविषूचिकाद्यंविनिहंतिसद्यः॥४॥

अर्थः- पारा, गंधक, सांकणखार, हे तीन समभाग आणि यांच्या बरोबर बचनाग ३भा०, कवडीभस्म २भा०, शंखभस्म २भा०, मिरें ८ भाग या प्रमाणें घेऊन चांगले पिकलेले लिंबाचे रसांत खल करावा. म्हणजे हा रस होतो. हा अजीर्णवात, गुदवात, गुल्मवात, विषूचिका (मोडशी) इत्यादिकांचा नाश करितो.

व्यायामप्रमदाध्ववाहनरतान्खिन्नानतीसारिणः शूल-
श्वासवतस्तृषापरिगतान्हिक्कामरुत्पीडितान्॥ क्षीणा-
न्क्षीणकफान्शिशून्मदहितान्वृद्धांस्तथाजीर्णिनोरात्रौ
जागरितान्नरान्निरशनान्कामंदिवास्वापयेत्॥ ॥५॥

अर्थः- व्यायाम, स्त्री, मार्ग, वाहन इतक्यांचे ठिकाणीं रत, खिन्न, अतिसारी, शूल, श्वास, तृषा इतक्यांनीं युक्त; उचकी, वायु याणीं पीडित, क्षीण, क्षीणकफ, बाल, मदोन्मत्त, वृद्ध, अजीर्णी, रात्रीं जागलेला, उपोषित, इतक्या मनुष्यांनीं दिवसास निद्रा घ्यावी. ॥इति अजीर्णचिकित्सा॥

अथकृमिलक्षणोपचारः

ज्वरोविवर्णताशूलंहृद्रोगश्छर्दनंभ्रमः॥
भक्तद्वेषोतिसारश्चसंजातकृमिलक्षणं॥१॥

अर्थः- ज्वर, तोंड उतरणें, डोळे खोल जाणें, शूल, हृदयांत पीडा, ओकारी, भोंवळ, अन्नाचा द्वेष, अतिसार, हीं लक्षणें कृमि झाल्याचीं आहेत.

मुस्तारुपर्णीफलदारुशिग्रुक्वाथःसकृष्णाकृमिशत्रुकल्कः
मार्गद्वयेनापिचिरप्रवृत्तान्कृमीन्निहन्यात्कृमिजांश्चरोगान्॥२

अर्थः- नागरमोथा, उंदीरकानी, इंद्रजव, देवदारु, शेवगा यांचा काढा, पिंपळी आणि वावडिंग यांचें चूर्ण घालून द्यावा म्हणजे दोन्ही द्वारांनीं फार दिवस पडणारे जरी जंत असले तरी त्यांचा आणि त्यांपासून झालेले रोगांचा नाश होतो.

विडंगंपारिभद्राग्रंब्रह्मबीजंपृथक्पृथक्॥
मधुनाकृमिनाशायनिंबंवाहिंगुसंयुतं॥३॥

अर्थः- वावडिंग अथवा कडुनिंबाचीं पानें किंवा पळसपापडी मधाबरोबर खावी म्हणजे कृमिनाश होतो अथवा कडुनिंबाचीं पानें हिंगाबरोबर खावीं॥४

भल्लातकंवादध्याचचिंचाम्लेनहरेत्कृमीन्॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पलाशबीजं वल्लेकं स्नुहिक्षीरेणजंतुजित्॥४

अर्थः बिब्बा दत्त्यांबरोबर किंवा चिंचेबरोबर खावा. अथवा पळसपापडी निवडुंगाचे रसाबरोबर खावी म्हणजे कृमीचा नाश होईल.

सौवीरंपत्रशाकांश्च वर्जयेत्कृमिवान्नरः॥ ५

अर्थः जंत झालेल्या मनुष्यानें बोरें आणि पालेभाज्या खाऊं नयेत.

खदिरः कुटजः पिचुमंदवचात्रिकटुत्रिफलात्रिवृतासहितं
पशुमूत्रयुतंपिबसप्तदिनंकृमिकोटिशतान्यपिहंत्यचिरात्॥ ५॥ ६

अर्थः खैर, कुडा, कडुलिंब, वेखंड, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, तेड यांचें चूर्ण किंवा काटा गोमूत्रांत घालून सात दिवस प्यावा. म्हणजे कोट्यावधि कृमि असले तरी नाश पावतील.

निंबुवत्सकविडंगसंयुतंरामठेनसहजंतुनाशनं॥ निंबपत्रमजमोदकान्वितंचूर्णमेवमधुनाप्रशस्यते॥ ६॥ ७॥

अर्थः लिंब, कुडा, वावडिंग, हिंग यांचें चूर्ण जंतनाशक आहे. लिंबाचीं पानें, ओंवा यांचें चूर्ण मधाबरोबर खावें. म्हणजे तें जंताचें नाशक आहे.

आरवुपर्णीदलैः पिष्टैः पिष्टकेनचपूपकान्॥
भुक्त्वासौवीरकंचानुपिबेत्कृमिहरंपरम्॥ ७

अर्थः उंदीरकानीची पानें कुटून चूर्ण करून त्यांत पीठ मिश्र करून त्याचे घारगे करून खावे. आणि वरती सातूंची कांजी किंवा यावकमद्य प्यावें म्ह० कृमिनाश होतो.

सुवर्चिकारामठपत्रिकाहविडंकबाह्लीककणाग्निविश्वा
यवानिकाग्रंथिकभद्रमुस्तास्तक्रेणचूर्णंकृमिकोटिहारि ८

अर्थः सज्जीखार, हिंग, जायपत्री, वावडिंग, केंशर, पिंपळी, चित्रक, सुंठ, ओंवा, पिंपळमूळ, नागरमोथा यांचें चूर्ण ताकाबरोबर प्यावें. म्हणजे कोट्यावधि कृमींचा नाश होईल.

सारनालारवुपर्णीवातक्रंपालाशबीजयुक्॥
हिंग्वाजमोदातक्रंवाकृमिरोगंविनाशयेत् ९।

अर्थः कांजीसहित उंदीरकानी, पळसपापडी ताकासहित. हिंग, ओंवा, हीं कृमिरोगनाशक आहेत.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

क्षीराणिमांसानिघृतानिचैवदधीनिशाकानिचपत्रवंति ॥
समासतोम्लंमधुरान्नसांश्चकृमीज्जिघांसुःपरिवर्जयेच्च१०

अर्थः- दूध, मांस, तूप, दहीं, पालेभाजी, गोड, आंबट, रस इतके पदार्थ कृमि झाले असतील त्याणें वर्ज करावे. इति कृमिचिकित्सा.

अथपांडुरोगलक्षणोपचारः

भ्रूनेत्रगुदपन्नाभिगुल्फशोफोविवर्णता॥ब-
लाग्निनाशानंकार्श्यंपांडोसासृग्विरेचनम्॥१

अर्थः- भिवया, नेत्र, गुद, पाय, बेंबी, गुल्फ, इतक्या ठिकाणीं सूज, विवर्णता ह्मणजे निस्तेजपणा, बल अग्नि यांचा नाश, कृशता, गुदावाटे रक्तपडणें हीं पांडुरोगाचीं लक्षणें जाणावीं.

ज्वरारोचकहृल्लासच्छर्दिस्तृष्णाक्लमान्वितं
क्षीणंहतेंद्रियंवृद्धंसंत्यजेत्पांडुरोगिणं॥२॥

अर्थः- ज्वर, अरुचि, हृदयव्यथा, ओकारी, तृषा, ग्लानि, क्षीणता, विकलेंद्रिय, वृद्धता इतक्यांनीं युक्त जो पांडुरोगी तो असाध्य जाणावा.

पांडुदंतनखोयश्चपांडुनेत्रक्षयोभवेत्॥पां-
डुसंघातदर्शीचपांडुरोगीविनश्यति॥ ३ ॥

अर्थः- दांत, नेत्र, नखें, ज्याचीं पांडुरवर्ण आणि सर्व पांडुरवर्ण पाहतो, असा पांडुरोगी विनाश पावेल.

पीतनेत्राननननखारुचिर्दौर्बल्यदाहकृत् ॥
कामलाबहुपित्तेषाचिरास्यात्कुंभकामला ४

अर्थः- जींत नेत्र, मुख, नखें, पिंवळीं, अरुचि, दुर्बलता; दाह इतकीं लक्षणें होतात तीं कामला जिला कावीळ असें ह्मणतात ती अतिपित्तापासून होते आणि फार दिवस असली ह्मणजे तिला कुंभकामला असें ह्मणतात.

कृष्णापीतशकृन्मूत्रशूलतृट्दाहमोहवान्
रक्तनेत्राननस्त्याज्यःकामलाच्छर्द्यरोचकी५

अर्थः- काळें किंवा पिंवळें मळ आणि मूत्र, शूल, तृषा, दाह, मोह, नेत्र आणि मुख रक्तवर्ण इतक्यांनीं युक्त; कामला, अरुचि, ओकारी, या रोगांचा जो मनुष्य आहे तो असाध्य जाणावा.

हरितश्यावपीतत्वक्क्षयतंद्राग्निनाशनैः॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

हलीमकं विजानीयाद्गात्रमर्दतृषाभ्रमैः॥ ६

अर्थः- हिरवी किंवा काळसर किंवा पिवळी अशी त्वचा, रक्त, मांस, इत्यादिकांचा क्षय, झांपड, अग्निनाश, आंग मोडून येणें, तृषा, भ्रम इतकीं लक्षणें ज्यांत असतात त्याला हलीमक असें ह्मणतात.

अथोपचारः

फलत्रिकामृतावासातिक्ताभूनिंबनिंबजः॥
क्वाथः क्षौद्रयुतो हन्यात्पांडुरोगं सकामलं॥ १

अर्थः- हिरडा, बेहडा, आंवळकाठी, गुळवेल, अडूळसा, कुटकी, किराईत, कडूनिंब, यांचा काढा मध घालून प्यावा ह्मणजे पांडुरोग, कामला यांचा नाश करील.

रसमामलकानां तु संशुद्धं यंत्रपीडितं॥ द्रोणं पचेच्च मृद्वग्नौ तत्रेमानि प्रदापयेत्॥ २॥ चूर्णितं पिप्पलीप्रस्थं मधुकं हि पलं तथा॥ प्रस्थं गोस्तनिकायाश्च द्राक्षायाः कल्कपेषितं॥ ३॥ शृंगवेरपलद्वंद्वं तुगाक्षीर्याः पलद्वयं॥ तुलार्धं शर्करायाश्च घनीभूतं समुद्धरेत्॥ ४॥ मधुप्रस्थसमायुक्तं लेपयेत्पलसंमितं॥ हलीमकं कामलां च पांडुत्वं चापकर्षति ५

अर्थः- आंवळ्याचा रस स्वच्छ १०२४ तोळे शिजत ठेवावा. त्यांत पिंपळीचें चूर्ण ६४ तोळे, ज्येष्ठमध ८ तो० काळीं द्राक्षें बिया काढून कुस्कुरून ६४ तो० सुंठ आठ तो० वंशलोचन ८ तो० साखर २०० तो० इतके पदार्थ टाकून घट्ट झाल्यावर उतरावा. नंतर त्यांत ६४ तोळे मध घालून ठेवावा. ४ तोळे प्रमाणें खावा. ह्मणजे हलीमक कामला पांडुरोग हे जातील.

पुनर्नवानिंबपटोलशुंठीतिक्तामृतादार्व्यभयाकषायः॥
सर्वांगशोफोदरपांडुरोगस्थौल्यप्रसेकोर्ध्वकफामयेषु ६

अर्थः- घेंटोळी, कडुलिंब, कडुपडवळ, सुंठ, कुटकी, गळवेल, दारूहळद, हिरडा, यांचा काढा सर्वांग सूज, उदर, पांडु, स्थूलता, तोंडांत नेहेमीं खाकेरा येणें कफरोग यांचा नाशक आहे.

अयस्तिलत्र्यूषणकोलभागैः सर्वैः समं माक्षिकधातुचूर्णं
तैर्मोदकः क्षौद्रयुतो हि भक्तः पांड्वामयेद्दूरगतेपि शस्तः ७

अर्थः- लोहभस्म, तीळ, सुंठ, मिरें, पिंपळी, बोरीचे फळाची साल हीं समभाग घेऊन या सर्वांचे बरोबरीनें माक्षिक भस्म घालून त्याची गोळी करून मधाब-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

रोबर रवावी. म्हणजे असाध्य देखील पांडुरोगी बरा होतो.

॥ यवगोधूमशाल्यन्नंरसैर्जांगलजैः शुभैः ॥
मुद्गाढकीमसूराद्यैस्तयोर्भोजनमिष्यते ॥ ८

अर्थः सातु,गहूं,शाली यांचें अन्न,अरण्यसंबंधीं जें मांस त्याच्या रसांनीं युक्त किंवा मूग,तुरी,मसूरा इत्यादिकांनीं युक्त जें भोजन तें कामलावान् पांडुरोग्यांस अ०

॥ त्रिफलावागुडूच्यावा दार्व्यानिंबस्यवारसम्
प्रातर्मधुघृतंवैद्यः कामलार्ताययोजयेत् ९

अर्थः हिरडा,बेहडा,आंवळकाठी यांचा काढा,किंवा गुळवेलीचा किंवा दारूहळदीचा किंवा कडुलिंबाचा काढा मध घालून प्रातःकाळीं वैद्यानें कामलेनें पीडित असेल त्यास द्यावा.

॥ धात्रीलोहरजोव्योषनिशाक्षौद्राज्यशर्कराः ॥
लेहोनिवारयत्याशुकामलामुन्दूतामपि ॥ १०

अर्थः आंवळकाठी, लोहभस्म,सुंठ,मिरें,पिंपळी,दारुहळद,मध,तूप,साखर यांचा लेह कामला,पांडुरोग यांचें निवारण करितो.

॥ अंजनंकामलार्तानांद्रोणपुष्पीरसंशुभम् ॥ निशागैरिकधात्रीणांचूर्णंवासंप्रकल्पयेत् ॥ ११ ॥

अर्थः पांढरे गोकर्णीचा रस,किंवा दारुहळद,तुरटी,आंवळकाठी यांचें अंजन कामलानाशक आहे.

॥ गुडूचीस्वरसेसर्पिः सक्षीरंमाहिषंघृतम् ॥ चतुर्गुणेनपयसापाययेत्तद्धलीमके ॥ १२ ॥ छ ॥

अर्थः गुळवेलीचा रस,तूप आणि दूध घालून पाजावा. अथवा म्हशीच्या तुपांत चौपट दूध घालून पाजावें म्हणजे हलीमकाचें निवारण होतें.

॥ व्योषाग्निवेल्लत्रिफलामुस्तैस्तुल्यमयोरजः ॥
चूर्णितंतक्रमध्वाज्यकोष्णतोयोपयोजितं ॥
कामलापांडुहृद्रोगकुष्ठार्शोमेहनाशनं ॥ १३

अर्थः— सुंठ,मिरें,पिंपळी,चित्रक,वावडिंग,हिरडा,बेहडा,आंवळकाठी,आणि नागरमोथा यांच्या चूर्णाबरोबर लोहभस्म घेऊन एकत्र करून ताक,मध,तूप,किंवा ऊनपाणी यांतून एकाबरोबर रवावें. म्हणजे कामला,पांडुरोग,हृद्रोग,कुष्ठ,अर्श आणि मेह यांचा नाश होईल असें जाणावें. ॥ छ ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथेमनोज्ञकुंडलेस्फुरन्मुखेंदुमंडले॥गवां-
पयःसनागरंनिहंतिकामलाभरम्॥१४॥

अर्थः- अथि सुंदर कुंडले, देदीप्यमान मुखचंद्रे, गायीचें दूध स्कंठीशींयुक्त प्यालें असतां कामलाभर नाशितें.

अर्कमूलंहरेन्नस्यात्कामलांतंदुलोदकैः॥

अर्थः- रुईचें मूळ तांदळांचे धुणांत उगाळून नाकांत घालावें म्हणजे कामलेचा नाश करील.

व्योषबिल्वद्विरजनीत्रिफलाद्विपुनर्नवा॥मुस्ताचायोरजःपाठाविडंगंदेवदारुच॥१५॥वृश्चिकालीचभार्ङ्गीचसक्षीरैस्तैर्घृतंशृतं॥सर्वान्प्रशमयत्याशुविकारान्मृत्तिकाकृतान्१६॥

अर्थः- स्कंठ, मिरें, पिंपळी, बेल, हळद, दारुहळद, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, पांढरी वस्त्र, तांमडी वस्त्र, नागरमोथा, लोहभस्म, पहाडमूळ, वावडिंग, देवदार, मेडशिंगी, भारंग, दूध इतक्यांनीं सिद्ध केलेलें तूप, मृत्तिकेपासून झालेले सर्व विकारांचा नाश करिते.

तद्वत्केसरयष्ट्याह्वपिप्पलीस्करसाह्वयैः॥मृद्भेषणायतल्लोल्येवितरेद्भावितांमृदम्॥१७॥

अर्थः- नागकेशर, ज्येष्ठमध, पिंपळी, निशोत्तर, यांचा काढा करून त्याच्या भावना मृत्तिकेला द्याव्या. नंतर ती माती खाणारास द्यावी. म्हणजे खाल्लेली माती पडून विकार दूर होतो.

तिलपिष्टनिभंयस्यकामलावान्सृजेन्मलम्॥
कफरुद्धपथंतस्यपित्तंकफहरैर्जयेत्॥१८॥

अर्थः- तिळांचे पेंडी सारखा ज्याला मळ होतो, अशा कामलावान् मनुष्याचे कफानें रोधलेला मार्ग ज्याचा असें पित्त कफहारक, पित्तशामक असे औषधानीं शामवावें.

गोमूत्रेणपिबेत्कुंभकामलायांशिलाजतुः॥

अर्थः- गोमूत्रांत शिलाजीत प्यावा. म्हणजे कुंभकामला नष्ट होते असें जाणा.

वेणीफलंन्यसेत्तोयेरात्रौपर्युषितंचतत्॥हंतिनस्यविधानेनकामलांशरुद्भवामपि॥१९॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः देवडांगरीचें फळ रात्रभर पाण्यांत ठेऊन सकाळीं कुसकरून त्याच्या रसाचें नस्य घालावें. म्हणजे नाकांतून पिंवळा स्राव पुष्कळ होतो तेणें करून कामला पांडु यांचा नाश होतो.

द्रोणपुष्पीरसोपेतारोचनाहिंगुसंयुता ॥ धात्रीनिशागैरिकावाकामलापहमंजनम् ॥२०

अर्थः पांढरे गोकर्णीचे रसांत गोरोचन, हिंग घालून अथवा आंवळकाठी, दारुहळद, तुरटी, घालून अंजन करावें. हें कामलेचें नाशक आहे.

लोहचूर्णंनिशायुग्मंत्रिफलाकटुरोहिणीं ॥
प्रलिह्यमधुसर्पिर्भ्यांकामलार्तःसुखीभवेत्२१

अर्थः लोहभस्म, हळद, दारुहळद, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी आणि कुटकी यांचें चूर्ण मध व तूप यांच्या बरोबर खावें. म्ह० कामलेनें पीडित असेल तर सुखी होईल.

मंडुरंचूर्णयेच्छ्लक्ष्णंगोमूत्रेष्टगुणेपचेत् ॥ पंचकोलंदेवदारुमुस्ताव्योषफलत्रयं ॥२२॥ विडंगंस्यात्प्रतिपलंपाकांतेचूर्णितंक्षिपेत् ॥ भक्षयेत्कर्षमात्रंचतक्रेणतक्रभोजनं ॥२३॥ पांडुशोफहलीमंचऊरुस्तंभंचकामलाम् ॥ अर्शांसिहंतिनोचित्रंहंसमंडूरकोत्थयम् ॥२४॥

अर्थः मंडूरभस्म ४ तो० त्याचे आठपट गोमूत्रांत शिजत ठेवावें. त्यांत पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, देवदार, नागरमोथा, मिरें, सुंठ, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, वावडिंग हीं चार चार तोळे चूर्ण करून टाकावीं. शिजल्यावर एक तोळा ताका बराबर खावें. पथ्य ताकभात खावा. म्हणजे पांडु, शोफ, हलीमक, ऊरुस्तंभ कामला आणि अर्श यांचा नाश करितें. याला हंसमंडूर म्हणतात. ॥इति हंसमंडूरः॥

रसगंधाभ्रलोहैक्यंपांडुरिःपुटितंत्रिधा ॥
कुमार्यास्तुचतुर्वल्लंपांडुकामलपूर्वहृत् ॥१॥

अर्थः पारा, गंधक, अभ्रकभस्म, लोहभस्म, हीं एकत्र करून कोरफडीच्या रसाचीं तीन पुटें द्यावीं. म्हणजे हा रस होतो. हा चार वाल प्रमाणें सेवन केला असतां कामला पांडु यांचा नाश करितो. इति पांडुरिः ॥ ७ ॥ श्रीशम्

॥ इति पांडुरोगचिकित्सा ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथरक्तपित्तलक्षणोपचारः॥

रक्तपित्ताद्दशंरक्तमूर्ध्वंचाधःप्रवर्त्तते॥रोमकूपैश्चयुगप
च्छैत्यकांक्षारुचिर्वमिः॥१॥ऊर्ध्वंकर्णाक्षिनासास्यैर्मेढ्र-
योनिगुदैरधः॥साध्यमूर्ध्वमधोयाप्यमसाध्यंयुगपद्ग-
तम्॥ २॥छ

अर्थः- ऊर्ध्वद्वारानें,अधोद्वारानें अतिरक्त पडतें. तसेंच रोमरंध्रावाटे पडतेंआ-णि शीताकांक्षा,अरुचि,ओकारी असें ज्यांत लक्षण होतें त्याला रक्तपित्त असेंह्म-णतात. जें ऊर्ध्वद्वारांनीं जातें तें कान,नेत्र,नाक आणि तोंड यांपासून जातें तें सा-ध्य आणि जें अधोद्वारांनीं जातें तें;लिंग,योनि,गुद यांवाटे जातें तें कष्टसाध्य. आणि एकदांच खालचे,वरचे द्वारांनीं जातें तें असाध्य असें जाणावें. ॥७॥

लोहितंछर्दयेद्यस्तुसततंलोहितेक्षणः॥लो-
हितांगारदर्शीचिरक्तपित्तीविनश्यति॥ ३ ॥

अर्थः- तांबडें ओकतो,तांबडे नेत्र,लाल निखारे पाहतो असा रक्तपित्तीविनाश्यः

अक्षीणबलमांसाग्नेः कर्त्तव्यमपतर्पणम्॥

अर्थः- ज्यांचें बल,मांस,आणि अग्नि क्षीण झाले नाहींत त्यांला लंघनाचा उपा-य करावा.

ऊर्ध्वगेरेचनंशस्तमधोगेवमनंहितम्॥४॥

अर्थः- ऊर्ध्वमार्गानें रक्त जाणारें असेल तर रेचन द्यावें. आणि अधोमार्गानें र-क्त जात असेल तर वमन द्यावें.

आरग्वधेनधात्र्यावात्रिवृतापथ्ययाथवा॥
विरेचनंप्रयोक्तव्यंशर्करामाक्षिकोत्तरम्॥५॥

अर्थः- बाहवा,आंवळकाठी,अथवा तेड,हिरडा,हीं रेचनार्थ योजावीं. यांत म-ध,साखर पुष्कळ घालून द्यावें. म्हणजे रेच होऊन रक्तपित्त बंद होतें. ॥७॥

नस्यंदाडिमपुष्पोत्थंरसोदूर्वाभवोथवा॥आ-
म्रास्थितःपलांडोर्वानासिकाच्युतरक्तजित्॥६

अर्थः- डाळिंबाचे फुलांचे रसाचें किंवा दूर्वांचे रसांचे,किंवा आंब्याचे कोईचे र-साचें किंवा कांद्याचे रसाचें नस्य करावें म्हणजे नाकांतून रक्त पडणें बंदहोईः

भृंगीगृहंतुक्षीरेण नारीणांनावनाज्जयेत्
लोहंखदिरसारेणनासिकारक्तनाशनं॥७॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः कुंभारमाशीचें घर, स्त्रियांचे दुधांत उगाळून नस्य करावें. म्हणजे रक्त बंद होतें. किंवा लोहभस्म आणि खदिर सार हीं दोन्ही एकत्र करून नाकांत ओढावीं म्हणजे रक्त बंद होतें.

वृषपत्राणिनिष्पीड्यरसंसमधुशर्करम् ॥
अनेनप्रशमंयातिरक्तपित्तंसुदारुणम् ॥ ८

अर्थः अडूळशाचा रस, मध, साखर एकत्र करून प्यावें म्हणजे भयंकर रक्तपित्त शांत होतें.

ह्रीवेरधान्यकंशुंठीचंदनंमधुयष्टिका ॥ वृषो-
शीरयुतःक्वाथः शर्करामधुयोजितः ॥ ९ ॥ छ

अर्थः वाळा, धणे, सुंठ, चंदन, ज्येष्ठमध, अडूळसा, काळा वाळा, यांचा काढा साखर, मध घालून प्यावा. म्हणजे रक्तपित्त, तृषा, दाह, ज्वर, हे दूर होतात.

आटरूषकमृद्वीकापथ्याक्वाथः सशर्करः ॥
क्षौद्राढ्यःसकणःश्वासरक्तपित्तनिबर्हणः १०

अर्थः अडूळसा, मनुका, हिरडा, यांचा काढा साखर, मध आणि पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा म्हणजे श्वास, रक्तपित्त यांचा नाशक आहे.

मुद्गाःसलाजाःसधवाःसकृष्णाःसोशीरमुस्ताःसहचंदनेन
बलाजलैःपर्युषितःकषायःसरक्तपित्तंशमयत्सुदीर्णं ११

अर्थः मूग, लाह्या, सातु, पिंपळी, वाळा, नागरमोथा, चंदन, चिकणा, हीं पूर्वदिवशीं रात्रौ पाण्यांत भिजत घालून दुसरे दिवशीं वाटून गाळून प्यावीं. म्हणजे रक्तपित्त शांत होतें.

पक्वोदुंबरकाश्मर्यपथ्याखर्जूरगोस्तनी ॥
मधुनाघ्नंतिसंलीढारक्तपित्तंपृथक्पृथक् १२

अर्थः पिकलेलें उंबराचें फळ, शिवणीचें फळ, हिरडा, खजूर, मनुका, यांतून कोणतेंही एकादें फळ मधाबरोबर खाल्लें असतां रक्तपित्त नाशक आहे.

शृंगगैरिकयोःकल्कंधातक्यामधुकस्यच ॥
घ्राणस्रुतेसृजिप्रोक्तंयोषित्क्षीरेणनावनं १३

अर्थः मुरदारशिंग, आणि गेरू, धायटीचें फूल, ज्येष्ठमध इतक्यांचें चूर्ण स्त्रियांचे दुधांत कालवून नस्य करावें. म्हणजे नाकांतून पडणारें रक्त बंद होतें.

मूलानिपुष्पाणिचमातुलिंग्याःसमंपिबेत्तंदुलधावनेन

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

घ्राणप्रवृत्तेजलमाशुदेयंसशर्करंनासिकयोःपयोवा॥१४

अर्थ- महालुंगीचीं मुळें किंवा फुलें तांदुळांचे धुणांत वांटून प्यावीं. किंवा पाण्यांत साखर घालून किंवा दूध साखर एकत्र करून नाकांत घालावें ह्मणजे नाकांतील रक्त बंद होतें.

उदुंबराणिपक्वानिगुडेनमधुनापिवा॥उप
भुक्तानिनिघ्नंतिनासारक्तंनृणांध्रुवम्॥१५॥

अर्थ- उंबराचीं पिकलेलीं फळें गुळाबरोबर किंवा मधाबरोबर खाल्लीं असतां नाकांतून पडणारें रक्त बंद होतें.

हरीतकीदाडिमपुष्पदूर्वालाक्षारसोनस्यविधानयोगात्
निवारयत्येवचिरप्रवृत्तमप्याशुनासांतरशोणितौघम्१६

अर्थ- हिरडा,डाळिंबाचें फूल,दूर्वांचा रस नाकांत घातला ह्मणजे फार दिवस पडणारें नाकांतील रक्त बंद होईल.

घृतेनाजेनपयसाक्षुपिष्टंकुंकुमंपिबेत्॥
ऊर्ध्वरक्तविनाशायतेनैवाजेनभोजनम्॥१७

अर्थ- शेळीच्या दुधांत केंशर शिजवून प्यावें. आणि शेळीच्या दुधाबरोबरभात खावा. म्हणजे ऊर्ध्वरक्त बंद होतें.

यष्टीमधुसमायुक्तंक्षीरंसंक्वाथ्यशीतलम्॥
शर्करामधुसंमिश्रंरक्तपित्तापहंपिबेत्॥१८

अर्थ- ज्येष्ठमध व दूध यांचा काढा करून थंड झाला ह्मणजे त्यांत साखरव मध घालून प्यावा. म्हणजे रक्तपित्ताचा नाश करील.

पलाशकल्कःक्वाथोवासुशीतःशर्करान्वितः
पिबेद्वामधुसर्पिर्भ्यांगवाश्वशकृतोरसं॥१९

अर्थ- पळसाचीं फुलें वांटून त्यांत साखर घालून प्यावीं. अथवा त्यांचा काढा करून त्यांत साखर घालून प्यावा. अथवा गायीच्या शेणाचा रस अथ॰ घोड्याचे लेंड्यांचा रस घालून त्यांत मध,तूप घालून प्यावा. म्हणजे रक्त बंद होतें.

सक्षौद्रंग्रंथितेरक्तेलिह्यात्सारावतंशकृत्

अर्थ- रक्ताच्या गांठी वळल्या असतां मधाबरोबर पारव्याची विष्ठा खावी.

अतिनिःसृतरक्तोवाक्षौद्रेणरुधिरंपिबेत्२०

अर्थ- ज्याच्या अंगांतून फार रक्त गेलें असेल त्याणें मधाबरोबर केंशर खावें

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथवा ब्राह्मणव्यतिरिक्तानें रक्तच प्यावें.

खदिरस्यप्रियंगूनां कोविदारस्यशाल्मलेः॥
पुष्पचूर्णानिमधुनालिह्याद्वारक्तपित्तनुत्२१

अर्थः- खैर, राळे, कोरळ, सांवरी याच्या फुलांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें. म्हं० रक्तपित्त दूर होतें.

अश्वत्थपत्राग्ररसात्षडंशोबोलोथतस्माद्द्विगुणंमधुस्यात्॥ रक्तप्रवाहंहृदयस्थितंवावातोयथाभ्रंहरतेतथैव॥२२

अर्थः- पिंपळाच्या पानांच्या अग्रांचा रस एक भाग आणि सहाभाग रक्तबोळ त्याच्या दुप्पट मध असें एकत्र करून प्यावें. म्हणजे उरांतला रक्ताचा प्रवाह, वारा जसा मेघांस दूर करितो त्या प्रमाणें बंद करील.

जयेन्नासाश्रितंरक्तंलीढंवाक्षौद्रपावकम्॥

अर्थः- मधाबरोबर केंशराचें चूर्ण चाटावें. म्हं०नाकांतील रक्त पडण्याचें बंद होतें.

गंधंसूतंमाक्षिकंलोहचूर्णंसर्वंघृष्टंत्रैफलेनोदकेन॥लौहेपात्रेगोपयसाचधृत्वारात्रौदद्यात्रक्तपित्तप्रशांत्यै॥२३

अर्थः- गंधक, पारा, माक्षिकभस्म, लोहभस्म हीं सर्व एकत्र करून लोखंडाचे पात्रांत रात्रौ त्रिफळ्याच्या काढ्यानें मिश्र करून ठेवावें आणि तें गायीच्या दुधाबरोबर प्यावें. म्हणजे रक्तपित्त शांत होतें. ॥ इति रक्तपित्त सुधा०॥ ७

शालिषष्टिकनीवारचणमुद्गमसूरकाः॥
श्यामाकाश्चप्रियंगुश्चभोजनंरक्तपित्तिनां१

अर्थः- तांदूळ साठेसाळीचे, नांचणी, वरी, हरभरे, मूग, मसूरा, सांवे राळे इतकीं धान्यें रक्तपित्ती मनुष्यास भोजनास योग्य आहेत. ॥इतिरक्तपित्त चिकित्सा॥

॥अथराजयक्ष्मलक्षणोपचारः॥

दैन्यंकासमदांगभेदवमथुश्लेष्माप्यतिश्वासताशोषस्तालुतलेग्निमांद्यमसहन्निष्ठीवनंगात्ररुक्॥दाहःपादकरांबुजेस्वरहतिर्जाड्यंचहिक्काज्वरोविड्भेदक्लमपीनसारुचियुतःस्याद्राजयक्ष्मागदः१

अर्थः- दैन्य, खोकला, मद, आंग दुखणें, ओकारी, कफ, अतिश्वास, तालुस्थानीं शोष, अग्नि मंद, वारंवार खांकेरे टाकणें, अंगास ठणका लागणें, हातांपायांचा दाह, स्वर बदलणें, जडपणा, उचकी, ज्वर, मळ पातळ होणें, ग्ला-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

नि, पडसें आणि अरुचि या लक्षणांनीं युक्त राजयक्ष्मा (क्षयरोग) असतो.

किंचिल्लिंगयुतंदीप्तपावकंलक्षकंनरम् ॥
उपाचरेदात्मवंतंयक्ष्मिणंसाध्यलक्षणं॥२

अर्थ- थोडे लक्षणांनीं युक्त, अग्नि प्रदीप्त, कृश नाहीं, इंद्रियें स्वाधीन ठेवणारा असा जो क्षयरोगी तो साध्य. व तोच उपचार करण्यास योग्य आहे.

अर्धलिंगैःकृच्छ्रसाध्यंसर्वलिंगैःपरित्यजेत्

अर्थ- अर्धी चिन्हें झाल्यावर कृच्छ्रसाध्य म्हणजे कष्टसाध्य. आणि सर्व चिन्हें झाल्यावर असाध्य. याला उपचार करूंनये.

॥अन्नस्यद्वेषिणंकृच्छ्रमेहिनंशुक्लक्षणम् ॥
स्त्रीसक्तंपथ्यक्षीणंवाक्षीणशुक्रंपरित्यजेत्३

अर्थ- अन्नद्वेषी, कृच्छ्रमेही म्हणजे कष्टानें मूत्र वगैरे होनात तो, पांढरा झालेलेला, स्त्रीसक्त, पथ्य न करणारा, क्षीणधातु असा जो क्षयी त्यास उपचार करूंनये.

क्षीयंतेधातवःसर्वेततःशुष्यतिमानवः॥ परंदिनसहस्रं
तुयदिजीवतिमानवः॥सुभिषग्भिरुपक्रांतस्तरुणःशो-
षपीडितः४

अर्थ- पूर्वीं या रोगांत सर्व धातु क्षीण होनात. नंतर मनुष्य क्षीण होतो. म्हणून याला क्षय म्हणतात. आणि क्षय ज्याला होतो तो क्षयी. हा तरुण आणि चांगले वैद्यांनीं उपचार केलेला फार वांचला तर सहस्र दिवस पर्यंत वांचेल. ४

मलायत्तंबलंपुंसांशुक्रायत्तंतुजीवितम्॥त-
स्माद्यत्नेनसंरक्षेद्यक्ष्मिणोमलरेतसी॥५॥

अर्थ- मनुष्याचें बळ शरीरांत मळ आहे तों पर्यंत आहे. आणि शुक्र म्हणजे वीर्य आहे तों पर्यंत जीवित आहे यासाठीं क्षयी मनुष्याचें रेत आणि मल यांचें रक्षण करावें.

पुरीषंयत्नतोरक्षेच्छुष्यतोराजयक्ष्मिणः॥
सर्वधातुक्षयार्त्तस्यबलंतस्यहिविट्बलं॥६

अर्थ- क्षयानें शुष्क जो मनुष्य त्याचें पुरीष यत्नानें रक्षण करावें म्हणजे बेतानें थोडें शौचास होईल असा उपाय करावा. कारण सर्व धातूंच्या क्षयानें पीडित जो मनुष्य त्याला पुरीषबल (मळ) हेंच बल आहे.

क्षयादौशोधनंदद्याद्वमनंरेचनंतथा॥वा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तम्लेष्महरं क्वाथं दद्याद्दोषापहं पुरा॥७॥

अर्थः क्षयाच्या आरंभीं वमन किंवा रेचन असें शोधन द्यावें. आणि वातकफहरण करणारा असा दोषशामक काढा द्यावा.

कृष्णाद्राक्षासितालेहः क्षयहाक्षौद्रतैलवान्
मधुसर्पिर्युतो वाश्वगंधाकृष्णासितोद्भवः॥८

अर्थः पिंपळी, मनुका, साखर, मध, आणि शिरसाचें तेल यांचा लेह क्षयनाशक आहे. आणि मध, तूप, आस्कंद, पिंपळी, साखर यांचा लेह क्षयनाशक आहे.

फलत्रिकक्वाथविशुद्धमादौ सिद्धं गुडूच्या दशमूलसिद्धं॥ स्थिरादिकाकोलियुगादिसिद्धं शिलाजतुः स्यात्
क्षयिषु प्रशस्तं९

अर्थः हिरडा, बेहेडा, आंवळकाठी यांच्या काढ्यांत शिलाजीत बारीक करून पुरचुंडी बांधून शिजवून शुद्ध करून नंतर गुळवेलीचा काढा, दशमूलांचा काढा, स्थिरादि काढा, काकोल्यादि काढा यांच्या भावना देऊन सिद्ध केलेला शिलाजीत क्षयावर प्रशस्त आहे.

वृंताकं कारवेल्लं च तैलं बिल्वं च राजिकाम्॥
मैथुनं च दिवानिद्रां क्षयी कोपं विवर्जयेत्१०

अर्थः वांगें, कारलें, तेल, बेलफळ, मोहऱ्या, मैथुन, दिवसास झोंप इतकीं क्षयी मनुष्यानें वर्ज करावीं.

दशमूलबलारास्नापुष्करसूरदारुनागरैः क्वथितं॥ पेयं पार्श्वांसशिरोरुकुक्षतकासादिशांतये सलिलं॥११

अर्थः दशमुळें, चिकणा, रास्ना, पोखरमूळ, देवदार, सुंठ, यांचा काढा प्यावा म्हणजे कुशी, खांदे, डोकें, या ठिकाणचा शूल, उरःक्षत, खोकला, श्वास हे शांत होतील. इति दशमूलादिः

शर्करामधुसंयुक्तं नवनीतं लिहन्क्षयी॥ क्षीराशी लभते पुष्टिमतुल्ये चाज्यमाक्षिके॥१२

अर्थः खडीसाखर, मध, लोणी एकत्र करून खावें अथवा तूप आणि मध एकत्र करून खावें. (मध व तूप हीं समभाग नसावीं) वर्ती दूध प्यावें म्हणजे पुष्टी होते.

कूष्मांडकगिरोत्थेन रसेन परिपेषितम्॥
लाक्षाकर्षद्वयं पीत्वा जयेद्रक्तक्षयं तथा१३

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- कोंहळ्याचे गिराचा रस काढून त्यांत लाखेचें चूर्ण दोन तोळे रूमारें टाकून प्यावें म्हणजे रक्तक्षय होणार नाहीं.

शतपुष्पासमधुकंकुष्ठंतगरचंदने॥आलेपनंस्यात्सघृतंशिरःपार्श्वांसशूलनुत्॥३॥

अर्थ- बडीशेफ, ज्येष्ठमध, कोष्ठकोलिंजन, तगर, चंदन, हीं वांटून तूप घालून लेप करावा. म्हणजे डोकें, कुशी, खांदे यांच्या ठिकाणीं शूल होत नाहीं. ॥७॥

एलापत्रंनागपुष्पंलवंगाभागस्त्वेषांद्वौचखर्जूरकस्य द्राक्षायष्टीशर्करापिप्पलीनांचत्वार्येतत्क्षौद्रयुक्तंक्षयेस्यात्॥४॥

अर्थ- वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर, लवंगा यांचा एक भाग, खजूर दोन भाग, मनुका, ज्येष्ठमध, साखर, पिंपळी यांचे भाग चार सर्व एकत्र करून चूर्ण करावें. आणि मधाबरोबर खावें. क्षयावर प्रशस्त आहे. ॥इति एलादिचूर्णम्॥ ७

बलाविदारीश्रीपर्णीबहुपत्रीपुनर्नवा॥पयसानित्यमभ्यस्ताःशमयंतिक्षतक्षयं॥१

अर्थ- चिकणा, झईकोंहळा, शिवण, कांटेशेवती, घेंटोळी, हीं वांटून दुधाबरोबर प्यावीं. म्हणजे उरःक्षत व क्षय यांचा नाश करील.

सधान्ययवगोधूमामुद्गाश्चापिसदाहिताः स्त्रियश्चतुःपदेश्रेष्ठाःपुमांसोविहगामताः२

अर्थ- धणे, सातु, गहूं, मूग, चार पायांचे जनावरामध्यें स्त्री जाति आणि पक्ष्यांत पुरुषजाति हें क्षयरोग्यास हितकारक आहे.

छागंमांसंपयश्छागंसर्पिश्छागंसशर्करं छागोपसेवासततंछागमध्येतुयक्ष्मनुत्॥३

अर्थ- शेळीचें मांस, दूध, तूप, साखरे सहित, सेवा शेळ्यांमध्यें बसणें हें सर्व क्षयरोग नाशक आहे.

गीतवादित्रशब्देश्चप्रियस्तुतिभिरेवच॥हर्षणाश्वासनैर्नित्यंगुरूणांसमुपासनैः॥ब्रह्मचर्येणदानेनतपसादेवतार्चनैः॥सत्येनाचारयोगेनरविमंडलसेवया॥वैद्यविप्रार्चनाच्चैवरोगराजोनिवर्तते॥५॥ ७॥ ७॥

अर्थ- गीत, वाद्य-घोष, प्रियस्तुति, हर्ष, आश्वासन, गुरुसेवा, ब्रह्मचर्य, दान, तप,

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

देवतार्चन, सत्य, आचार, सूर्याची सेवा, वैद्य, ब्राह्मण यांची सेवा, पूजा केली ह्मणजे राजयक्ष्मा निवृत्त होतो.

रसभस्म त्रिभागं स्यात् भागैकं हेमभस्मकं ॥ मृततास्रस्य भागैकं शिलागंधकतालकं ॥६॥ प्रतिभागद्वयं शुद्धमेकीकृत्वा वचूर्णयेत् ॥ वराटान् पूरयेत्तेन चाजाक्षीरेण टंकणं ॥७॥ पिष्ट्वातेन मुखं रुध्वा मृद्भांडे सन्निधापयेत् ॥ शुष्कं गजपुटे पाच्यं चूर्णयेत्स्वांगशीतलं ॥८॥ रसो राजमृगांकोयं चतुर्गुंजः क्षयापहः ॥ एकोनत्रिंशन्मरिचैर्घृतेन सह भक्षयेत् ॥९॥ दशानां पिप्पलीनां च चूर्णं दत्वा प्रदापयेत् ॥ क्षये कासज्वरे पांडौ ग्रहण्यां चातिसारके १०

अर्थः- पान्याचें भस्म ३ भाग, सुवर्णभस्म १ भाग, ताम्रभस्म १ भाग, मनशील, गंधक, हरताळ, प्रत्येक २ भाग; हें एकत्र खलून कवड्यांत भरून नंतर शेळीचे दुधांत टांकणखार खलून त्या कवड्यांचीं तोंडें टांकणखाराने बंद करावीं. शुष्क झाल्यावर मडक्यांत भरून तोंड बंद करून गजपूट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर खलावें. याला राजमृगांक ह्मणतात. एकुणतीस मिऱ्यांचें चूर्ण अथवा दहा पिंपळ्याचें चूर्ण आणि तूप याच्या बरोबर चार गुंजा खावा ह्मणे क्षय, खोकला, ज्वर, पांडु, ग्रहणी, अतिसार यांचा नाश होईल. ॥ इति राजमृगांकः

अथ कासलक्षणोपचारः

प्राणोत्क्वदानानुगतः प्रदुष्टः संभिन्नकांस्यस्वनतुल्यघोषः ॥ निरेति वक्त्रात्सहसा स घोषो मनीषिभिः कास इतिप्रदिष्टः १

अर्थः- प्राणवायु दुष्ट होऊन उदानवायूशीं संघर्ष करितो आणि फुटकें कांशाचें भांडें वाजतें त्या प्रमाणें मुखांतून अकस्मात् जो शब्द निघतो त्याला मुनि कास (खोकला) असें ह्मणतात.

पंचकासाः स्मृतावातपित्तश्लेष्मक्षतक्षयैः ॥ क्षयायोपेक्षिताः सर्वे बलिनश्च यथोत्तरं ॥२

अर्थः- वात, पित्त, कफ, उरक्षत, क्षय यां पासून क्रमें करून वातकास, पित्तकास, कफकास, उरःक्षतकास, क्षयकास असे पांच प्रकारचे कास उत्पन्न होतात. ते उत्तरोत्तर एकापेक्षां एक अधिक त्यांची उपेक्षा केली असतां नाश-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

क होतात.

शष्कंविनिष्ठीवतिदुर्बलस्तुप्रक्षीणमांसंरुधिरंसपूयं
तंसर्वलिंगंभृशदुश्चिकित्स्यंचिकित्सितज्ञाः क्षयजंवदं
ति॥३॥७॥

अर्थ:- दुर्बल मनुष्य कोरडें खोकून नंतर कुजलेलें मांस, रक्त, पू, यांसहित जो खाकेरा टाकतो तो कास ह्मणजे खोकला क्षयापासून झालेला असें वैद्य ह्मणतात. हा असाध्य जाणावा.

अमृतानागरफंजीव्याघ्रपर्णीचसाधितःक्वाथः
पीतःसकणाचूर्णःश्वासकासौजयत्याशु॥४॥

अर्थ:- गुळवेल, सुंठ, भारंग, रक्त, एरंड, सालवण, यांचा काढा पिंपळीचे चूर्णसहित प्याला असतां श्वास, कास यांचा नाशक आहे.

तालीसपत्रंमरिचंनागरंपिप्पलीतुगा॥ यथोत्तरंभाग
वृद्ध्यात्वगेलाचार्धभागिकी॥५॥ पिप्पल्यष्टगुणाचा-
त्रप्रदेयासितशर्करा॥ श्वासकासारुचिहरंतच्चूर्णंदीप-
नंपरं॥६॥ हृत्पांडुग्रहणीशोषप्लीहशोफज्वरापहम्॥
छर्द्यतीसारशूलघ्नंमलवातानुलोमनम्॥७॥ ७॥ ॥

अर्थ:- तालीसपत्र १, मिरें २, सुंठ ३, पिंपळी ४, वंशलोचन ५, दालचिनी ॥, वेलदोडे ॥, सारवररवडी ३२ यांचें चूर्ण श्वास, कास, अरुचि, हृद्रोग, पांडु, संग्रहणी, क्षय, प्लीहा, शोफ, ज्वर, ओकारी, अतिसार, शूल यांचें नाशक आहे. आणि मल, वायु, यांचें अनुलोमक, दीपन आहे. ॥ ॥इति तालिसादिचूर्णम्॥ ७॥

अपामार्गस्यपंचांगंसंपिष्टंनीलिकारसे॥ शिलातालक
संयुक्तंवस्त्रेपर्पटिकावृता॥८॥ साग्नौक्षिप्ताभवेद्धूम
स्तंनिपीयमुखेनतु॥ वारयेद्दुस्तरंकासंश्वासंघोरंभया
वहम्॥९॥

अर्थ:- आघाड्याचें पंचांग ह्मणजे मुळासुद्धां, बियांसुद्धां सर्व झाड काळ्या निर्गुंडीच्या ह्मणजे निळीच्या रसांत वांटून त्यांत मनशील, हरताळ घालून त्याची वडी वस्त्रानें गुंडाळून अग्नींत टाकावी. त्याचा धूर निघेल तो तोंडानें घ्यावा. ह्मणजे घोर, भयंकर असे श्वास, कास निवारण करील असें जाणावें.

संयुतंमधुसर्पिर्भ्यांचूर्णंत्रिकटुसंभवम्॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

निहंतितरसाकासान्त्रासानिवसतांहरिः१०

अर्थः मिरे, सुंठ, पिंपळी, यांचें चूर्ण मध तूप यांच्या बरोबर खावें. म्हणजे शीघ्र कासाचा नाश करितें. जसा साधूंचे त्रासाचा नाश हरि करितो.

सेविनंमधुरखंडाभ्यांचूर्णंमरिचजंयदि॥ कि-
मर्थंक्रियतेचिंताश्वासकासपराजितैः॥११

अर्थः मध, खडीसाखर यांचे बराबर जर मिऱ्यांचें चूर्ण सेवन केलें तर श्वास, कास जातो. तर श्वास कासांनीं पराजित अशांनीं चिंता कां करावी?

पिप्पलीपिप्पलीमूलंविश्वौषधबिभीतकैः
मधुनासेवितंकासःप्रशाम्यतिकुतूहलात्१२

अर्थः पिंपळी, पिंपळमूळ, सुंठ, बेहेडा, यांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें. म्हणजे कास सहज शांत होईल.

पचेत्क्षुद्रांसपंचांगांपुटपाकेनतद्रसः॥०॥
पिप्पलीचूर्णसंयुक्तःकासश्वासज्वरापहः१३

अर्थः रिंगणीचें झाड मुळा फुलां फळां कुटून पुटपाकें करून पक्व करावें आणि त्याचा रस पिंपळीचे चूर्णासहित प्यावा. म्हणजे श्वास कास ज्वर यांचा नाश करील.

भार्ङ्गीद्राक्षासठीशृंगीपिप्पलीविश्वभेषजैः
गुडतैलयुतोलेहोहितोमारुतकासिनां१४

अर्थः भारंगी, मनुका, कचोरा, कांकडशिंगी, पिंपळी, सुंठ, गूळ, शिरसाचें तेल यांचा लेह वायूचे खोकल्यास हितकारक आहे.

श्रीखंडयष्टीमधुशालिपर्णीपाठापटोलेंद्रयवाबृहत्यौ
मूर्वागुडूचीकटुकाकषायःक्षयोत्थकासेचसपिप्पली
कः॥१५॥

अर्थः चंदन, ज्येष्ठमध, सालवण, पाहाडमूळ, कडू पडवळ, इंद्रजव, रिंगणी, डोली, मोरवेल, गुळवेल, कुटकी यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा, म्हणजे क्षयापासून झालेला खोकला दूर होतो. ॥ ॥ इतिश्रीखंडादिका०

तुल्यालवंगमरिचाक्षफलत्वचःस्युः सर्वैःसमोनिग-
दितःखदिरस्यसारः॥बब्बूलवल्कलकषायजुषांचतु-
र्णांकासान्निहंतिवटिकाघटिकात्रयेण१

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः लवंगा, मिरें, बेहेडेदळ, हीं समभाग यांच्या बरोबर खदिरसार घेऊन सर्व कुटून एकत्र करून बाभळीच्या सालीच्या काढ्यांत खलून गोळ्या कराव्या. ती गोळी सेवन केली असतां तीन घटिकांत खोकला राहतो.

सौभाग्यहिंगुलकणागरलंमरीचंसंमर्द्यनिंबुजरसेन दिनत्रयंच॥ आनंदभैरवबटीतुवरीप्रमाणानानानुपानसहितासकलामयघ्नी२॥

अर्थः टांकणखार (भर्जित) हिंगूळ, पिंपळी, बचनाग मिरें हीं लिंबाचे रसांत तीन दिवस खलून तुरी एवढ्या गोळ्या करून एकेक गोळी त्या त्या अनुपाना-बरोबर खावी. म्हणजे सर्व रोग (शैत्य खोकला पडसें वगैरे) नाशक आहे.

अर्कमूलशिलेतुल्येततोर्धेनकटुत्रिकं॥ चूर्णितंवन्हिनिक्षिप्तंपिबेद्धूमंतुयोगवित्॥३॥ भक्षयेदथतांबूलं पिबेद्दुग्धमथांबुवा॥ कासाःपंचविधायांतिशांतिमाशुनसंशयः॥४॥

अर्थः रुईचें मूळ, १ मनशीळ, १ सुंठ, मिरें, पिंपळी मिळून निमे भाग घेऊन त्यास-र्वांचें चूर्ण करून अग्नींत टाकून त्याचा धूर युक्तीनें घ्यावा. नंतर विडा खावा किंवा दूध अथवा पाणी घ्यावें. म्हणजे पांच प्रकारचे कास लोकर शांत होतील यांत संशय नाहीं.

मनःशिलालंमरिचंमांसीमुस्तातथेंगुदी॥ एषांधूमंपिबेच्चानुसुखोष्णंसगुडंपयः५

अर्थः मनशीळ, हरताळ, मिरें, जटामांसी, नागरमोथा, हिंगणबेट यांचा धूर घ्यावा. आणि वर मंदोष्ण पाणी गूळ घालून घ्यावें.

एषकासान्पृथक्कृंद्वसन्निपातसमुद्भवान्॥ शनैरपिप्रयोगेणसाधयेदप्रसाधितान्॥६

अर्थः हा धूमप्रयोग सर्व प्रकारचे कास यांचा नाशक आहे. इतिमनःशि॰धूमः

मनःशिलालिप्तदलंबदर्याःशुष्कमानपे॥ सक्षारंधूमपानंचमहाकासनिबर्हणं॥७॥

अर्थः मनशीळ जवखार पाण्यांत कालवून बोरीचे पानाला लेप करून उन्हांत वाळवून विडी ओढावी. किंवा चिलमींत घालून धूर घ्यावा. म्हणजे मोठा खोकला असला तरी नाश होईल.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

श्वासकासहरो बर्हि पादोवाक्षौद्रसर्पिषा।
लिह्यान्मरिचचूर्णंवासघृतक्षौद्रशर्करं ८

अर्थः मोराचे पाय मध, तूप यांच्या बरोबर खावे. हे श्वासकास हारक आहेत. अथवा मिऱ्याचें चूर्ण तूप, साखर, मध यांच्या बरोबर खावें म्हणजे श्वास कास दूर होतात.

बदरीपत्रकल्कंवाघृतंभ्रष्टंससैंधवं॥ स्वरो-
पघातेकासेचलेहमेनंप्रयोजयेत्॥ ९॥ ७॥

अर्थः बोरीचीं पानें वांटून तुपांत तळून सैंधव घालून लेह करून चाटावा म्हणजे स्वर बदलणें किंवा कास यावर प्रशस्त आहे.

जातीजटाकिसलयैर्बदरीदलैश्चजातीमसूरकफलैः
समनःशिलैश्च॥ स्याद्धूमवर्त्तिरिहगुग्गुलुनासमेतैः
कासेस्थितेबदरिकाग्निविदत्यमानैः॥ १०॥ ७॥ ७

अर्थः जाईचीं मुळें आणि पल्लव, बोरीचीं पानें, जायफळ, मसूरा, मनशीळ, गुग्गुळ हीं एकत्र कुटून चूर्ण करून बोरीच्या लांकडांचा अग्नि करून त्यावर टाकून धूर घ्यावा. म्हणजे कास बरा होतो. ॥ इतिजातीधूमः॥ ७॥ ७॥ ॥

गुडक्षारोषणकणादाडिमंश्वासकासजित्
क्रमात्पलद्व्यार्धाक्षिकर्षार्धाक्षपलोन्मितं ११

अर्थः गूळ ८ तोळे, जवखार ॥ तोळा, मिरें अर्ध तोळा, पिंपळी १ तोळा, डाळिंब ४ तोळे या प्रमाणें घेऊन खलून गोळ्या करून शक्तीप्रमाणें खाव्या. म्हणजे श्वास कास दूर होईल.

त्रिजातमर्धकर्षांशंपिप्पल्यर्धपलंसिता॥ द्राक्षामधुक
खर्जूरंपलांशंश्लक्ष्णकल्कितम्॥ १२॥ मधुनागुटिका-
घ्नंतितावृष्यापित्तशोणितं॥ कासश्वासारुचिच्छर्दि-
मूर्च्छाहिध्मामदभ्रमान्॥ १३॥ क्षतक्षयस्वरभ्रंशक्षी
हशोषाद्यमारुतान्॥ रक्तनिष्ठीवहृत्पार्श्वरुक्पिपासा
ज्वरानपि १४॥

अर्थः दालचिनी अर्धा तोळा, तमालपत्र अर्धा तोळा, वेलदोडे अर्धा तोळा, पिंपळी २ तोळे, खडीसाखर ४ तोळे, मनुका ४ तोळे, ज्येष्ठमध ४ तोळे, खारीक ४ तोळे या प्रमाणें घेऊन बारीक खलून गोळ्या करून यथाशक्ति भक्षण कराव्या. त्या

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वीर्यवर्धक आणि रक्तपित्त, श्वास, कास, अरुचि, ओकारी, मूर्छा, उचकी, मद, भ्रम, उरक्षत, क्षय, स्वरनाश, पांथरी, शोष, वायु, घशांतून रक्त पडणें, हृदय, कुशी, यांचा शूल, तहान, ज्वर यांचे नाशक आहेत. ॥ इति त्रिजातगुटिका ॥ ७॥ ७

अभ्रकं हरबीजं च तीक्ष्णशुल्बसमन्वितं॥ कासमर्द वरागस्ति वेतसाम्लैर्विभावयेत्॥ चतुर्गुंजावटी हंति कासं पंचविधं तथा १॥

अर्थ:- अभ्रकभस्म, पारा ८ चकारें करून गंधक १ गंधक, पोलादभस्म, ताम्रभस्म हीं एकत्र करून कासविंदा, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, अगस्ता, आम्लवेतस यांच्या रसाच्या भावना द्याव्या. म्हणजे हा कासारी रस होतो. त्याची चार गुंजाप्रमाण गोळी खावी. पांच प्रकारचे कास दूर करिते. इति कासारिः॥

इति कासचिकित्सासमा०

अथ हिक्काश्वासलक्षणो०

मुहुर्मुहुर्वायुरुदेति सस्वनो यकृत्प्लिहांत्राणि मुखादि वाक्षिपन्॥ सघोषवानाशु हिनस्ति यस्मात्ततस्तु हिक्केत्यभिधीयते बुधैः॥ १॥

अर्थ:- वारंवार जो वायु शब्द करणारा आणि मुखानें यकृत्, प्लीहा, आंतडीं फेंकतोच काय असा ऊर्ध्व येतो त्याला हिक्का (उचकी) असें म्हणतात. हिक्का असें म्हणण्याचें कारण, तो एकसारखा शब्द करून प्राणाप्रत हिनस्ति म्हणजे नाशितो म्हणून हिक्का असें म्हणतात.

यैरेव कारणैर्हिक्का बहुभिः संप्रजायते॥ तैरेव कारणैः श्वासो घोरो भवति देहिनां २

अर्थ:- ज्या कारणांनीं हिक्का होते त्याच कारणांनीं मनुष्यास श्वास होतो, तो घोर म्हणजे भयंकर आहे.

ऊर्ध्वश्वासे प्रकुपिते ह्यधः श्वासो निरुध्यते मुह्यते नाम्यते चोर्ध्वश्वासस्तस्यैव हंत्यसून् ३

अर्थ:- ऊर्ध्वश्वास कुपित झाला असतां अधःश्वास कोंडतो. आणि वरती गुदमरून येतो त्याचे प्राण श्वास नाशितो.

ग्रीवाशिरसि संगृह्य श्लेष्माणं समुदीर्य च

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥करोतिपीनसंतेनरुद्धोघुर्घरकंतथा॥ ४॥

अर्थ- तो वायु गळ्यांत, डोक्यांत येतो आणि कफ वर्ती आणितो, पडसें उत्पन्न करितो. मग कोंडतो आणि घुर घुर शब्द करितो.

श्लेष्मणादह्यमानेनभृशंभवतिदुःखितः
तस्यैवचविमोक्षांतेमुहूर्तंलभतेस्फुरवम् ५

अर्थ- श्वासाचे योगानें कफ दग्ध होऊन घट्ट होतो. आणि अडकतो. तेणें करून अति दुःख होतें. तो पडल्यावर दोन घटिका स्फुरव होतें.

हिक्काश्वासौपिबेद्भार्ङ्गीसविश्वामुष्णवारिणा
नागरंवासिताभार्ङ्गीसौवर्चलसमन्विताम्॥६

अर्थ- हिक्का, श्वास ज्याला असेल त्याणें सुंठ, भारंगमूळ यांचें चूर्ण ऊन पाण्या बरोबर प्यावें. अथवा सुंठ, सारवर, भारंगमूळ, पादेलोण यांचें चूर्ण खावें. ॥ ७॥

शृंगीकटुत्रिकफलत्रयकंटकारीभार्ङ्गीसपुष्करजटा-
लवणानिपंच॥ चूर्णंपिबेदशिशिरेणजलेनहिक्काश्वा
सोर्ध्ववातकसनारुचिषुप्रशस्तम्॥७॥

अर्थ- कांकडशिंगी, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, रिंगणी, भारंगमूळ, पोखरमूळ, सैंधव, पादेलोण, बिडलोण, काचलोण, मीठ यांचें चूर्ण ऊन पाण्या बरोबर प्यावें. म्हणजे हिक्का, श्वास, ऊर्ध्ववात, खोकला, अरुचि यांचा नाश करील. इति शृंग्यादि चूर्णम्॥

शुंठीकणामरिचनागदलंत्वगेलाचूर्णंकृतंक्रमविवर्धि-
तमूर्ध्वमंत्यात्॥ खादेदिदंसमसितंगुडजाग्निमांद्यका-
सारुचिश्वसनकंठहृदामयेषु १

अर्थ- सुंठ ६, पिंपळी ५, मिरें ४, विड्याचीं पानें ३, दालचिनी २, वेलदोडा १, याप्रमाणें घेऊन चूर्ण करून बरोबरीनें सारवर घालून खाल्लें असतां मुळव्याध, अग्निमांद्य, खोकला, अरुचि, श्वास, कंठरोग, हृद्रोग यांवर प्रशस्त आहे. ॥ ७

मधुकंमधुसंयुक्तंपिप्पलीशर्करान्विता॥ना-
गरंगुडसंयुक्तंहिक्काघ्नंनावनत्रयम्॥ २॥

अर्थ- ज्येष्ठमध, मध ॥ पिंपळी सारवर ॥ आलें गूळ ॥ हीं तीन नस्यें हिक्कानाशक आहेत.

कटुतैलेनसंयुक्तोगुडोयावन्नसेवितः॥ना-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वन्नश्यतिकिंश्वासः पीयूषमधुराधरे ॥ ३ ॥

अर्थः- शिरसाचें तेल, आणि गूळ जों पर्यंत सेवन केला नाहीं तों पर्यंत हे अमृततुल्य मधुरोष्ठे, श्वास नष्ट होईल कीं काय?

कपित्थस्वरसोवापिरसआमलकस्यच ॥ पिप्पलीक्षौद्रसंयुक्तोहिक्काश्वासनिवारणः ४

अर्थः- कंवठाचा आंगरस, किंवा आंवळ्याचा आंगरस, मध पिंपळीसहित हिक्का, श्वास यांचा निवारक आहे.

खर्जूरंपिप्पलीद्राक्षाशर्कराचेतितत्समम् ॥ मधुसर्पिर्युतोलेहोहिक्काश्वासनिवारणः ५

अर्थः- खर्जूर (म्हणे खारीक) पिंपळी, मनुका, साखर हीं समभाग घेऊन त्यांत मध, तूप घालून लेह करावा तो हिक्काश्वास-निवारक आहे.

मर्कटीनांतुबीजानांचूर्णंमाक्षिकसर्पिषा ॥ प्रलिह्यात्प्रातरुत्थायश्वासार्तःस्वास्थ्यमाप्नुयात् ६

अर्थः- कुडलीचे बियांचें चूर्ण प्रातः काळीं मध, तूप यां बरोबर चाटावें. म्हणजे श्वासानें पीडित असेल तो स्वस्थ होईल.

हिंगुसौवर्चलाजाजीबिडपुष्पकचित्रकैः ॥ सिद्धाकर्कटशृंग्याचयवागूःश्वासहिक्किनाम् ॥ ७

अर्थः- हिंग, पादेलोण, जिरें, बिडलोण, पोखरमूळ, चित्रक, कांकडशिंगी इतक्यांनीं सिद्ध झालेली कांजी श्वास, हिक्का हीं ज्यांना आहेत त्यांस प्रशस्त आहे.

गुडोषणनिशारास्नाद्राक्षामागधिकाःसमाः ॥ तैलेनचूर्णितालीदास्तीव्रश्वासनुदःस्मृताः ८

अर्थः- गूळ, मिरें, हळद, रास्ना, मनुका, पिंपळी हीं सर्व समभाग घेऊन यांचें चूर्ण शिरसाचे तेला बरोबर खावें. म्हणजे तीव्र श्वास दूर होतो.

कासमर्दकपत्राणांयूषःसौभांजनस्यच ॥ शुष्कमूलकमंडस्तुहिक्काश्वासनिवारणः ॥ ९ ॥

अर्थः- काशिंवद्याचे पानांचा अथवा शोवग्याचे सुळीचा किंवा वाळलेले सुळीचा मंड हिक्का श्वास-निवारक आहे.

हरिद्रापत्रमेरंडमूलंलाक्षांमनःशिलाम् ॥ सदेवदार्वलंमांसींपिष्ट्वावर्तिंप्रकल्पयेत् ॥ १० ॥ तांघृताक्तांपिबेद्धूमंयवा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

न्वाघृतसंयुतान् १०॥

अर्थ- हळदीचीं पानें, एरंडमूळ, लाख, मनशीळ, देवदार, हरताळ, जटामांसी यांचें चूर्ण करून फडक्यास लावून वात करावी. ती तुपांत भिजवून अग्नींत टाकून त्याचा धूर घ्यावा. अथवा सातूंस तूप लावून अग्नींत टाकून त्याचा धूर घ्यावा. ह्मणजे श्वास दूर होतो.

पिप्पलीमूलमधुकगुडगोश्वशकृद्रसान्॥ हि-
क्काभिष्यंदकासघ्नान्लित्ध्यान्मधुघृतान्वितान् ११

अर्थ- पिंपळमूळ, ज्येष्ठमध, गूळ, गाय, घोडा यांचें शकृत् इतक्यांचा निरनिराळा काढा मध, तूप यांसहित हिक्का, श्वास आणि अभिष्यंद यांचा नाशक आहे.

कुलित्थनागरव्याघ्रीवासाभिः क्वथितं जलम्
पीतं पौष्करसंयुक्तं कासश्वासनिवारणम्॥१२॥

अर्थ- हुलगे, सुंठ, रिंगणी, अडूळसा, पोखरमूळ यांचा काढा श्वासकासनिवारक आहे.

द्राक्षांहरीतकीं मुस्तां कर्कटाख्यां दुरालभाम्
सर्पिर्मधुभ्यां विलिहन् श्वासान्हंति सुदारुणान् १३

अर्थ- मनुका, हिरडा, नागरमोथे, कांकडशिंगी, धमासा यांचा लेह मध, तूप घालून करावा तो खाल्ला असतां मोठा भयंकर श्वास दूर होईल असें जाणा.

रसाभ्रहेमभस्मानि वैक्रांतं सर्वतुल्यकं। सर्वैः पंचगुणं
शंखचूर्णं शुष्कं विमर्दयेत् १४ लेहयेन्मधुनामाषचतु-
ष्कं सानुपानकम्॥ हिक्कान्पंचविधान्हंति सुमूर्षोरपित-
त्क्षणात् १५॥

अर्थ- पान्याचें भस्म १ अभ्रकभस्म १ सुवर्णभस्म १ वैक्रांतभस्म १। ३ शंखभस्म ३० हीं एकत्र खलून चार मासे प्रमाणें अनुपाना सहित खावें, ह्मणजे पांच प्रकारची हिक्का मुमूर्षु असला तरी त्याची नाशा करील.

कासप्रकरणोक्तं चभिषगत्र नियोजयेत्॥
क्षयोक्तं वात्र कासे च हिक्काश्वासे नियोजयेत् १६

अर्थ- कासप्रकरणांत सांगितलेलें औषध हिक्का श्वासाचे ठायीं वैद्यांनीं योजावें. आणि क्षयावर सांगितलेलें औषध कास, हिक्का, श्वास यांचे ठायीं योजा.

इति हिक्काश्वासलक्षणं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथस्वरभेद लक्षणोपचारः

अत्यच्चभाषणविषाध्ययनाभिघातसंदूषणैः प्रकुपिताः पवनादयश्च॥ स्रोतःस्वनेस्वरवहेषुगताः प्रदुष्टाह न्युः स्वरंभवतिचापिहिषड्विधःसः१॥

अर्थः- फार मोठ्यानें बोलणें, विषसंपर्क, मोठ्यानें घोकणें, लांकूड, दगड वगैरेयांचा धक्का इतक्या दोषांनीं कुपित जे वायु, पित्त, कफ ते स्वरवाहिनी शिरांचे ठायीं गेलेले दुष्ट असे स्वरभेद करतात. तो स्वरभेद साहा प्रकारचा आहे.॥७

वातेनकृष्णानयनाननमूत्रवर्चाभिन्नस्वरैर्वदतिगर्दभवत्खरंच॥ पित्तेनपीतनयनाननमूत्रवर्चाब्रूयाद्गलेनच सदाहसमन्वितेन॥२॥ ब्रूयात्कफेनसततंकफपूर्णकंठः स्वल्पंशनैर्वदतिचापिदिवाविशेषात्॥ सर्वात्मकेभवतिसर्वविकारलिंगंतंचाप्यसाध्यमृषयःस्वरभेदमाहुः३

अर्थः- वातानें स्वरभेद झाला असतां मुख, नेत्र, मूत्र, मल, हे काळे. आणि गाढवाचे स्वराप्रमाणें कर्कश स्वरानें बोलतो. पित्तापासून असेल तर नेत्र, मुख, मूत्र, मल हे पिवळे आणि दाहयुक्त कंठानें बोलतो. कफानें असेल तर नेहेमीं घशांत कफ आणि फार हळू बोलतो. त्यांत दिवसास तर फारच हळू बोलतो. त्रिदोषापासून असेल तर सर्व विकार आणि सर्व चिन्हें असतात. आणि तो स्वरभेद असाध्य असें ऋषि ह्मणतात.

बिभीतकफलैर्युक्तापिप्पलीसैंधवंतथा॥ कांजिकेनभवेत्साध्यंस्वरभेदाद्विमुच्यते॥ ४॥७

अर्थः- बेहडा, पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण कांजींत घालून प्यावें. ह्मणजे स्वरभेदापासून मुक्त होईल.

पिप्पलीपिप्पलीमूलंमरिचंविश्वभेषजम्॥ पिबेन्मूत्रेणमतिमान्कफजेस्वरसंक्षये॥५॥

अर्थः- पिंपळी, पिंपळमूळ, मिरें, सुंठ, यांचें चूर्ण गोमूत्रांत घालून प्यावें ह्मणजे कफापासून बिघडलेला स्वर नीट होतो.

चव्याम्लवेतसकटुत्रयतिक्तिडीकंतालीसजीरकतुगा दहनैःसमांशैः॥ चूर्णंगुडप्रमृदितंत्रिसुगंधियुक्तं वैस्वर्यपीनसकफारुचिषुप्रशस्तं६॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- चवक, आम्लवेतस, सुंठ, मिरें, पिंपळी, चिंच, तालीसपत्र, जिरें, वंशलोचन, चित्रक, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे यांचें चूर्ण गुळांत कालवून खावें. ह्मणजे स्वरभेद, पीनस, कफ, आणि अरुचि यांवर प्रशस्त आहे.

कासमर्दकवार्ताकमार्कवस्वरसैर्युतम्॥ क्षी-
रानुपानंपैत्तेषुपिबेत्सर्पिरतंद्रितः॥ ७॥

अर्थ- कासविंदा, वांगें, माका यांचा आंगरस तूप घालून प्यावा. वर दूध प्यावें ह्मणजे पित्तापासून झालेला स्वरभेद नीट होतो.

आद्येकोष्णजलंपेयंजग्ध्वाघृतगुडौदनम्॥
पीतंघृतंहंत्यनिलंसिद्धंमार्कवजेरसे॥ ८॥

अर्थ- तूपभातांत गूळ घालून खावा. वर ऊन पाणी प्यावें ह्मणजे वातापासून झालेला स्वरभेद नीट होतो. तसेंच माक्याचा रस व तूप एकत्र करून आटवून तें तूप प्यावें. ह्मणजे वातानें बिघडलेला स्वर नीट होतो असें जाणावें.

अक्षीयाच्चससर्पिष्कंयष्टीमधुकपायसम्॥

अर्थ- तूप, ज्येष्ठमधाचें चूर्ण खिरींत घालून ती खाल्ली असतां स्वर नीट होतो.॥

शर्करामधुमिश्राणिशृतानिमधुरैःसह॥ पि-
बेत्सयांसियस्योच्चैर्वदतोभिहतःस्वरः॥ ९॥

अर्थ- ज्याचा मोठ्यानें बोलून स्वरभेद ह्मणजे घसा बसला असेल त्याणें साखर, मध व दुसरे मधुर पदार्थ घालून तापलेलें दूध प्यावें.

व्याघ्रीस्वरसविपक्वंरास्नावाट्यालगोक्षुर-
व्योषैः॥सर्पिःस्वरोपघातंहन्यात्कासंचपंचविधं १०

अर्थ- रिंगणीचा आंगरस काढून त्यांत पक्व केलेलें अथवा रास्ना, लघु चिकणा, गोखरू, सुंठ, मिरें, पिंपळी यांच्या काढ्यांत पक्व केलेलें तूप स्वरभेद व पांच प्रकारचा खोकला यांचा नाश करितें.

विहितमसृणचूर्णान्यारनालेनसार्धम्॥ क-
लितरुफलकृष्णासैंधवानिप्रलिह्यात्॥ ११

अर्थ- बेहडा, पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण बारीक करून कांजींत घालून प्यावें. ह्मणजे स्वरभेदाचा नाश होतो.

अभिलषतिविजेतुंयःस्वरस्यप्रणाशम्॥
सपिबतिसहदुग्धेनामलक्याःपतंवा॥ १२॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- स्वरभेद जिंकण्याची जो इच्छा करील त्याणें दुधांत आंवळकाठीची पूड टाकून तें प्यावें.

कासश्वासोपयुक्तारसाः प्रयोक्तव्याः॥७॥

अर्थ- कास श्वासाचे ठायीं उपयुक्त जे रस त्यांची स्वरभेदाचेठायीं योजनाकरावी

स्वरभेदस्यक्षयरोगांतःपातित्वात्क्षयरोगोक्तमेवकार्यं

अर्थ- स्वरभेदही क्षयाचे पोटांत आहे या साठीं क्षयांत जें उक्त असेल तें औषध करावें.

अथारोचकलक्षणोपचारः

वातादिभिःशोकभयातिलोभक्रोधैर्मनोघ्राशनरूपगंधैः।
अरोचकास्यःपरिदृष्टदंतःकषायवक्त्रश्चमतोनिलेन१॥

अर्थ- वात,पित्त,कफ,शोक,भय,अतिक्रोध,मनोभंग करणारें वाईट रूप,भोजन, गंध इतक्यांनीं अरोचक ह्मणजे अरुचि होते. वायूपासून ज्याला अरुचि होते त्याचे दांत शिवशिवतात. आणि तोंड तुरट असतें.

अम्लिकागुडतोयंचत्वगेलामरिचान्वितम्।
अभक्तछंदरोगेषुशस्तंकवलधारणम्॥२॥

अर्थ- अन्नावर अरुचि ज्यास होते त्याणें चिंचेचें सरबत,गुळ,पाणी,दालचिनी,वेलदोडे,मिरें घालून करावें आणि त्याचे बराबर जेवावें.

कुष्ठसौवर्चलाजाजीशर्करामरिचंबिडम्॥धान्येलापद्म
कोशीरपिप्पल्यश्चंदनोत्पलम्॥३॥लोध्रतेजोवतीपथ्या
त्र्यूषणंसयवाग्रजम्॥आर्द्रदाडिमनिर्यासःसाजाजी-
शर्करायुतः॥४॥सतेलमाक्षिकाख्येतेचत्वारःकवल
ग्रहाः॥चतुरोरोचकान्घ्नंतिवाताद्येकजसर्वजान्॥५॥

अर्थ- कोष्ठकोलिंजन,पादेलोण,जिरें,सारवर,मिरें आणि बिडलोण यांचें चूर्ण. धणे,वेलदोडे,पद्मकाष्ठ,वाळा,पिंपळी,चंदन आणि कमळ यांचें चूर्ण. लोध्र,मालकांगुणी,हिरडा,सुंठ,मिरें,पिंपळी आणि जवखार यांचें चूर्ण. आलें,डाळिंब यांचा रस,जिरें सारवर युक्त हे चार योग,शिरसाचें तेल मध घालून यांचे तोंडांत कवळ ह्मणजे गुळण्या धरिल्या असतां वात,पित्त,कफ आणि सन्निपातयांपासून झालेली चार प्रकारची अरुचि तिचा नाश करितात असें जाणावें.

शमयतिकेसरमरुचिंसलवणघृतमाशुमातुलिंगस्य
दाडिमचूर्णमथवाचरको रुचिकारिसूचयामास ६

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- महाळुंगाचें केंशर सैंधव तूप लावून खाल्लें असतां अरुचि नाशक आहे. अथवा डाळिंबाचें चर्वण ह्मणजे खाणें रुचिकारक आहे असें चरकानें सुचविलें आ०

॥पिक्षाजाजीसधान्याकंघृतप्रस्थेविपाचयेत्॥
॥कफपित्तारुचिहरंमंदानलवमिंजयेत्॥७॥

अर्थ- जिरें, धणे कुटून ६४ तोळे तुपांत पक्क करून शक्तीप्रमाणें खावें. म्हणजे कफ, पित्त यां पासून झालेली अरुचि, मंदाग्नि यांचा नाश करील.

अजाजीमरिचंकुष्ठंबिडंसौवर्चलंतथा॥ मधुकंशर्करातैलंवातिकेमुखधावनम्॥८॥ ७॥

अर्थ- जिरें, मिरें, कोष्ठ कोलिंजन, बिडलोण, पादेलोण, ज्येष्ठमध, सारवर, शिरसाचें तेल हीं एकत्र करून याणें तोंड धुवावें. म्हणजे वाताची अरुचि जाते. ॥७॥

कारंजंदंतकाष्ठंचविधेयमरुचौसदा॥ किंचिल्लवणसंयुक्तमारनालंविपाचयेत्॥९॥ तेनगंडूषकंकुर्यादास्यवैरस्यशांतये॥

अर्थ- तोंडाची अरुचि असतां करंजाचे काष्ठानें दांत घांसावे. आणि थोडें मीठ घालून कांजी कढवून त्यानें चुळा टाकाव्या. म्हणजे तोंडाची अरुचि जाते. ॥७॥

शर्करादाडिमंचाथद्राक्षाखर्जूरमेवच१०केसरंमातुलिंगस्यसिंधुनामधुनापिवा॥ आस्यवैरस्यशमनंभक्षयेत्कर्षसंमितं॥११॥

अर्थ- सारवर, डाळिंब, मनुका, खारीक, महाळुंगाचें केंशर, सैंधवाशीं किंवा मधाशीं युक्त यांतून कोणतें एक क्षमारें तोळाभर भक्षिलें असतां तोंडास रुचि येत्ये.

विडंगचूर्णंकर्षेकंक्षौद्रेश्चतुर्गुणैर्युतम्॥ असाध्यमपिसंहन्यादरुचिंवक्त्रधारणात्॥१२॥

अर्थ- वावडिंगाचें चूर्ण १ तोळा. मध ४ तोळे यांची गोळी तोंडांत धरावी. म्हणजे असाध्य जरी अरुचि असली तरी तिचा नाश करील.

त्रिभ्यूषणानित्रिफलारजनीद्वयंचचूर्णीकृतानि यवशूकविमिश्रितानि॥ क्षौद्रान्वितानिवितरेन्मुखधावनार्थमन्यानितिक्तकटुकानिचभेषजानि॥१३

अर्थ- दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी हळद, दारुहळद आणि जवखार यांचें चूर्ण मधाशीं मिश्र करून तोंड धुण्यास

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

घ्यावें आणखीही कडू तिखट औषधे घ्यावी म्हणजे अरुचीचा नाश होईल.

सिताव्योषकपित्थानांचूर्णंक्षौद्रेणनहृदीं॥स-
र्वारोचकशांत्यर्थंधारयेद्वदनांबुजे॥१४॥

अर्थ- साखर, सुंठ, मिरें, पिंपळी, कंवठ यांच्या चूर्णाची मधांत गोळी करून तोंडांत धरावी. म्हणजे अरुचि शांत होते. ॥ इति अरोचकचिकित्सा ॥७॥ समाप्त.

अथछर्दिलक्षणोपचारः

श्वासकासौज्वरोहिक्कातृष्णावैस्वर्यमेवच
हृद्रोगस्तमकश्चैवज्ञेयाश्छर्देरुपद्रवाः॥१

अर्थ- कास, श्वास, ज्वर, हिक्का, तृष्णा, स्वरभेद, हृद्रोग, तमकश्वास, इनके छर्दीचे म्हणजे ओकारीचे उपद्रव (म्हणजे मागून होणारे रोग) आहेत असें जाणावें.

ईषदुष्णासफेनायासशूलाचपुनःपुनः॥छ-
र्दिर्भवतिलक्ष्मैतद्वातच्छर्दिःप्रकीर्तितं॥२॥

अर्थ- किंचित् उष्ण, फेंसासहित, शूलयुक्त, वारंवार होणारी अशी वातछर्दी जा०

सदाहलोहितापीताहरितोष्णाथवाभवेत्॥
छर्दिरेतद्भवेल्लक्ष्मपित्तच्छर्देरसंशयम्॥३॥

अर्थ- दाहयुक्त, तांबडी, पिवळी अथवा हिरवी उष्ण अशी पित्तच्छर्दी जाणावी.

कफमिश्रासहृद्दाहामुहुर्मुहुःसघुर्घुरा॥स-
लालाजंबालयुताश्लेष्मच्छर्दिःप्रकीर्तिता॥४

अर्थ- कफमिश्र, हृदय दाहानें युक्त, वारंवार घुर्घुर शब्दसहित, जींत लाळ, जळमटें अशी कफच्छर्दी जाणावी.

छर्दनंवमनंज्ञेयंकुर्यात्तच्छांतिभेषजम्॥४

अर्थ- छर्दन म्हणजे वमन जाणावें. तीच ओकारी तिच्या शांततेचें औषधकरावें.

एलालवंगगजकेसरकोलमज्जालाजप्रियंगुघनचंदन
पिप्पलीनाम्॥चूर्णानिमाक्षिकसितासहितानिलीढ्वाछ-
र्दिंनिहंतिकफमारुतपित्तजातां५

अर्थ- वेलदोडे, लवंग, नागकेशर, बोराचे आंठीचा मगज, लाह्या, गहुला, नागरमोथा, चंदन, पिंपळी यांचे चूर्ण मध साखर यां बराबर खावें. म्हणजे वात, पित्त, कफ यांची छर्दी नष्ट होईल.

चंदनंचमृणालंचबालकंनागरंवृषम्॥स-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥तंदुलोदकक्षौद्रैः पीतः कल्कोवमिंजयेत् ॥६॥

अर्थः- चंदन कमळाच्या देंठांतला तंतु, वाळा, स्कंठ अडूळसा हीं तांदुळांचे धुणांत वांटून मध घालून तें प्यावें. म्हणजे ओकारीला जिंकील.

सोदीच्यगैरिकंदेयं सेव्यंवातंदुलांबुना॥ जातीपत्ररसं-
कृष्णामरिचंशर्कराचितं ॥ एतानिमधुयुक्तानिघ्नंतिच्छ-
र्दिंचिरोद्भवाम् ७॥

अर्थः- वाळा, गेरु, अथवा वाळा तांदुळांचे धुणांत वांटून प्यावा. अथवा जाईचे पानांच्या रसांत पिंपळी, मिरें यांचें चूर्ण साखर घालून प्यावें. त्या तिन्ही औषधांत मध घालून द्यावें. म्हणजे फार दिवसांची ओकारी बंद होईल.

चंदनेत्र्यक्षमात्रेचसंयोज्यामलकीरसम् ॥
पिबेन्माक्षिकसंयुक्तंछर्दिस्तेननिवार्यते॥८॥

अर्थः- तोळाभर चंदन घेऊन चूर्ण करून त्यांत आंवळ्यांचा रस, मध मिश्र करून प्यावा तेणें करून ओकारीचें निवारण होतें.

कषायोभ्रष्टमुद्गानांसलाजमधुशर्करः॥ छ-
र्द्यतीसारदाहघ्नोज्वरघ्नःसंप्रकाशितः॥ ९ ॥

अर्थः- भाजलेल्या मुगांचा काढा, लाह्या, मध, साखर, यांणीं युक्त करून द्यावा. तो ओकारी, अतिसार, दाह, ज्वर, यांचा नाशक आहे.

कोलमज्जाकणाबर्हिपक्षभस्मसशर्करम्॥
मधुनालेहयेच्छर्दिंहिक्काकोपस्यशांतये॥१०॥

अर्थः- बोराचे आंठीचा मगज, पिंपळी, मोराचे पंखाची राख, साखर, मध, हें एकत्र करून चाटलें असतां ओकारी, उचकी यांचा कोप शांत होतो.

बीजपूराम्रजंबूनांपल्लवानिजटाःपृथक् ॥
द्विःपचेत्पुटपाकेनक्षौद्रयुक्तश्चतद्रसः॥ छ-
र्दिंनिवारयेत्सद्यः सर्वदोषसमुद्भवाम् ॥११॥

अर्थः- माहालुंग, आंबा, जांबूळ यांचे पल्लव अथवा मुळें पुटपाकानें पक्व करून त्यांचा रस मधुयुक्त करून दिला असतां सर्व दोषां पासून जरी ओकारी असली तरी तिचें शीघ्र निवारण करितो.

पित्तच्छर्दिंव्रजेद्दूर्वातंदुलोदकपानतः॥ धा-
त्रीरसेनवापीतासितालाजाश्चहंतितां॥१२॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः- दूर्वांचा रस तांदुळांचे धुणा बरोबर प्यावा। अथवा आंवळ्यांचा रस सा-खर, लाह्या एकत्र करून प्यावा. म्हणजे पित्तच्छर्दि निवारण होते.

सैंधवंसर्पिषापीतंवातच्छर्दिनिवारणम्॥

अर्थः- सैंधव, तूप एकत्र करून प्यावें म्हणजे वातच्छर्दि निवारण होते.

हरीतकीनांचूर्णंतुलित्वान्माक्षिकसंयुतम्॥
अधोभागेकृतेदोषेछर्दिस्तेननिवार्यते॥१३॥

अर्थः- हिरड्याचें चूर्ण मधाबरोबर खावें तेणें करून दोष अधोभागीं गेले म्हण-जे छर्दीचें निवारण होतें.

आरक्तशालिभक्तंगोदध्याशर्कराविमिश्रंच॥
कुर्याद्भोजनमेतत्कफच्छर्दिच्छिदंजंतोः॥१४

अर्थः- तांबडे साळींचा भात, गायीचें दहीं, सारवर यांचें भोजन करावें म्हणजे कफछर्दीचा नाश होतो.

मृद्भृष्टलोष्टप्रभवंसुशीतंसलिलंपिबेत्॥

अर्थः- मातीचें ढेंकूळ तापवून पाण्यांत विझवावें तें पाणी थंड झाल्यावर प्या-वें म्हणजे छर्दी निवारण होते.

जंबाम्रपल्लवोशीरवटशृंगावरोहजः१५ क्वाथःक्षौद्रयु-तःशीतःपीतोवाविनियच्छति॥ छर्दिज्वरमतीसारं मू-र्च्छांतृष्णांचदुर्जयां१६

अर्थः- जांबूळ, आंबा यांचे पल्लव, वाळा, वडाच्या पारंब्या यांचा काढा थंड करून मधासहित प्यावा. म्हणजे ओकारी, ज्वर, अतिसार, मूर्च्छा, तृष्णा हीं दुर्जय असलीं तरी त्यांचा नाश होतो.

हिंगुनासारिवामूलंसर्ववांतिहरंपरम्॥जा-
तीफलंवमोशोषेजागरेविप्रयोजयेत्॥ ॥

अर्थः- हिंगासहित लघु उपळसरीचें मूळ सर्व प्रकारचे ओकारीचें नाशक आ-हे. जायफळ ओकारी, शोष, जागरण यांच्यावर प्रशस्त आहे.

उग्रगंधारनालेनपीताच्छर्दिंनिवारयेत्॥१७

अर्थः- वेखंड, कांजी बराबर प्यालें असतां छर्दीचें निवारण होईल असें जा०

अथतृष्णालक्षणोपचारः

सततंयःपिबेत्तोयंनतृप्तिमधिगच्छति॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥पुनःकांक्षतितोयंचनतृष्णार्दितमादिशेत्॥१॥

अर्थ- एकसारखें जो पाणी पितो आणि तृप्त होत नाहीं पुनः पाण्याची इच्छा करितो. त्याला तृष्णार्दित ह्मणजे तृषेनें पीडित असें ह्मणतात.

काश्मर्यशर्करायुक्तंचंदनोशीरपद्मकम्॥द्रा-
क्षामधुकसंयुक्तंपित्ततृष्णोजलंपिबेत्॥२॥

अर्थ- लघुशिवणीचें फळ, साखर, चंदन, वाळा, पद्मकाष्ठ, मनुका, ज्येष्ठमध यांचा काढा पित्तापासून तृषा लागते त्यावर प्रशस्त आहे.

सजीरधान्यार्द्रकशृंगबेरसौवर्चलान्यर्धपरिप्लुतानि॥
मद्यानिरुद्यानिचगंधवंतिपीतानिसद्यःशमयंतितृष्णां३

अर्थ- जिरें, धणे, आलें आणि पादेलोण यांचें चूर्ण अर्धें, व दुप्पट मद्य चांगलें, सुगंधानेंयुक्त, घालून प्यालें असतां तृष्णा शमेल.

आम्रजंबूकषायंवापिबेन्माक्षिकसंयुतम्॥
छर्दिसर्वांप्रणुदतितृष्णांचैवापकर्षति॥४॥

अर्थ- आंबा जांबूळ यांच्या सालीचा काढा मध घालून प्याले असतां ओकारी तृषा यांचा नाशक आहे.

गोस्तनीक्षुरसक्षीरयष्टीमधुमधूत्पलैः॥नि
यतंनस्यतापीतैस्तृष्णाशाम्यतितत्क्षणात्५

अर्थ- काळीं द्राक्षें, ऊंस, दूध, ज्येष्ठमध, मध, कमळ यांचें नस्य केलें असतां नेमानें त्याच क्षणीं तृषा शांत होते.

जीरकुस्तुंबरीद्राक्षाचंदनोत्पलशीतलम्॥
शीतलेनसमंदद्यात्तृष्णांहंत्यतिशीतलं॥६॥

अर्थ- जिरें, धणे, मनुका, चंदन, कमळ, कापूर हीं सर्व वांटून थंड पाण्याबरोबर प्यावीं ह्मणजे तृषा नाश होईल.

रुग्लाजाब्दवटप्ररोहमधुकैर्मध्वन्वितैःकल्पिताप्युग्रा
माशुतृषांमृशंप्रशमयेदास्यांतरस्थागुटी॥७॥७॥

अर्थ- कोष्ठकोलिंजन, लाह्या, नागरमोथा, वडाचे अंकूर ज्येष्ठमध, मध हीं एकत्र वांटून गोळी करून तोंडांत धरावी. ह्मणजे अतितृष्णा जरी असली तरी लवकर शांत होईल.

॥निर्वापितंतप्तलोष्टकपालसिकतादिभिः॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥तृष्णायांवमनोत्थायांसगुडंदधिशस्यते॥८॥

अर्थ- मातीचा दें कूळ खापरी, वाळू यांतून कांही एक तापवून दत्यांत विझवून तें दहीं गूळ घालून प्यावें. ह्मणजे वांतीपासून झालेली तृषा बंद होईल.

॥पित्तजायांसितायुक्तःपक्वोदुंबरजोरसः॥

अर्थ- पित्तापासून तृष्णा उत्पन्न झाली असतां पिकलेल्या उंबराचा रस काढून त्यांत साखर घालून द्यावा.

॥आतपात्ससितंमंथंयवकोलजसक्तुभिः॥९

॥सर्वाण्यंगानिलिंपेच्चतिलपिण्याककांजिकैः॥

अर्थ- उनापासून तृषा असली तर यव, बोरकूट आणि सातू यांचें पीठ पाण्यांत कालवून साखर घालून प्यावा. आणि सर्वांगाला तिळांची पेंड कांजींत वांटून त्याचा लेप करावा.

॥रोगोपसर्गजातायांधान्यांबुससितामधु॥१०

वटप्ररोहयष्ट्याह्वकणामधुकृतावटी॥ मुख-

स्थाचिरकालोत्थांतृष्णांहन्यात्सुदुस्तराम्॥११॥

अर्थ- रोगाचे संबंधानें तृषा असली तर धण्याचें पाणी मध, साखर घालून प्यावें. आणि फार वेळ तृषा लागून दुःसाध्य असली तर वडाचे अंकुर, ज्येष्ठमध, पिंपळी, मध यांची गोळी मुखांत धरावी.

॥अथमूर्च्छालक्षणोप०॥

॥संज्ञावहासुनाडीषुपिहितास्वनिलादिभिः

तमोभ्युपैतिसहसासुखदुःखव्यपोहकृत्१

॥सुखदुःखव्यपोहाच्चनरःपततिकाष्ठवत्॥

अर्थ- ज्ञानवाही शिरा वातादि दोषांनीं आच्छादित झाल्या असतां सुख दुःखाचें निवारक असें तम (अज्ञान) अकस्मात् उत्पन्न होतें. आणि सुख दुःखाचा नाश झाला ह्मणजे मनुष्य काष्ठाप्रमाणें पडतो.

॥हृत्पीडाजृंभणंग्लानिःसंज्ञादौर्बल्यमेवच२॥

॥सर्वासांपूर्वरूपाणियथास्वंचविभावयेत्॥

॥मोहोमूर्च्छेतितामाहुःषड्विधासाप्रकीर्तिता३॥

अर्थ- हृदयांत पीडा, जांभया, ग्लानि, बुद्धीचा कमीपणा हीं सर्व मूर्च्छांचीं पूर्वरूपें आहेत तीं साऱ्या लक्षणांनीं जाणावीं. तिला मोह, मूर्च्छा, असें ह्मणतो ती सहा प्रकारची आहे.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

यथादोषंकषायांश्चज्वरघ्नांश्चप्रयोजयेत्॥

अर्थ:- जो दोष असेल त्याचे नाशक ज्वरघ्न (ज्वरनाशक) असे काढे द्यावे.

रक्तजायांचमूर्छायांहितःशीतक्रियाविधिः४

मद्यजायांवमेन्मद्यंनिद्रांसेवेद्यथासुखं॥

विषजायांविषघ्नानिभेषजानिप्रदापयेत् ५

अर्थ:- रक्तापासून मूर्छा असली तर थंड औषध हितकारक आहे. मद्यापासून मूर्छा असली तर मद्य ओकून टाकावें. आणि निद्रा करावी. विषापासून मूर्छा असली तर विषनाशक औषधें द्यावीं.

कोलमज्जाकणोशीरकेसरंशीतवारिणा

पीतंमूर्छांजयेल्लीढ्वाकृष्णांवामधुसंयुतां६

अर्थ:- बोरांचे आंठीचा मगज, पिंपळी, वाळा, नागकेशर हीं थंड पाण्यांत वांटून प्यावीं. अथवा मधाबरोबर पिंपळी खावी. म्हणजे मूर्छा नाश पावेल

मधुनाहंत्यपयुक्तात्रिफलारात्रौगुडोदकंप्रातः॥सप्ता-

हात्पथ्यभुजोमदमूर्छाकासकामलामोहान्॥ ७ ॥

अर्थ:- रात्रीस मधा बरोबर हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, यांची पूड खावी, आणि गूळ आलें एकत्र करून प्रातः काळीं खावें. पथ्य करावें. या प्रमाणें सात दिवस केलें असतां मद, मूर्छा, कामला आणि मोह यांचा नाश होईल.

महौषधामृताद्राक्षापौष्करग्रंथिकोभवम्

पिबेत्कणायुतंक्वाथंमूर्छायांचमदेषुच ८

अर्थ:- सुंठ, गुळवेल, मनुका, पोखरमूळ, पिंपळमूळ, यांचा काढा पिंपळीचे चूर्णासहित मूर्छा आणि मद यांचे ठायीं प्रशस्त आहे.

पिबेद्दुरालभाक्वाथंसघृतंभ्रमशांतये॥

अंजनान्यपिपीडाश्चधूमाःप्रधमनानिच ९

अर्थ:- धमाशाचा काढा तूप घालून भ्रमशांतीला प्यावा. अथवा तीव्र अंजनें घालावीं. ठेंचून वगैरे व्यथा करावी. मिरच्यांची वगैरे धुरी द्यावी. कांहीं तीव्र औषधें ओढावयास द्यावीं. म्हणजे मूर्छा शांत होते असें जाणा:

सूचीभिस्तोदनंशस्तंदाहपीडानखांतरे॥

लुंचनंनखलोम्नांचदंतैर्दंशनमेवच॥ ॥

अर्थ:- सूया ठेंचाव्या. पाय वगैरे ओरपावे. नखें दाबावीं, ओढावीं. केश

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तोडावे, उपटावे, आणि दांतांनीं डसावें.

॥आत्मगुप्तावघर्षश्चहितस्तस्यावबोधने॥१०

अर्थ:- कुहिली अंगास चोळावी ह्मणजे शुद्धि येते. ॥ इति मूर्छाचिकित्सा.

अथमदात्ययलक्षणोपचारः

॥येविषस्यगुणाःप्रोक्तास्तेपिमद्येप्रकीर्तिताः
तेनमिथ्योपयुक्तेनभवत्यग्रोमदात्ययः॥१

अर्थ:- जे विषाचे गुण तेच मद्याचे सांगितले यास्तव तें मद्य भलते वेळेस आणि प्रमाणापेक्षां अधिक प्यालें असतां मोठा मदात्यय होतो.॥७

॥अल्पांबुभक्ष्यावततोदरेणसाजीर्णभक्तेनतथाबलेन
उष्णाभितप्तेनचसेव्यमानंकरोतिमद्यंविविधान्विकारान्२

अर्थ:- अल्प अन्नोदक सेवन केलेला, अजीर्णी, उष्णानें तापलेला इतक्यांनीं सेवन केलेलें आणि इच्छा नसतां बळानें पाजलेलें मद्य नानाप्रकारचे विकार.

हृद्गात्रतोदकफसंस्रुतिकंठधूममूर्छावमिज्वरशिरोवदनप्रवाहः॥आध्मानमुग्रमथवोद्गिरणंविदाहःपाने जरांसमुपगच्छतिलक्षणानि॥३॥

अर्थ:- हृदयाचे ठायीं आणि शरीराचे ठायीं टोंचल्या प्रमाणें व्यथा, कफ पडणें, घशांतून धूर, मूर्च्छा, ओकारी, ज्वर, डोकें, तोंड यांचे ठायीं अत्यंत दाह, अतिपोट फुगणें, ढेंकर, दाह, दुर्बलपणा इतकीं लक्षणें पानजीर्ण होत असतां होतात.

सौवर्चलमजाजीचवृक्षाम्लंसाम्लवेतसम्॥त्वगेलामरिचाद्यांशंशर्कराभागयोजितं॥४॥एतल्लवणमष्टांगमग्निसंदीपनंपरं॥मदात्ययेकफप्रायेदद्यात्स्रोतोविशोधनं५

अर्थ:- पादेलोण, जिरें, आंबसल, आम्लवेतस, दालचिनी, वेलदोडे, मिरें यांचें चूर्ण अर्धा भाग आणि साखर एक भाग असें एकत्र करून खावें. याला अष्टांगलवणचूर्ण असें ह्मणतात. हें चूर्ण अग्निदीपक आणि कफयुक्त मदात्ययाचे ठायीं स्रोतःशुद्धि करणारें आहे.

॥चव्यंसौवर्चलंहिंगुपूरकंविश्वभेषजम्॥
॥चूर्णंमद्येनपातव्यंपानात्ययरुजापहम्६

अर्थ:- चवक, पादेलोण, हिंग, महाळुंग, सुंठ यांचें चूर्ण मद्या बरोबर प्यावें ह्मणजे पानात्ययाची पीडा हरण करितें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥त्रिफलायारसोवापि व्योषचूर्णसमाहितः॥
॥शृष्कमूलकजोयूषःकौलित्थोवामधूत्कटः॥
सर्वजैःसर्वमेवेदंप्रयोक्तव्यंचिकित्सितम्७

अर्थः- हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचा काढा, सुंठ, मिरें, पिंपळी यांची पूड घालून प्यावा. अथवा वाळलेले मुळे यांचा मंड अथवा हुलग्यांचा मंड मध घालून प्यावा. ह्मणजे मदात्यय दूर होतो. आणि सर्व दोषांपासून मदात्यय असला तर हीं तिन्हीं औषधें करावीं.

त्वक्पिप्पलीभृंगपुष्पबिडैरुपेतंसेवेतहिंगुमरिचैलयुतंफलाम्लं॥ उष्णांबुसैंधवयुतात्वथवाबिडत्वक्चव्यैलमूलमगधाफलहिंगुशुंठी॥८॥

अर्थः- दालचिनी, पिंपळी, नागकेशर, बिडलोण, हिंग, मिरें, वेलदोडे, आम्लवेतस यांचें चूर्ण अथवा सैंधव, बिडलोण, दालचिनी, चवक, वेलदोडे, पिंपळमूळ, पिंपळी, हिंग आणि सुंठ यांचें चूर्ण ऊन पाण्या बरोबर खावें. ॥ इति मदात्ययचिकि०

॥अथदाहलक्षणोपचारः॥
॥त्वचंप्राप्तःसपानोष्मापित्तरक्ताभिमूर्च्छितः॥
॥दाहंप्रकुरुतेघोरंपित्तवत्तत्रभेषजम्॥१॥

अर्थः- तो मद्यपानजन्य ऊष्मा त्वचेप्रत प्राप्त झालेला रक्त आणि पित्त यांणीं वाढलेला असा अतिदाह उत्पन्न करतो. त्यावर पित्ताप्रमाणें उपचार करावा.

शीतांबुशीतलतरैश्चशयानमेनंहारैर्मृणालवलयैरबलाःस्पृशेयुः॥ भिन्नोत्पलोद्भवलहिमेशयनेशयीतयंत्रेषुवासजलबिंदुषुपद्मिनीनां॥२॥

अर्थः- कमळाच्या पाकळ्यांचें स्वच्छ, थंड, गार, अशा शयनावर अथवा जलबिंदुयुक्त कमलिनीच्या यंत्राचे ठायीं शयन करावें. आणि शयन केल्यावर थंडपाणी, शीतळ हार, कमलाचे देंठ्यांची वलयें यांनीं युक्त अशा स्त्रियांनीं त्याला स्पर्श करा०

बदरीपल्लवोत्थेनफेनेनारिष्टकस्यवा॥ सुरामंडांबुदध्याम्लंमातुलिंगरसोमधु॥३॥ ७

अर्थः- बोरीचे पाल्याचा फेंस, लिंबाच्या पाल्याचा फेंस, मद्यावरलो पाणी, दह्यांची निवळ, महाळुंगांचा रस इतके दाहशामक आहेत.

॥संपूर्णमवगाहेतद्रोणींदाहार्दितोनरः॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- दाहपीडित मनुष्यानें द्रोणींत बुडी मारून बसावें. ह्मणजे दाह शांत होतो.

वाप्य:कमलहासिन्योजलयंत्रगृहा:शुभा:
नार्यश्चंदनदिग्धांग्योदाहदैन्यहरामता:४

अर्थ:- कमळांनीं शोभणाऱ्या मोठ्या विहिरी,जलमंदिरें,चंदनाचा लेप केलेल्या स्त्रिया,दाहापासून झालेलें दैन्य दूर करतात.

प्रात:पर्युषितंधान्यसलिलंसितयायुतम्॥
अंतर्दाहंहरेत्पीतंदु:खंमृत्युंजयोयथा५॥

अर्थ:- रात्रीं धणे पाण्यांत भिजत घालून प्रात:काळीं कुसकरून तें पाणीं साखर घालून प्यावें ह्मणजे अंतर्दाह शांत करीत. जसें दु:खशमन सांब करितो.

सहस्रधौतेनघृतेनदिग्धदेहस्यदाह:कृशतांबिभर्त्ति
अन्यांगनासंगमसादरस्यस्वीयेषुदारेषुयथाभिलाष:६

अर्थ:- सहस्रवेळां धुतलेलें तूप अंगास चोळलें असतां दाह कमी होतो. जसा परस्त्रीशीं संसक्त पुरुषाचा मनोरथ स्वस्त्रीच्या ठायीं कमी होतो त्या प्रमाणें.

तृट्दाहमोहा:प्रशमंप्रयांतिनिंबप्रवालोत्थितफेनलेपात्॥ यथानराणांधनिनांधनानिसमागमाद्वारविलासिनीनाम्॥७॥

अर्थ:- कडू लिंबाचीं पानें हातावर कुसकरून तो फेंस अंगास चोळावा. ह्मणजे तृषा दाह मोह हे शांत होतात. जसें धनिक लोकांचें धन वेश्यासमागमाचे योगानें नष्ट होतें.

दाहेतिशिशिरंतोयंक्रियाकार्यासुशीतला
अर्थ:- अति थंड पाणी प्यावें. आणि शीत उपचार करावे. ह्मणजे दाह शांत होतो.

सर्वांगेचंदनालेपश्चंद्रकस्तूरिकायुत:॥सितनीरजलेपोवाधारागारनिवेशनम्॥ ८॥

अर्थ:- कापूर,कस्तूरीयुक्त चंदनाचा सर्वांगास लेप करावा. अथवा पांढरे कमळाचा लेप करावा. आणि जेथें कारंज्याचे फवारे उडताहेत अशा घरांत बसावें.

सहजस्नेहसोत्साहमुग्धमंजुललापिनाम्॥
बालकानांसमाश्लेषस्तापंनिर्वापयेज्ज्वरात्९॥

अर्थ:- स्वाभाविक स्नेहयुक्त आणि उत्साहानें लाडकें मंजूळ असें बोलणारे मुलांच्या आलिंगनानें ताप शांत होतो.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

उशीरागारशयनं तालवृंतानुवर्तनम्॥सा-
हित्यसरसावाणीकवीनांतापहृन्त्रयं॥१०॥

अर्थ- वाळ्याच्या नाटी लावलेल्या गृहांत शयन, पंख्याचा वारा, कवीचें अलंकारयुक्त,सरस भाषण, हीं तिन्हीं तापशामक आहेत.

पानीयामलकीद्राक्षानारिकेलंससार्करम्॥
गायनं सुकुमारीणां दाहमूर्च्छां हरेद्द्रुतं॥०॥

अर्थ- आंवळा,द्राक्षें यांचा रस प्यावा, नारळाचें पाणी साखरेसहित प्यावें,सुकुमार स्त्रियांचें गायन ऐकावें. म्हणजे ताप आणि मूर्छा हरण होईल.

सेवनायहितंतापेकोमलंमूत्रलंफलम्॥११॥

अर्थ- दाह झाला असतां मूत्र करणारें कोंवळें फळ सेवन करावें. इतिदाहचि०

अथोन्मादलक्षणोपचारः

धीविभ्रमःसत्वपरिप्लवश्चपर्याकुलादृष्टिरधीरताच॥अ-
बद्धवाक्यंहृदयंचशून्यंसामान्यमुन्मादगदस्यलिंगं॥१॥

अर्थ- बुद्धीवर भ्रांति,सत्वगुणाचा नाश,व्याकुळ दृष्टि,अधीरपणा, बोलणें,असंगत,हृदयशून्य म्हणजे अंतःकरणांत कांहीं एक न येणें हें सामान्य चिन्ह उन्माद रोगाचें जाणावें

यःसन्निपातप्रभवोतिघोरःसर्वैःसमस्तैःसतुहेतुभिः
स्यात्॥अत्यर्थवाग्विक्रमवीर्यचेष्टोज्ञानादिविज्ञानबलादिवी-
र्यः॥उन्मादकालोनियतश्च तस्यभूतोत्थमुन्मादमुदाहरंतिश

अर्थ- जो उन्माद सन्निपातापासून असतो तो अति घोर आणि सर्व कारणें एकत्र मिळून होतो. आणि ज्या उन्मादांत नियमें करून अतिभाषण,अतिपराक्रम,अतिचेष्टा,सामान्य विशेष ज्ञान,बल,हें असतें तो भूतापासून उन्माद(वेड)झाला अ.ज्ञा.

त्र्यूषणंहिंगुलवणंवचाकटुकरोहिणी॥शिरीषनक्तमा-
लानांबीजंश्वेताश्वसर्षपाः॥३॥गोमूत्रपिष्टैरेतैस्तुवर्तिर्नेत्रांजनेहिता॥चातुर्थिकमपस्मारमुन्मादंचनियच्छति॥४

अर्थ- सुंठ,मिरें,पिंपळी,हिंग,सेंधेलोण,वेरवंड,कुटकी,शिरस,करंजाचें बीं,पांढरें शिरस हीं सर्व गोमूत्रांत वाटून त्यांत वात भिजवून त्या वातीनें नेत्रास अंजन करावें. म्ह० चातुर्थिकज्वर,अपस्मार,उन्माद,यांचा प्रतिबंध करील. इतित्र्यूषणादिः

सिद्धार्थकवचाहिंगुकरंजोदेवदारुच॥मंजिष्ठात्रिफला

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

श्वेताकटभीत्वक्कटुत्रिकाः समांशंचप्रियंगुश्चशिरी-
षोरजनीद्वयं॥ बस्तमूत्रेणपिष्ट्वेदमगदंपानमंजनं॥ ६॥
नस्यमालेपनंचैवस्नानमुद्वर्तनंतथा॥ अपस्मारविषोन्
मादकृत्यालक्ष्मीज्वरापहम्॥ ७॥ भूतेभ्यश्चभयंहंति रा
जद्वारेचशस्यते॥ सर्पिरेतेनसिद्धंवासगोमूत्रंतदर्थकृत्॥ ८॥

अर्थः- पांढरे शिरस, वेरखंड, हिंग, करंजाची बी, देवदार, मंजिष्ठ, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, तुरटी, लघुकांगोणी, दालचिनी, सुंठ, मिरें, पिंपळी, राळे, शिरस आणि दारुहळद हीं बोकडाचे मुतांत वांटून प्यावीं. याचें अंजन करावें. नस्य करावें, लेप करावा, स्नान करावें. अंगास चोळावें. ह्मणजे अपस्मार, विष, उन्माद, कृत्या, दुर्दशा, ज्वर, भूतबाधा, यांचें नाशक आहे. आणि राजाकडे जाणें असल्यास हा योग करावा. या प्रमाणेंच या औषधांनीं सिद्ध केलेले तूप गोमूत्रसहित सेवन केलें असतां गुण करणारें आहे. ॥इति सिद्धार्थक-योगः॥

कामशोकभयक्रोधहर्षेर्ष्यालोभसंभवान्॥
परस्परप्रतिद्वंद्वैरेभिरेवशमंनयेत्॥ ९॥ ७

अर्थः- काम शोक, भय, क्रोध, हर्ष, ईर्ष्या आणि लोभ यां पासून जे उत्पन्न झाले रोग ते त्याचे प्रतिद्वंद्वी जे काम-शांत्यादिक याणीं निवारण करावें ह्मणजे कामा पासून उत्पन्न झाला जो कामज्वर तो कामशांति झाली ह्मणजे ज्वर जातो. त्या प्रमाणें करावें.

कार्पासास्थिमयूरपिच्छबृहतीनिर्माल्यपिंडीतकत्वङ्मां
सीवृषदंशविट्तुषवचाकेशाहिनिर्मोचनैः॥ नागेंद्रहि-
जशृंगहिंगुमरिचैस्तुल्यैस्तुधूपःकृतःस्कंदोन्मादपिशा-
चराक्षससुरावेशज्वरघ्नःस्मृतः॥ १०॥ ७॥

अर्थः- कापसाच्या सर्क्या, मोराचें पीस, रिंगणी, वेलपत्र, गेळफळ, दालचिनी, जटामांसी, मांजराची विष्ठा, तूस, वेरखंड, मनुष्याचे केंस, सर्पाची मेंग, हस्तिदंत, सांबराचें शिंग, हिंग, मिरें, हीं समांश घेऊन धूप करावा. आणि तो घेतला असतां स्कंदोन्माद, अपस्मार, उन्माद पिशाच राक्षस देवसंचार ज्वर यांचा नाश

॥अथापस्मारलक्षणोपचारः॥

॥तमःप्रवेशःसंरंभोदोषोद्रेकोहतस्मृतिः॥
॥अपस्मारइतिज्ञेयोगदोघोरःसफेनकः॥ १

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः- अंधकारांत शिरल्याप्रमाणें वाटणें, घाबरेपणा, दोषांच्या प्राबल्यानें स्मृतिनाश, तोंडास फेंस हीं लक्षणें ज्यांत होतात, त्याला अपस्मार (फेंपरें) असें ह्मणतात. हा रोग भयंकर आहे.

वातिकंबस्तिभिःप्रायःपैत्तिकंचविरेचनैः॥
कफजंवमनप्रायैरपस्मारमुपाचरेत्॥२॥

अर्थः- वातापासून अपस्मार असेल तर बहुत करून बस्ति करावा आणि पित्तापासून असेल तर प्रायः रेचन द्यावें. आणि कफापासून असेल तर प्रायः वमन द्यावें.

पुष्योद्धृतंशकृनःपित्तमपस्मारघ्नमंजनम्॥
तद्देवसर्पिषायुक्तंधूपनंपरमंहितम्॥३॥

अर्थः- पुष्यनक्षत्राचे ठायीं कुत्र्याचें पित्त काढून अंजन करावें अथवा तुपांत मिश्र करून धूप करावा. म्हणजे अपस्माराचा नाश होईल.

मनोह्वातार्क्ष्यकंचैवशकृत्सारावतस्यच॥अं
जनंहत्यपस्मारमुन्मादंचविशेषतः॥४॥

अर्थः- मनशीळ, रसांजन, पारध्याची विष्ठा यांचें अंजन अपस्मार व उन्मादयांचें नाशक आहे.

यष्टिहिंगुवचावज्रीशिरीषलशकनामयैः॥
साजमूत्रैरपस्मारेसोन्मादेनावनांजने॥५॥

अर्थः- ज्येष्ठमध, हिंग, वेखंड, निवडुंगाचा चीक, शिरस, लसूण, कोष्ठ कोसिंजन यांचें अंजन आणि नस्य बोकडाचे मुताबरोबर केलें असतां अपस्मार आणि उन्माद हे रोग जातात.

वचामृताव्योषमधूकसारुद्राक्षसिंधूद्भवबार्हतानि॥फलंसमुद्रस्यरसोनकल्कंध्मातंहिनासापुटमध्यदेशे॥६॥अपस्मृतिश्लेष्ममरुच्छिरोरुक्प्रलापनंद्राभ्रमजाड्यमोहान्॥ससंनिपातश्रुतिकाक्षिभंगान्सपीनसंहंतिहलीमकंच॥रसायनंभैरवनामधेयंज्ञातंविचारात्कविविठ्ठलेन७

अर्थः- वेखंड, गळवेल, सुंठ, मिरें, पिंपळी, मोहाचा डीक, रुद्राक्ष, सैंधव, रिंगणीचें फळ, समुद्रफळ, लसूण हीं सर्व एकत्र वांटून नाकांत ओढावीं म्हणजे अपस्मार वायु, कफ, मस्तकपीडा, बडबड, तंद्रा, भ्रम, जाड्य, मोह, सन्निपात, कर्णरोग, अक्षिभंग, पीनस, हलीमक इतक्यांचा नाश करील. याला भैरव रसायण असें ह्मणतात.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

त. विठ्ठलपंडितानला विचारानें हें समजलें आहे.

शंखपुष्पीवचाकुष्ठैः सिद्धंब्राह्मीरसेघृतम्॥
पुराणंहंत्यपस्मारंमेध्यमुन्मादनाशनम्॥८

अर्थः- शंखाहुली, शेतवड, वेखंड, कोष्ठ कोलिंजन यांचें चूर्ण, तूप, ब्राह्मीचा रस एकत्र शिजवून रस आटला ह्मणजे तूप सिद्ध झालें. तें फार दिवसांचा अपस्मार आणि उन्माद यांचें नाशक आहे.

घृतसैंधवहिंगुभ्यः कर्षैर्वर्तिश्चतुर्गुणैः॥मू-
त्रैः सिद्धमपस्मारंहृद्ग्राहग्रामनाशनं॥९॥

अर्थः- तूप १, सैंधव १, हिंग १, हीं एक एक तोळा आणि बारा तोळे गोमूत्र घेऊन एकत्र शिजवावें. मूत्र आटलें ह्मणजे तूप सिद्ध झालें तें तूप, अपस्मार आणि हृद्रोग यांचें नाशक आहे.

अरण्यब्रपुषीचूर्णंनस्येनापस्मृतिंजयेत्॥१०

अर्थः- बघु राळे, कंवडळ यांच्या चूर्णाचें नस्य करावें. तें अपस्मारावें नाशकआहे.

अथवातव्याधिलक्षणोपचारः

देहेस्रोतांसिरिक्तानिपूरयित्वानिलोबली॥
करोतिविविधान्व्याधीन्सर्वांगैकांगसंश्रयान्॥१

अर्थः- बलवान् असा जो वायु तो पोकळ शिरा असतात त्यांत शिरून शरीराचे ठायीं संपूर्ण किंवा एखादा अवयव धरून राहिलेले असे नाना प्रकारचे व्याधि उत्पन्न करितो.

संकोचःपर्वणांस्तंभोभंगोस्थ्नांपर्वणामपि॥रोमहर्षःप्रलापश्चपाणिपृष्ठशिरोग्रहान्॥२॥खांज्यपांगुल्यकुब्जत्वंशोषोंगानामनिद्रता॥गर्भशुक्ररजोनाशःस्पंदनंगात्रसुप्तता॥३॥शिरोनासाक्षिजत्रूणांग्रीवापार्श्वाभिकुंचनं॥भेदस्तोदार्तिराक्षेपोमोहश्चायासएवच॥४॥एवंविधानिरूपाणिकरोतिकुपितोनिलः॥हेतुस्थानविशेषैश्चभवेद्रोगविशेषकृत्॥५॥सर्वांगैकांगरोगांश्चकुर्यात्स्वायुगतोनिलः॥ऊर्ध्ववातमधोवातंकुंभकंनलमारुतम्॥संधिवातंकटीवातंशिरोवातंवदंत्यलम्॥६॥

अर्थः- सांधे आखडणें, धरणें, हाडें सांधे फुटणें, अंगावरा कांटा येणें, बडबड, हा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

त पाठ, डोकें धरणें, लंगडेपणा, पांगळेपणा, कुबडेपणा, अंगास रूक्षपणा, झोंप न येणें, गर्भ, वीर्य, स्त्रियांचा विटाळ यांचा नाश, कंप, अंगास बहिरेपणा, डोकें, नाक, डोळे, खवांटे, मान, कुशी यांच्या ठिकाणीं ओढ, फुटणें, टोंचल्या सारखें होणें, ठणकणें, उडणें, मोह, भ्रम अशा नानातऱ्हा वायु कुपित झाला ह्मणजे करितो. कारणविशेषें करून, स्थानविशेषें करून रोगविशेषा करणारा होतो. आणि शिरागत वायु झाला म्हणजे सर्वांगरोग, एकांगरोग करितो. ऊर्ध्ववायु, अधोवायु, कुंभक, नळवात, संधिवात, कटीवात, शिरोवात इत्यादि प्रकारचीं नावें होतात.

अभ्यंगस्वेदनंबस्तिर्नस्यंस्नेहंविरेचनम्॥
स्निग्धाम्ललवणस्वादुहृष्यंवातानुलोमनम्६

अर्थ- अभ्यंग, वाफारा, बस्तिकर्म, नस्य, तेल इत्यादिकांनीं मर्दन, रेच इनके प्रकार करावे आणि स्निग्ध, आंबट, खारट, मधुर, हृष्य, वातानुलोमन असें भक्षण करावें. म्हणजे वातव्याधि शांत होतो.

वाजिगंधाबलास्तिस्रोदशमूलीमहौषधं
गृध्रनखौचरास्नाचगणोमारुतनाशनः७

अर्थ- आस्कंद, चिकणा, लघुचिकणा, पेटारी दशमुळें, १० सुंठ, बोर, रानबोर, रास्ना हा गण वातनाशक आहे.

निर्गुंड्याचोपनाहंचकरंजेश्वापिपित्तलैः
भेषजैःसेकलेपादिस्नानिषेकादिकंचरेत्८

अर्थ- निर्गुंडीचा अथवा करंजाचा पेंड बांधावा. आणि पित्तकारक औषधांनीं वाफारा, लेप, स्नान इत्यादिक करावें. ह्मणजे वायु शमतो अ० जा०

चित्रकेंद्रयवापाठाकटुकातिविषाभया॥
महाव्याधिप्रशमनोयोगःषट्चरणःस्मृतः९

अर्थ- चित्रक, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी, अतिविष, हिरडा यांचें चूर्ण महावातव्याधीचें शमन करणारें आहे. याला षट्चरणयोग असें ह्मणतात.

चित्रकत्रिफलाव्योषभल्लातकगुडंसमम्
सेवनीयंप्रयत्नेनवातदोषनिवारणम्१०

अर्थ- चित्रक, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, बिब्बा, गुळ एकत्र करून कुटून गोळ्या करून खावें ह्मणजे वातदोष निवारण होतो.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

एतद्योगेनसंयुक्तंगुग्गुलंमधुसर्पिषा ॥
संलेह्यनाशयेत्तूर्णंवातरोगंविशेषतः ११

अर्थ- पूर्वींचे योगा बरोबर गुग्गुळ, मध, तूप, हें सेवन केलें असतां वातरोगाचें निवारण लौकर होतें.

सुरतरुरामठकुष्ठंशतपुष्पासैंधवंवचार्कपयः॥
अस्थिगतानपिवातान्निहंत्येकेनलेपेन ॥१२॥

अर्थ- देवदार, हिंग, कोष्ठ, कोलिंजन, बडिशेप, सैंधव, वेरखंड, रुईचा चीक यांचा लेप अस्थिगत जरी वायु झाला तरी त्याचा नाश करितो.

शतपुष्पेस्फरदारुदिनेशपयोगररामठसिंधुभवंहरति॥ अपिलेपनतोस्थिगतंमरुतंकटिसंधिगतंत्रिदिनात्सततम् १३

अर्थ- बडिशेप, देवदार, रुईचा चीक, बचनाग, हिंग, सैंधव यांचा लेप अस्थिगत वायु, कटिगत, संधिगत, वायु यांचा तीन दिवसांत नाश करितो. असें जाण.

प्रक्षयित्वाक्षरेणांगंकेवलानिलपीडितम्॥ तत्रप्रलेपंदद्याच्चपिष्ट्वागुंजाफलैःकृतं॥१४॥ तेनापबाहुजाःपीडाविश्वाचीगृध्रसीतथा॥ अन्याश्चवातजाःपीडाःप्रशमंयांतिवेगतः॥१५॥

अर्थ- ज्या ठिकाणीं केवळ वायूची पीडा असेल तेथें वस्त्र्यानें फांसण्यारा-कून त्यावर गुंजा वांटून त्याचा लेप करावा. तो लेप अपबाहू, विश्वाची, गृध्रसी, अन्य दुसरे वायु यांची पीडा शमवितो.

रास्नामृतादेवदारुनागरैरंडजंमृतम् ॥
ससधातुगतेवातेसामेसर्वांगगेपिबेत् १६

अर्थ- रास्ना, गळवेल, देवदार, सुंठ, एरंडमूळ, यांचा काढा, ससधातुगत वायु आमवात, सर्वांगि वायु यांच्या ठायीं प्रशस्त आहे. इतिरास्नापंचकम्॥७

॥ अथमहारास्नादिः॥

रास्नाद्विगुणभागास्यादेकभागास्ततःपरे॥ धन्वयासबलैरंडदेवदारुसटीवचा॥१॥ वासकोनागरंपथ्याचव्यंमुस्तापुनर्नवा॥ गुडूचीबृहदारूचशतपुष्पाचगोक्षुरः२ अश्वगंधाप्रतिविषोकृतमालशतावरी॥ कृष्णा

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सहचरश्चैवधान्यकंबृहतीद्वयम्॥३॥एभिःकृतंपिबे-
त्क्वाथंशुंठीचूर्णेनसंयुतम्॥कृष्णाचूर्णेनवायोगराज
गुग्गुलुनाथवा॥४॥अजमोदादिनावापितैलेनैरंडजे
नवा॥सर्वांगकंपेकुब्जत्वेपक्षाघातेबबाहुके॥५॥गृध्र-
स्यामामवातेचश्लीपदेचापतानके॥अंत्रवृद्धौतथाध्मा-
नेजंघाजानुगतेर्दिते॥६॥शुक्रामयेमेंद्ररोगेवंध्यायो-
न्यामयेषुच॥महारास्नादिगदितोब्रह्मणागर्भकारणं७

अर्थ- रास्ना, दोन भाग आणि धमासा, चिकणा, एरंड, देवदार, कचोरा, वेरवंड, अडूळसा, सुंठ, हिरडा, चवक, नागरमोथा, घेंटोळी, गुळवेल, वरधारा, बडिशेफ, सरांदे, आस्कंद काळें, अतिविष, बाहवा, शतावरी, पिंपळी, कोहांडा, धणे, रिंगणी, डोरली, यांचा काढा, शुंठीचें चूर्ण अथवा पिंपळीचें चूर्ण, अथवा योगराज गुग्गुळ, अथवा ओंव्याचें चूर्ण, अथवा एरंड तेल, यांतून एकाबरोबर प्यावा. हा काढा सर्वांगकंप, कुबडेपणा, पक्षघात, अपबाहुक, गृध्रसी, आमवात, श्लीपद, अपतानक, अंत्रवृद्धि, आध्मान, पोटऱ्या, गुडघे, या ठिकाणचा वायु, अर्दित, शुक्ररोग, मेंद्रवात, वंध्यासंबंधि योनिरोग इतक्यांचे ठायीं प्रशस्त आहे. आणि गर्भ राहण्यास कारण आहे. याला महारास्नादि काढा असें ह्मणतात. हा ब्रह्मदेवांनीं सांगितला आहे. ॥इति महारास्नादिः॥

एरंडबिल्वौबृहतीद्वयंचसौवर्चलव्योषविरामठंच॥स-
न्नातुलिंगीलवणोत्तमंचक्वाथोधनुर्वातहरःप्रशस्तः॥८॥

अर्थ- एरंड, बेल, रिंगणी, डोरली, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, महालुंग, सैंधव यांचा काढा धनुर्वातनाशक आहे. इत्येरंडादिः

विशोध्यैरंडबीजानिपिष्ट्वाक्षीरेविपाचयेत्
तत्सायंसंकटीशूलेगृध्रस्यांपरमौषधम्॥९॥

अर्थ- एरंडाच्या बिया शुद्ध करून, वांटून दुधांत शिजवाव्या. ती खीर कंबरेचा शूल, गृध्रसी, वायु यांचे ठायीं उत्तम औषध आहे.

अभ्रगंधविषव्योषरसटंकान्समांशकान्॥भावयेत्सप्त-
धाभृंगरसेनस्यात्समीरहा १० आर्द्रद्रवेणवल्लीवारवंड्यौषे-
णयोजितः॥महावातान्जयत्याशुनासाध्मातःसुसंज्ञकृत्११॥

अर्थ- अभ्रकभस्म, गंधक, बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, पारा, टांकणखार हींस-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

भांशा घेऊन भाक्याचे रसांत खलून सात भावना द्याव्या. ह्मणजे हा समीरहा रस होतो. तो आल्याचे रसांत वालभर द्यावा. किंवा खडीसारवर, सुंठ, मिरें, पिंपळी यांच्या चूर्णा बरोबर खावा. म्हणजे मोठा वायु जिंकतो. आणि नाकांत फुंकला तर मनुष्यास शुद्धीवर आणतो.

सूतंगंधकचित्रकंत्रिकटुकंमुस्तंविषंत्रैफलंतुल्यांशंविद-
धातुभार्कवरसेकृत्वाचगुंजावटीं॥कुष्ठाष्टादशकंप्रमेह
कफजंवातप्रकोपंक्षयरोगानेककरींद्रदर्पदलनःपंचा
ननोवैद्यराट् १२

अर्थः- पारा, गंधक, चित्रक, सुंठ, मिरें, पिंपळी, नागरमोथा, बचनाग, हिरडा, बेहडा, आंवळकाठी हीं समभाग घेऊन भाक्याच्या रसांत खलून गुंजप्रमाण गोळी अनुपान योजून खावी. म्हणजे अष्टादश कुष्टें, प्रमेह, कफरोग, वातप्रकोप, क्षय इत्यादि अनेक रोग हेच करींद्र याचे गर्वाचा नाश करणारा हा रस सिंहच होईल. आणि केवळ वैद्यश्रेष्ठ असा आहे. ॥ इतिवातगजसिंहः ॥

अत्रक्वाथंघृतंतैलंचूर्णंपाकावलेहिकम्॥व-
टिकागुटिकाप्रोक्तारसास्तन्नात्रलेखितं॥१३

अर्थः- वातव्याधीविषयीं काढे, घृतें, तैलें, चूर्णें, पाक, लेह, वड्या, गोळ्या, आणि रस जे सांगितले आहेत ते सर्व या ग्रंथांत लिहिले नाहींत. यत्किंचित् लिहिले आहेत.

॥वातरोगस्त्वसाध्योयंदैवयोगात्प्रसिद्ध्यति
अनुमानेनकुर्वीतवैद्यकंनप्रतिज्ञया॥१४

अर्थः- वातरोग तर असाध्य आहे. परंतु दैवयोगानें चांगला साध्य होतो. यासाठीं त्यावर उपचार अनुमानानें करावा. प्रतिज्ञेनें करूं नये. इतिवातरोगचिकित्सा

॥अथवातरक्तलक्षणोपचारः॥

जानुजंघोरुकट्यंसहस्तपादांगसंधिषु॥निस्तोदस्फु-
रणंभेदोगुरुत्वंस्फुटिरेवच॥१॥कंडूःसंधिषुरुग्भूत्वा
भूत्वानश्यतिवासकृत्॥वैवर्ण्यंमंडलोत्पत्तिर्वातासृक्
पूर्वलक्षणं२॥

अर्थः- गुडघे, पोटऱ्या, मांड्या, कंबर, खांदे, हात, पाय आणि अंगाचे सांधे यांच्या ठिकाणीं चुसतें स्फुरण फुटणें, जडपणा, बहिरेपणा, कंड आणि सांध्याचे ठायीं वारंवार उणका लागून पुनः बंद व्हावा. आणि विवर्णपणा, मंडळें उ-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सन्न व्हावीं हें वातरक्ताचें पूर्वरूप जाणावें.

उत्तानमवगाढंचद्विविधंवातशोणितम्॥ त्व
ङ्मांसाश्रयमुत्तानंगंभीरंत्वंतराश्रयम्॥३॥

अर्थ:- उत्तान, गंभीर या भेदें करून वातरक्त दोनप्रकारचें आहे. त्वचेच्या मांसाचा आश्रय करून जें असतें तें उत्तान, आणि मेदादिक धातूंचा आश्रय करून जें असतें तें गंभीर असें जाणावें.

पिंडतैलादिनाभ्यंगंपानंतिक्तादिसर्पिषा॥
सेकलेपात्यसृङ्मुक्तिःशोधनंचोभयोर्हितं४

अर्थ:- रक्त्या बोळानें तेल सिद्ध करून त्या तेलानें अभ्यंग करावें. आणि कुटकी इत्यादिकांनी सिद्ध केलेलें तूप याचें पान, पाणी शिंपडणें, लेप लावणें, रक्त काढणें, रेचक, वमन हें दोंहोंवर हितकारक आहे.

समधूच्छिष्टमंजिष्ठसमसर्जरसमाधितम्॥
पिंडतैलादिनाभ्यंगोवातरक्तरुजापहः॥५

अर्थ:- मेण, मंजिष्ठ, राळ याचे तेलानें किंवा रक्त्याबोळाचे तेलानें अभ्यंग करावें. ह्मणजे वातरक्ताची पीडा दूर करील.

वासागुडूचीचतुरंगुलानामेरंडतैलेनपिबेत्कषायम्॥
क्रमेणसर्वांगजमप्यशेषंजयेद्दुरुग्वातभवंविकारम्६

अर्थ:- अडूळसा, गुळवेल, बाहावा यांचा काढा एरंडेल तेला बरोबर प्यालें असतां वातरक्ताचा विकार सर्वांगावर जरी असला तरी क्रमानें दूर करील अ. जा.

मंजिष्ठाकुटजामृताधनवचाशुंठीहरिद्राद्वयंवासापर्पट
सारिवाप्रतिविषानंताविशालाजलम्॥ क्षुद्रारिष्टपटोल
कोष्ठकटुकाभार्ङ्गीविडंगाग्निकंमूर्वादारुकलिंगभृंगमग
धात्रायंतिपाठावरी॥७॥ गायत्रीत्रिफलाकिरातकमहा
निंबोसनारग्वधम् श्यामावल्लजचंदनंसवरुणंपूतीकशा
कोटकम्॥ मंजिष्ठादिमसुंकषायविधिनानित्यंपुमान्यः
पिबेत्त्वग्दोषात्ह्यचिरेणयांतिविलयंकुष्ठानिचाष्टादश ८
वातरक्तेप्रसक्तेचविसर्पेविद्रधौतथा॥ सर्वेषुरक्तदोषेषु
मंजिष्ठादिःप्रशस्यते९॥

अर्थ:- मंजिष्ठ १ कुडा २ गुळवेल ३ नागरमोथा ४ चेरवंड ५ शुंठ ६ हळद ७ दारूहळ-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

द ८ अडूळसा ९ पित्तपापडा १० उपळसरी ११ अतिविष १२ धमासा १३ कडुइंद्रायन १४ वाळा १५ रिंगणी १६ कडुलिंब १७ कडू पडवळ १८ कोष्ठकोलिंजन १९ कुटकी, २० भारंग २१ वावडिंग २२ चित्रक २३ मोरवेल २४ देवदार २५ इंद्रजव २६ माका २७ पिंपळी २८ मेंदी २९ पहाडमूळ ३० शतावरी ३१ रेवेर ३२ हिरडा ३३ बेहडा ३४ आंवळकाठी ३५ काडेकिराइत ३६ बकाणलिंब ३७ असाणा ३८ बहावा ३९ काळें तेड ४० बांवच्या ४१ चंदन ४२ वायवर्णा ४३ करंज ४४ साग ४५ यांचा काढा करून नित्य प्यालें असतां त्वचेचा दोष, अठरा कुष्ठें, वातरक्त, स्फनबेरी, विसर्प, विद्रधि, सर्व रक्तदोष यांचा नाश लोकर करितो. याला मंजिष्ठादि असें म्हणा.

इतिमंजिष्ठादिः

प्रस्थमेकंगुडूच्याश्चसार्धप्रस्थंतुगुग्गुलुः॥ प्रत्येकंत्रिफलायाश्चतत्प्रमाणंविनिर्दिशेत्॥१॥ सर्वमेकत्रसंक्षिप्यक्वाथयेदुल्वणेंभसि॥ पादशेषंपरिश्राव्यकषायंग्राहयेद्भिषक्॥२॥ पुनःपचेत्कषायंवायावत्सांद्रत्वमाप्नुयात्॥ दंतिव्योषविडंगानिगुडूचीत्रिफलात्वचः॥३॥ ततश्चार्धपलंचूर्णंगृण्हीयात्तुप्रतिप्रति॥ चूर्णकर्षंत्रिहृत्तायाःसर्वंतत्रविनिक्षिपेत्४ तस्मिन्स्फसिद्धंविज्ञायकोष्णंपात्रेविनिक्षिपेत्॥ ततश्चाग्निबलंज्ञात्वातस्यमात्रांप्रयोजयेत्५ वातरक्तंतथाकुष्ठंगुदजानग्निसादनं॥ दुष्टव्रणंप्रमेहंचत्र्यामवातंभगंदरं६ नाड्याद्यवातान्सवयथून्सर्वान्वातामयाञ्जयेत्॥ अश्विभ्यांनिर्मितःपूर्वंमाहिष्यारव्यश्चगुग्गुलुः७

अर्थः- ६४ तोळे गुळवेल, ७२ तोळे गुग्गुळ, ६४ तोळे हिरडा, ६४ तो० बेहडा, ६४ तो० आंवळकाठी हीं एकत्र करून पुष्कळ पाण्यांत कढवावीं. चतुर्थांश पाणी उरलें म्हणजे गाळून घेऊन पुनः तो काढा दाट होई तों पर्यंत आटवावा. आणि त्यांत दांतिमूळ २ संठ २ मिरें २ पिंपळी २ वावडिंग २ गूळ २ वेल २ हिरडा २ बेहडा २ आंवळकाठी २ दालचिनी २ तोळे हीं दोन दोन तोळे आणि तेड एक तोळा घेऊन चूर्ण करून टाकावें. आणि ढवळून चांगलें शिजलें म्हणजे किंचित् उष्ण असतानांच भांड्यांत भरून ठेवावें. नंतर अग्निबळपाहून मात्रा द्यावी. म्हणजे वातरक्त, कुष्ठ, मुळव्याध, अग्निमांद्य, दुष्टव्रण, प्रमेह, आमवात, भगंदर, नाडीवात, सूज, संपूर्ण वातरोग यांस जिंकील.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

याला माहिष गुग्गुळ असें ह्मणतात. हा अश्विनी कुमारांनीं निर्माण केला आहे. इति माहिष गुग्गुलुः

पटोलीत्रिफलातिक्ता गुडूचीचशतावरी ॥
एष क्वाथोजयेत्पीतो वातास्रं दाहसंयुतं १

अर्थः- कडू पडवळ, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, कुटकी, गुळवेल, शतावरी यांचा काढा प्यालें असतां दाह युक्त वातरक्त जिंकीत. इति पटोलादिकषायः

क्वाथोवासामृतातिक्ताभवोवातास्रनोदनः

अर्थः- अडूळसा गुळवेल कुटकी यांचा काढा वातरक्तनाशक आहे. वासा०

नवमाहिषलोचनोदरसंन्निभवर्णस्यगुग्गुलोः प्रस्थम्
प्रक्षिप्यतोयराशौत्रिफलामसृतांयथोक्तपरिमाणां १
संसाधयेत्प्रयत्नाद्दूर्व्यासंघट्टयेच्चतद्यावत् ॥ अर्धक्षपितंजातंतोयंज्वलनस्यसंसर्गात् ॥२॥ अवतार्यवस्त्रपूतंपुनरपिसंसाधयेदापः ॥ सांद्रीभूतेतस्मिन्नवतार्यहिमोपमंस्पर्शम् ॥३॥ पथ्याचूर्णंहिपलंत्रिकटुकचूर्णंषडक्षपरिमाणम् ॥ कृमिरिपुचूर्णार्धपलंकर्षंकर्षंत्रिवृद्दंत्योः ॥४॥ पलमेकंछिन्नरुहांदलासंचूर्ण्ययत्नेन ॥ संस्थापयेच्चगुप्तंस्निग्धेभांडेघृतेनसुरभीणां ॥५
आदायतस्यमात्रांविहितातिथिदेवताप्रणतिः ॥ रवादेर्द्यथाग्निमनुजोव्याधिबलापेक्षयासम्यक् ॥६॥ इच्छाहारोभेषजकालश्चसर्वएवात्र ॥ तनुरोधिवातशोणितमेकहिश्चुल्वणंचिरोत्थमपि ॥७॥ भग्नस्तृतिंपरिशष्कंस्फुटितमपिनिहंतियत्नेन ॥ व्रणकासकुष्ठगुल्मश्वयथूदरपांडुरोगमेदांसि ॥८॥ मंदाग्निलघिबंधंप्रमेहदोषांश्चनाशयति ॥ सततंनिषेव्यमाणः कालेननिहंतिरोगगणम् ॥ अभिभूयजरादोषंकरोतिकैशोरकंरूपम् ॥९

अर्थः- नवीन उत्पन्न झालेला रोणगा त्याच्या डोळ्यांच्या पोटा प्रमाणें ज्याचा रंग असेल असा ह्मणजे कैरा गुग्गुळ ६४ तोळे, गुळवेल ६४ तोळे, हिरडा ६४ तोळे, बेहेडा ६४ तोळे, आंवळकाठी ६४ तो० घेऊन पाण्यांत टाकून कढवावें. अर्धें पाणी आटे तों पर्यंत पळीनें ढवळावें, नंतर उतरून गाळून घ्यावें. आणि पु-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

नः कदन ठेवावें दाट झालें ह्मणजे उतरून थंड झाल्यावर त्यांत चूर्णें टाकावीं. तीं हिरडा आठ तोळे, सुंठ २ तो०, मिरें २ तो०, पिंपळी २ तो०, वावडिंग ४ तोळे, तेड एक तोळा, दांतिमूळ एक तोळा गुळवेल आठ तोळे या प्रमाणें टाकून फारवेळ मर्दन करावें, सर्वांचा एकजीव होईतों पर्यंत कालवावें. नंतर गायीच्या तुपानें राबलेलें असें मडकें घेऊन त्यांत भरून तोंड बांधून ठेवावें. नंतर देवता, अतिथी यांची पूजा नमस्कार करून आपलें अग्निबळ, व्याधिबळ पाहून मात्रा रवावी. इच्छे प्रमाणें आहार करावा. पाहिजे त्या वेळेस औषध घ्यावें. हें औषध शरीर व्यापणारें असें वातरक्त एकाधिक दोषाचें किंवा दोन तीन दोषज्यांत अधिक आहेत असें फार दिवसांचें, स्राव बंद झालेलें, शुष्क, फुटलेलें भशा वातरक्ताचें नाशक आणि व्रण, कास, गुल्म, कुष्ठ, सूज, उदर, पांडुरोग, मेद, मंदाग्नि, पोट फुगणें, प्रमेह यांचें नाशक आणि सतत सेवन केलें असतां काळें करून सर्व रोगांचा नाश करिते. आणि जरा दूर करून तारुण्य आणितें.॥७

इतिकैशोरकगुग्गुलुः

मंजिष्ठात्रिफलातिक्तावचादारुनिशामृता
निंबश्चैषांकृतःक्वाथोवातरक्तविनाशनः॥
पामाकपालिकाकुष्ठरक्तमंडलजिन्मतः १॥

अर्थः- मंजिष्ठ, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, कुटकी, वेरवंड, दारुहळद, गुळवेल, कडूलिंब यांचा काढा वातरक्त, खरूज, कपालिका, कुष्ठ, रक्तमंडळ यांचा नाशक आहे.॥इतिलघुमंजिष्ठादिः॥

पारदंचक्रियाशुद्धंतत्तुल्यंशुद्धगंधकं॥ अभ्रकंतुद्वयोस्तुल्यंत्रिभिस्तुल्यंतुगुग्गुलुम्॥१॥ सर्वांशाममृतासत्वंभावयेदौषधैःपृथक्॥ निर्गुंडीगोक्षुरच्छिन्नाकोकिलाख्यांघ्रिजैरसैः॥२॥ सप्तवारंततोयुंज्यात्वातरक्ते त्रिवल्लकं॥ कोकिलाख्यस्यमूलानांपानीयमनुपाययेत्३

॥ ३ ॥

अर्थः- पारा शुद्ध गंधक समभाग दोघांच्या बरोबर अभ्रक भस्म तिघांचे बरोबर गुग्गुळ ४ सर्वांचे बरोबर गुळवेलीचें सत्व, ८ हीं एकत्र करून निर्गुंडी, गोखरू, गुळवेल, कांकोलीचे मूळ यांच्या काढ्याच्या ७ भावना द्याव्या. नंतर वातरक्तरोगावर ३ वाल प्रमाणें खावा. वर कांकोलीचे मुळांचा काढा अनुपानास घ्यावा.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥मंदमप्यसाध्यंज्ञेयं॥

अर्थः- हें वातरक्त अल्प जरी असलें तरी असाध्य जाणावें. इतिवातरक्तचि॰

॥अथोरुस्तंभलक्षणोपचारः॥

यदाकफान्वितेनोरूस्तब्धौशीतावचेतनौ॥ संयुक्तौपादसदनकृच्छ्रोद्धरणासहिभिः॥ तमूरुस्तंभमित्याहुराढ्यवातमथापरे॥१॥

अर्थः- जेव्हां कफयुक्त वायूनें मांड्या स्तब्ध आणि त्यांनां जीव नाहींसा होतो आणि मांड्या बारीक, संकटानें उचलणें, स्पर्श न कळणें अशा होतात तेव्हां त्या वायूला ऊरुस्तंभ किंवा आढ्यवात असें ह्मणतात.॥ ७

॥भल्लातकामृताशुंठीदारुपथ्यापुनर्नवा॥
॥पंचमूलीद्वयंमिश्रमूरुस्तंभनिबर्हणम्२॥

अर्थः- बिब्बा, गुळवेल, सुंठ, देवदार, हिरडा, पेंरोळी, दशमुळें यांचा काढा ऊरुस्तंभाचा नाशक आहे.

॥पिप्पलीपिप्पलीमूलंभल्लातकफलानिच॥
॥कल्कंमधुयुतंपीत्वाऊरुस्तंभात्प्रमुच्यते३॥

अर्थः- पिंपळी, पिंपळमूळ, बिब्बे यांची कुटून गोळी करून मधाबरोबर खावी. ह्मणजे ऊरुस्तंभा पासून मुक्त होतो.

॥क्षौद्रंसर्षपवल्मीकमृत्तिकासंयुतंभिषक्॥
॥गाढंमृत्प्रादनंकुर्याद्ऊरुस्तंभेप्रलेपनम्४॥

अर्थः- मध, शिरस, वारुळाची माती एकत्र वांटून दाट लेप करावा. हा ऊरुस्तंभ-नाशक आहे.

॥यत्स्यात्कफप्रशमनंनचमारुतकोपनम्॥
॥तत्सर्वंसर्वदाकार्यमूरुस्तंभस्यभेषजं५

अर्थः- जें कफशामक आणि वायु कुपित न करणारें तें औषध ऊरुस्तंभावर नेहेमीं करावें.

पलमर्धपलंवापिरसोनस्यसकुट्टितम्॥ हिंगुजीरकसिंधूत्थंसौवर्चलकटुत्रिकम्॥६॥ एभिःसंचूर्णितैःसर्वैस्तैलेनसंयुतम्॥ यथाग्निभक्षयेत्प्राज्ञोरुबुद्ध्याद्यानुपानतः॥७॥ मासमेकंप्रयोगेणसर्वान्वातामया-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

नूजयेत्॥ एकांगसर्वांगगतमूरुस्तंभंचगृध्रसीम्॥८
कटिपृष्ठास्थिसंधिस्थमर्दितंचापतंत्रकम्॥ ज्वरंधा-
तुगतंजीर्णंनित्यंशैत्यंकरांघ्रिजं९॥

अर्थ- कुटलेला लसूण, हिंग, जिरें, सैंधव, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, यांचें चूर्ण मिळून ४ तोळे किंवा दोन तोळे घेऊन त्याच्या बरोबर एरंडेल घेऊन जसें अग्निबळ असेल त्या प्रमाणें प्यावें. नंतर एरंडमुळाचा काढा प्यावा. या प्रमाणें महिनाभर केलें असतां संपूर्ण वातरोग जिंकील. आणि एकांगवात, सर्वांगवात, ऊरुस्तंभ, गृध्रसी, कटिपृष्ठ, अस्थि-संधि, या ठिकाणचावायु अर्दित, अपतंत्रक हे वायु धातुगत ज्वर, जीर्णज्वर, हाता पायांचें शैत्य इतक्यांचा नाश करील. इति लशून प्रयोगः॥

॥पुनर्नवानागरदारुपथ्याभल्लातकच्छिन्नरुहांकषायः॥
॥दशांघ्रिमिश्रः परिपेयऊरुस्तंभेयवामूत्रपुरःप्रयोगः॥१

अर्थ- घेंरोळी, सुंठ, देवदार, हिरडा, बिब्बा, गुळवेल, दशमूळें, यांचा काढा करून ऊरुस्तंभावर प्यावा. अथवा गोमूत्रांत गुग्गुळ घालून प्यावा. पुनर्नवा०क्वा०

॥शिलाजतुगुग्गुलुंवापिप्पलीमथनागरम्॥
॥ऊरुस्तंभेपिबेन्मूत्रैर्दशमूलीजलेनवा॥२॥

अर्थ- शिलाजित अथवा गुग्गुळ किंवा पिंपळी अथवा सुंठ गोमूत्रा बरोबर किंवा दशमुळांचे काढ्या बरोबर प्यावें. ह्मणजे ऊरुस्तंभाचा नाश होतो.

निष्कत्रयंशुद्धसूतंनिष्कद्वादशगंधकम्॥ गुंजाबीजंविषंनिंबबीजंचविजयातथा॥३॥ प्रत्येकंनिष्कमात्रंतुमाषंजेपालबीजकम्॥ जातीजंबीरधत्तूरकाकमाचीद्रवैर्दिनम्॥४॥ मर्द्यंसर्वंवटींकुर्यात्घृतैर्गुंजाद्वयंपिबेत्॥ गुंजागर्भोरसोनामहिंगुसैंधवसंयुतः॥ समंडंदापयेत्पथ्यमूरुस्तंभप्रशांतये॥५॥६॥

अर्थ- पारा १तोळा. गंधक ४ तो० गुंजा, बचनाग, लिंबोळ्या, मांगा प्रत्येक तीन तीन मासे प्रमाणें आणि जेपाळ १मासा हीं एकत्र करून जाई, लिंबु, धोत्रा, कांग यांच्या रसांत एक एक दिवस खलावें. नंतर वडी करून ठेवावी. दोन गुंजा प्रमाणें तूप, हिंग, सैंधव यांच्या बरोबर सेवन केली असतां ऊरुस्तंभ शांत करील. याला मंड आणि भात हें पथ्य आहे. याला गुंजागर्भर-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

स असें ह्मणतात. इति गुंजा गार्भरसः इत्यूरुस्तंभचिकित्सा ॥ ७ ॥

॥ अथामवातलक्षणोपचारः ॥

अंगमर्दोऽरुचिस्तृष्णा आलस्यं गौरवं ज्वरः अ-
पाकः शूनतांगानामामवातस्य लक्षणम् ॥ १ ॥

अर्थ:- आंग मोडून येणें, अरुचि, तृषा, आळस, जडपणा, ज्वर, अपाचन आणि अंगाला सुजीरपणा, हीं आमवाताचीं लक्षणें जाणावीं.

हस्तपादशिरोगुल्फत्रिकजानूरुसंधिषु ॥ क-
रोति सरुजं शोफं व्याविद्धूदवृश्चिकैः ॥ २ ॥

अर्थ:- हात, पाय, डोकें, पायांचे घोंटे, माकड हाड, गुडघे, मांड्या यांचे सांधे यांचे ठायीं विंचू डसल्या प्रमाणें पीडा आणि सूज करतो.

जठरं गर्जति यस्य गुल्मवत्परिपीडितम् ॥ क-
टीपृष्ठजडत्वं च त्वामो गुल्माभिशंकितः ॥ ३ ॥

अर्थ:- गुल्मानें जशी पीडा होते त्या प्रमाणें पीडा आणि पोटांत गुरगुरतें कंबर पोट यांचे ठिकाणीं जडपणा असें झाल्या मुळे आमवायूवर गुल्माची शंका होते.

कटीपृष्ठे वक्षदेशे तोदनं बस्तिशूलता ॥ गु-
ल्मवज्जठरं गर्जेत्तथांतेशोफ एव च ॥ ४ ॥

अर्थ:- कंबर, पाठ, ऊर या ठिकाणीं टोंचल्या प्रमाणें पीडा, ओंटी पोटांत शूल, गुल्माप्रमाणें पोटांत गुरगुरणें, सूज अशीं लक्षणें होतात असें समजावें.

रास्नामृतारग्वधदेवदारुत्रिकंटकैरंडपुनर्नवानाम् ॥ क्वा-
थं पिबेन्नागरचूर्णमिश्रं जंघोरुपृष्ठत्रिकपार्श्वशूली ५

अर्थ:- रास्ना, गुळवेल, बाहवा, देवदार, गोखरू, एरंड, घेंटोळी यांचा काढा सुंठीचें चूर्ण घालून प्यालें असतां पोटऱ्या, मांड्या, पाठ, माकड हाड, कुशी या ठिकाणचा शूल राहतो.

शुंठीगोक्षुरकक्वाथः प्रातः प्रातर्निषेवितः ॥
आमवातं कटीशूलं पाचनो रुक्प्रणाशनः ६

अर्थ:- सुंठ आणि गोखरू यांचा काढा नित्य सेवन केला असतां आमवात, कटीशूल यांचा नाशक, पाचक आणि पीडानाशक आहे.

मणिमंथस्य भागौ द्वौ यवक्षारश्च तत्समः ॥ तथा ज-
मोदभागश्च नागराद्भाग पंचकम् ॥ ७ ॥ दशचैव हरी
तक्याः सूक्ष्मचूर्णकृतं शुभम् ॥ मस्त्वारनालमूत्रैश्च

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सुरयोष्णोदकेनवा॥पीतंजयेदामवातंगुल्महृद्वस्तिजा-
न्गदान्॥प्लीहानमथशूलादीनानाहंचार्शसांहितम्॥वा-
तानुलोमनमिदंचूर्णंवैश्वानरंस्मृतम्॥९॥

अर्थ- सैंधव दोन भाग, जवखार दोन भाग, ओंवा दोन भाग, सुंठ पांच भाग, हिरडा दहा भाग, यांचें चूर्ण बारीक करून दत्ध्यांत मंड, कांजी, गोमूत्र, मद्य, उष्णोदक यांचून एका बरोबर घ्यावें ह्मणजे आमवात, गुल्मरुद्रोग, बस्तींतले रोग पांथरी शूल, आनाह, मुळव्याध यांचा नाश करितें. आणिवातला अनुलोमन करतें. याला वैश्वानरचूर्ण असें ह्मणतात.

हिंगुचव्यंबिडंशुंठीकृष्णाजाजीसपुष्करम्
भागोत्तरमिदंचूर्णंपीतंवातामजिद्भवेत्॥१०

अर्थ- हिंग १ चवक २ बिडलोण ३ सुंठ ४ पिंपळी ५ जिरें ६ आणि पुष्करमूळ ७ यांचें चूर्ण भागोत्तर ह्मणजे हिंगा पेक्षां चवक दुप्पट त्याच्या पुढचें बिडलोण तें एका भागानें जास्त अशा क्रमानें घेऊन चूर्ण तयार करावें. तें पाण्याबरोबर घ्यावें. म्हणजे आमवाताचानाश होईल.

शुंठीकल्कंविनिष्पिष्यरसेरेरंडमूलजैः॥विपचेत्पुट
पाकेनतद्रसःक्षौद्रसंयुतः॥आमवातसमुद्भूतांपीडांज
यतिदुस्तराम्॥११॥

अर्थ- सुंठीचें चूर्ण एरंडमुळाचे रसांत खलून पुटपाकानें पक्क करून मधाबरोबर खावें. म्हणजे आमवाताची पीडा दुस्तर असली तरी जिंकील. अ. जा.

॥विलासिनीविलासेनविलासिहृदयंयथा
तथागुडूचीविश्वेनहरेदामसमीरणम्॥१२

अर्थ- विलासिनी स्त्रीच्या विलासें करून विलासी पुरुषाचे अंतःकरणाचें जसें हरण होतें तसें गुळवेल आणि सुंठ यांच्या काढ्यानें किंवा चूर्णानें आमवाताचें हरण होतें.

कर्षंनागरचूर्णस्यकांजिकेनपिबेत्सदा॥आ-
मवातप्रशमनंकफवातविनाशनम्॥१३॥

अर्थ- सुंठीचें चूर्ण दहा मासे नित्य कांजी बरोबर घ्यावें ह्मणजे आमवात, कफवात यांचा नाश करील.

॥पंचकोलकचूर्णंचपिबेदुष्णेनवारिणा॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

मंदाग्निशूलगुल्मामकफारोचकनाशनं॥१४॥

अर्थ- सुंठ मिरें पिंपळी चवक चित्रक यांचे चूर्ण ऊन पाण्या बरोबर प्यालें असतां मंदाग्नि शूल गुल्म आम कफ अरोचक यांचा नाश करील.॥

त्रिफलानागरंचैवसूक्ष्मचूर्णानिकारयेत्॥ मस्त्वार-
नालतक्रेणपेयामांसरसेनवा॥ आमवातंनिहंत्याशु
श्वयथुंसंधिसंस्थितं॥१५॥

अर्थ- हिरडा बेहडा आंवळकाठी सुंठ यांचें चूर्ण करून दह्यांचा मंड कांजी तक्र पेया मांस रस यांतून एका बरोबर प्यालें असतां आमवात संधिगत सूज यांचा नाश लवकर करील.

प्रक्षिप्यगंधंरसपादभागंकलाप्रमाणंचविषंसमस्ता-
त्॥ कृशानुतोयेनचभावयित्वावल्लुंदद्दीतास्यमरुत्प्र-
शांत्यै॥१६॥ अपस्मारेतथोन्मादेसर्वांगव्यथितेपिच
एकांगवातेसामेवादंष्ट्राबंधेहिमेतथा॥ देयोयंवल्लुमा-
त्रंतुसर्ववातनिवृत्तये॥१७॥

अर्थ- पारा ४ भाग गंधक १ भाग आणि सर्वांचे षोडशांश १/१६ बचनाग घेऊन चित्रकाच्या काढ्यांत खलून वाला प्रमाणें वातशमनार्थ द्यावा. याला वातविध्वंसन रस ह्मणतात. अपस्मार उन्माद सर्वांगव्यथा एकांगवात आमवात हनुस्तंभ हींच इत्यादिक सर्व वायु दूर होण्या करितां वाल प्रमा द्यावा.

इतिवातविध्वंसनः॥

अथशूललक्षणोपचारः॥

वायुःप्रवृद्धोजनयेद्धिशूलंहृत्पार्श्वपृष्ठत्रिकबस्तिदेशे॥१॥

अर्थ- वायु वाढला ह्मणजे हृदय कुक्षि पाठ माकड हाड ओंटी पोट यांचे ठिकाणीं तिडीक उत्पन्न करितो त्याला शूल असें ह्मणतात.

॥वेदनाच तृषा मूर्च्छा ध्यानाहोगौरवारतीः॥ का-
सश्वासौचहिक्काचशूलस्योपद्रवाःस्मृताः॥२॥

अर्थ- वेदना तृषा मूर्च्छा आनाह जडपणा अरति कास श्वास हिक्का इतके शूलाचे उपद्रव सांगितले आहेत.

॥भुक्तेजीर्यतियच्छूलंतदेवपरिणामजम्॥ ७॥

अर्थ- भोजनोत्तर अन्न जिरूं लागलें असतां जो शूल होतो तोच परिणामशूल जाणा

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

आध्मानाटोपविण्मूत्रविबंधारतिवेदनैः॥ स्नि-
ग्धोपशमनंप्रायःपैत्तिकंलक्षयेद्बुधः॥३॥७॥

अर्थ:- पोट फुगणें, जीव गुंडाळून येणें, मलमूत्रांचा प्रतिबंध, अस्वास्थ्य, वेदना, प्रायः स्निग्ध उपचारांनीं शमन अशा लक्षणांनीं पित्तमूल जाणावा.

आनाहगौरवे छर्दिस्तृष्णाज्वरभ्रमोरुचिः॥ कृ-
शत्वंबलहानिश्चवेदनातिप्रवर्त्तनम्॥ उपद्रवा
दशैवैतेयस्यशूलस्यनास्तिसः॥४॥

अर्थ:- मलबद्धरोग, जाड्य, छर्दी, तृषा, ज्वर, भ्रम, अरुचि, कृशपणा, दुर्बलपणा, अतिवेदना हे १० उपद्रव ज्याचे शूलास आहेत तो मनुष्य नाहीं असें जाणा.

एरंडबिल्वबृहतीद्वयमातुलिंगपाषाणभिन्निकटुमूलकृतः
कषायः॥ सक्षारहिंगुलवणोरुबुतैलमिश्रःश्रोण्यूरुमेढ्र
हृदयस्तनरुक्क्षपेयः५॥

अर्थ:- एरंड, बेल, डोरली, रिंगणी, महाकुंग यांचीं मुळें पाषाणभेद, लकड्या, सुंठ, मिरें, पिंपळी यांचा काढा जवखार, हिंग, सैंधव, एरंडेल तेल याणीं मिश्र कंबर, मांड्या, शिश्न व हृदय स्तन इतक्या ठिकाणच्या शूलावर प्यावा.

त्रिफलाक्वाथगोमूत्रक्षौद्रक्षीररसैःपृथक्॥ ए-
रंडतैलद्विगुणैर्हितःशूलनिवारणे॥६॥७॥

अर्थ:- हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचा काढा गोमूत्र, मध दूध यांतून कोणता एक पदार्थ एक भाग आणि एरंडेल तेल दोन भाग एकत्र करून प्यालें असतां शूल निवारण होतो.

शंबूकभूषणंचैवपंचैवलवणानिच॥ समांशैर्गुटिकांकृ-
त्वाकलंबुकरसेनवा॥७॥ प्रातर्भोजनकालेवाभक्षयेत्तु
यथाबलम्॥ शूलाद्विमुच्यतेजंतुःसहसापरिणामजात्८

अर्थ:- लहान शंखाचें भस्म, मिरें, मीठ, टांकणखार, सैंधव, बिडलोण, पादेलोण, हीं समांश घेऊन कलंबुक म्हणजे कलंबा म्हणजे कुलूम काचरी तिचे रसांत गोळ्या करून प्रातःकाळीं किंवा भोजनसमयीं शक्तीप्रमाणें खाव्या. म्हणजे परिणामशूल पासून मुक्त होईल.

॥वमनंलंघनंस्वेदःपाचनंफलवर्त्तयः॥ क्षारश्चू-
र्णानिगुटिकाःशस्यंतेशूलनाशनाः॥९॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- वमन, लंघन, घाम काढणें, पाचन, फलवर्ती म्हणजे मलशोधन करण्या विषयीं गुदांत घालण्याची वात ती, क्षार चूर्णें, गोळ्या इतकीं शूलनाशक आहे.

॥शतावरीसयष्ट्याह्वाद्याल कुशगोक्षुरैः॥
शृतशीतंपिबेन्नोयंसगुडक्षौद्रशर्करम्॥ पि-
त्तास्रकृद्दाहशूलघ्नंसद्योदाहरुजापहम्॥११॥

अर्थ- शतावरी, ज्येष्ठमध, लघुचिकणा, दर्भमूळ, गोखरू, यांचा काढा करून थंड झाल्यावर गूळ किंवा साखर व मध घालून प्यावा. म्हणजे पित्तरक्त, दाह, शूल यांचा नाश करील. आणि दाह तात्काळ शमवील.

मदनस्यफलंतिक्तांपिष्ट्वाकल्कंचवारिणा॥
कोष्णंकुर्यान्नाभिलेपंशूलशांतिर्भवेत्ततः॥११

अर्थ- गेळफळ, कुटकी पाण्यांत वांटून किंचित् ऊन लेप बेंबीवर करावा तेणें करून शूल शमन होईल.

त्रिफलारिष्टयष्ट्याह्वकटुकारग्वधैःशृतम्॥
पाययेन्मधुनामिश्रंदाहशूलोपशांतये॥१२॥

अर्थ- हिरडा, बेहडा, आंवळकाठी, कडूलिंब, ज्येष्ठमध, कुटकी आणि बहावा यांचा काढा मधानें मिश्रित शूल आणि दाह यांच्या शांतीसाठीं प्यावा.॥

एकएवकुबेराक्षोहंतिशूलशतत्रयम्॥ किं-
पुनर्लशुनोपेतःसैंधवेनचहिंगुना॥१३॥

अर्थ- एकच सागरगोटा तीनशें शूलांचा नाश करील, मग लसून सैंधव व हिंग यांच्याशीं युक्त सेवन केला तर मग काय सांगावयाचें आहे?

नागरैरंडयोःक्वाथःक्वाथइंद्रयवस्यवा॥ हिं-
गुसौवर्चलोपेतोवातशूलनिवारणः॥१४॥

अर्थ- सुंठ, एरंडमूळ, यांचा अथवा इंद्रजव यांचा काढा, हिंग, पादेलोण यांणीं मिश्रित वातशूलाचा निवारक आहे.

॥शतावर्यश्चमधुनायुक्तःशूलहरोरसः॥

अर्थ- शतावरीचा रस मधाशीं युक्त असा शूलहारक आहे असें जाणावें.

हिंगुग्रंथिकधान्यकाग्निकवचाचव्याग्निपाठासटी
क्षाम्लंलवणत्रयंत्रिकटुकंक्षारद्वयंदाडिमम्॥ पथ्या-
पुष्करवेतसाम्लहपुषाजाज्याज्यगंधैःकृतंचूर्णंभावित

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

मेनदार्द्रकरसेस्याद्बीजपूरस्यवा॥१५॥ आध्मानग्रहणी विकारगरदजान्गुल्मानुदावर्त्तकान्वाताध्मानगरोद-राश्मरिरुजस्तूनिहृद्यारोचकान्॥ ऊरुस्तंभमतिभ्रमं-चमनसोबाधिर्यमष्ठीलिकंप्रत्यष्ठीलिकश्वासकासम-पह्नत्तसीतमुष्णांबुना॥१६॥ हृत्कुक्षिवंक्षणकटीजठरां तरेषुबस्तिस्तनांसफलकेषुचपार्श्वयोश्च॥ शूलानिना-शयतिवातबलासजानिहिंग्वाद्यमाद्यमिदमश्विनिसंहि तायाम्॥१७॥

अर्थः- हिंग, पिंपळमूळ, धणे, चित्रक, वेरवंड, चवक, बिब्बा, पहाडमूळ, कचोरा, चिंच, सैंधव, बिडलोण, बांगडखार, सुंठ, मिरें, पिंपळी, सज्जीखार, जवखार, डाळिंबसाळ, हिरडा, पोखरमूळ, आम्लवेतस, शेरणी, जिरें, रानतुळस, यांच्याचूर्णास आल्याचे रसाची, किंवा महाळुंगाचे रसाची भावना द्यावी. आणि ऊन पाण्याबरोबर खावे. तेणें करून आध्मान, संग्रहणी, मुळव्याध, गुल्म, उदावर्त्त, वाताध्मान, विष, उदर, मूत्रकृच्छ्र, तूनि, प्रतूनि, अरुचि, ऊरुस्तंभ, मतिभ्रम, अंतःकरणाचा भ्रम, बाधिर्य, अष्ठीलिका, प्रत्यष्ठीलिका, श्वास, कास, हृदय, कुक्षी, वंक्षण, कंबर, पोट, ओंटी, पोट, स्तन, खांदा, बरगड्या, इतक्या ठिकाणचा शूल वायूचा किंवा कफाचा असला तर त्याचा नाश होतो. याला हिंग्वादिचूर्ण असें म्हणतात. हें प्राचीन असून अश्विनीकुमारांनीं सांगितलें आहे॥

इतिहिंग्वादिचूर्णम्

चिंचाक्षारंपंचपलंलवणानिपलंपलम्॥ संचूर्ण्यनिक्षि-पेत्पस्थद्वयेजंबीरवारिणि॥१॥ शंखंदशपलंतस्मानिक्षि-पेत्सप्तवारतः॥ तत्समस्तंविशोष्याथहिंगुव्योषंचतुष्पलं॥२॥ बलीसूनविषाभागैःपलार्धंश्चपृथक्पृथक्॥ एत-त्समस्तंसंमर्द्यजंबीराम्लेदिनत्रयं॥ ३॥ बदरास्थिप्रमा-णेनवटिकांकारयेद्बुधः॥ एकैकांभक्षयेत्प्रातः कोष्णतो यंपिबेदनु॥४॥ सर्वशूलंहरेदुल्वमजीर्णंपरिणामज मू॥ अतीसारगदंहन्याद्ग्रहणींचविशेषतः॥ ५॥६॥

अर्थः- चिंचेखार २५ तोळे, मीठ ४ तोळे, सैंधव ४ तोळे, पादेलोण ४ तोळे, बिडलोण ४ तोळे, टांकणखार ४ तोळे यांचें चूर्ण १२८ तोळे लिंबाचे रसांत

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

टाकून नंतर ४० तोळे शंख तापवून त्या रसांत विझवावें. या प्रमाणें सातवेळ विझवून शुष्क करून त्यांत शंखाचें चूर्ण आणि हिंग चार तोळे, सुंठ ४ तोळे, मिरें चार तोळे, पिंपळी ४ तोळे, गंधक २ तोळे, पारा २ तोळे, वचनाग २ तोळे टाकून सर्वांचा लिंबाच्या रसांत तीन दिवस खल करून बोराचे आंठी प्रमाणें गोळ्या कराव्या आणि एक एक गोळी प्रातःकाळीं भक्षण करावी. वरती ऊन पाणी प्यावें. तेणें करून सर्व शूल, गुल्म, अजीर्ण, परिणाम शूल, अतिसार, संग्रहणी यांचा नाश होईल.

गोमूत्रसिद्धं मंडूरं त्रिफलाचूर्णसंयुतम् ॥
विलिह्य मधुसर्पिर्भ्यां शूलं हंति त्रिदोषजं ६

अर्थ:- गोमूत्रानें सिद्ध केलेला मंडूर, हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांच्या चूर्णासहित मध तूप यांच्या बरोबर खावा. तेणें करून त्रिदोषाचे शूलाचा नाश होतो.

हिंग्वक्षार्द्रकुबेराक्षाबृहद्वाः शूलं बुनाशकरवाः ॥
गुडाभयं वासघृतोरसोनः शूलनुत्परः ॥ ७ ॥

अर्थ:- हिंग १ बेहेडा २ सुंठ ३ सागरगोटा ४ या प्रमाणें भाग घेऊन चूर्ण करून ऊन पाण्या बरोबर प्यावें. तेणें करून शूल शमतो. गूळ, हिरडा आणि तूप, लसूण हे दोन योग शूलनाशक आहेत.

पक्तिशूलं जयत्याशु गुडार्द्रतिलमोदकः ॥ हिं-
ग्वाभयं वचा वेल्लं पीतमुष्णांबुना जयेत् ॥ आ-
नाहशूलहृद्रोगविषूचीगुल्ममारुतान् ॥ ८ ॥

अर्थ:- गूळ, आलें, तीळ यांचा मोदक परिणामशूलाचा नाशक आहे. हिंग हिरडा, वेरवंड, वावडिंग यांचें चूर्ण ऊन पाण्या बरोबर प्यावें. तेणें करून आनाह शूल हृद्रोग, विषूची, गुल्मवायु यांचा नाश होतो.

अथामशूले.

एरंडतैलं षड्भागं लशुनस्य तथाष्टकम् ॥ एकं हिंगु त्रिसिंधूत्थं सर्वमेकत्र मर्दयेत् ॥ त्रिनिष्कं भक्षयेत्पश्चादामशूलप्रशांतये ॥ १ ॥

अर्थ:- एरंडतेल ६ लसूण ८ हिंग १ सैंधव ३ या प्रमाणें भाग घेऊन एकत्र मर्दून करून एक तोळा प्रमाणें खावें म्हणजे आमशूल शांत होतो असें जाणावें.

शुद्धसूतं द्विभागं धं यामेकं मर्दयेद्दृढं ॥ द्वयोस्तुल्यं शुद्ध-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ताम्रसंपुटेतन्निरोधयेत्॥२॥ अधोर्ध्वलवणंदत्वामृद्भांडे धारयेद्भिषक्॥रुध्वागजपुटेपाच्यंस्वांगशीतंसमुद्धरेत्३ संपुटंचूर्णयेत्सम्यक्पर्णखंडैर्द्विगुंजकम्॥भक्षयेत्सर्वमूलार्तोहिंगुशुंठीसजीरकम्॥४॥वचामरिचजंचूर्णंकर्षंचोष्णांजलैःपिबेत्॥असाध्यंसाधयेच्छूलंरसोयंशूलकेसरी॥५

अर्थ- शुद्ध पारा १ शुद्ध गंधक २असे भाग घेऊन एक प्रहरभर चांगलें खलून त्याची कज्जली करावी. नंतर दोघांचे बरोबर शुद्ध तांब्याचे पत्रे घेऊन त्याचा संपुट करावा. नंतर त्यांत ती कज्जली भरून तो संपुट मडक्यांत खालीं वर मीठ घालून मध्यें ठेवावा. मडक्याचें तोंड बंद करून गजपूट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर त्या संपुटा सुद्धां बारीक खलून विड्याचे पानांबरोबर दोन गुंजा प्रमाणें खावें. नंतर हिंग, सुंठ, जिरें, वेखंड, मिरें यांचें चूर्ण दाहा मासे ऊन पाण्या बरोबर खावें म्हणजे असाध्य जरी शूल असला तरी शांत होईल. याला शूलकेसरिरस असें म्हणतात. इति शूल केसरिरसः॥७॥ ७॥

व्यायामंमैथुनंमद्यंलवणंकटुकानिच॥ वेग
रोधंदिवास्वप्नंवर्जयेच्छूलवान्नरः॥१॥ ७॥

अर्थ- व्यायाम, मैथुन, मद्य, खारट, तिखट, वेगरोध आणि दिवानिद्रा इतकीं शूलवान्मनुष्यानें वर्ज करावीं. इति शूलचिकित्सा.

अथानाहोदावर्तलक्षणोपचारः

बस्तिमेहनयोःशूलंमूत्रकृच्छ्रशिरोरुजः॥
विषमोवंक्षणानाहःस्याल्लिंगंमूत्रनिग्रहात्१

अर्थ- बस्ति, लिंग, यांच्या ठिकाणीं शूल, मूत्रकृच्छ्र, मस्तकपीडा आणि अडसंधि आखडणें हीं लक्षणें मूत्रनिग्रहापासून होतात.

मन्यागलस्तंभशिरोविकाराजृंभोपघातात्पवनात्मकाः
स्युः॥तथाक्षिनासावदनामयाश्चभवंतितीव्राःसहकर्णरोगैः॥२॥

अर्थ- मन्यास्तंभ, गलस्तंभ, शिरोविकार, डोळे, नाक, तोंड आणि कान यांचे ठिकाणीं तीव्ररोग हीं चिन्हें वायूच्या आनाहाचीं असतात. आणि तो जांभईचे प्रतिबंधापासून होतो.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वायुः कोष्ठानुगोरूक्षैः कषायकटुतिक्तकैः॥ भोजनैः कुपितः सद्य उदावर्त्तं करोतिहि॥ ३॥ वातमूत्रपुरीषांश्च कफमेदोवहानिच॥ स्रोतांस्युदावर्तयति पुरीषंचापि वर्तते॥ ४॥ श्वासकासप्रतिश्याय दाहमोहतृषाज्वरान्॥ वातमूत्रपुरीषाणि कृच्छ्रेणलभतेनरः॥ ५॥ ७॥

अर्थः- रूक्ष, तुरट, तिखट, कडू, अशा पदार्थांचे भोजनांनीं पोटांतला वायु कुपित झालेला तात्काळ उदावर्त रोग करितो. या रोगांत वायु, मूत्र, पुरीष आणि कफ, मेद यांनें वाहणाऱ्या शिरा यांची ऊर्ध्वगति होते. पुरीषही वरच्या द्वारांनीं कदाचित् पडतें. आणि श्वास, कास, प्रतिश्याय, दाह, मोह, तृषा आणि ज्वर हे उपद्रव असतात. आणि वात, मूत्र, पुरीष हीं संकटानें होतात.

त्रिवृद्धरीतकीश्यामास्कंहिक्षीरेणभावयेत्
वटिकामूत्रपीतास्ताः श्रेष्ठास्तानाहनाशनाः ६

अर्थः- तेड, हिरडा, पिंपळी यांचें चूर्ण करून निवडुंगाचे चिकाची भावना द्यावी. नंतर त्याच्या गोळ्या गोमूत्रा बरोबर रवाल्या असतां आनाह नाशाविषयीं श्रेष्ठ आहेत.

हिंगुमाक्षिकसिंधूत्थैः पत्त्वा वर्त्तिसुवर्तितां
घृताभ्यक्तांगुदेदद्यादुदावर्तविनाशिनीं॥ ७

अर्थः- हिंग, मध, सैंधव, एकत्र करून रवलून फडक्यास लावून त्याची वात करून शेकावी. नंतर तुपांत भिजवून गुदांत घालावी. तेणें करून उदावर्त विनाश पावेल.

विपाच्यसूत्राम्लरसेन दंतीपिंडीतकृष्णाबिडकुष्ठधूमैः॥
वर्तिं करांगुष्ठनिभांघृताक्तांगुदेरुजानाहहरींविदध्यात् ८

अर्थः- दांतीमूळ, गेळफळ, पिंपळी, बिडलोण, कोष्ठकोलिंजन, आणि घेरोसा, यांचें चूर्ण, गोमूत्र, लिंबाचा रस यांत शिजवून तें फडक्यास लावून त्याची हाताचे अंगुष्ठा प्रमाणें वात करून तुपांत भिजवून गुदांत ठेवावी. म्हणजे तिडीक आणि आनाह यांचा नाश करील.

हिंगूग्रगंधाबिडशंठ्यजाजीहरीतकीपुष्करमूलकुष्ठं॥
भागोत्तरंचूर्णितमेतदिष्टंगुल्मोदरानाहविषूचिकासु ९

अर्थः- हिंग १ वेरवंड २ बिडलोण ३ सुंठ ४ जिरें ५ हिरडा ६ पोखरमूळ ७

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

कोष्ठकोलिंजना ८ या प्रमाणें भाग घेऊन यांचें चूर्ण करून खावें. तेणें करून गुल्म, उदर, आनाह आणि विषूचिका यांचा नाश होतो.

हिंगूलंजयपालटंकणविषाण्यंत्यार्धभागोत्तरं सर्वंखल्वतलेविमर्द्यमतिमान्गुंजाद्वयंवेददेत्॥ मार्तंडोदयवान्ज्वरादिसहितश्वासोदराध्मानकेपांड्वाजीर्णगदेनुपानवशतः पथ्यंचतक्रोदनं॥१०॥ व्योषेणार्द्ररसेनतच्चसितयायुक्तंज्वरेदारुणेमांद्येगुल्मकफानिलेचपवनेशूलेचशोफोदरे॥ वातास्रेस्वरवर्णकुष्ठगदजेरोगानशेषान्जयेन्मार्तंडोदयनामकोरसवरोविश्वंसदारक्षतु॥११॥

अर्थ- हिंगूळ २ जेपाळ १॥ टंकणखार १ बचनाग ·॥· सर्व एकत्र खलून दोन गुंजा प्रमाणें द्यावा. याला मार्तंडोदयवान् रस असें ह्मणतात. हा ज्वर, श्वासोदर, आध्मान, पांडु, अजीर्ण इतक्यांचे ठायीं अनुपान योजून दिला असतां प्रशस्त आहे. पथ्य ताकभात; सुंठ, मिरें, पिंपळी, आल्याचा रस, साखर यांच्या बराबर दारुणज्वर, अग्निमांद्य, गुल्म, कफ, वायू, शूल, शोफोदर, वातरक्त, स्वरभेद, वर्णकुष्ठ, मुखव्याध इत्यादिक सर्व रोगांवर प्रशस्त आहे. असा हामार्तंडोदयनामकरस विश्वाचें पालन करो.॥ इत्यानाहोदावर्तचिकित्सा॥ ७॥

अथगुल्मलक्षणोपचारः

दुष्टावातादयोत्यर्थंमिथ्याहारविहारतः॥ कुर्वंतिपंचधागुल्मंकोष्ठांतेग्रंथिरूपिणम्॥१॥

अर्थ- मिथ्या आहार-विहारें करून अति दुष्ट झालेले वातादिक दोष, पोटांत पांच प्रकारचा ग्रंथिरूप गुल्म उत्पन्न करितात.

सद्यस्तैर्जायतेदोषैःसमस्तैरपिचोत्थितैः॥ पुरुषाणांतथास्त्रीणांज्ञेयोरक्तेनचापरः॥२॥

अर्थ- वात पित्त, कफ आणि सन्निपात या दोषां पासून पुरुषांस होतो, तसाच स्त्रियांस होतो व रक्तापासूनही स्त्रियांस एक होतो तो पुरुषांस होत नाः

उद्गारबाहुल्यपुरीषबंधतृप्त्यक्षमत्वांत्रविकूजनानि॥ आटोपमाध्मानमपक्तिशक्तिरासन्नगुल्मस्यवदंतिचिह्नं॥३

अर्थ- फार ढेंकरा, मल-प्रतिबंध, तृप्ति सहन न होणें, आंतड्यांत गुरगुरशब्द,

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

जीवा गुंडाळून येणें, पोट फुगणें पाचन शक्ति नसणें इतकीं लक्षणें गुल्म होणार असला म्हणजे होतात.

नवप्रसूताहितभोजनायायाचामगर्भंविसृजेदृतौच॥
वायुर्हितस्याःपरिगृह्यरक्तंकरोतिगुल्मंसरुजंसदाहं॥४॥

अर्थ:- नूतन प्रसूत झालेली, कुपथ्य करणारी, अशा स्त्रीचें रक्त घेऊन वायु दाह, पीडायुक्त गुल्म उत्पन्न करितो. आणि जी स्त्री अपूर्ण गर्भ असतां प्रसूत होते, आणि कुपथ्य करिते, तसेंच ऋतुकालीं कुपथ्य करिते तिलाही या प्रमाणेंच गुल्म होतो, तो गर्भाशयांत होतो असें जाणावें. ॥५॥श्रीशम्

वचाभयाबिडंशुंठीहिंगुकृष्णाग्निदीप्यकान्॥ द्वित्रिषट्
चतुरेकाष्टसप्तपंचांशकान्क्रमात्॥५॥ चूर्णंमूत्रादिभिः
पीतंगुल्मानाहोदरापहम्॥ शूलार्शःश्वासकासघ्नंग्रह-
णीदीपनंपरम्॥६॥

अर्थ:- वेखंड, हिरडा, बिडलोणा, सुंठ, हिंग, पिंपळी, चित्रक, ओंवा हीं औषधें अनुक्रमानें २।३।६।४।१।८।७।५ या प्रमाणें भाग घेऊन कुटावीं. नंतर तें चूर्ण गोमूत्रा बरोबर प्यालें असतां गुल्म, आनाह, उदर, शूल, मुळव्याध, श्वास, कास, संग्रहणी यांचा नाश करितें. आणि अग्निदीपन करतें असें जाणावें. ॥७॥श्री.

चित्रकग्रंथिकेरंडशुंठीक्वाथःपरंहितः॥ शू-
लानाहविबंधेषुसहिंगुबिडसैंधवः॥ ७॥ ७

अर्थ:- चित्रक, पिंपळमूळ, एरंडमूळ, सुंठ यांचा काढा हिंग, बिडलोण, सैंधव याणीं युक्त करून प्यावा. ह्मणजे गुल्म, शूल, आनाह, मळ आणि मलमूत्रबंध यांवर अत्यंत हितकारक आहे.

पथ्यारोहितकक्वाथोयवक्षारकणायुतः॥ पि-
बेत्प्रातर्यकृत्प्लीहगुल्मोदरनिवृत्तये॥ ८॥

अर्थ:- हिरडा, रक्तरोडा यांचा काढा जवखार आणि पिंपळी यांचें चूर्ण घालून प्यावा ह्मणजे यकृत्प्लीहा गुल्म उदर यांची निवृत्ति होते.

शुद्धसूतसमंगंधंजेपालंत्रिफलासमम्॥ त्रिकटुंपेषयेत्
तत्क्षौद्रमिश्रंगुल्मंलिहन्हरेत्॥ उष्णोदकंपिबेच्चानुनारा-
चोयंरसोत्तमः॥९॥

अर्थ:- शुद्ध पारा, गंधक, जेपाळ, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ही एकत्र खलून मधाबरोबर चाटावीं. वरून पाणी प्यावें. तेणें करून गुल्म नाश होईल. त्याला नाराचरस असें ह्मणतात. ॥ ॥ इति नाराच रसः॥ ७॥

अथवाउदयमार्तंडोदेयः॥ ॥अथवा त्यावर उदयमार्तंडरस द्यावा ॥७॥

शताह्वाचिरबिल्वलग्दारुभार्ङ्गीकिणोद्भवः॥
कल्कःपीतोहरेद्गुल्मंतिलक्वाथेनरक्तजम् १०

अर्थ- शतावरी, करंजाची साल, दारुहळद, भारंगमूळ आणि पिंपळी यांचें चूर्ण तिळांच्या काढ्या बरोबर प्यालें असतां रक्त आणि गुल्म यांचा नाश होईल.

तिलक्वाथोगुडघृतव्योषभार्ङ्गीरजोन्वितः
पीतोरक्तभवेगुल्मेनष्टेशुक्रेचयोषितः॥११

अर्थ- तिळांचा काढा गूळ, तूप आणि सुंठ, मिरें, पिंपळी, भारंगमूळ यांचें चूर्ण घालून प्यालें असतां रक्त, गुल्म आणि स्त्रियांचें शुक्र नष्ट होते यो०प्र०आ०

भार्ङ्गीकृष्णाकरंजत्वक्ग्रंथिकामरदारुजं
चूर्णंतिलानांक्वाथेनरक्तगुल्मरुजापहम् १२

अर्थ- भारंगमूळ, पिंपळी, करंजाची साल, पिंपळमूळ आणि देवदार यांचें चूर्ण तिळांच्या काढ्या बरोबर प्यालें असतां रक्त आणि गुल्म यांचा नाश होतो अ०ज्ञा०

सामुद्रंसैंधवंकाचंयवक्षारंसुवर्चलं॥ टंकणंसर्जिकाक्षारंतुल्यंचूर्णंप्रकल्पयेत्॥ १३॥ अर्कक्षीरैःस्नुहिक्षीरैर्लुलितंचविभावयेत्॥ अर्कपत्रंलिपेत्तेन रुध्वाभांडेपुटेपचेत् १४ तत्क्षारंचूर्णयित्वाथत्र्यूषणंत्रिफलारजः॥ जीरकंरजनीवन्हिर्नवकस्यचभागतः॥ १५॥ क्षारार्धंयोजयेत्सम्यगेकीकृत्यविचूर्णयेत्॥ वज्रक्षारमिमंपूर्वंस्वयंप्रोक्तंपिनाकिना १६ सर्वोदरेषुगुल्मेषुशूलशोफेषुयोजयेत्॥ अग्निमांद्येत्वजीर्णेचभक्ष्यंनिष्कहूयंतथा १७ वाताधिकेजलेकोष्णे घृतेपित्ताधिकेहितः॥ कफेगोमूत्रसंयुक्तआरनालेत्रिदोषनुत्॥ १८

अर्थ- मीठ, सैंधव, बांगडखार, जवखार, पादेलोण, टाकणखार, सज्जीखार, यांचें चूर्ण करून रुईचें आणि निवडुंगांचे चिकांत खलावें. नंतर रुईचे पानाला लेप करावा. नंतर तीं पानें मडक्यांत घालून तोंड बंद करून लहानसें पुट द्यावें. नंतर तें काढून बारीक करून त्यांत त्याचे निमें सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, जिरें, हळद आणि चित्रक यांचें चूर्ण घालून पुनः एकत्र करून

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

न खलून ठेवावें. याला वज्रक्षार असें ह्मणतात. हा पूर्वी शिवानें सांगितला आहे. सर्व उदरें, गुल्म, शूल, शोफ आणि अग्निमांद्य, अजीर्ण यांवर आवश्यकतेप्रमाणें खावा. वाताधिक्य असेल तर ऊन पाण्याबरोबर, पित्ताधिक्य असेल तर तुपाबरोबर खावा आणि त्रिदोषाधिक्याबर कांजीबरोबर खावा. इ. वज्रक्षा०

चिंचाक्षारंस्तुहिक्षारमर्कक्षारंपलंपलं॥ द्विपलंशंखभूतिं-
चरामठंचपलार्धकम्॥१॥लवणानिचसर्वाणिपलमात्रा-
णियोजयेत्॥क्षारद्वयंपलार्धंचसर्वमेकत्रचूर्णयेत्॥२॥
जंबीरकरसैर्मर्द्यमनलस्यदिनत्रयं॥भृंगराजस्यनिर्गुं-
डीमुंड्योश्चैवपृथक्द्रवैः॥३॥आर्द्रकस्यरसेनैवप्रत्येकंम
र्दयेद्दिनम्॥बदरीबीजमात्रांतुवटिकांकारयेद्भिषक्॥४
एकैकांभक्षयेत्प्रातःपंचगुल्मान्व्यपोहति॥सर्वशूलंनिहंत्या-
शुअजीर्णंचविषूचिकाम्॥५॥मंदाग्निंनाशयेच्छीघ्रंप-
थ्यंतैलाम्लवर्जितं॥चिंचाशंखवटीनामग्रहणीरोगहृत्
परा॥६॥

अर्थ- चिंच, निवडुंग, रुई यांचा खार चार चार तोळे, शंखभस्म ८ तो० हिंग २ तो० सैंधव ४ तो० पादेलोण ४ तो० काचलोण ४ तो० बिडलोण ४ तो० सांबरी मीठ ४ तो० मीठ ४ तो० द्रोणीचें मीठ ४ तो० मृत्तिकालवण चार तो० सूर्यखार ४ तो० हीं चार चार तोळे सज्जीखार जवखार दोन दोन तोळे. या प्रमाणें घेऊन एकत्र चूर्ण करावें, आणि ईडलिंबाचे रसांत खलावें. नंतर चित्रकाचे काढ्यांत तीन दिवस खलावें. नंतर भाका, निर्गुंडी, गोरखमुंडी आणि आलें यांच्या रसांत एक एक दिवस निराळें खलावें. नंतर बोरीच्या आंठी प्रमाणें गोळी करून प्रातःकाळीं एकेक भक्षण केली असतां पांच प्रकारचे शूल, अजीर्ण, विषूचिका आणि मंदाग्नि यांचा शीघ्र नाश करील. याला पथ्य तेल, तिखट, आंबट हें खाऊं नये. हिला चिंचाशंखवटी असें ह्मणतात. ही संग्रहणी रोगाचा नाशा करिते॥ ॥इति चिंचाशंखवटीचूर्णं॥

सामुद्रलवणंग्राह्यमष्टकर्षमितंबुधैः॥पंचसौवर्चलंग्रा-
ह्यंबिडंसैंधवधान्यकम्॥१॥पिप्पलीपिप्पलीमूलंचित्रकं
कृष्णाजीरकम्॥नागकेसरतालीसमाम्लवेतसकंतथा॥२॥
द्विकर्षमात्राण्येतानि प्रत्येकंहारयेद्बुधः॥मरीचंजीरकं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

विश्वमेकैकंकर्षमात्रकम् ३ दाडिमस्यचतुःकर्षत्वगेला-
चार्धकार्षिकी ॥ एतच्चूर्णीकृतंसूक्ष्मंलवणंभास्कराभि-
धं ॥४॥ शाणप्रमाणंदेयंतुभस्कृतक्रसरासवैः ॥ वातश्ले-
ष्मभवंगुल्मंप्लीहानमुदरंक्षयं ॥५॥ अर्शांसिग्रहणीकुष्ठं
विबंधंचभगंदरं ॥ शोफंशूलंश्वासकासंचामदोषंचहृ-
द्रुजम् ६ मंदाग्निंनाशयेच्छीघ्रंदीपनंपाचनंपरम् ॥ सर्व-
लोकहितार्थायभास्करेणोदितंपुरा ७

अर्थः- मीठ ८ तो०, पादेलोण ५ तो०, बिडलोण, सैंधव, धणे, पिंपळी, पिंपळमूळ, चि-
त्रक, शाहाजिरें, नागकेंशर, तालीसपत्र, आम्लवेतस हीं दोन दोन तोळे; मिरें,
जिरें, सुंठ एकेक तोळा; डाळिंबाची साल ४ तोळे, दालचिनी अर्धा तोळा, वेलदो-
डे अर्धा तोळा हें सर्व एकत्र कुटून बारीक करावें. याला भास्कर लवणचू-
र्ण असें ह्मणतात. हें चार मासे प्रमाणें दत्त्यांचे मंडांत अथवा नक्र सराआ-
सव त्यांतून एकांत घालून द्यावें. तेणें करून वातश्लेष्मापासून झालेला गु-
ल्म, वात, प्लीहा, उदर, क्षय, मुळव्याध, संग्रहणी, कुष्ठ, विबंध, भगंदर, शोफ, शूल,
श्वास, कास, आमदोष, हृद्रोग, मंदाग्नि यांचा नाश होतो. आणि हें अत्यंत दीपन,
पाचन आहे. व सर्व लोकांचे हितासाठीं सूर्यानें पूर्वी सांगितलें आहे ॥७॥ श्री.

दंतिहिंगुयवक्षारालाबुबीजंकणागुडः ॥ स्नुहिक्षीरेण
गुटिकासर्वेषांकर्षमात्रिका ॥८॥ भक्षितारक्तगुल्मघ्नी
रुधिरस्त्रावकारिणी ॥ पक्वंतैलेर्कजंपुष्पंरुधिरस्त्रावका-
रिच ॥९॥ ७

अर्थः- दंतिमूळ, हिंग, जवखार, कडू दुध्याशीं पव्याचें बीं, पिंपळी, गुळ निवडुंगा-
चे चिकांत खलून १ तोळा गोळी भक्षण केली असतां रक्तगुल्माची नाशक आणि
रक्ताचा स्राव करणारी आहे. व रुईचें फूल तेलांत तळून भक्षण केलें असतां
रक्तस्राव करणारें आहे. इति भास्कर लवणचूर्ण ॥

अथहृद्रोगलक्षणोपचारः

अत्युष्णगुर्वम्लकषायतिक्तश्रमाभिघाताध्यशनप्रसंगैः
संचिंतनैर्वेगविधारणैश्चहृद्दामयःपंचविधःप्रदिष्टः १

अर्थः- उष्ण, गुरु, जड, आंबट, तुरट, कडू त्यांचें अतिसेवन, अतिश्रम, धक्का
बसणें, अध्ययन, अतिमैथुन, अतिचिंता, वेगधारण इत्यादि कारणांनीं हृद्रो-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ग होतो. तो पांच प्रकारचा सांगितला आहे.

दूषयित्वारसंदोषाविगुणाहृदयंगताः ॥
हृदिबाधांप्रकुर्वंतिहृद्रोगंतंप्रचक्षते ॥२॥

अर्थ- वातादि दोष रसाला दूषित करून हृदयांत येऊन व्यथा करितात त्याला हृद्रोग असें ह्मणतात.

नियम्यतेमारुतजेहृदयंतुद्यतेतथा ॥ आध्मानंकुक्षिहृत्कंठवातविण्मूत्ररोधना ॥ तंद्रारोचकशूलानि तृष्णालिंगानिनिर्दिशेत् ३

अर्थ- हृदयास ओढ बसणें, ओढल्या प्रमाणें व्यथा होणें, आध्मान, कुक्षींत, उरांत वारा मारणें, मलमूत्राचा अवरोध, तंद्रा, अरुची, शूल आणि तृषा हीं चिन्हें वातहृद्रोगाचीं जाणावीं.

क्वाथःकृतःपौष्करमातुलिंगपलाशभूतीकसठीसराहैः
सनागराजाजिवचायवाह्वःसक्षारउष्णोलवणेनपेयः ४॥

अर्थ- पोखरमूळ, महाबुंग, पळस, ओंवा, कचोरा, तेल्यादेवदार, सुंठ, जिरें, वेखंड, यांचा काढा करून त्यांत जवखार, साजीखार, सैंधव, पादेलोण हीं घालून उष्णा असतां प्यावा तेणें करून हृद्रोग बरा होतो.

चूर्णंपुष्करजंलिह्यान्माक्षिकेणसमायुतम्
हृद्रोगश्वासकासघ्नंक्षिप्रंहिक्कानिवारणम् ५

अर्थ- पोखरमुळाचें चूर्ण मधाबराबर चाटलें असतां हृद्रोग, श्वास, खोकला आणि उचकी यांचें लवकर निवारण करील.

शरावसंपुटेदग्ध्वाशृंगंहरिणजंपिबेत् ॥ गव्येनसर्पिषापिष्टंहृच्छूलंनाशयेद्ध्रुवम् ॥६॥

अर्थ- हरिणाचें शिंग परळांत बारीक तुकडे करून ठेवावें. आणि वर दुसरा परळ ठेवून संधिलेप करून तें जाळावें. नंतर त्याचें चूर्ण करून गायीच्या तुपांत घालून प्यावें. तेणें करून हृदयांतला शूल नाश पावेल. असें जाणावें.

चतुर्विंशतिपलंक्षीरंगवामथपचेच्छनैः ॥ द्विरष्टपलकंयावत्तावत्कुर्याच्चुशीतलं ॥७॥ सिताक्षौद्रंघृतंतस्मिन्दुग्धेचार्धपलंक्षिपेत् ॥ कर्षैकंपिप्पलीचूर्णंक्षिप्त्वापेयंहितंपरं ॥८॥ सर्वदोषोत्थहृद्रोगंज्वरंकासंक्षयंजयेत् ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- ९६ तोळे गायीचें दूध मंदाग्नि लावून अर्धें आटे तों पर्यंत पक्व करावें. नंतर थंड झाल्यावर साखर मध तूप दोन दोन तोळे टाकावें आणि पिंपळीचें चूर्ण एक तोळा टाकून प्यावें. तेणें करून सर्व दोषांपासून झालेला हृद्रोग, ज्वर, खोकला आणि क्षय यांचा पराजय होतो.

॥यष्टीनागबलोदीच्यार्जुनैः सर्पिः सुसाधितं॥९॥
॥हृद्रोगक्षयपित्तास्रानिलास्रश्वासकासजित्॥

अर्थ- ज्येष्ठमध, गांगेरुकी, वाळा, अर्जुन यांचा काढा करून त्या काढ्यांत तूप घालून शिजवावें. काढा आटला म्हणजे तूप सिद्ध झालें. तें तूप हृद्रोग, क्षय, पित्तरक्त, वातरक्त आणि श्वासकास यांतें जिंकणारें आहे.

॥सूतार्कगंधंक्वाथेनवरायामर्द्ययेद्दिनम् १०काकमाच्या वटींकृत्वाचणमात्रांतुभक्षयेत्॥ हृदयार्णवनामायं हृद्रोगदलनोरसः॥११॥

अर्थ- पारा, गंधक, ताम्रभस्म, हीं हिरडा, बेहेडा, आंवळकाठी यांच्या काढ्यांत एक दिवस खलून पुनः काबळीचे काढ्यांत एक दिवस खलून हरभऱ्याप्रमाणें गोळी करून खावी. तेणें करून हृद्रोगाचा नाश होतो. याला हृदयार्णवरस असें म्हणतात. इति हृदयार्णवरसः

॥वमनंरेचनंदद्याद्युक्त्याहृद्रोगनाशनम्॥
॥नाराचोदयमार्तंडौदद्याद्धृद्रोगहानये॥१२॥

अर्थ- हृद्रोग नाशार्थ वमन किंवा रेचक युक्तीनें द्यावें. अथवा नाराचरस किंवा उदयमार्तंड रस द्यावा. म्हणजे हृद्रोगाचा नाश होईल. असें जाणावें.

॥अथमूत्रकृच्छ्रलक्षणोपचारः॥

॥पृथग्मलाः स्वैः कुपितानिदानैः सर्वेथवाकोपमुपेत्यबस्तौ॥मूत्रस्यमार्गंपरिपीडयंतियदानदामूत्रयतीहकृच्छ्रात्

अर्थ- वातादिक मल आप आपल्या कारणांनीं कुपित झालेले निरनिराळे किंवा संपूर्ण बस्तीप्रत येऊन मूत्राचे मार्गाचा जेव्हां रोध करतात तेव्हां रोगी संकटानें मुतितो त्या रोगाला मूत्रकृच्छ्र असें म्हणतात.

॥तीव्रार्तिरुग्वंक्षणबस्तिमेढ्रेस्वल्पंमुहुर्मूत्रयतीहवातात्१

अर्थ- मोठी पीडा होत असल्या प्रमाणें व्यथा असें बस्ति, वंक्षण, लिंग यांच्या ठिकाणीं होतें आणि थोडें थोडें वारंवार मुतायाला होतें हें वाताचा पासून जाणावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

शुक्रेदोषैरुपहतेमूत्रमार्गेविधारिते॥ सशु-
क्रंमूत्रयेत्कृच्छ्राद्बस्तिमेहनशूलवान्॥ ७ ॥

अर्थ- वातादिदोषांनीं शुक्र दुष्ट झालें असतां आणि मूत्रमार्गाचा रोध झाला असतां बस्ति, लिंग यांच्या ठिकाणीं शूल होतो. आणि शुक्रसहित मोठ्या संकटाने मुतनो.

अश्मरीशर्करचैव तुल्यसंभवलक्षणे॥२

अर्थ- मूत्राश्मरी आणि मूत्र शर्करा यांची उत्पत्ति आणि लक्षणें तुल्य आहे.

पाषाणभेदस्त्रिवृताच पथ्यादुरालभापुष्करगोक्षुरंच॥
पलाशशृंगाटककर्कटीनांबीजंकषायःसनिरुद्धमूत्रे॥३॥

अर्थ- पाषाणभेद, तेड, हिरडा, धमासा, पोखरमूळ, गोखरू, पळस पापडी, शिंगाडे आणि कांकडीचें बीं यांचा काढा मूत्रकृच्छ्रावर प्रशस्त आहे.॥७

हरीतकीगोक्षुरराजवृक्षपाषाणभिद्भूनवयवासकानाम्॥
क्वाथंपिबेन्माक्षिकसंप्रयुक्तंकृच्छ्रेसदाहेसरुजेविबंधे॥४॥

अर्थ- हिरडा, गोखरू, बाहवा, पाषाणभेद, धमासा, यांचा काढा मध घालून प्यालें असतां दाह, पीडा यांनीं युक्त जें मूत्रकृच्छ्र यावर प्रशस्त आहे.॥७॥

मूलानिकुशकाशेक्षुशराणांचेक्षुवालुका॥
मूत्राघाताश्मरीकृच्छ्रंपंचमूलीतृणात्मिका५

अर्थ- कुश, काश, ऊंस, शर, कसई हीं पांच प्रकारचीं मूळें मूत्राघात, मूत्राश्मरी आणि मूत्रकृच्छ्र यांचीं नाशक आहेत.

शिलाजत्वश्मभिल्लकृष्णातृटीनांवापिबेद्रजः

अर्थ- शिलाजीत, पाषाणभेद, पिंपळी, वेलदोडे यांचें चूर्ण पाण्या बरोबर प्यालें असतां मूत्रकृच्छ्रावर (काथद्वारा) प्रशस्त आहे.

हरिद्रामधुकंमूर्वामुस्तकंदेवदारुच॥ पिबे-
दक्षसमंकल्कंपयसामूत्रपीडितः॥ ६ ॥

अर्थ- हळद, ज्येष्ठमध, मोरवेल नागरमोथे, देवदार यांचें चूर्ण एक तोळा दुधाबराबर ज्याला मूत्रकृच्छ्र असेल त्याणें प्यावें.

एलोपकुल्यामधुकाश्मभेदकौंतीश्वदंष्ट्रातृषकोरुबूकैः॥
क्वाथंपिबेदश्मजतुप्रधानंसशर्करंसाश्मरिमूत्रकृच्छ्रे७॥

अर्थ- वेलदोडे, पिंपळी, ज्येष्ठमध, पाषाणभेद, रेणुकाबीज, गोखरू, अडू-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ळसा आणि एरंडमूळ यांचा काढा शिलाजीत आणि खडीसाखर घालून मूत्राश्मरी आणि मूत्रकृच्छ्र यांजवर द्यावा.

एलाश्मभेदसशिलाजतुपिप्पलीनांचूर्णानितंदुलजलै-
र्लुलितानिपीत्वा॥ यद्वागुडेनसहितान्यवलेह्यधीमाना-
सन्नमृत्करपिजीवतिमूत्रकृच्छी ८

अर्थ:- वेलदोडे, पाषाणभेद, शिलाजीत, पिंपळी यांचें चूर्ण तांदुळांचे धुणांत घालून प्यावें अथवा गुळा बरोबर खावें म्हणजे मूत्रकृच्छ्री आसन्नमृत्यु जरी असला तरी वांचेल.

समूलगोक्षुरकाथःसितामाक्षिकसंयुतः॥
नाशयेन्मूत्रकृच्छ्राणितथाचोष्णंसमीरणं ९

अर्थ:- मुळासहित सराट्यांचें झाड आणून त्याचा काढा साखर, मध यांनीं युक्त करून प्यालें असतां मूत्रकृच्छ्र आणि उष्णवायु यांचा नाश करील असें समजावें.

तक्रेणयुक्तंशितिवारकस्यबीजंपिबेत्कृच्छ्रविदाहहेतोः॥
पिबेत्तथातंदुलधावनेनप्रवालचूर्णंकफमूत्रकृच्छ्रे॥१०॥

अर्थ:- मूत्रकृच्छ्रापासून दाह होतो. त्यावर कुरडूचें बीं यांचें चूर्ण ताकांत घालून प्यावें. तसें कफापासून जें मूत्रकृच्छ्र होतें त्यावर तांदुळांचे धुणांबरोबर प्रवाळ-भस्म प्यावें.

॥मंथंपिबेद्वाससितंससर्पिःश्रितंपयोवार्द्धसितंप्रदेयम्॥
॥धात्रीरसेचेक्षुरसंपिबेद्वाकृच्छ्रेसदाहेमधुनाविमिश्रं॥११॥

अर्थ:- दाहयुक्त मूत्रकृच्छ्रावर साखरयुक्त मंथ, पिठाचें पाणी अथवा तापलेलें दूध तुपासहित बरोबरीनें साखर घालून अथवा आंवळ्यांचा आणि उंसाचा रस एकत्र करून त्यांत मध घालून प्यावें.

ऐर्वारुबीजयष्ट्याह्वदार्वीवातंदुलांभसा॥ तोयेनकल्कंद्रा-
क्षायाःपिबेत्पर्युषितेनवा १२ पिबेन्मद्येनसूक्ष्मैलांधात्री
फलरसेनवा॥ ॥

अर्थ:- कांकडीचें बीं ज्येष्ठमध दारुहळद हीं तांदुळांचे धुणांत वांटून प्यावीं अथवा शिळे पाण्यांत मनुका वांटून प्याव्या अथवा वेलदोड्याचें चूर्ण मद्या बरोबर किंवा आंवळ्याचे रसाबरोबर प्यावें. तेणें करून मूत्रकृच्छ्र दूर होतें.

रसभस्मचभागैकंचतुर्भागंतुगंधकम् १३ पिष्ट्वावराट-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

कान्पुर्याद्रसपादंचटंकणम्॥ क्षीरेणपिष्ट्वारुध्वास्यंभां-
डेरुध्वापुटेपचेत्१४स्वांगशीतंविचूर्ण्यथलघुलोकेश्वरो
रसः॥ चतुर्गुंजोघृतैर्देयोमरीचैकोनविंशतिः१५जाती
मूलंपलैकंतुत्र्यजाक्षीरेणपाचयेत्॥शर्कराभाविनंचा-
नुपीतंकृच्छ्रहरंपरम्॥१६

अर्थ:- पान्याचें भस्म १ गंधक ४ भाग एकत्र खलून कवड्यांत भरून भस्माच्या चतुर्थांश टांकणखार दुधांत खलून त्याणें कवड्यांचीं तोंडें बंद करून कवड्या मडक्यांत भरून तोंड बंद करून पुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर खलून चार गुंजांप्रमाणें तुपाबरोबर द्यावा. याला 'लघुलोकेश्वर रस असें ह्मणतात. नंतर एकुणीस मिरें आणि चार तोळे जाईचें मूळ शेळीच्या दुधांत शिजवून त्यांतसा-खर घालून प्यावें. हें अत्यंत कृच्छ्रहारक आहे असें जाणावें. लघुलोकेश्वररस:

अथमूत्राघातलक्षणोपचार:

मूत्रमल्पाल्पमथवासरुजंसंप्रवर्तते॥स्थानाच्च्युतंमूत्रयु-
तंप्राक्पश्चाद्वाप्रवर्तते॥१॥भस्मोदकप्रतीकाशंमूत्राघातं
तदुच्यते॥

अर्थ:- थोडें थोडें पीडायुक्त असें मूत्र होणें, अथवा मूत्राचे पूर्वी किंवा नंतर मूत्रा बरोबर स्थानापासून भ्रष्ट झालेले, भस्माचे पाण्या सारखें जें पडतें त्याला मूत्राघात असें ह्मणतात.

मूत्रंहारिद्रमथवासरक्तंरक्तमेववा॥कृच्छ्रा
त्पुनःपुनर्जंतोरुष्णवातंवदंतितम्॥२॥॥

अर्थ:- पिंवळें किंवा तांबडें किंवा रक्तयुक्त असें मूत्र होतें त्याला उष्णवात असें ह्मणतात.

सदाभद्राश्मभिन्मूलंशतावर्याश्चचित्रकम्॥रोहिणी-
कोकिलाख्योचक्रौंचस्थूलत्रिकंटकम्३श्लक्ष्णंपिष्ट्वा
क्षरापीतंमूत्राघातनिषूदनम्॥

अर्थ:- रक्तशिवण, पाषाणभेद, शतावरीमूळ, चित्रक, कुटकी, तालीसखाना, कमलाक्ष, मोठे सरांटे यांचें चूर्ण बारीक करून मद्याबरोबर प्यालें असतां मूत्राघाताचें नाशक आहे.

निदिग्धिकायाःस्वरसंपिबेद्वातक्रमिश्रितं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

जलेकुंकुमकल्कंवासक्षौद्रमुषितंनिशि४॥

अर्थ- रिंगणीचा आंगारस नाकाबरोबर प्यावा. अथवा रात्रीस पाण्यांत केशर भिजत घालून सकाळीं त्यांत मध घालून कोंळून प्यावें. तेणें करून मूत्राघात जातो.

शृतशीतंपयोमांसीचंदनंतंदुलांबुना॥पिबे-
त्सशर्करंश्रेष्ठमुष्णावातेसशोणिते॥ ५ ॥

अर्थ- तापून थंड झालेलें दूध, जटामांसी, चंदन, तांदुळांचें धुवण, साखर हें एकत्र करून प्यालें असतां रक्तसहित उष्णवातावर श्रेष्ठ आहे. असें सम०

दद्यादुत्तरबस्तिंवा मूत्राघातेसवेदने॥

अर्थ- वेदनासहित मूत्राघातावर उत्तरबस्ति द्यावा. म्ह० पिचकारी मारावी.

स्त्रीणामतिप्रसंगेनशोणितंयस्यसिच्यते
मैथुनोपरमस्तस्यबृंहणीयोविधिर्हितः॥६॥

अर्थ- अति मैथुनाचे योगानें ज्याचें रक्त शिस्नावाटे जातें त्याणें मैथुन करूं नये. आणि पौष्टिक औषध घ्यावें.

देयःपाषाणभेदोत्रानुपानैःकृच्छ्रनाशनः॥
शीतोपचारंबहुलंकुर्याल्लिंगोद्भवेगदे॥७॥

अर्थ- पाषाणभेद अनुपान योजून द्यावा. तो कृच्छ्रनाशक आहे. आणि लिंगाचे ठायीं होणारा रोग (मूत्राघातवगैरे) त्यावर पुष्कळ शीतोपचारकरा०

पिबेच्छिलाजतुक्वाथेगणेवीरतरादिके॥
रसंदुरालभायावाकषायंवासकस्यवा॥८॥

अर्थ- वीरतर्वादि गणाचे काढ्यांत शिलाजीत प्यावा. अथवा धमासा किंवा अडूळसा यांचा काढा प्यावा.

त्रिकंटकैरंडशतावरीभिःसिद्धंपयोवातमयेसशूले॥
गुडप्रगाढंसघृतंपयोवारोगेषुकृच्छ्रादिषुशस्तमेतत्॥९॥

अर्थ- सरांटे, एरंडमूळ, शतावरी यांचा काढा वातापासून झालेला मूत्राघात शूलसहित त्यावर प्रशस्त आहे. आणि गूळ, तूप, दूध एकत्र करून मूत्रकृच्छ्रादिक रोगांवर प्रशस्त आहे. ॥ इति मूत्राघात चिकित्सा ॥ ७ ॥ श्रीशं॥

अथमूत्राश्मरीलक्षणोपचारः

बस्त्याध्मानंतदासन्नदेशेषुपरितोतिरुक्॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥ मूत्रेच बस्तगंधित्वंमूत्रकृच्छ्रंशिरोरुजः १॥

अर्थः- ओंटी पोट फुगलेलें आणि त्याचे सभोंवती अति निडीक, मूत्राला बोकडाचे मुता सारखी घाण, मुतताना निडीक, डोकें दुखणें हीं चिन्हें मूत्राश्मरीची (मुतखड्याचीं) जाणावीं. आणि सामान्यतः बेंबी, मूत्रबस्ति यांच्या ठिकाणी पीडा होते असें जाणावें.

॥ अलातकास्थिसंस्थानारक्तापीतासिताश्मरी

अर्थः- बिब्याचे आंतली बी असते त्या प्रमाणें आकारानें आणि वर्णानें तांबडी किंवा पिंवळी अथवा पांढरी अशी अश्मरी (मुतखडा) असते असें जाणावें.॥ ७

॥ दौर्बल्यंसदनंकार्श्यंकुक्षिशूलमथारुचिः॥
॥ पांडुत्वमुष्णवातंचतृष्णाहृत्पीडनंवमिः॥ २ ॥

अर्थः- दुर्बलपणा, ग्लानी, कृशपणा, कुशींत शूल, अरुचि, पांढरेपणा, उष्णवात तृषा हृदयांत पीडा ओकारी, इतके उपद्रव मुतखड्यापासून होतात.॥ ७॥

शुंठ्यग्निमंथापामार्गशिग्रुवरुणगोक्षुरैः॥ अभयारग्वधफलैः क्वाथंकुर्याद्विचक्षणः ३ रामठक्षारलवणचूर्णंदत्वा पिबेन्नरः॥ अश्मरीमूत्रकृच्छ्रघ्नंदीपनंपाचनंपरम्॥ ४॥

अर्थः- सुंठ, ऐरण, आघाडा, शेवगा, वायवर्णा, गोखरू, हिरडा, बाहावा, यांचा काढा करून विचक्षण असेल त्याणें मूत्राश्मरी, मूत्रकृच्छ्र यांवर हिंग, जवखार आणि सैंधव यांचें चूर्ण घालून प्यावा, हा अत्यंत दीपन आणि पाचन आहे.

॥ शृंगबेरयवक्षारपथ्याकालीयकांजनम्॥
॥ आजंदधिभिनत्यग्राम्यश्मरीमाशुपातनं ५

अर्थः- आलें, जवखार, हिरडा, दारुहळद, काळा शेवगा, हीं शेळीच्या दुधांत वांटून प्यावीं. म्हणजे मूत्राश्मरी फुटून पडते.

तिलापामार्गकांडेचकारवेल्याश्मवस्यच॥ पलाशकाष्ठसंयुक्तंसर्वंतुल्यंदहेत्पुटे॥ ६॥ तन्निष्केकमजामूत्रे वटींचानंदभैरवीं॥ पाययेदश्मरीहंतिसप्तवारान्नसंशयः॥ ७॥

अर्थः- तीळ, आघाडा, कारली, सातु, यांचें कांडें, पळसाचें काष्ठ हीं सर्व समान घेऊन मडक्यांत घालून पुट देऊन जाळावीं. नंतर त्यांची चार मासे राखघेऊन शेळीच्या मुतांत गोळी करून खावी. या प्रमाणें सात वेळा खाल्ली अ-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सतां अश्मरीचें पाचन होऊन नाश होतो. यांत संशय नाहीं.

आदौव्यथास्यात्कटिकुक्षिदेशेततोनिरोधाज्ज्वलितंचमूत्रम् ॥इत्यश्मरीलक्ष्मरसोत्रयुक्तःपाषाणभेदीसनिरूप्यतेऽथ॥८॥

अर्थ:- पूर्वी कंबर,कुशी यांचे ठिकाणीं पीडा नंतर मूत्र कोंडल्यामुळें मूत्र उष्ण होतें. हें अश्मरी चिन्ह सांगितलें असतां अश्मरीवर योग्य पाषाणभेदी रस तो पुढें सांगितला आहे.

त्रिकंटकस्यबीजानांचूर्णंमाक्षिकसंयुतं
अविक्षीरेणसप्ताहं पिबेदश्मरिभेदनं ९

अर्थ:- सराट्यांचें चूर्ण मधयुक्त मेंढीचे दुधांत घालून प्यावें. सात दिवस प्यालें असतां अश्मरीचा भेद होतो.

क्षारोनिपीतस्तिलपुष्पराजःसमाक्षिकःक्षीरयुतस्त्रिरात्रम्॥ हंत्यश्मरींसिंधुविमिश्रितंवानिपीयमानंरुचकं प्रयत्नात् १०

अर्थ:- तिळांचे फुलांचा क्षार, मध, दूध, एकत्र करून तीन दिवस प्यावें अथवा सैंधव आणि महाळुंग सेवन करावें. तेणें करून अश्मरीचा नाश होतो. ॥७

गोपालकर्कटीमूलंपिष्टंपर्युषितांभसा ॥
पीयमानंत्रिरात्रेणपातयत्यश्मरींहठात् ११

अर्थ:- चिबुडाचें मूळ शिळे पाण्यांत वांटून प्यावें. ह्मणजे तीन दिवसांत अश्मरी (मूत्रखडा) पाडील.

गव्येनपिक्षापयसार्कपुष्पीनिपीयमानात्रिदिनंप्रभाते॥
विदार्यवीर्येणनिजेनतीव्रामप्यश्मरींयाकुरुतेचदाहं १२

अर्थ:- शिरदोडी गायीच्या दुधांत वांटून प्रातःकाळीं तीन दिवस प्यावीं. ह्मणजे ती आपले सामर्थ्यानें दाहयुक्त तीव्र अश्मरीचें विदारण करून नाशा करिते.

यवक्षारगुडाभ्यांचपिबेत्पुष्पफलोद्भवम्॥
रसंमूत्रविबंधघ्नंशुक्राश्मरीविनाशनम् १३

अर्थ:- जवखार, गूळ, याणीं युक्त मूत्ररोधाचा नाशक असा फळांचा किंवा फुलांचा रस प्यावा. तो शुक्राश्मरी नाश करितो.

शतावरीमूलरसोगव्येनपयसासमः॥ पीतो

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥ निपातयत्याशु त्वश्मरीं चिरजामपि ॥१४॥

अर्थ:- शतावरीच्या मुळांचा रस आणि त्याच्या बरोबर गायीचें दूध एकत्र करून प्यावा ह्मणजे फार दिवसांची जरी अश्मरी असली तरी तिचा लवकर नाश करितो.

वरुणस्य त्वचं श्रेष्ठां शुंठीगोक्षुरसंयुताम् ॥ यवक्षारगुडं दत्वा क्वाथं कृत्वा पिबेद्धिमम् १५ अश्मरीशर्करामूत्रकृच्छ्राघातरुजापहम् ॥७॥

अर्थ:- वायवर्ण्याची साल, सुंठ, गोखरू, जवखार, गूळ, यांचा काढा करून थंड झाल्यावर प्यावा. ह्मणजे मूत्राश्मरी, शर्करा, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात या रोगांचा नाश करितो.

गंधर्वहस्तबृहतीव्याघ्रीगोक्षुरकेक्षुरात् ॥ मूलं कल्कं पिबेद्दुग्धामधुरेणाश्मभेदनम् १६

अर्थ:- पांढरा एरंड, रिंगणी, डोरली, गोखरू, काळा ऊंस यांचीं मुळें गोडदुध्यांत वांटून प्यालीं असतां अश्मरीभेदक आहेत.

तिलापामार्गकदलीपलाशयवसंभवः ॥ क्षारः पेयो विमूत्रेण शर्करास्वश्मरीषु च ॥ १७ ॥

अर्थ:- तीळ, आघाडा, केळ, पळस, सातु यांचा खार मेंढीच्या मुत्रा बरोबर प्यावा. मूत्राश्मरी, मूत्रशर्करा यांवर प्रशस्त आहे.

क्वाथश्च शिग्रुमूलोत्थः कट्वीष्णोश्मरिपातनः ॥ क्षीरान्नमुद्गबर्हिशिखामूलं वा तंडुलांबुना १८

अर्थ:- शेवग्याचे मुळांचा काढा कोंबट, अश्मरी पाडणारा असा आहे तो प्यावा. अथवा मयूरशिखेचें मूळ तांदुळांचे धुणांत वांटून प्यावें. पथ्य दूधभात.

अश्मर्यां चाश्मरीकृच्छ्रे शिलाजतु समाक्षिकं ॥ यवक्षारं गोक्षुरं च खादेद्वा चाश्मरीहरम् १९

अर्थ:- अश्मरी आणि अश्मरीयुक्त मूत्रकृच्छ्र यांच्या ठायीं मधुयुक्त शिलाजीत खावा किंवा जवखार आणि गोखरू खावें.

हिंग्वेलाक्षीरसर्पिस्तक्रमूत्रशुक्राश्मयापहम् ॥

अर्थ:- हिंग, वेलदोडे, दूध आणि तूप हें एकत्र करून प्यालें असतां मूत्राश्मरी व शुक्राश्मरी यांचें नाशक आहे, असें जाणावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वरुणस्य तुलांक्षुण्णांजलद्रोणे विपाचयेत् ॥ पादशेषं प-
रिश्राप्य घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ २० ॥ वारुणी कदलीं बिल्वं
तृणजं पंचमूलकम् ॥ अमृतालशमजं देयं बीजं चत्रपुस-
स्यच ॥ २१ ॥ शतपर्वा तिलक्षारः पालाशः क्षार एव च ॥
यूथिकायाश्च मूलानि कर्षैकानि समर्पयेत् ॥ अस्य मा-
त्रां पिबेज्जंतु देशकालाद्यपेक्षया ॥ जीर्णे चानुपिबेत्सर्व-
मजीर्णे मस्तुमेव च ॥ अश्मरीं शर्करां चैव मूत्रकृच्छ्रं च नाश-
येत् ॥ २३ ॥

अर्थ- वायवर्णी ४०० तोळे कुटून १०२४ तोळे पाण्यांत शिजवावा. चतुर्थांश पा-
णी उरलें ह्मणजे गाळून घेऊन त्यांत ६४ तोळे तूप घालून शिजवावें. तूप शो-
षराहिलें ह्मणजे उतरून त्यांत करवीरणी, केळ, बेल, कुश, काश, ऊंस, शर, क-
सई, गुळवेल, शिलाजीत, कांकडीचें बीं, काळ्या दूर्वा, तिळांचा खार, पळसाचा
खार, ऊंई हीं सर्व एक एक तोळा घेऊन टाकावीं. नंतर काल देश शक्ति पाहू-
न त्याची मात्रा खावी. औषध जिरलें तर जें पाहिजे तें खावें. न जिरलें तर नु-
सत्या दह्यांचा मंड प्यावा. हें औषध अश्मरी मूत्रकृच्छ्र शर्करा यांचा नाश करि-

शुद्धसूतं द्विधागंधं श्वेतपोनर्नवैर्द्रवैः ॥ मर्दयित्वा दिनं रव-
ल्वे रुध्वा धौ भूधरे पचेत् ॥ २४ ॥ पाषाणभेदसंयुक्तं पिष्ट्वा
चूर्णं प्रकल्पयेत् ॥ भक्षयेदश्मरीं हंति रसः पाषाणभेदकः २५

अर्थ- शुद्ध पारा १ भाग गंधक २ भाग घेऊन पांढऱ्या पुनर्नव्याच्या रसांत
एक दिवस खलून भूधर यंत्रांत पक्व करावें. नंतर त्याच्या बरोबरीनें पाषा-
णभेद घालून एकत्र करून ठेवावें. शक्तीप्रमाणें खावें. ह्मणजे अश्मरी-
नाश करितें याला पाषाणभेदी रस असे ह्मणतात. इति पाषाणभेदीरसः

अथ प्रमेहमधुमेहपिटिकालक्षणोपः.

समक्रियत्वाद्विषमक्रियत्वान्महाक्रियत्वाच्च यथाक्रमंते
मज्जानमोजः पिशितं प्रदूष्य शरीरिणां विंशतिरेव मेहाः १

अर्थ- कांहीं मेह समक्रिय आणि कांहीं विषमक्रिय, आणि महाक्रिय अ-
से आहेत. ते क्रमें करून साध्य, याप्य, असाध्य असे होतात. वातादि दोषां-
नीं मज्जा, शुक्र, मांस दूषित होऊन मनुष्यास वीस प्रकारचे मेह उत्पन्न होतात.

दंतादीनां मलाढ्यत्वं प्राग्रूपं पाणिपादयोः ॥ दाहश्चिक-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

णतादेहेतृट्श्वासश्चोपजायते॥ सामान्यलक्षणंतेषां प्रभूताविलमूत्रता॥२॥

अर्थ॥ दांत मलयुक्त हातापायांची आग शरीरा चिकचिकीत तृषा, श्वास हें प्रमेहाचें पूर्वरूप आहे. आणि पुष्कळ गढूळ असें मूत्र हें त्याचें सामान्य लक्षण आहे असें जाणावें.

उदमेहस्तथाचेक्षुःसांद्रमेहःसुराभिधः॥ पिष्टप्रमेहः शीतारव्यः शुक्रारव्यः सिकताशनैः॥३॥ लालामेहस्तथाक्षारोनीलमेहोथकालकः॥ हरिद्रामेहमंजिष्ठोरक्तमेहस्तथापरः॥४॥ षोडशोथवसामेहोमज्जामेहःप्रकीर्तितः॥ क्षौद्रमेहस्तथाहस्तिमेहानांविंशतिःक्रमात्५

अर्थ॥ उदमेह १ उदकमेह १ इक्षुमेह २ सांद्रमेह ३ सुरामेह ४ पिष्टप्रमेह ५ शीतमेह, ६ शुक्रमेह ७ सिकतामेह ८ शनैर्मेह ९ लालामेह १० क्षारमेह ११ नीलमेह १२ कालकमेह १३ हरिद्रामेह १४ मंजिष्ठामेह १५ रक्तमेह १६ वसामेह १७ मज्जामेह १८ क्षौद्रमेह १९ हस्तिमेह २० या प्रमाणें वीस प्रकारचे मेह जाणे.

पूतिप्रमेहश्चघृतप्रमेहस्तक्रप्रमेहःखदिकाप्रमेहः॥ यथाभिधानंचतथैवलक्षणंबलक्षयंयातिनरस्यदेहः॥

अर्थ॥ पूतिप्रमेह १ घृतप्रमेह २ तक्रप्रमेह ३ खदिका प्रमेह ४ हे ही चार प्रकारचे आणखी प्रमेह आहेत. आतां उदमेहादिक जे प्रमेह सांगितले त्याचा नांवा प्रमाणेंच लक्षण जाणावें जसें इक्षुमेह यांमध्यें इक्षु हें नांव उंसाचें आहे. तर उंसाचे रसा सारखें शिश्नांतून पाणी पडतें म्हणून याला इक्षुमेह म्हणतात.

साध्याःकफोत्थादशपित्तजाःषट्याप्यानसाध्याःपवनाच्चतुष्काः॥६॥

अर्थ॥ कफापासून होणारे दाहा साध्य. पित्तापासून होणारे साहा ते याप्य. वायूपासून होणारे चार ते असाध्य.

गुदेबस्तिशिरस्यंसपृष्ठमर्मस्वचोत्थिताः॥ सोपद्रवादुर्बलाग्नेःपिटिकाःपरिवर्जयेत्७

अर्थ॥ गुद, बस्तिशिर, खांदे, पाठ, मर्मस्थान याठिकाणीं उत्पन्न झालेल्या आणि उपद्रव सहित आणि ज्याचा अग्नि दुर्बल त्याला झालेल्या अशा ज्या

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

प्रमेह पिटिका त्यांचे वर्जन करावें म्हणजे त्याला उपचार करूं नये। अ॰ स॰

त्रिफलादारुदार्व्यब्द काथः क्षौद्रेण मेहहा॥
गुडूच्याः स्वरसः पीतो मधुना सर्वमेहजित् ८॥

अर्थ- हिरडा बेहडा आंवळकाठी, देवदार दारुहळद, नागरमोथे यांचा काढा मधासहित अथवा गुळवेलीचा आंगरस मधासहित प्यावा। हा सर्व मेहांचा नाशक आहे।

फलत्रिकंदारुनिशाविशाला मुस्ताच निष्काथ्य निशासमेतं॥ पिबेत्कषायं मधुना प्रयुक्तं सर्वप्रमेहेषु समुत्थितेषु॥ ९॥ ७॥

अर्थ- हिरडा बेहडा आंवळकाठी, देवदार दारुहळद, आणि कडू वृंदावन वनागरमोथे यांचा काढा हळद आणि मध घालून सर्व प्रमेहांवर द्यावा॥ ७॥

रोध्राभयाकट्फलमुस्तकानां विडंगपाठार्जुनधन्वकानां॥
कदंबशाखार्जुनदीप्यकानां विडंगदार्वीघनशाल्मलीनां॥
चत्वार एते मधुना कषायाः कफप्रमेहेषु निषेवणीयाः १०॥

अर्थ- लोध्र हिरडा, कायफळ, नागरमोथे, वावडिंग, पहाडमूळ, अर्जुन, धमासा, कळंब, अर्जुन, ओंवा, वावडिंग, दारुहळद, नागरमोथे, कांटेशेंवरी, हे चार काढे मधाशीं युक्त कफप्रमेहावर सेवन करावे.

रोध्रार्जुनोशीरकुचंदनानामरिष्टसेव्यामलकाभयानां॥
धात्र्यर्जुनारिष्टकवत्सकानां नीलोत्पलाजाजिनिशार्जुनानां॥
चत्वार एते विहिताः कषायाः पित्तप्रमेहेषु मधुप्रयुक्ताः ११॥

अर्थ- लोध्र, अर्जुन, वाळा, पतंग, यांचा काढा; लिंब, वाळा, आंवळकाठी, हिरडा यांचा काढा, आंवळकाठी, अर्जुन, लिंब, कुडा यांचा काढा, काळें कमळ, जिरें, हळद, अर्जुन यांचा काढा हे चार काढे मधसहित पित्तप्रमेहावर द्यावे.

॥एलाशिलाजतुकणापाषाणविभेदनिर्मितं
चूर्णं॥तंदुलजलेन पीतं प्रमेहरोगं हरत्याशु १२॥

अर्थ- वेलदोडे, शिलाजीत, पिंपळी, पाषाणभेद यांचें चूर्ण तांदुळांचे धुवणाबरोबर प्यालें असतां प्रमेहाचा नाश लवकर करितें.

एलासकर्पूरशिलासधात्रीजातीफलंगोक्षुरशाल्मली च॥ सूतेंद्रवंगायसभस्मसर्वमेतत्समानं परिभावये-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ऋ१३गुडूचिकाशाल्मलिकाकषायैर्निष्कार्धमानंमधुना
नतश्च॥ बद्धावटीचंद्रकलेतिसंज्ञासर्वप्रमेहेषुनियोज-
येन्नाम्॥१४॥

अर्थ:- वेलदोडे, कापूर, शिलाजीत, आंवळकाठी, जायफळ, सरांदे, शेंवरी, पारा, कथिल, लोखंड यांचीं भस्में सर्व समान घेऊन गुळवेल, सांवरी यांचे काढ्याची भावना देऊन दोन मासे प्रमाणें गोळी मधाबरोबर सर्व मेहांवर द्यावी. हिला चंद्रकला असें ह्मणतात. ॥ इतिचंद्रकलावटी॥ ० ७॥ छ॥

गुडूचीरसमधुनावंगभस्मप्रमेहनुत्॥ नागभस्मतथै-
वापिसर्वमेहनिवारणं१५

अर्थ:- गुळवेलीचा रस, मध यांच्या बरोबर वंगभस्म प्रमेहनाशक आहे. तसें नागभस्म सर्व प्रमेहनाशक आहे.

वंगभस्ममृतंसूतंतुल्यंक्षौद्रेविमर्दयेत्॥द्वि
गुंजंलेहयेन्नित्यंहंतिमेहांश्चिरंतनान्॥१६॥

अर्थ:- वंगभस्म, पारदभस्म समभाग घेऊन मधांत रवलून दोन गुंजा प्रमाणें नित्य चाटावें तेणें करून फार दिवसांचा मेह जातो.

द्विनिशात्रिफलायुक्तंरात्रौपर्युषितंजलम्॥
प्रभातेमधुनापीतंमेहमूलंनिहंतिते॥१७॥

अर्थ:- दारुहळद, हळद, हिरडा, बेहडा, आंवळकाठी हीं कुटून रात्रीसा पाण्यांत भिजत घालून प्रातःकाळीं कुंवळून पाणी गाळून घेऊन त्यांत मध घालून प्यालें असतां मेहाचें मूळ छेदून टाकील.

श्यामाककोद्रवोद्दालगोधूमचणकादकी॥
कुलित्थाश्चहिताभोज्यापुराणामेहिनांसदा१८॥

अर्थ:- सांवे, कोद्रु, हरीक, गहूं, हरभरे, तुरी, हुलगे हीं धान्यें मेही मनुष्यास जुनीं हितकारक आहेत.

यथामृतारसःक्षौद्रयुक्तःसर्वप्रमेहजित्
हरिद्राचूर्णयुक्तोवारसोधात्र्याःसमाक्षिकः१९

अर्थ:- जसा गुळवेलीचा रस मधाशीं युक्त सर्व मेह जिंकणारा तसा हळदीचें चूर्ण आणि मध यांशीं युक्त आंवळ्यांचा रस आहे असें जाणावें.

क्षीरमौदुंबरंयत्नाद्वाकुंचंवाप्रयोजयेत्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥पिटिकासुसमस्तासु लेपनंसंप्रशांतये॥२०॥

अर्थ॥ उंबराचे चिकाचा किंवा बांवचीचे चिकाचा पिटिकाह्मणजे पुटकुळ्या त्यांवर लेप करावा. तेणें करून बऱ्या होतात.

॥न्यग्रोधोदुंबराश्वत्थशोनाकारग्वधासनम्॥आम्रंकपित्थंजंबूचप्रियालंककुभंधवम्॥२१॥मधूकंमधुकंरोध्रंवरुणंपारिभद्रकम्॥पटोलंमेषशृंगीचदंतीचित्रकमाढकी॥२२॥करंजत्रिफलाशाकभल्लातकफलानिच॥एतानिसमभागानिश्लक्ष्णचूर्णानिकारयेत्॥२३॥न्यग्रोधाद्यमिदंचूर्णंमधुनासहयोजयेत्॥फलत्रयरसंचानुपिबेन्मूत्रविशुद्धये॥२४॥एतेनविंशतिर्मेहामूत्रकृच्छ्राणियानिवा॥प्रशमंयांतिवेगेनपिटिकासुचयोजयेत्॥२५॥

अर्थ॥ वड, उंबर, पिंपळ, टेंटू, बाहावा, बिवळा, अंबा, कवठ, जांबूळ, चारोळी. अर्जुन, धावडा, मोह, ज्येष्ठमध, लोध्र, वायवर्णा, कडू लिंब, कडू पडवळ, मेढशिंगी, दांतिमूळ, चित्रक, तूर, करंज, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, कुडा, बिब्बा, हीं सर्व समभाग घेऊन बारीक चूर्ण करावें. याला न्यग्रोधाद्यचूर्ण असें ह्मणतात. हें मधाबरोबर योजावें. नंतर वर हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचा काढा मूत्र शुद्ध होण्या साठीं प्यावा. तेणें करून वीस प्रकारचे मेह, मूत्रकृच्छ्रें हीं लवकर शांत होतात. हें पिटिकांवर योजावें. इतिन्यग्रोधाद्यचूर्ण

सौवीरकंसुरांसूक्तंतैलंक्षीरंघृतंगुडम्॥
आम्लेक्षुरसपिष्टान्नानूपमांसानिवर्जयेत्॥१॥

अर्थ॥ बोरा मद्य, कांजी, तेल, दूध, घृत, गूळ, आंबट, उंसांचा रस, पिष्टान्न, जलप्रायदेशांतील मांस इनकें मेही याणें वर्ज करावें.

॥पलाशतरुपुष्पाणांक्वाथःशर्करयायुतः॥
॥निषेवितःप्रमेहाणिहंतिनानाविधान्यपि२॥

अर्थ॥ पळसाच्या फुलांचा काढा साखर घालून प्यालें असतां नाना प्रकारचे मेह नाशितो.

॥सजलंत्रिफलाकल्कंआतपेधारयेत्त्र्यहम्॥तद्भांडेद्रोलिप्तंत्रेचचणकान्मुष्टिमात्रकान्॥३॥अहोरात्रोषि-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तान्खादेद्वर्धमानंदिनेदिने॥ असाध्यंसाधयेन्मेहंसि-
द्धयोगउदाहृतः॥४॥

अर्थः- हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचें चूर्ण भांड्यांत भरून त्यांत पाणी घालून तीन दिवस उनांत ठेवावें. नंतर त्या भांड्यांत दोलायंत्रामध्यें सूतभर हरभरे अहोरात्र ठेवावे. नंतर खावे. ते हरभरे प्रतिदिवशीं वाढवीत जावे. या प्रमाणें केलें असतां असाध्य मेह बरा होईल हा सिद्धयोग सांगितला आहे.

॥ कर्कटीबीजसिंधूत्थत्रिफलासमभागिकं॥
॥ पीतमुष्णांभसाचूर्णंमूत्ररोधंनिवारयेत्५॥

अर्थः- कांकडीचें बीं, हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचें चूर्ण, सैंधव सर्व समभाग एकत्र कुटून ऊन पाण्याबरोबर प्यावें तेणें करून मूत्ररोधाचें निवारण होईल.

त्रिकटुत्रिफलामुस्तंगुग्गुलंचसमांशकम्॥ गोक्षुरक्वा-
थसंयुक्तांवटिकांकारयेद्बुधः॥६॥ देशकालबलापे-
क्षीभक्षयेच्चानुलोमिकाम्॥ नचात्रपरिहारोस्तिकर्म-
कुर्याद्यथेप्सितम्॥७॥ प्रमेहान्वातरोगांश्चवातशोणि-
तमेवच॥ मूत्राघातंमूत्रदोषंप्रदरंचापिनाशयेत्॥८॥

अर्थः- सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, नागरमोथे, गुग्गुळ हीं समांश घेऊन सरास्यांचे काढ्यांत गोळ्या करून देश, काल, बल पाहून भक्षण कराव्या. अनुलोमक आहेत. याला पथ्य नाहीं. यथेच्छ कर्म करावें. प्रमेह, वातरोग, वातरक्त, मूत्राघात, मूत्रदोष, प्रदर यांचा नाश करील.

मृतंसूतंमृतंवंगंमृतंलोहाभ्रकंसमम्॥ मर्दयेन्मधुना
सार्धंरसोयतालकेश्वरः॥९॥ माषैकंभक्षयेत्क्षौद्रेब-
हुमूत्रापनुत्तये॥१०॥

अर्थः- पारदभस्म, वंगभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, हीं मधांत खलावीं. याला तालकेश्वररस असें ह्मणतात. बहुमूत्राचे नाशार्थ मासाभर प्रमाणें मधांत खावें. इति तालकेश्वररसः॥७॥

शुद्धसूतंसमंगंधंवंगंचद्विगुणंभवेत्॥ एकत्रमर्दये-
त्सर्वंवल्लमेकंप्रमेहिणाम्॥११॥ शर्करामधुसंयुक्तंपथ्यं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

चक्षारवर्जितम्॥ एषवंगेश्वरोनामसर्वमेहनिकृंतनः॥१२

अर्थ- पारा १ गंधक १ वंग भस्म २ या प्रमाणें भाग घेऊन एकत्र खलून वालप्रमाण मध साखरे बरोबर प्रमेही याणीं खावें. पथ्य- खारट वर्ज. याला वंगेश्वर असें ह्मणतात. हा सर्व मेहांचा छेदक आहे. इति वंगेश्वरः॥७॥ ७

विषोषणकणाटंकहिंगूलैः समचूर्णकः॥
आनंदभैरवस्यास्यगुंजातीसारमेहनुत् १३

अर्थ- बचनाग, मिरें, पिंपळी, टांकणखार, हिंगूळ हीं समभाग घेऊन त्यांचें एकत्र चूर्ण करून ठेवावें. याला आनंदभैरव ह्मणतात. हा गुंजाप्रमाणमेह आणि अतिसार यांचा नाशक आहे. इत्यानंदभैरवः॥७॥इ॰प्र॰पि॰चि॰

अथमेदलक्षणोपचारः

अव्यायामदिवास्वप्नश्लेष्मलाहारसेविनः
मधुरान्नरसप्रायःस्नेहान्मेदोविवर्धते॥१

अर्थ- व्यायाम नकरणारा, दिवसास झोंप घेणारा, कफकारक, आहार सेवन करणारा, मधुररस प्रायः सेवन करणारा याचा मेद वाढतो. आणि स्नेहापासूनही मेद वाढतो.

मेदसावृतमार्गत्वाच्छुष्यंत्यन्येचधातवः॥
मेदस्तूचीयतेतस्मादशक्तःसर्वकर्मसु॥२

अर्थ- मेदानें अन्य धातूंचे मार्गांचा रोध होतो. तेणें करून अन्य धातु शुष्क होतात. आणि मेद वाढतो. ह्मणून सर्व कर्मांविषयीं मनुष्य अशक्त होतो.

फलत्रयंत्रिकटुकंसतैलंलवणान्वितम्॥
षण्मासमुपभुक्तंचेत्कफमेदोनिलापहं ३

अर्थ- हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरें, पिंपळी, तेल, सैंधव हीं सर्व एकत्र करून ६ महिने पर्यंत सेवन केलीं तर कफ, मेद, वायु यांचीं नाशक आहेत.

अस्वप्नंचव्यवायंचव्यायामंचिंतनानिच॥
स्थौल्यमिच्छन्परित्यक्तुंक्रमेणातिप्रवर्तयेत्४

अर्थ- थोडी झोंप, मैथुन, व्यायाम, चिंता हीं ज्याला स्थौल्य (स्थूलपणा) जावें अशी इच्छा असेल त्याणें क्रमें करून वाढवावीं.

व्योषाग्निमुस्तत्रिफलाविडंगंगुग्गुलुःसमम्॥खादन्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सर्वान्जयेद्व्याधीनामवातभवान्गदान्॥ क्षौद्रेणात्रिफ-
लाक्वाथःपीतोमेदोहरःस्मृतः॥५॥

अर्थ- सुंठ मिरें पिंपळी चित्रक नागरमोथे हिरडा बेहडा आंवळकाठी वा-
वडिंग, गुग्गूळ हीं समभाग एकत्र करून खावीं, तेणें करून सर्वी रोगांचा ज-
य होतो आणि आमा पासून झालेले रोग यांचा जय होतो मधा बरोबर हि-
रडा, बेहडा आणि आंवळकाठी यांचा काढा प्यावा तो मेदहारक आहे.॥ ७

शीतीभूतंतथोष्णांबुमेदोघ्नंक्षौद्रसंयुतम्॥
उष्णाभक्तस्यमंडंवापिबन्कृशतनुर्भवेत्॥६॥

अर्थ- ऊन पाणी थंड करून मध घालून प्यालें असतां मेदनाशक आहे. तसा
च भाताचा मंड उष्णा प्यावा ह्मणजे तनु कृश होते असें समजावें.

वासादलरसैर्लेपःशंखचूर्णावचूर्णितः॥बि-
ल्वपत्ररसोवापिगात्रदौर्गंध्यनाशनः॥७॥

अर्थ- अडूळशाचे पाल्याचा रस, शंखचूर्ण यांचा लेप अथवा बेलाच्या रसा-
चा लेप शरीराच्या दुर्गंधीचा नाशक आहे.

बब्बूलस्यदलैःसम्यक्वारिणापरिपेषितैः॥ गात्रमुद्व-
र्त्तयेत्पश्चाद्धरीतक्यास्कपिष्टया ८ भूयउद्वर्त्तनंकृत्वा
पश्चात्स्नानंसमाचरेत्॥ प्रस्वेदान्मुच्यतेक्षिप्रंततस्त्वे-
वंसमाचरेत् ९ जंबूदलार्जुनतरुप्रसवैःसकुष्ठैरुद्वर्त्त-
नंप्रकुरुतेप्रतिवासरंयः॥ प्रस्वेदबिंदुकणिकानिकरा
निषंगोदुर्गंधितावपुषितस्यपदंदधाति॥१०॥ ७॥

अर्थ- बाभळीचा पाला पाण्यांत वांटून अंगास चोळावा, नंतर हिरडा वांटू-
न चोळावा, नंतर स्नान करावें, घामापासून लवकर मुक्त होतो. नंतर या प्र-
माणें करावें. जांभळीचीं आणि अर्जुनवृक्षाचीं पानें, कोष्ठ कोलिंजन यांचें चू-
र्ण पाण्यांत वांटून जो प्रत्यहीं अंगास लावितो त्याच्या अंगास घाम, दुर्गंधी
ही रहात नाहींत.

त्रिफलातिविषामूर्वात्रिवृच्चित्रकवासकैः॥ निंबारग्व-
धषड्ग्रंथासप्तपर्णनिशाद्वयैः॥११॥ गुडूचींद्रयवाकु-
ष्ठाकुष्ठसर्षपनागरैः॥ तैलमेभिःसमंपक्वंस्करसादि-
रसप्लुतं॥१२॥ पानाभ्यंजनगंडूषनस्यबस्तिषुयोजि-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तम्॥ स्थूलतालस्यकंड्वादिजयेत्कफकृतान्नादान्॥१३॥

अर्थ- हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, अतिविष, मोरवेल, तेड, चित्रक, अडूळसा, कडूलिंब, बाहावा, वेरवंड, सांत्रिण, हळद, गुळवेल, इंद्रजव, पिंपळी, कोशकोलिंजन, शिरस, सुंठ ही औषधें आणि निर्गुंडी इत्यादिकांचे कफघ्न रस घालून तेल पक्क करून ठेवावें. तें पिणें, अंजन करणें, चूळ टाकणें, नस्य, बस्ति इतक्या प्रकारांनीं उपयुक्त केलें असतां स्थूळपणा, आळस, कंड इत्यादि कफाचे रोग जिंकील. इति त्रिफलादि तैलम्

शुद्धसूतंमृतंताम्रंतालंबोलंसमंसमम्॥ अर्कक्षीरैर्दिनं मर्द्यंक्षौद्रैर्लेह्यंद्विगुंजकम्॥१॥ वडवाग्निरसोनामस्थौल्यतुंदंनियच्छति॥ पलंक्षौद्रंपलंतोयमनुपानंपिबेत्सदा॥२॥

अर्थ- पारा, गंधक, ताम्रभस्म, हरताळ, रक्त्याबोळ, सर्व समभाग घेऊन रुचीचे चिकांत एक दिवस खलून मधाबरोबर दोन गुंजा चाटावा. याला वडवाग्नि रस असें ह्मणतात. हा स्थौल्यनाशक आहे. त्याच्यावर चार तोळे पाणी आणि चार तोळे मध एकत्र करून प्यावें. इति वडवाग्निरसः

अथोदरलक्षणोपचारः

रोगाःसर्वेपिमंदाग्नौसुतरामुदराणिच॥ अजीर्णान्मलिनैश्चान्यैर्जायंतेमलसंचयात्१ वातोदरंचैवजलोदरंचप्लीहोदरंबद्धगुदंतथैव॥ ॥

अर्थ- सर्व रोग मंदाग्नि असतां होतात. त्यांत उदरें तर विशेषतः होतात. तशीं अजीर्णापासून, मलिन पदार्थ भक्षणापासून व मलसंचयानें होतात. वातोदर, जलोदर, प्लीहोदर, बद्धगुद इत्यादिक.

कृशत्वमंदोदरवृद्धितंद्रारुचिर्मलाध्मानबलाग्निहानिः२

अर्थ- कृशपण, आंतडीं, पोट, यांची वृद्धि; तंद्रा, अरुचि, मलबद्धता, बल, अग्नि, यांची हानि हीं लक्षणें जाणावीं.

पीतंचोदकमेवंतु तस्माज्जातंजलोदरम्॥

अर्थ- मंदाग्नि असतां जर उदक प्यालें तर त्यापासून जलोदर होतें अ० जा०

उदरंसजलंयस्यवर्धतेश्वयथुस्तथा॥ हस्तपादौकृशौधूमःस्याज्जलोदरलक्षणं३॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- जलयुक्त पोट वाढतें, सूज, हात, पाय, बारीक होतात. आणि तोंडांतून धूर निघाल्या प्रमाणें होतें. हें जलोदराचें लक्षण जाणावें.

रेचनंवमनंकुर्यात्सर्वत्रपाचनानिच ॥ ७ ॥

अर्थ- सर्व उदरांवर रेचन, वमन आणि पाचन हें करावें.

विशालाशंखिनीदंतीत्रिवृन्नीलीफलत्रयं
निशाविडंगकंपिल्लुमूत्रेणोदरनुत्पिबेत् ॥ ४ ॥

अर्थ- कडू इंद्रायन, शेनवड, दांतिमूळ, तेड, नीळ, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, हळद, बावडिंग, कपिला, हीं सर्वी एकत्र कुटून गोमूत्राबरोबर उदरनाशार्थ प्या.

पयसाशृंगबेरांबुकषायोदारुवह्निजः ॥ च-
व्यमुस्तासमुत्थोवापेयोजठरशांतये ॥ ५ ॥

अर्थ- पाण्या बरोबर आल्याचा रस अथवा देवदार किंवा चित्रक यांचा काढा अथवा चवक, नागरमोथे यांचा काढा उदरनिवृत्तीसाठीं प्यावा. ७

प्लीहिनःपृष्ठदेशेतुरक्तस्रावंतुकारयेत् ॥

अर्थ- प्लीहावान् मनुष्याचे पाठीचें रक्त काढावें.

वामभागेभवेत्प्लीहागुल्मंवदनसन्मुखम् ॥ ६ ॥

अर्थ- प्लीहा डाव्या बाजूस असते. आणि गुल्म तोंडाचे समोर असतो ७

लवणंरजनीराजीप्रत्येकंपलपंचकम् ॥ चूर्णितंनिक्षिपे-
द्भांडेतत्रशतपलोन्मितम् ७ त्रिदिनंमुद्रितंरक्षेत्पश्चा-
त्संचपलंसदा ॥ पीत्वाविनाशयेत्प्लीहंत्रिःसप्ताहंनसंश-
यः ॥ ८ ॥

अर्थ- सैंधव वीस तोळे, हळद २५ तोळे, मोहऱ्या वीस तो० यांचें चूर्ण, नाक ४०० तोळे भांड्यांत घालून तोंड बांधून तीन दिवस ठेवावें. नंतर वीस तोळे प्रमाणें रोज प्यावें. स्ह० २१ दिवसांनीं प्लीहोदराचा नाश होईल, यांत संशय नाहीं. ॥ ७

समूलपत्रमेरंडंरुध्वाभांडेपुटेपचेत् ॥ त-
त्कर्षंपलगोमूत्रंपीतंप्लीहविनाशनम् ॥ ९ ॥

अर्थ- मूळें, पानें फळां एरंडाचें झाड भांड्यांत भरून तोंड बंद करून पुट देऊन पक्व करावें. नंतर कुटून एक तोळाभर घेऊन ४ तोळे गोमूत्राबरोबर प्यावें. हें प्लीहोदरनाशक आहे.

हरीतकीनागरदेवदारुपुनर्नवाच्छिन्नरुहांकषायः ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सगुग्गुलुर्मूत्रयुतश्चपेयः शोफोदराणांप्रवरः प्रयोगः॥१०

अर्थ- हिरडा, सुंठ, देवदार, घेंटोळी, गुळवेल यांचा काढा गुग्गुळ, गोमूत्र घालून प्यावा. हा शोफोदरावर श्रेष्ठ प्रयोग आहे.

रक्तस्त्रावेर्कदुग्धंचसैंधवंलेपयेत्तथा॥ अग्निदाहंचकुर्याद्वा प्लीहोदरहरंपरम्॥११॥

अर्थ- रक्तस्त्राव करून त्यावर रुईचा चीक, सैंधव यांचा लेप करावा. अथवा अग्निदाह म्हणजे डाग द्यावा. तो प्लीहोदरनाशक आहे असें जाणावें.

अंबुपानंदिवास्वापंगुर्वभिष्यंदिभोजनम्॥
व्यायामंचाध्वयानंचजठरीपरिवर्जयेत्॥१२॥

अर्थ- उदकपान, दिवसास झोंप, गुरु, चिकट असें भक्षण, व्यायाम, मार्ग चालणें इतकें उदरी असेल त्याणें वर्ज करावें.

सामुद्रशुक्तिकाक्षारोयवक्षारःससैंधवः॥
गोदध्नासंप्रयुज्येतसर्वोदरविनाशनः॥१३॥

अर्थ- समुद्रांतील शिंप्यांचा खार. जवखार. सैंधव हें गायीच्या दह्यां बरोबर खावें. हें सर्व उदरांचें नाशक आहे.

मूत्राण्यष्टावुदरिणांपानेसेकेप्रयोजयेत्॥
पिप्पलीवर्धमानंवापयसैवप्रयोजयेत्॥१४॥

अर्थ- आठ प्रकारचीं गोमूत्रादिक मूत्रें पिण्यास व धार धरण्यास उदरी यास योजावीं. अथवा वर्धमानपिंपळी दुधाबरोबरच योजावी.

उष्ट्रीक्षीरंपिबेज्जीर्णेनिरन्नोजठरामयी॥
पक्षंमासमृतुंवापिनचपानीयमाचरेत्॥१५॥

अर्थ- उंटिणीचें दूध जिरलें असतां उदरी याणें पक्ष किंवा मास ऋतु पर्यंत अन्न उदक सेवन न करितां प्यावें.

स्नेहस्वेदविरेकादिविधेयंप्लीहरोगिणाम्

अर्थ- स्निग्धोपचार, घाम काढणें, रेच इत्यादिक जो प्लीहरोगी त्यास करावें.

वामबाहोंचमोक्तव्याकूर्पराभ्यंतरेशिरा॥ विध्येत्प्लीहविनाशाययकृन्नाशायदक्षिणे॥१६

अर्थ- प्लीहनाशार्थ डावे हाताचीं कोंपराचे आंतील शीर टोंचावी. आणि यकृत्नाशासाठीं त्याच प्रमाणें उजवे हाताची शीर टोंचावी. ॥७॥ श्रीशः

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥अर्कपत्रंसलवणमंतर्धूमंविपाचयेत्॥ म-
॥स्तुनातंपिबेत्क्षारंप्लीहोदरहरंपरम्॥१७॥

अर्थ- रुइची पाने आणि सैंधव मडक्यांत घालून तोंड बंद करून जाळावें. तो खार दत्र्यांचे मंडाबरोबर प्यावा, अत्यंत प्लीहहारक आहे असें जाणा.

॥लवणंलाजिकाचूर्णंसमंगोमूत्रमिश्रितम्॥
॥त्रिशाणंहंतिपीतंचेद्यकृत्प्लीहोदराण्यपि१८॥

अर्थ- सैंधव, मोहऱ्या समभाग एकत्र करून कुटून गोमूत्राबरोबर एकतोळा प्यालें तर यकृत्प्लीहा आणि उदर यांचा नाश करिते.

॥पातव्योयुक्तितःक्षारःक्षीरेणोदधिशुक्तिजः॥
॥पयसावाप्रयोक्तव्याःपिप्पल्यःप्लीहनाशनाः१९॥

अर्थ- समुद्रांतील शिंप्यांचा खार दुधाबरोबर युक्तीनें प्यावा. अथवा दुधाबरोबर पिंपळ्या खाव्या त्या प्लीहनाशक आहेत.

॥भल्लातकाभयाजाजीगुडैश्चकृतमोदकः॥
॥सप्तरात्रान्निहंत्येषप्लीहानमतिदारुणं२०॥

अर्थ- बिब्बा, हिरडा, जिरें, गूळ, यांचा लाडू करून खावा. सात दिवसांत अतिदारुण प्लीहा नाशितो.

॥लशुनंपिप्पलीमूलमभयांचैवभक्षयेत्॥
॥पिबेद्गोमूत्रगंडूषंप्लीहरोगविमुक्तये॥२१॥

अर्थ- लसूण, पिंपळमूळ, हिरडा एकत्र कुटून खावें. वर गोमूत्राचा घोट प्यावा. त्याणें प्लीहरोग निवृत्त होईल.

॥यःसप्तरात्रंविलिपेत्क्षुधायाःक्षीरेणचूर्णंमृदितंकणायाः॥
॥लिह्यात्प्रकामंमधुरंचभुंक्तेतस्योदरव्याधिरुपैतिशांतिं२२॥

अर्थ- निवडुंगाचे चिकांत पिंपळ्या सात दिवस भिजत घालाव्या. नंतर त्यांचें चूर्ण करून खावें. वर मधुर आहार करावा. असें जो करील त्याचा उदररोग शांत होईल.

॥एरंडतैलंदशमूलमिश्रंगोमूत्रयुक्तंत्रिफलारजोवा॥नि-
॥हंतिवातोदरशोथशूलंक्वाथःसमूत्रोदशमूलजश्च॥२३

अर्थ- एरंड तेल दशमुळांच्या चूर्णांत मिश्र करून खावें. अथवा गोमूत्रांत हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचें चूर्ण खावें. अथवा दशमुळांचा काढा

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

गोमूत्रसहित प्यावा, ह्मणजे वातोदर, सूज, शूल यांचा नाश होतो असें जाणे

॥ द्वेपंचमूल्योत्रिवृतानिकुंभेससप्तलंचित्रकशिग्रुमूलम्
॥ कुरंटबीजंत्रिफलागुडूचीमेरंडमूलंमदयंतिकांच ॥२४॥
॥ पाठांसभार्ङ्गीसुषवींसुनीलांसरोहिषायासकुचेलिकां-
॥ च ॥ षष्ठ्यक्षसमाहृत्यपलंजलस्यद्रोणेपचेत्तच्चरणांश-
शेषम् ॥ घृतंहिपक्वंसकषायचक्रंनिहंतिपीतंसकलो-
दराणि ॥२५॥

अर्थ- दशमुळें, तेड, कुंभा, नेवाळी, चित्रक, शेवगा, पांढऱ्या कोहांटीचें बीं, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, गुळवेल, एरंडमूळ, मोगरीमूळ, पाहाडमूळ, भारंगमूळ, पिंपळी, काळा माका, रोहिस गवत, धमासा हीं चार चार तोळे घेऊन १०२४ तोळे पाण्यांत शिजवावीं. नंतर चतुर्थांश पाणी उरलें ह्मणजे गाळून घेऊन त्यांत तूप घालून पुनः पक्क करून पाणी आटलें म्हणजे तें तूप प्यावें सर्व उदरांचा नाश करितें ॥ इति सर्वोदरे दशमूल्यादि घृतम् ॥

वातोदरीपिबेत्तक्रंपिप्पलीलवणान्वितं ॥ शर्करामरिचो-
पेतंस्वादुपित्तोदरीपिबेत् ॥ १ ॥ यवानीसैंधवाजाजी-
व्योषयुक्तंकफोदरी ॥ सन्निपातोदरीतक्रंत्रिकटुक्षारसैं-
धवैः ॥ २ ॥ ७

अर्थ- वातोदरी असेल त्याणें पिंपळी, सैंधव यांणीं युक्त आंबट ताक प्यावें. आणि पित्तोदऱ्यानें साखर मिरें युक्त गोड ताक प्यावें. तसेंच ओंवा, सैंधव, जिरें, सुंठ, मिरें, पिंपळी, याणीं युक्त करून कफोदऱ्यानें ताक प्यावें. आणि सन्निपातोदरी असेल त्याणें सुंठ मिरें पिंपळी जवखार सैंधव याणीं युक्त ताक प्यावें

॥ पुनर्नवानिंबपटोलशुंठीतिक्तामृतादार्व्यभयाकषायः ॥
॥ सर्वांगशोथोदरकासशूलश्वासान्वितंपांडुगदंनिहंति ३

अर्थ- घेंटोळी, कडूलिंब, कडू पडवळ, सुंठ, किराईत, गुळवेल, दारुहळद, हिरडा यांचा काढा; सर्वांग सूज, उदर, कास, शूल, श्वास, पांडुरोग यांचा नाशक आहे ॥ इति पुनर्नवादिः ॥

॥ सूतभस्मवंगभस्मपलेकैकंप्रयोजयेत् ॥ मृतंताम्रंगंध-
कंचप्रत्येकंचपलंपलम् ॥ ४ ॥ अर्कक्षीरैर्दिनंमर्द्यंसर्वं
तद्गोलकीकृतम् ॥ रुध्वातद्भूधरेपक्वापुटैकेनसमुद्धरे-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

न्॥५॥एषवंगेश्वरोनामप्लीहगुल्मोदरंजयेत्॥घृतेर्गुं-
जाद्वयोलेह्योनिष्कश्वेतपुनर्नवैः६

अर्थ- पान्याचें भस्म ४ तोळे, वंगभस्म ४ तोळे, ताम्रभस्म ४ तो०, गंधक ४ तो०, घेऊन रुयीच्या चिकांत खलून गोळा करावा. नंतर भूधर यंत्रांत पक्व करून काढावा. याला "वंगेश्वर" असें ह्मणतात. प्लीह, गुल्म, उदर यांचा जय करील. घेंटोळीचें चूर्ण चार मासे आणि तूप यांच्याबरोबर दोन गुंजा प्रमाणें चाटावा. इति वंगेश्वरः

रसगंधकताम्राणिलोहमभ्रंविषंतथा॥टंकणंसर्जिका-
क्षारंदरदंचकपर्दिकम्॥१॥अर्कक्षीरेणखल्वेचवज्रिक्षी-
रेणभावयेत्॥निर्गुंडीभृंगराजेनचार्द्रद्रावेणभावयेत्२
गुल्मेजलोदरेरोगेशोथेपांडुक्षयेतथा॥शूलेविषूचिका-
यांचत्र्यनुपानैःप्रयोजयेत्॥३॥त्रैलोक्यडंबरोनामक-
थितोरोगशांतये॥वल्लुमात्रप्रमाणेनत्रिःसप्ताहंप्रदाप-
येत्॥४॥

अर्थ- पारा, गंधक, ताम्रभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, बचनाग, टंकणखार, सज्जीखार, हिंगूळ, कवडीचें भस्म हीं समभाग घेऊन रुई निवडुंग यांचा चीक, निर्गुंडी, माका, आलें यांचा रस त्यांच्या निरनिराळ्या भावना द्याव्या. त्याचें नांव त्रैलोक्यडंबररस. हा गुल्म, जलोदर, सूज, पांडु, क्षय, शूल, विषूचिका, यांचे ठायीं अनुपान योजून दोन गुंजा मात्रा एकवीस दिवस द्यावी. अथवा रोग शांत होईतोंपर्यंत द्यावी. इति त्रैलोक्यडंबररसः अत्रोदयमार्तंडोदेयः॥ यावर उदयमार्तंडहि योजावा. इत्यदरचिकित्सा.

अथशोफलक्षणोपचारः

सगौरवंस्यादनवस्थितत्वंसोत्सेधमूष्माचशिरातनुत्वं॥
सलोमहर्षांगविवर्णताचसामान्यलिंगंश्वयथोःप्रदिष्टं१

अर्थ- जडपणा, अनवस्थितपणा, उंचोटा, ऊष्मा, शिरा बारीक, रोमांच, वर्ण बदलणें हें सुजेचें सामान्य लक्षण सांगितलें आहे.

योमध्यदेशेश्वयथुःसकष्टःसर्वगश्चयः॥
अर्धांगोरिष्टभूतःस्याद्यश्चोर्ध्वंप्रतिसर्पति२

अर्थ- मध्यभागींजी सूज येते, आणि सर्वांगास जी येते ती कष्टसाध्य जा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

णावी। अर्धांगास येणारी आणि वरती चढणारी ती अरिष्टभूत जाणावी॥७

श्वासःपिपासाच्छर्दिश्चदौर्बल्यंज्वरएवच।
यस्यचान्नेरुचिर्नास्तिश्वयथुंतंविवर्जयेत्॥३॥

अर्थ- श्वास नाहान ओकारी दुर्बलपणा ज्वर अन्नावर अरुची असें ज्यामध्ये आहे तो श्वयथु म्हणजे सूज वर्ज करावा॥

अनन्योपद्रवकृतःशोफःपादसमुत्थितः॥
पुरुषंहंतिनारींतुसुरवजोगुह्यजोद्वयम्॥४॥

अर्थ- अन्यरोगाची उपद्रवभूत जी सूज नव्हे ती पायांस आली तर पुरुषास मारते, आणि मुखास आली तर स्त्रीला मारते. आणि गुह्यस्थानची सूज उभयतांस मारते॥

अन्यच्च॥०॥ स्त्रीणांतुमुखजःशोफःपुंसांपादगतस्तथा॥ असाध्योतोविजानीयाच्छोफिनोपरिवर्जयेत्॥५

अर्थ- स्त्रियांचे तोंडाला आणि पुरुषांचे पायांला जी सूज ती असाध्य, ते रोगी वर्ज करावे.

दारुगुग्गुलुशुंठीनांकल्कोमूत्रेणशोफजित्॥
गोमूत्रस्यप्रयोगोवाक्षिप्रंश्वयथुनाशनः॥६॥

अर्थ- देवदार, गुग्गुळ, सुंठ यांचें चूर्ण गोमूत्राबरोबर प्यालें असतां शोफ जिंकणारें आहे. अथवा केवळ गोमूत्र शोफनाशक आहे. (अथवा उदरांत सांगितलेला पुनर्नवादि काढा द्यावा).

कृष्णाग्निविश्वघनजीरककंटकारी पाठानिशाकरिक्रणामगधाजटानां॥चूर्णंकवोष्णसलिलेरवलोड्यपीतं नातःपरंश्वयथुरोगहरंनराणां॥७॥

अर्थ- निर्गुंडीचें बी, किंवा काळें तेड, चित्रक, सुंठ, नागरमोथे, जिरें, रिंगणी, पाहाडमूळ, हळद, पिंपळी, गजपिंपळी, जटामांसी यांचें चूर्ण मंदोष्ण पाण्यांत कालवून प्यावें या पेक्षां मनुष्यास शोफनाशक दुसरें औषध नाहीं॥७॥

त्रिफलाक्वाथपानंहिमहिषीसर्पिषासह॥
हंतिशोफंप्रमेहंचनाडीव्रणभगंदरम्॥८॥

अर्थ- हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, यांचा काढा महिषीचें तूप घालून प्यालें असतां सूज, प्रमेह, नाडी व्रण आणि भगंदर यांचा नाशक आहे अ. जा.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

न्यग्रोधोदुंबराश्वत्थप्लक्षवेतसवल्कलैः॥
ससर्पिष्कैः प्रलेपः स्याच्छोफनिर्वारणः परः॥९॥

अर्थ- वड, उंबर, पिंपळ पायरी, वेत यांच्या साली उगाळून तूप घालून लेप करावा. तो अत्यंत शोफनिवारक आहे.

गोधूमकणिकायुक्तं निर्गुंडीपत्रचूर्णकम्
पोलिकातिलतैलेन युक्ताशोफविनाशिनी॥१०

अर्थ- गव्हांची कणीक, निर्गुंडीच्या पाल्याचें चूर्ण यांची पोळी तिळांच्या तेलाशीं युक्त करून खावी. ही शोफनाशक आहे.

पुनर्नवादारुशुंठीसिद्धार्थं शिग्रुमेवच॥
पिष्ट्वाचैवारनालेन प्रलेपः सर्वशोफजित्॥११

अर्थ- घेंटोळी, देवदार, सुंठ पांढरे शिरस, शेवगा हीं वाटून कांजींत घालून लेप करावा. हा सर्व शोफ जिंकणारा आहे.

पुनर्नवाग्निनिर्गुंडीपलितैरंडजैर्दलैः॥स-
हाचरैर्जलंतप्तंतत्स्वेदः शोफहामतः॥ १२ ॥

अर्थ- घेंटोळी, चित्रक, निर्गुंडी, गुग्गुळ, एरंडाचीं पिकलीं पानें, कोहांटा हीं पाण्यांत घालून तें पाणी तापवावें. त्याचा वाफारा शोफनाशक आहे.॥ ७

कुटजार्कशिरीषाणांविदलैरंडनिंबजैः॥
पत्रैर्युक्तंजलंतप्तंतत्स्वेदोदुष्टशोफहृत्॥१३

अर्थ- कुडा, रुई, शिरस, काळें तेड, एरंडाचीं पानें, लिंबाचीं पानें हीं पाण्यांत घालून तें पाणी तापवून त्याचा वाफारा घ्यावा. तो दुष्टशोफ हारक आहे.

आर्द्रकस्वरसः पीतः पुराणगुडमिश्रितः॥अ-
जाक्षीराशिनांशीघ्रंसर्वशोथ्यहरोभवेत्॥१४

अर्थ- आल्याचा रस जुना गूळ घालून घ्यावा. आणि शेळीचें दूध सेवन करावें. ह्मणजे लवकर सर्व शोफ निवारण होईल.

सिंहोस्यामृतभंटाकीक्वाथंकृत्वासमाक्षिकं
कृच्छ्रशोथंजयेज्जंतुंकासंश्वासंज्वरंवमीं॥१५

अर्थः- अडूळसा, गुळवेल, डोरली यांचा काढा मधयुक्त घ्यावा. ह्मणजे कृच्छ्रशोफ, जंत, श्वास, कास, ज्वर, ओकारी यांतें जिंकील असें समजावें. ॥७॥

सेकस्तथार्कवर्षाभूनिंबक्वाथेनशोफजित्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

गोमूत्रेणाथकुर्वीतक्षारवोष्णेनावसेचनं १६

अर्थ- रुई घेंटोळी कडूलिंब, यांच्या काढ्याचा वाफारा अथवा मंदोष्ण गोमूत्रें करून सिंचन करावें तें शोफ जिंकणारें आहे॥

कृष्णापुराणपिण्याकंशिग्रुत्वक्सिकतातसी।
प्रलेपोन्मर्दनेयुंज्याल्क्षारवोष्णासूत्रकल्किताः १७

अर्थ- मिरें जुनी पेंड, शेवग्याची साल, सारवर, जवस हीं गोमूत्रांत वांटून किंचित् ऊन करून अंगाला चोळावीं. लेप करावा. सूजनाशक आहे अ० जा०

बिल्वपत्ररसःपीतःसोषणःश्वयथोरुजि॥
विट्संगेचैवदुर्नाम्निविषूच्यांकामलास्वपि १८

अर्थ- बेलाचे पानांचा रस प्यालें असतां सूज, मलबद्धता, मुळव्याध, विषूचिका, कावीळ यांचा शोषक आहे.

बीजपूरजटाहिंस्रादेवदारुमहौषधम्॥रा-
स्नाग्निमंथलेपोयंवातशोथविनाशनः॥१९॥

अर्थ- महाळुंगाचें मूळ, जटामांसी, देवदार, सुंठ, रास्ना, नरवेल यांचा लेप वायूचे शोफाचा नाशक आहे.

हिंगूलंजयपालंचमरीचंटंकणंकणा॥ संम-
र्द्यवल्गुःसघृतःसर्वशोफहरःपरः॥ २०॥

अर्थ- हिंगूळ, जेपाळ, मिरें, टांकणखार, पिंपळी यांचा एकत्र खल करून तुपाबरोबर वालभर खावें. सर्व शोफहारक आहे. इति शोफारिः

देयोदयमार्तंडस्त्रैलोक्याडंबरोथवा॥अ-
ग्निकुमारकोवात्रदेयःशोफविनाशनः॥१॥

अर्थ- उदयमार्तंड किंवा त्रैलोक्याडंबर किंवा अग्निकुमार शोफनाशार्थ द्यावा.

भल्लातकभवेशोफेसतिलाकृष्णामृत्तिका॥
नवनीततिलैर्लेपोथवादुग्धंतिलान्वितं॥२॥

अर्थ- बिब्याचा पासून आलेल्या सूजेवर तीळ काळी माती, अथवा लोणी तीळ किंवा दूध तीळ यांचा लेप करावा॥

बिभीतकानांफलमध्यलेपःसर्वेषुदाहार्तिहरःप्रशस्तः॥
यष्ट्याह्वमुस्तैःसकपित्थपत्रैःसचंदनैस्तत्सिटिकास्फुले
पः॥ ३॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- बेहेड्याच्या मगजाचा लेप सर्व सूज दाहा यांवर प्रशस्त आहे. आणि बिब्याचापासून सूज व पुटकुळ्या येतात त्यांवर ज्येष्ठमध, नागरमोथे, कंवठीचीं पानें आणि चंदन यांचा लेप करावा॥

पिष्टान्नमुष्णंलवणानिमद्यंमृदंदिवास्वप्नमजांगलंच
पयोगुडंतैलमथोगुरूणिशोफंजिघांसुःपरिवर्जयेत४

अर्थ- पिठाचें अन्न, उष्ण, खारट, मद्य, माती, दिवसास झोंप, रानांतलें नव्हे असें मांस, दूध, गूळ, तेल, गुरु (जड) पदार्थ, इतकीं शोफाचे नाशाची इच्छा करणारा याणें वर्ज करावीं. इति शोफचिकित्सा॥

अथांत्रवृद्धिमुष्कवृद्धिलक्षणोप॰
मुष्कोवंक्षणतःप्राप्यफलकोशाभिवाहिनीः
प्रपीड्यधमनीर्वृद्धिंकरोतिफलकोशयोः१॥

अर्थ- वायु अंडकोशाला वंक्षणाजवळ आणून त्या प्रत जाणाऱ्या धमनींला अत्यंत पीडा करून फलकोश म्हणजे अंडांतल्या गोळ्या त्यांची वृद्धि करि॰

मूत्रांत्रजावप्यनिलाद्धेतुभेदस्तुकेवलम्॥

अर्थ- मूत्रज आणि अंत्रज हे वायूपासूनच परंतु कारणमात्र निराळें आहे॥

अंत्रवृद्धिरसाध्योयंवातवृद्धिसमाकृतिः॥२॥

अर्थ- हा अंत्रवृद्धिरोग असाध्य. त्याचें वातवृद्धिरोगासारखें लक्षण आहे॥७

रास्नायष्ट्यमृतेरंडपटोलंरेणुकाबला॥ वृ-
षस्याक्वथितोवृद्धिंहन्याच्चित्रकतैलवान्३॥

अर्थ- रास्ना, ज्येष्ठमध, गुळवेल, एरंड, कडूपडवळ, मेंदी, चिकणा, अडूळसा, यांचा काढा, चित्रकाचें चूर्ण एरंडेल तेल याणीं युक्त करून प्यावा. तो अंत्रवृद्धीचा नाश करील.

तैलमेरंडजंपीत्वा बलासिद्धपयोन्वितम्॥
आध्मानशूलोपचितामंत्रवृद्धिंजयेन्नरः॥४॥

अर्थ- चिकण्याचे काढ्यांत एरंडेल घालून प्यावें. तेणें करून आध्मान, शूल याणीं युक्त जी अंत्रवृद्धि तिचा जय होईल॥

शंखोपरिचकर्णांतेत्यक्त्वासेवनिमादरात्॥
व्यत्यासाद्वाशिरांविद्ध्येदंत्रवृद्धिनिवृत्तये५॥

अर्थ- शंख म्हणजे गालाचा वरचा भाग त्याचे वर्ती कानाच्या जवळ सेवनी

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ह्मणजे सांधा सोडून शिरावेध करावा. तो व्यत्यासें करून ह्मणजे उजवेकडील अंत्रवृद्धि असली तर डावेकडील शिरावेध करावा. आणि डावेकडे असली तर उजवेकडे करावा. तेणें करून अंत्रवृद्धीची निवृत्ति होते असें जाणावें ॥७॥

कर्णकोशस्यमध्येतुरक्तांनिर्धारयेच्छिराम्॥
उभाभ्यांहृच्छिरावेद्ध्येतेनवातस्फरवंभवेत्६॥

अर्थ- कानाच्या पाळीच्या मधली लाल शिरा वेधावी. दोहीं कडून वृद्धि असेल तर दोन्ही कान्हांच्या शिरा वेधाव्या. तेणें करूनही स्फरव होईल.

अजाजीहपुषाकुष्ठंगोमयंबदरान्वितम्॥
कांजिकेनतुसंपिष्टंकुर्याद्वर्ध्मप्रलेपनं॥७॥

अर्थ- जिरें, थोर शेरणी, कोष्ठकोलिंजन, गायीचें शेण, बोर हीं कांजींत वांटून लेप करावा. तेणें करून वर्ध्म अंत्रवृद्धि याचा नाश होतो.

लाक्षाकरंजबीजंचशुंठीदारुसगैरिकम्॥कुंद-
रुंचसमंकृत्वाचूर्णयेन्मतिमान्भिषक्॥८॥
कांजिकेनतुसंपेष्यस्तथाश्वयथुनाशनः॥॥

अर्थ- लाख, करंजाची बी, सुंठ, देवदार, काव, कुंदा गवत हीं सर्व समान घेऊन त्यांचें चूर्ण करून कांजींत कालवून किंचित् ऊन लेप करावा. हा अंत्रवृद्धि व सूज यांचा नाशक आहे.

आर्द्रकस्यरसःक्षौद्रयुक्तोवृषणवातजित्९

अर्थ- आल्याचा रस मधासहित प्यावा. हा वृषणवात जिंकणारा आहे.॥७

फलत्रिकोद्भवंक्वाथंगोमूत्रेणैवपाचयेत्॥
वातश्लेष्मकृतंहंतिशोथंवृषणसंभवम्१०

अर्थ- हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचा गोमूत्रांत काढा करून प्यावा. वातकफापासून आलेला वृषणाचा शोफ याचा नाशक आहे.

रास्नामृताबलायष्टीगोकंटैरंडजःशृतः॥
एरंडतैलसंयुक्तोवृद्धिमंत्रभवान्जयेत्११

अर्थ- रास्ना, गुळवेल, चिकणा, ज्येष्ठमध, गोखरू, एरंडमूळ यांचा काढा एरंडेल घालून प्यावा. ह्मणजे अंत्रवृद्धि जिंकील.

गुग्गुलंरुबुतैलंवागोमूत्रेणपिबेन्नरः॥अं-
त्रवृद्धिंनिहंत्याशुचिरकालानुबंधिनीम्१२

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- गुग्गूळ किंवा एरंडेल तेल गोमूत्राबरोबर प्यावें. ह्मणजे फार दिवसांचा अंत्रवृद्धीचा नाश होतो.

॥ सक्षीरं वापिबेत्तैलं मांसमेरंडसंभवम् ॥ तैलं नारायणं योज्यं पानाभ्यंजनबस्तिषु ॥ १३

अर्थ- दुधाबरोबर एरंडेल तेल किंवा एरंड्यांचा मगज कढवून प्यावा. अथवा नारायण तेल पिणें, चोळणें आणि बस्ति याविषयीं योजावें.

पंचवल्कलकल्केन सघृतेन प्रलेपनम् ॥

अर्थ- वड, पिंपळ, उंबर, पायरी, नांदुरकी यांच्या साली वांटून त्यांत तूप घालून लेप करावा. अंत्रवृद्धिनाशक आहे.

पुनर्नवामृतादारुसक्षारलवणत्रयम् ॥ १४ ॥ कुष्ठंसटीवचामुस्तारास्नाकट्फलपुष्करम् ॥ यवानीहपुषाहिंगुशतावाहाचाजमोदकः ॥ १५ ॥ विडंगातिविषायष्टीपंचकोलकसंयुतैः ॥ एतैः कल्कसमैरक्षैस्तैलप्रस्थं विपाचयेत् ॥ १६ गोमूत्रंद्विगुणंदेयंकांजिकंचतथैवच ॥ पुनर्नवाद्यमेतत्तु बस्तौपानेतथोत्तमम् ॥ १७ ॥ कट्वूरुष्ठमेंद्रेषुकुक्षौचवृषणाश्रितम् ॥ कफवातोद्भवंशूलमंत्रवृद्धिंविनाशयेत् १८ ॥

अर्थ- घेंटोळी, गुळवेल, देवदार, मीठ, जवखार, बिडलोण, साजीखार, खारी मीठ, टाकणखार, सैंधव, कांचलवण, कोष्ठ कोळिंजन, कचोरा, वेरवंड, नागरमोथे, रास्ना, कायफळ, पोखरमूळ, ओंवा, शेरणी, हिंग, शतावरी, अजमोदा, वावडिंग, अतिविष, ज्येष्ठमध, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, आणि चित्रक या सर्वांबरोबर बेहेडे घेऊन सर्व ६४ तोळे तेलांत टाकून तें तेल कढवावें. नंतर त्यांत दुप्पट गोमूत्र आणि कांजी मिळवावी. याला पुनर्नवाद्य तेल म्हणतात. हें पिणें बस्ति या विषयीं योजावें. तेणें करून कंबर, पाठ, मांड्या, लिंग, कुशी, वृषण या ठिकाणच्या कफवातापासून झालेला असा शूल, अंत्रवृद्धि यांचा नाश होतो.

अंगुष्ठमध्यत्वक्छित्वादहेदंगविपर्ययम् ॥ वचासर्षपकल्केनप्रलेपः शोफनाशनः ॥ १९ ॥

अर्थ- पायांच्या आंगठ्याच्या मधोमध लग्नभेद होईल तोंपर्यंत डाग द्यावा. तो विपर्ययानें उजवेकडे, वृद्धि असली तर डावे आंगठ्याला याप्रमाणेंच

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वेरवंड आणि शिरस वांटून त्यांचा लेप करावा हा शोफनाशक आहे अथ सम-

पिप्पलीजीरकंकुष्ठंबदरंशुष्कगोमयम्॥कां-
जिकेनप्रलेपोयमंत्रवृद्धिविनाशनः॥२०॥

अर्थ- पिंपळी जिरे कोष्ठकोलिंजन बोर वाळलेले शेण यांचा लेप ही कां-
जीत घालून करावा हा अंत्रवृद्धिनाशक आहे.

देवदारुमिसीवासाटंकलीमूलसैंधवैः॥क्षौ-
द्रयुक्तैश्चतेर्लेपोवृद्धिमंत्रभवाञ्जयेत्॥२१॥

अर्थ- देवदार बडीशोफ अडूळसा टंकळीचें मूळ सैंधव यांचा लेप अंत्रवृ-
द्धीला जिंकील॥

दार्वीचूर्णंगवांमूत्रैर्निपीतंमुष्कवृद्धिजित्॥

अर्थ- दारुहळदीचें चूर्ण गोमूत्रा बरोबर प्यालेनर अंडवृद्धि जिंकणारें आहे.

वेगाहतंपृष्ठयानंव्यायामंमैथुनंतथा॥अ-
त्यशनमथाध्वानमुपवासंपरित्यजेत्॥२२॥

अर्थ- वेगानें मारणें किंवा घाव मारणें घोड्याच्या पाठीवर बसून जाणें
व्यायाम आणि मैथुन करणें अतिखाणें मार्ग चालणें उपास करणें इत-
कीं अंत्रवृद्धीचे रोग्यानें वर्ज करावीं. इति अंत्रवृद्धि चिकित्सा समाप्ता॥७

अथकुरंडलक्षणोपचारः

अत्यभिष्यंदिगुर्वम्लसेवनान्निचयंगतः॥क-
रोतिग्रंथिवच्छोफंदोषोवंक्षणसंधिषु॥१॥

अर्थ- अति अभिष्यंदि ह्मणजे पडसें आणणारीं दहीं काकवी वगैरे जडव
आंबट यांच्या सेवनानें वृद्धि पावलेला असा दोष वंक्षण संधीचे ठायीं ग्रंथी
प्रमाणें शोफ उत्पन्न करितो. त्याला कुरंडवळ असें ह्मणतात. ॥७॥श्रीः

वातकोपिभिराहारैःशीततोयावगाहनैः॥धारणोरणभा-
षाध्वविषमांगप्रवर्तनैः॥२॥क्षोभणैःक्षभितश्चान्यैःक्ष-
द्रांत्रावयवंयदा॥पवनोविगुणीकृत्यस्वनिवेशादधोन-
येत्॥३॥कुर्याद्वंक्षणसंधिस्थोग्रंथ्याभंश्वयथुंतदा॥
ज्वरशूलांगसादाद्यंतंवर्ध्मेतिनिर्दिशेत्॥४॥७॥

अर्थ- वातकोप करणारें आहार थंड पाण्यांत बुडी मारणें भार घेणें फेंकणें
बोलणें चालणें यांचे ठायीं वेडें वांकडें आंग करणें या कारणांनीं आणि दु-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

सन्या वायुस्रोमक कारणांनीं क्षुभित झालेला वायु बारीक आंतड्यांचे अवयव वेगळे करून स्वस्थानापासून खालीं नेऊन वंक्षण संधिगत होणारा आणि ग्रंथीसारखा शोफ उत्पन्न करतो. ज्वर, शूल, कृशपणा याणीं युक्त असतो. तेव्हां त्याला वर्ध्म असें ह्मणावें.

इंद्रवारुणिकामूलं तैलं पुष्करजं तथा ॥ संम-
र्द्यचसगोदुग्धं पिबेज्जंतुः कुरंडके ॥ ५ ॥ ७

अर्थ- इंद्रावनाचें मूळ एरंड तेलांत मिश्र करून गायीच्या दुधा बरोबर प्यावें हें कुरंड रोगावर प्रशस्त आहे.

गवांघृतेन संयुक्तं कृत्वा सैंधवचूर्णकम् ॥ पि-
बेत्सप्तदिनं यावत्तावल्लेपः कुरंडके ॥ ६ ॥ ७

अर्थ- गायीच्या तुपामध्यें सैंधवाचें चूर्ण घालून तें सात दिवस प्यावें. आणि तितकेच दिवस कुरंडावर लेप करावा.

संचूर्णितं सैंधवमाज्ययुक्तं संमर्द्य तोयस्थितमेव सोष्णं
मुहुर्मुहुर्यः कुरुते प्रलेपं विलीयते तस्य कुरंडरोगः ॥ ७ ॥

अर्थ- सैंधवाचें चूर्ण, तूप हीं पाण्यांत खलून किंचित् उष्णा करून वारंवार लेप करावा. तेणें करून कुरंडरोग नाश पावतो.

एरंडतैलसंमिश्रं कासीसं सैंधवं पिबेत् ॥ व-
स्त्रेण वृषणं बध्वा कुरंडज्वरनाशनम् ॥ ८ ॥

अर्थ- एरंडेल तेलांत सैंधव आणि हिराकस मिश्र करून प्यावें. आणि वृषण वस्त्रानें घट्ट बांधावा. तेणें करून कुरंडज्वराचा नाश होतो असें जाणा.

तंदुलवारिविमिश्रं घृतपूरसंज्ञमुच्यते लोके ॥
तन्मूलपिष्टलेपं कुरंडगलगंडयोः कुर्यात् ॥ ९

अर्थ- तांदळांचे धुणांत चोपड्या करंज्याचें मूळ उगाळून त्याचा लेप कुरंड आणि गंडमाळा यांवर करावा.

ईश्वरीमूलमेरंडमूलमूषकचर्मच ॥ प्रलेपः
स्यात्कुरंडाख्यरोगविच्छेदकारकः ॥ ॥ १० ॥

अर्थ- वांझ कर्टोलीचें मूळ, एरंडमूळ, उंदराचें कातडें हीं एकत्र वांटून त्याचा लेप करावा. हा कुरंडनाशक आहे.

रूपेषितं ब्राह्मणयष्टिकायामूलं समं तंदुलधावनेन ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

निर्हंतिलेपाद्गलगंडमालांकुरंडमुख्यानखिलान्विकारान्॥११

अर्थ- भारंगमूळ तांदुळांचे धुणांत बारीक गंधासारखें उगाळून, गंडमाळा, कुरंड यांवर लेप करावा. म्हणजे त्यांचा नाश करील.

वातारितैलमृदितंस्फरवारुणीजंमूलंनरःपिबतियोम-
स्नुणांविचूर्ण्य॥गव्ये निधायपयसित्रिदिनावसानेत-
स्यप्रणश्यतिकुरंडकृतोविकारः॥१२

अर्थ- एरंडेल तेलांत लघुवृंदावनाचें मूळ बारीक खलून गाईच्या दुधा-बरोबर तीन दिवस प्यावें. म्हणजे कुरंडरोगाचा नाश होईल. असें सम०

॥तरुमूषिकचर्मणानिबद्धःप्रविलेपाद्यचेश्वरीजरायाः॥
॥उपशांतिमुपैतिमानवानामचिरेणैवकुरंडसंज्ञरोगः॥१३

अर्थ- उंदीरकानीची साल बांधावी, किंवा वांझ कर्टोलीचें मूळ उगाळून लेप करावा. म्हणजे कुरंडरोग लवकर शांत होतो.

॥यःपित्तदोषेणकुरंडरोगोभवेच्छिशोर्दक्षिणमुष्कभागे॥
॥तस्योर्ध्वभागंश्रवणस्यविध्येद्वामस्यवामप्रभवेपरस्य॥१४॥

अर्थ- जो पित्तदोषानें मुलांचे उजवे बाजूस अंडावर कुरंडरोग होतो त्याच्या डाव्या कानावरची, डावे बाजूस असला तर उजवे कानावरची शीर वेधावी. इ० कु०

॥अथगंडमालापचीग्रंथ्यर्बुदलक्षणो०
विवृद्धःश्वयथुर्यस्यमुष्कवल्लंबतेगले॥महा-
न्वायदिवाह्रस्वोगलगंडंतमादिशेत्॥१॥

अर्थ- जो वाढलेला शोफ अंडा प्रमाणें गळ्याचे ठायीं लोंबतो तो मोठा असो किंवा लहान असो त्याला गलगंड असें ह्मणतात.

॥कर्कंधुकोलामलकप्रमाणैःकक्षांसमन्यागलवंक्षणेषु
॥मेदःकफाभ्यांचिरमंदपाकैःस्याद्गंडमालाबहुभिश्चगंडैः॥२

अर्थ- क्षुद्र बोर, मोठें बोर, आंवळा या प्रमाणांचे; कारव, खांदे, मान, गळा, वंक्षण यांचे ठायीं मेद आणि कफ यां पासून जे ग्रंथी ओळीनें उत्पन्न होतात आणि त्यांचा थोडा चिरकालें करून पाक होतो त्याला गंडमाला असें ह्मणतात.॥

॥तेग्रंथयःकेचिदवाप्तपाकाःस्रवंतिनश्यंतिभवंतिचान्ये॥
॥कालानुबंधंचिरमादधातिसैवापचीतिप्रवदंतिकेचित्॥३॥

अर्थ- पूर्वी सांगितलेले जे ग्रंथी ते कांहीं पिकतात कांहीं एक पाझरतात, कांहीं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

नष्ट होतात. कांहीं नवे उत्पन्न होतात आणि फार दिवस पर्यंत असतात त्याना कोणी अपची ह्मणतात.

वातादयोमांसमसृक्प्रदूष्यसंदूष्यमेदश्चतथाशिराश्च॥
वृत्तोन्नतंविग्रथितंचशोफंकुर्वंत्यतोग्रंथिरितिप्रदिष्टः ४

अर्थ- वातादिदोष, मांस, रक्त, मेद, शिरा यांतें दूषित करून वाटोळा उंच विशेष घट्ट शोफ उत्पन्न करतात. म्हणून त्या रोगाला ग्रंथि असें ह्मणतात.॥७

गात्रप्रदेशेक्वचिदेवदोषाःसंदूषितामांसमसृक्प्रदूष्य॥
वृत्तंस्थिरंमंदरुजंमहांतमनंतशूलंचिरवृद्धिपाकम्॥कु
र्वंतिगाढोच्छ्रयमांसगाढंतमर्बुदंशास्त्रविदोवदंति॥५

अर्थ- दूषित झालेले वातादि दोष मांस रक्त यांतें दूषित करून क्वचित् गात्र, प्रदेशाचे ठायीं वाटोळा, स्थिर, दाबलें असतां किंचित् दुखणारा, मोठा, फार शूलयुक्त, चिरकालानें वाढणारा आणि पिकणारा, उंचोटा आणि मांस ज्यांत पुष्कळ अशा रोगाला अर्बुद असें ह्मणतात.

तुंबीरसेनकटुकेनचतुर्गुणेनकल्कीकृतेर्मगधजादिग-
णौषधैश्च॥तैलंशृतंहरतिदेहिषुगंडमालामत्कल्बणा-
मपिगलेगलगंडरोगान् ६॥

अर्थ- चौपट कडू भोपळ्याचा रस त्यांत एकपट मगधजादि (ह्मणजे पिप्पल्यादि) गणोक्त औषधें वांटून त्या कल्काबरोबर तेल कढवून गंडमाला, गलगंड यांवर लावलें असतां त्यांचा नाश करील.

सर्षपाशिग्रुबीजानिषणबीजातसीयवाः॥मूलकस्य
चबीजानितक्रेणाम्लेनपेषयेत्॥७॥गंडानिग्रंथय-
श्चैवगंडमालास्तथैवच॥आलेपात्तेनशाम्यंतिविलयं
यांतिवाचिरात्॥८॥७॥

अर्थ- शिरस, शेवग्याचें बीं, तागाचें बीं, सातु, जवस, मुळ्याचें बीं हीं आंबट ताकांत वांटून लेप करावा. म्हणजे गलगंड, ग्रंथि, गंडमाला हे रोग शांत होतात. अथवा नाश पावतात.

सर्षपारिष्टपत्राणिदंतिभल्लातकैःसह॥
छागमूत्रेणसंपिष्टमपचीघ्नंप्रलेपनम्॥९॥

अर्थ- शिरस, कडूलिंबाचीं पानें, दांतिमूळ, बिब्बा हीं बोकडाचे मुतांत वांटून

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

लेप करावा हा अपचीनाशक आहे.

जलकुंभीकजंभस्मपङ्कं गोमूत्रगालितम्
पिबेत्क्षोद्रवतक्राशीगलगंडनिवृत्तये॥१०॥

अर्थ:- कांटेशेवतीची राख गोमूत्रांत घालून शिजवावी. नंतर तें गोमूत्र गाळून प्यावें. आणि हरकांचा भात आणि ताक हें पथ्य करावें. तेणें करून गलगंड निवृत्ति होते.

व्योषंविडंगंमधुकंसैंधवंदेवदारुच॥ तैलमे-
भिःशृतंनस्यात्कृच्छ्रामप्यपचींजयेत्॥११॥

अर्थ:- सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, ज्येष्ठमध, सैंधव, देवदार हीं औषधें घालून कढलेल्या तेलाचें नस्य केलें असतां मोठा कठिण जरी अपची रोग असला तरी त्यास जिंकील.

पश्चात्क्षारेणसंशोध्यव्रणवत्समुपाचरेत्
क्षाराग्निभ्यांदहेच्चापिस्वेदैश्चविविधैर्जयेत्१२

अर्थ:- नस्य केल्यानंतर क्षार लावून धुवावें. आणि व्रणाप्रमाणें उपचार करावा. अथवा क्षारानें किंवा अग्नीनें जाळावें. किंवा नानाप्रकारचे स्वेद देऊन जिंकावा.

इभांडसदृशंमेदोदृत्वाचाग्निंप्रयोजयेत्॥
जयेद्बिद्रधिवत्सूर्वमर्बुदंदहनादिभिः॥१३॥

अर्थ:- हत्तीचे अंडाप्रमाणें मेद काढून डाग द्यावा आणि बिद्रधि प्रमाणें डागादीक उपचार करून अर्बुद रोग जिंकावा.

क्षुद्रकुंदरीविपक्वंतुक्षणातैलंवरंध्रवम्॥निं-
बाश्वमारनिर्गुंड्याचाभ्यंगान्नाशयेन्नृणां१४

अर्थ:- राळेच्या तेलांत चुचुंद्री तळावी आणि तें तेल लावावें. किंवा कडूलिंब, कण्हेर, निर्गुंडी याणीं सिद्ध केलेलें तूप चोळावें तेणें करून गंडमालादिरोग बरे होतात.

कुलित्थंमरिचंहिंगुसजलंगंडपाचनम्॥

अर्थ:- हुलगे, मिरें आणि हिंग हीं पाण्यांत वांटून त्यांचा पेंड गंडमालांवर बांधावा म्हणजे त्या पिकतात.

विष्णुक्रांताचपेटारीकांजिकेनसुपेषिता१५

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

कालस्फोटं हरेल्लेपादन्यग्रंथिषु का कथा॥ ७॥ श्रीशः॥

अर्थः- विष्णुक्रांत आणि पेटारी म्हणजे चक्रमेंडा हीं दोन कांजींत वांटून त्यांचा लेप करावा. म्हणजे काळपुळीचा देखील नाश करील. मग इतर ग्रंथींची कथा काय आहे!!

पुत्रजीवस्य मज्जांतु जलेपिष्ट्वा प्रलेपयेत् १६
कालस्फोटं विषस्फोटं सद्यो हन्यात्सवेदनम्
कक्षाग्रंथिं गलग्रंथिं कर्णग्रंथिं च नाशयेत् १७

अर्थः- पुत्रजीव वृक्षाचा नार पाण्यांत उगाळून लेप करावा. तो काळपुळी, विषाचा फोड हे वेदनायुक्त असले तरी तात्काळ त्यांचा नाश करितो आणि कांखमांजरी, गळा, मान या ठिकाणच्या ग्रंथींचा नाश करितो. असें जाणावें.

सर्वेषामेव ग्रंथीनां रक्तस्रावः प्रशस्यते॥ गदार्कदुग्धतालेन जेपालेन विनाशयेत्॥ १८

अर्थः- सर्व ग्रंथीचे ठायीं रक्तस्राव प्रशस्त आहे आणि कोष्ठ कोलिंजन, रुईचा चीक, हरताळ आणि जेपाळ यांच्या लेपानें सर्व ग्रंथि नाश पावतात. ७

गंधकं सूतकं तुल्यमर्कक्षीरं ससैंधवम्॥ पिष्ट्वा च कांचनीमूलं लेपो यं गंडमालिके॥ १९

अर्थः- पारा, गंधक, समान रुईचा चीक, सैंधव आणि कांचनीचें मूळ यांचा लेप गंडमालेवर करावा.

पिष्ट्वा जेपालपत्राणि स्वरसेन कृतावटी॥ छायाशुष्का ततो लेपाद्गंडमाला विनश्यति॥ २०

अर्थः- जेपाळाचीं पानें वांटून त्यांच्या आंगरसाची वडी सावलींत वाळवून तिचा लेप केला असतां गंडमाळा नष्ट होते.

राजिकालशुनं पेष्य लेपोत्हृद्गलग्रंथिकाः॥

अर्थः- मोहऱ्या, लसून एकत्र वांटून लेप, गळा या ठिकाणचे ग्रंथींवर लेपक.

भल्लातकासीसहुताशदंतीमूलैर्गुडस्नुक्करविदुग्धदिग्धैः॥ लेपे कृते गच्छति गंडमाला समीरवेगादिव मेघमाला॥ २१॥

अर्थः- बिब्बा, हिराकस, चित्रकमूळ, दांतिमूळ, गूळ, निवडुंगाचा चीक, रुईचा चीक हीं एकत्र खलून लेप केला असतां गंडमाळा जाते. ज-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

शी वायूच्या वेगानें मेघमाला जाते.

॥अलंबुषायाः स्वरसः पीतोद्विपलमात्रया॥
॥अपच्यागंडमालानां कामलायाश्च नाशनः॥२२॥

अ० लाजाळूचा स्वरस प्यालें असतां अपची, गंडमाला, व कामला यांचा नाशक आहे.

कांचनारत्वचः क्वाथः शुंठीचूर्णेन नाशयेत्॥
गंडमालांतथा क्वाथः क्षौद्रेण वरुणत्वचः॥२३॥

अर्थ- कांचनाच्या सालीचा काढा शुंठीच्या चूर्णाशीं युक्त करून प्यावा. तसाच वायवर्ण्याचे सालीचा काढा मधाशीं युक्त करून प्यावा. म्ह० गंडमा० नाशा करी०.

जलेन पेषयेत्तुल्यं कांचनं चित्रकं वृषं॥ सप्ताहं लेपयेत्तेन सर्व-
जा गंडमालिकाः॥२४॥ स्फुटंति नात्र संदेहः स्फोटे लेपमिमं कुरु॥

अर्थः- कांचनीमूळ, चित्रक, अडूळसा, हीं सर्व समभाग घेऊन पाण्यांत वांटून त्याचा सात दिवस लेप केला असतां सर्व दोषांपासून झालेल्या गंडमाळा फुटतात. यांत संशय नाहीं. हा लेप फोडांवरही करावा.

वत्सनाभं निंबुनीरं लेपाद्गंडं विनश्यति॥२५॥

अर्थः- बचनाग आणि लिंबाचा रस यांच्या लेपानें गंडमालेचा नाश होतो.

॥निजद्रवेण संपिष्टं मुंडीमूलं प्रलेपयेत्॥ गंड-
॥मालाक्षयं याति तद्द्रवं च पिबेत्पलम्॥२६॥

अर्थः- गोरखमुंडीच्या रसांत तिचेंच मूळ वांटून लेप करावा आणि चार तोळे रस प्यावा. तेणें करून गंडमाळांचा क्षय होतो.

ब्रह्मदंडीयमूलं तु पिबेत्तंदुलवारिणा॥ स्फु-
टितां हंति लेपेन गंडमालान्न संशयः॥२७॥

अर्थः- ब्रह्मदंडी (ऊटकटारी) चें मूळ तांदुळांचे धुणांत उगाळून प्यावें आणि लेप करावा. म्हणजे फुटलेल्या गंडमाळांचा नाश करितो असें समजावें.॥७

षट्पलं व्योषचूर्णं च त्रिफलाच पलत्रयम्॥ कांचनारत्व-
चाचूर्णं योजयेद्द्वादशं पलम्॥२८॥ गुग्गुलुः सर्वतुल्यः
स्यात्सर्वमेकत्र कुट्टयेत्॥ क्षौद्रं पलशतं देयं गुडिकां कर्ष-
संमिताम्॥२९॥ भक्षयेद्गंडमालार्त्तो गलग्रंथींश्च नाशयेत्

अर्थः- शुंठ, मिरें, पिंपळी यांचें चूर्ण २४ तोळे. हिरडा, बेहडा, आंवळा काढी यांचें बारा तोळे, कांचनाच्या सालीचें ४८ तोळे. गुग्गुळ ८४ तोळे घेऊन सर्व कुटून

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

एकत्र करावें. नंतर ४०० तोळे मधांत गोळ्या एक तोळा बचनागाच्या कराव्या. आणि एक एक खावी, म्हणजे गंडमाला, गलगंड यांचा नाश करील. इ. त्रि. क.

अजमोदाचसिंदूरंहरितालंनिशाद्वयम्॥ क्षारद्वयंफेनयुतंसाधकंसरलोद्भवम्॥३०॥ इंद्रवारुण्यपामार्गकदलीकंदकैःसमैः॥एभिःसार्षपकंतैलमजामूत्रप्रयोजितं३१ मृद्वग्नौपाचयेदेतत्तुल्यार्कक्षीरमिश्रितम्॥ अजमोदादिकंतैलंगंडमालांव्यपोहति॥३२॥ आमांविदग्धांतुपचेत् पक्वांचैवविशोधयेत्॥ रोपणंमृदुभावंचतैलेनानेनकारयेत्३३॥

अर्थ- ओंवा, शेंदूर, हरताळ, दारुहळद, हळद, जवखार, सज्जीखार, समुद्रफेण, खणा, विशेषनामक धूप, कंवडळ, आघाडा, केळीचा कांदा हीं सर्व समभाग घेऊन तेलांत टाकून त्यांत शेळीचें मूत्र, निवडुंगाचा चीक, रुईचा चीक घालून मंदाग्नीवर पक्व करावें. याला अजमोदादितैल असें म्हणतात. हें गंडमालानाशक आहे. अपक्व असली तर पोटीस बांधून पिकवावी. आणि पिकली असली तर दर्द काढून शुद्ध करावी नंतर भरून येणें आणि मऊपणा हा ह्या तेलानें आणावा. इति अजमोदाद्यं तैलम्

गंधकंटंकणंसिंधुकांचनीनवसारकम्॥ सौवर्चलंयवक्षारंकाचंरक्तंसुवर्चलम्॥३४॥ शीतंरक्तंचपाषाणंमूषकोत्थंनियोजयेत्॥जेपालबीजमज्जाचसमंजंबीरपीडितं॥३५ शस्त्रैःछिन्नाप्रदातव्यंवेष्ट्यमेरंडपत्रकैः॥ एवंत्र्यहात्स्फुटंत्येवदध्यन्नंदापयेत्ततः॥ गंडमालापचीग्रंथिर्बहिर्निर्यातिनान्यथा३६

अर्थ- गंधक, टांकणखार, सैंधव, हळद, नवसागर, पादेलोण, जवखार, बांगडखार, शेंदूर, सज्जीखार, कापूर खैर, लकड्या पाषाणभेद, उंदीरकानीचीसाल, जेपाळाचा मगज हीं सर्व समभाग घेऊन ईडलिंबाच्या रसांत खलून शस्त्रानें छेद करून वर्ती बांधावें. त्यावर एरंडाचीं पानें बांधावीं. या प्रमाणें तीन दिवस करावें. दहीभात खावा. म्हणजे गंडमाला, अपची, ग्रंथि हे फुटून बाहेर निघतात. हें खोटें नाहीं.

अग्निमंत्र्यशनोसायंरवौप्रातःसमाहरेत्॥ पेटारीमूल-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

कंधूपैर्धूपयित्वाथरवंडयेत्॥ चतुर्दशगुणैः सूत्रैर्बध्वा ग्रंथिंगलेस्थितम्३७॥

अर्थ- शनवारीं सायंकाळीं आमंत्रण करून रविवारीं प्रातःकाळीं पेटारीचें मूळ धुपवून तोडून आणावें आणि चवदा पदरी सूत घेऊन पुढें मंत्र लिहितों त्या मंत्रानें गळ्याचे ग्रंथीवर बांधावें॥

॥अथमंत्रः॥

गूढंप्रसहितिरितिरीचित्रपुटकभूकनागतेपापढगालापरं दशमूलवासकालदेपालरेवंगुरुप्रसादात्॥ इतिमंत्रः॥

निर्गुंडीस्वरसेनाथलांगलीमूलकल्कितम्॥ तैलंनस्येन हंत्याशुगंडमालांसुदुस्तराम्३८

अर्थ- निर्गुंडीच्या आंगरसांत कळलावी, ज्याला कोंकणांत खड्यानागा म्हणतात त्याचें मूळ उगाळून तें तेलांत टाकून कढवावें. तें तेल नस्ययोगानें दुस्तर गंडमालेचा नाश करितें. इति गंडमालापचिग्रंथिचिकित्सा समाप्ता॥७॥७

॥अथश्लीपदलक्षणोपचारः॥

मेदोमांसाश्रितंशोफंपादेश्लीपदमुच्यते॥

अर्थ- पायांचे ठायीं मेदमांसाश्रित जो शोफ त्याला श्लीपद असें म्हणतात.

यःसज्वरोवंक्षणजोमृशार्तिःशोफोनृणांपादगतश्चयः स्यात्॥ तच्छ्लीपदंस्यात्करकर्णनेत्रशिश्नोष्ठनासास्वपि केचिदाहुः॥१॥

अर्थ- जो ज्वरसहित वंक्षणाचे ठायीं बहुपीडायुक्त मनुष्यास शोफ उत्पन्न होतो त्यालाही कोणी श्लीपद म्हणतात. आणि तो पाय, हात, कान, नेत्र, शिश्न, ओंठ, नाक, या ठिकाणींही असतो.

लंघनालेपनैःस्वेदैरेचनैश्चप्रसेचनैः॥ प्रायःश्लेष्महरैरुष्णैःश्लीपदंसमुपाचरेत्२॥

अर्थ- लंघन, लेप, स्वेद, रेच, रक्त मोक्ष इतक्यांनीं आणि प्रायः कफनाशक उष्ण अशा उपचारांनीं श्लीपद बरें करावें॥

॥सिद्धार्थसौभांजनदेवदारुविश्वौषधैर्मूत्रयुतैःप्रलिंपेत्॥ ॥पुनर्नवानागरसर्षपानांकल्केनवाकांजिकमिश्रितेन॥३॥

अर्थ- शिरस, शेवगा, देवदार, सुंठ हीं गोमूत्रांत वांटून लेप करावा. अथवा

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

घेंटोळी, सुंठ, शिरस हीं कांजींत वांटून लेप करावा. म्हणे श्लीपद बरें होतें अजा.

धत्तूरैरंडनिर्गुंडीवर्षाभूशिग्रुसर्षपैः॥ प्रलेपः
श्लीपदं हंति चिरोत्थमपि दारुणम्॥ ४॥

अर्थ- धोत्रा, एरंड, निर्गुंड, घेंटोळी, शेवगा, शिरस यांचा लेप चिरकालाचें श्लीपद दारुण असलें तरी त्यांचा नाश करितो॥

पलाशमूलस्वरसं पिबेद्वा तैलेन तुल्यं सितसर्षपाणां॥
मूत्रेण पक्वामरदारुविश्वं श्रीगुग्गुलुश्लीपदिभिर्निषेव्यं ५

अर्थ- पळसाचे मुळाचा आंगरस आणि पांढरे शिरसांचें तेल हीं दोन्हीं समान घेऊन प्यावीं. अथवा देवदार, सुंठ, बेलफळ, गुग्गुळ हीं गोमूत्रांत पक्व करून श्लीपद रोग्यांनीं खावीं॥

गुडूचीकटुकीशुंठीदेवदारुविडंगकम्॥ पिष्ट्वा गोमूत्रसंयुक्तं लेपं श्लीपदनाशनम्॥ ६॥

अर्थ- गुळवेल, कुटकी, सुंठ, देवदार, वावडिंग हीं गोमूत्रांत वांटून लेप करावा. तो श्लीपद नाशक आहे॥

पादकंडूहरं कुर्यान्नवनीतेन माक्षिकम्॥ पाददाहहरं खादेत्तिलान्निर्गुण्डबाकुचीम्॥ चूर्णितां मधुसर्पिर्भ्यां कर्षार्धार्तिप्रशांतये॥ ७॥

अर्थ- लोणी आणि मध एकत्र करून चोळावें. म्हणजे तें पायांची कंडू हरण करील. आणि पायांचा दाह होत असेल तर एकपट तीळ आणि दुप्पट बांवच्या एकत्र करून मध आणि तूप यांच्या बरोबर एक तोळा खावाव्या॥ ७॥

मदनं च तथा सिक्थं सामुद्रलवणं तथा॥ महिषीनवनीतेन संतप्तं लेपनं हितं॥ सप्ताहात्स्फुटितौ पादौ जायेते कमलोपमौ॥ ८॥

अर्थ- गेळफळ, मेण, मीठ हीं महिषीच्या लोण्यांत खलून पायांला चोळावें. म्हणजे दाह शांत होतो. आणि सात दिवसांत फुटलेले पाय कमळाप्रमा हो.

॥ अथ विद्रधिलक्षणोपचारः

लग्नक्तमांसमेदांसि प्रदूष्यास्थि समाश्रिताः॥ दोषाः शोफं शनैर्घोरं जनयंत्यच्छिताभृशम्॥ १॥ महाशूलं रुजावंतं वृत्तं वाप्यथवायतं॥ सविद्रधिरितिख्यातो ज्ञेयः स

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥षड्विधोबुधैः२रक्तविद्रधिलिंगंतुपित्तविद्रधिवत्स्मृतम्॥

अर्थ- त्वचा, रक्त, मांस, मेद हीं दूषित करून अस्थींचा आश्रय करून राहिलेले असे वातादि दोष पुनः अति वाढलेले असे ते हळु हळू घोर फार दुखणारा शूलयुक्त वाटोळा किंवा लांब असा शोफ उत्पन्न करतात. त्याला विद्रधि म्हणतात. तो सहा प्रकारचा जाणावा. रक्तविद्रधीचें चिन्ह पित्तविद्रधीचें प्रमाणें जाणावें॥

॥विद्रधिस्त्वसृजांतस्थः सोभ्यंतर इतिस्मृतः॥

अर्थ- रक्तापासून आंत जो विद्रधि होती त्याला अभ्यंतर असें ह्मणतात. ७

॥तत्कालेस्रावयेद्रक्तमग्निकर्माथवागदम्॥३॥

अर्थ- अंतर्विद्रधीवर तात्काळ रक्तस्राव किंवा डाग किंवा औषध उपाय करावा.

कासीससैंधवशिलाजतुहिंगुचूर्णैर्मिश्रीकृतो वरुणवल्कलजः कषायः॥ अभ्यंतरेस्थितमपक्कमतिप्रमाणंनृणा-मयंहरतिविद्रधिमुग्रशोफम्४॥

अर्थ- हिराकस, सैंधव, शिलाजीत, हिंग, याचे चूर्णानें मिश्रित वायवर्ण्याचा काढा करून दिला असतां आंतला, अपक्क, मोठा, शोफयुक्त अशा विद्रधीचा नाशक आहे.

पक्केषुविद्रधिषुपूयमतिस्रवत्सुनाडीषुचव्रणगदेषुभगंदरेषु॥ स्याद्गंडमालिषुफलत्रिक-गुग्गुलुःस्यात्पथ्यंफलत्रिकघृतंलघुभोजनंच५

अर्थ- पक्क आणि अति पुवातें स्रवणारा असा विद्रधि, नाडी, व्रण, भगंदर, गंडमाला यांच्या ठायीं त्रिफला, गुग्गुळ खावा. आणि त्रिफला, घृत, लघुभोजन हें पथ्य करावें.

॥त्रीणिपलानिफलत्रितयस्यद्वेतुपलेभवतोमगधायाः॥ ॥पंचपलानिभवंतिपुरस्यस्यात्सफलत्रिकगुग्गुलुयोगः॥६॥

अर्थ- हिरडा ४ तो० बेहेडा ४ तो० आंवळकाठी ४ तो० पिपळी ८ तो० गुग्गुळ २० तो० हें एकत्र खलावें ह्मणजे त्रिफला गुग्गुल झाला. इतित्रिफला गुग्गुलुः

जलौकापातनंशस्तंसर्वस्मिन्नेवविद्रधौ॥ मृदुर्विरेकोलघ्वन्नंतुंबशृंगाग्निकर्मच॥७॥

अर्थ- सर्व विद्रधींचे ठायीं जळवा किंवा तुंबडी किंवा शृंग यांणीं रक्तस्राव,

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

डाग हलका रेच लघु अन्न हें प्रशस्त आहे॥

दशमूलछिन्नरुहा पथ्यादारुपुनर्नवा॥ज्वर-
विद्रधिशोफेषुशिग्रुविश्वयुताहिता॥ ८॥

अर्थ- दशमुळें गुळवेल, हिरडा, देवदार घेंटोळी, शेगवा, शुंठ यांचा काढा ज्वर विद्रधि, सूज यांवर प्रशस्त आहे॥

सोमांजनस्यनिर्यासोहिंगुसैंधवसंयुतः॥अ-
चिराद्विद्रधिंहंतिप्रातःप्रातर्निषेवितः॥ ९ ॥

अर्थ- शेगव्याचा डीक, हिंग सैंधव यांचें चूर्ण रोज प्रातःकालीं सेवन केलें असतां विद्रधीचा लवकर नाश करील.

शिग्रुमूलंजलेधौतंदरपिष्टंप्रलेपयेत्॥तद्र-
संमधुनापीत्वाहंत्यंतर्विद्रधिंनरः॥ १० ॥

अर्थ- शेगव्याचें मूळ पाण्यांत उगाळून त्यांत मध घालून प्यावें. आणि त्याचरसांत बचनागाचें चूर्ण घालून लेप करावा म्हणजे अंतर्विद्रधीचा नाशक॥

॥शिग्रुदीप्यवरुणाह्वयामिनीकुंजराशनकृतःकषायकः॥
॥बोलचूर्णसहितोंतरस्थितंविद्रधिंप्रशमयेदसंशयं॥११॥

अर्थ- शेगवा, ओंवा, वायवर्णा, दारुहळद, हळद, पिंपळी यांचा काढा बोळाचें चूर्ण घालून प्यालें असतां अंतर्विद्रधीचा नाशक आहे असें जा॥

॥वर्षाभूवरुणांघ्रिभ्यांक्वाथोविद्रधिनाशनः॥१२

अर्थ- घेंटोळी, वायवर्णा, यांच्या मुळांचा काढा विद्रधीचा नाशक आहे.

॥अथव्रणादिलक्षणोपचारः॥

॥एकदोषोत्थितःशोफोव्रणानांपूर्वलक्षणम्॥
॥षड्विधःस्यात्पृथक्सर्वरक्तागंतुनिमित्तजः१॥

अर्थ- रक्तापासून१सर्व दोषांनीं२आणि आगंतुक३व एकेक दोषानें३असा सा-हा प्रकारचा व्रण. त्यांमध्यें एका दोषापासून झालेला जो शोफ तो व्रणाचें पूर्वलक्षण जाणावें.

मंदोष्मताल्पशोफत्वंकाठिन्यंत्वक्सवर्णता॥
मंदवेदनताचैवव्रणशोफस्यलक्षणम्॥२॥

अर्थ- अल्प उष्णता, अल्पशोफ कठिणपणा त्वचेप्रमाणें वर्ण असणें वेदनामंदा हें व्रणशोफाचें लक्षण जाणावें॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

द्विधाव्रणःसविज्ञेयःशारीरागंतुभेदतः॥दो-
षैरेकस्तयोरन्यःशस्त्रादिक्षतसंभवः॥ ३ ॥

अर्थ- तो व्रण दोन प्रकारचा, एक शारीर आणि दुसरा आगंतुक, या भेदें करून, एक दोषांच्या पुष्टीनें आणि दुसरा शस्त्रादिकें करून क्षत होनें त्या पासून.

स्तब्धःकठिणसंस्पर्शोमहास्रावोमहारुजः॥
तुद्यतेस्फुरतिश्यावोव्रणोमारुतसंभवः॥४॥

अर्थ- स्तब्ध घट्ट, अतिस्राव, अतिठणका, टोंचल्या प्रमाणे व्यथा, फुरफुरणें, धुरासारखा वर्ण ज्यास आहेत असा जो व्रण तो वातजन्य जाणावा ॥७॥

॥पूतिपूयातिदुष्टास्रक्स्राव्युत्संगीचिरस्थितिः॥
॥दुष्टव्रणोतिगंधादिः शस्त्रीलंगविपर्ययः॥५॥

अर्थ- दुर्गंधयुक्त पू, दुष्ट रक्त यांतें स्रवणारा, सांखा धरणारा, चिरकाल राहणारा, अति दुर्गंधयुक्त शस्त्रचिन्हांपेक्षां विपरीत चिन्हें असा दुष्टव्रण जाणावा,

॥कपोतवर्णप्रतिमायस्यांताःक्लेदवर्जिताः॥
॥स्थिराश्चपिटिकावंतोरोहतीतितमादिशेत्॥६॥

अर्थ- कपोत पक्ष्याचे वर्णासारख्या ज्याच्या कडा शुष्क, स्थिर आणि ज्यांच्या सभोंवती पुळ्या असतात असा जो व्रण तो भरत येत आहे असें समजे.

प्रवृत्तपूयरुधिराव्रणायेषांचमर्मसु॥क्रियाभिःसम्य-
गारब्धानसिद्ध्यंतिचयेव्रणाः॥एतान्विवर्जयेद्वैद्यःसं-
रक्षेदात्मनोयशः॥७॥

अर्थ- मर्माचे ठायीं झालेले आणि पुष्कळ पूरक्त यांतें स्रवणारे, चांगले उपचार केले असतां बरे न होणारे असे ज्यांना व्रण आहेत ते वैद्यानें आपलें यश रक्षण करणें असेल तर वर्ज करावे.

॥शिरीषोन्मत्तवाकूचीहिंस्राकालासुदर्शनः॥
॥तंदुलीयकमूलंचप्रलेपःशोफनाशनः॥८॥

अर्थ- शिरस, धोत्रा, बांवची, जटामांसी, नीली, तान्हीचा वेल, तांदुळज्याचें मूळ यांचा लेप शोफनाशक आहे.

॥तिलकल्कःसलवणोद्वेहरिद्रेत्रिवृद्धृतम्॥
॥मधुकंनिंबपत्राणिलेपःस्याद्व्रणशोधनः॥९॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- तिळांचा कल्क, सैंधव, दारुहळद, हळद, तेड, तूप, ज्येष्ठमध, कडूलिंबाचीं पानें यांचा लेप व्रणशोधक आहे.

तिलसैंधवयष्ट्याह्वनिंबपत्रनिशायुतैः॥त्रि-
वृन्मधुयुतैः पिष्टैः प्रलेपोव्रणशोधनः॥१०॥

अर्थ- तीळ, सैंधव, ज्येष्ठमध, कडूलिंबाचीं पानें, दारुहळद, हळद तेड आणि मध यांचा लेप व्रणशोधक आहे.

न्यग्रोधोदुंबराश्वत्थकदंबप्लक्षवेतसः॥क-
रवीरार्ककटुकाकषायोरोपणोहितः॥११॥

अर्थ- वड, उंबर, पिंपळ, कळंब, पायरी, वेत, कण्हेर, रुई, कुटकी यांचा काढा व्रणभरून येण्या विषयीं हितकारक आहे.

शोफेमहतिसंवृद्धेशांतिःशोणितमोक्षणात्॥
एकतश्चक्रियाःसर्वारक्तमोक्षणमेकतः॥१२॥

अर्थ- शोफ फार वाढला असतां रक्तमोक्षणानें शांत होतो. सर्व उपचार एकीकडे आणि रक्तस्राव एकीकडे.

हरत्यष्टांगुलंतुंबीशृंगंचद्वादशांगुलम्॥
शिरासर्वांगजंरक्तंजलौकाचतुरंगुलम्॥१३

अर्थ- तुंबडी आठ अंगुळें प्रदेशांतील रक्त काढते. शिंग बारा अंगुळें प्रदेशांतील आणि शिरावेध सर्वांगाचें आणि जळू चार अंगुळें प्रदेशांतील रक्त ओढते.

येक्लेदपाकेसतिगंधवंतोव्रणामहांतःसरुजःसशोथाः
प्रयांतितेगुग्गुलुमिश्रितेनपीतेनशांतिंत्रिफलाजलेन१४

अर्थ- जे व्रण पू होऊन पिकले असतां गंधियुक्त उणका, सूज याणींयुक्त, मोठे, तेही हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचा काढा गुग्गूळ मिश्रित प्यालें असतां बरे होतात.

निंबपत्रंतिलादंतीत्रिवृत्सैंधवमाक्षिकम्॥
दुष्टव्रणप्रशमनोलेपःशोधनकेसरी॥१५॥

अर्थ- कडूलिंबाचीं पानें, तीळ, दांतीमूळ, तेड, सैंधव आणि मध यांचा लेप दुष्टव्रणाचा शोधक आणि शोधनाविषयीं केवळ सिंहच आहे असें जाणा.

अभयात्रिवृतादंतीलांगलीमधुसंयुतैः॥क्षवीपत्र-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥धत्तूरकर्णमोटकुठेरिका॥ पृथगेतेप्रलेपेनगंभीरव्रण॥
शोधनाः॥ १६॥

अर्थः॥ हिरडा, तेड, दंतीमूळ, कळलावी, मध, सैंधव, कारलीचें पत्र, धोत्रा, बा-
भूळ, नांदुरकी, त्यांचा लेप केला तरी हीं निरनिराळीं व्रणशोधक आहेत. ७

॥अग्निदग्धेव्रणेसम्यक्प्रयुंजीतचिकित्सकः॥
॥सद्यःक्षतंव्रणंवैद्यःसशूलंपरिवर्जयेत्॥१७॥

अर्थः॥ अग्नीनें दग्ध होऊन झालेल्या व्रणावरही पूर्वोक्त लेप वैद्यानें योजावे.
आणि सद्यःक्षतापासून झालेला व्रण शूलसहित असला तर वर्जी करावा.

॥यष्टीमधुकयुक्तेनकिंचिदुष्णेनसर्पिषा॥ मत्वागंतुव्र-
णंवैद्यो घृतक्षौद्रसमन्वितम्१८ शक्तिक्रियाप्रयोक्तव्या॥
॥पित्तरक्तोष्मणानिशि॥

अर्थः॥ आगंतुक व्रणावर ज्येष्ठमधाचें चूर्ण आणि तूप यांचा किंचित् उष्णा
लेप करावा आणि शक्त्यनुसारें करून किंचित् पित्तकारक, रक्तशोधक, उष्ण
अशा पदार्थांनीं तूप मधासहित रात्रीं उपचार करावा॥

आदौभग्नंविदित्वातुसेचयेच्छीतवारिणा१९पंकेनाले-
पनंकार्यंबंधनंचकुशान्वितम्॥ आलेपनार्थंमंजि-
ष्ठामधुकंचाम्लपेषितम्२०शतधौतघृतोन्मिश्रंशालि-
पिष्टंचलेपनं॥नाडीनांगतिमन्वीक्ष्यशस्त्रेणोत्पाट्यकर्म-
वित्॥२१॥

अर्थः॥ अभिघातादिकें करून हाड मोडतें त्यावर प्रथम थंड पाणी शिंपावें.
वर तांबडमातीचा लेप करून वर्ती दर्भानें पेंडावें नंतर मंजिष्ठ, ज्येष्ठमध
लिंबादिकांचे रसांत वांटून लेप करावा. नंतर शंभर वेळां धुतलेल्या घृतां-
त नांदुच्यांचें पीठ मिश्र करून लेप करावा. नाडीची गति चांगली तपासून
जेथपर्यंत पुवानें मार्ग केला असेल तेथपर्यंत शस्त्रानें फाड करून मग-
चिकित्सा करावी॥

॥घृतंसदुग्धंव्रणतर्पणेनहन्याद्गतिंकोष्ठगतापियास्या
त्॥ ॥७॥

अर्थः॥ कोष्ठव्रणावर दूध, तूप एकत्र करून प्यावें. म्हणजे बरा होतो अ. जा.

॥जात्यर्कशम्याककरंजदंतीसिंधूत्थसौवर्चलयावशूकैः॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥वर्त्तिःकृताहंत्यचिरेणनाडीस्नुक्षीरपिष्टासहसैंधवेन॥२२॥

अर्थ- जाईरुई बाहावा करंज दांतीमूळ सैंधव पादेलोण जवखार एकत्र खलून त्याची वात करून नाडीव्रणांत घालावी. अथवा निवडुंगाचा चीक, सैंधव एकत्र खलून त्याची वात करून घालावी तेणेंकरून नाडीव्रण बरा होतो.

कृशदुर्बलभीरूणांनाडीमर्माश्रितातुया॥
क्षारमूत्रेणसंछिद्यान्नशस्त्रेणकदाचन॥२३॥

अर्थ- कृश, दुर्बल, भित्रा, यांची मर्माश्रित जी नाडी ती खारमूत्र याणीं छेदावी. शस्त्रानें कधींही छेदूं नये.

॥समूलपत्रांनिर्गुंडींपीडयित्वारसेनतु॥
तेनसिद्धंसमंतैलंनाडीदुष्टव्रणापहम्॥२४॥

अर्थ- मुळां, पाळां सहां निर्गुंडीचें झाड कुटून त्याचा रस काढून त्याचे बराबर तेल घेऊन एकत्र कढवून रस आटल्यावर तेल सिद्ध झालें. तें नाडीसंबंधीं दुष्टव्रणाचें नाशक आहे.

॥नरास्थितैललेपेनस्फुटितःशष्यतिव्रणः

अर्थ- मनुष्यांच्या अस्थींच्या (हाडांच्या) तेलानें फुटलेला व्रण शष्क होः

॥विडंगत्रिफलाव्योषचूर्णंगुग्गुलुनासमम्॥२५
॥सर्पिषावटिकांकुर्यात्खादेद्धाहितभोजनः
दुष्टव्रणापचीमेहकुष्ठनाडीविशोधनः॥२६॥

अर्थ- वावडिंग, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, सुंठ, मिरे, पिंपळी यांच्या चूर्णाबरोबर गुग्गूळ घेऊन सर्व तुपांत खलून गोळी करून खावी. पथ्य करावें. ह्मणजे दुष्टव्रण, अपची, मेह आणि दुष्टनाडी यांची शुद्धि करील॥

॥मनःशिलासमंजिष्ठासक्षाररजनीद्वयम्॥
॥प्रलेपःसघृतक्षौद्रस्त्वग्विशुद्धिकरःस्मृतः॥२७॥

अर्थ- मनशीळ, मंजिष्ठ, जवखार, दारुहळद, हळद, तूप, मध यांचा लेप त्वचेची शुद्धि करणारा आहे.

॥करंजारिष्टनिर्गुंडीरसोहन्याद्व्रणंकृमीन्॥

अर्थ- करंज, कडूलिंब, निर्गुंडी यांचा रस व्रणसंबंधी कृमीचा नाशक आहे.

॥निंबशाम्याकजात्यर्कसप्तपर्णाश्चमारकाः
कृमिघ्नामूत्रसंयुक्ताःसेकलेपनधावनैः॥२८॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः- कडूलिंब, बाहावा, जाई, रुई, सांलिण, श्वेत, कण्हेर, गोमूत्र, यांचा लेप, याणीं व्रण धुणें व वाफारा हीं कृमिनाशक आहेत.

जातीनिंबपटोलपत्रकटुकादार्वीनिशासारिवामंजिष्ठाभयसिंधुतुत्थमधुकैर्नक्ताह्वबीजैः समैः॥ सर्पिः सिद्धमनेनसूक्ष्मवदनामांसाश्रिताः स्राविणोगंभीराः सरुजोव्रणाः सुगतिकाः शुद्ध्यंतिरोहंतिच॥२९॥७

अर्थः- जाई, कडू पडवळ, कडूलिंब, कुटकी, दारुहळद, हळद, श्वेत उपळसरी, मंजिष्ठ, काळा वाळा, सैंधव, मोरचूत, ज्येष्ठमध, यांच्या बरोबर करंजाच्या बिया घेऊन याणीं सिद्ध केलेलें तूप त्या तुपानें बारीक, तोंडाचे मांसाश्रित, स्रवोल, स्रवणारे, पीडायुक्त असे व्रण शुद्ध होऊन भरून चांगले बरे होतात.

पटोलीनिंबपत्राणांक्वाथःसंक्षालनेहितः॥ कल्कःसंरोपणेशस्तस्तिलानांमधुकान्वितः३०॥

अर्थः- कडू पडवळ, कडूलिंबाचीं पानें यांचा काढा व्रण धुण्या विषयीं प्रशस्त आहे. असें तिळांचें आणि ज्येष्ठमधाचें चूर्ण व्रण भरण्या विषयीं आ.

अथभगंदरलक्षणोपचारः॥

गुदस्यह्यंगुलेदेशेपार्श्वतःपिटिकार्तिकृत्॥ भिन्नाभगंदरोज्ञेयःसचपंचविधस्मृतः॥१॥

अर्थः- गुदापासून दोन अंगुलांवर जी पुळी वेदनायुक्त होऊन फुटते तीस भगंदर असें ह्मणतात. तो पांच प्रकारचा जाणावा. ॥ ॥लक्षणांतरं

क्षताकृतिःपायुगताविवर्द्धतेह्युपेक्षणात्साकृमिभिर्विदार्यते॥ प्रकुर्वतेमार्गमनेकधासुरेवेव्रणेस्तदुन्मार्गिभगंदरंभवेत्॥२॥

अर्थः- गुदाचे ठायीं क्षत उत्पन्न होऊन नाडी वाढते. आणि त्याची उपेक्षा केली असतां कृमी होऊन त्याचें विदारण करितात. नंतर ते कृमि आपले मुखानें व्रण करून अनेक मार्ग करतात. नंतर तीं सर्व छिद्रें एक झालीं ह्मणजे भगंदर जाणावें.॥

॥कुष्ठंत्रिवृत्तिलादंतीमागधीसैंधवंमधु॥ ॥रजनीत्रिफलातुत्थंहितंस्याद्व्रणलेपनम्३॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- कोषकोलिंजन, तेड, नीळ, दांतिमूळ, पिंपळी, सैंधव, मध, हळद, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, मोरचूत त्यांचा लेप भगंदर व्रणावर प्रशस्त आहे.॥

रसांजनंहरिद्रेद्वेमंजिष्ठानिंबपल्लवाः॥त्रि-
वृत्तेजोवतीदंतीकल्कोनाडीव्रणापहः॥४॥

अर्थ- रसांजन, दारुहळद, हळद, मंजिष्ठ, कडूलिंबाचीं पानें, तेड, कांगुणी, दांतिमूळ यांच्या चूर्णाचा लेप नाडीव्रणाचा नाशक आहे.

निशार्कक्षीरसिंध्वग्निपुंखीलांगलिवत्सकैः॥
एभिःप्रसाधितंतैलंभगंदरविनाशनम्॥५॥

अर्थ- हळद, रुईचा चीक, सैंधव, चित्रक, शरपुंखी, मंजिष्ठ आणि कुडा यांणीं सिद्ध केलेलें तेल भगंदरनाशक आहे.

त्रिफलारससंयुक्तंबिडालास्थिप्रलेपनम्॥
दुष्टव्रणंनिहंत्याशुभगंदरहरंपरम्॥ ६॥७

अर्थ- हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांच्या काढ्यांत मांजराचें हाड उगाळून लेप करावा. तो दुष्टव्रण भगंदर यांचा नाशक आहे.

चित्रकार्कत्रिवृत्पाठामलयूहममारकौ॥ सुधावचालांग-
लिकीहरितालंसुवर्चिकाम्॥ ७॥ ज्योतिष्मतींचसंहृत्य
तैलंधीरोविपाचयेत्॥एतद्धि स्यंदनंनामतैलंदद्याद्भगं
दरे॥शोधनंरोपणंचैवसवर्णकरणंतथा॥ ८॥ ७ ॥

अर्थ- चित्रक, रुई, तेड, पाहाडमूळ, बांवची, कण्हेर, निवडुंग, वेखंड, कळलावी, हरताळ, सज्जीखार, कांगुणी त्या औषधांसहित तेल कढवावें. त्याला स्यंदन तेल ह्मणतात. हें भगंदरावर योजावें. शोधन, रोपण, वर्ण नीट करणारें आहे. इति स्यंदन तेलम् ॥ पूर्वोक्तंत्रिफलागुग्गुलुंभक्षयेत्॥ अर्थ- पूर्वीं सांगितलेला त्रिफला आणि गुग्गुल भक्षण करावा.॥७॥७॥

खदिरत्रिफलाक्वाथोमहिषीघृतसंयुतः॥
विडंगचूर्णसंयुक्तोभगंदरविनाशनः॥९॥

अर्थ- खैर, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, यांचा काढा महिषीचें तूप, वावडिंगाचें चूर्ण, घालून प्यावा. भगंदरविनाशक आहे

शुनोस्थिभूलतातक्रपेषितारवररक्तयुक्॥
लेपोभगंदरंहन्यान्नरास्थ्नांतैलमेवच॥१०॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- कुत्र्याचें हाड भूलता हीं नाकांत उगाळून त्यांत गाढवाचें रक्त घालून लेप करावा म्हणजे भगंदराचा नाशक आहे. अथवा मनुष्याच्या हाडाचें तेल लावावें॥ इतिभगंदरचिकित्सा॥

॥अथोपदंशलक्षणोपचारः॥

॥हस्ताभिघातान्नखदंतघातादधावनाद्रत्यतिसेवनाद्वा॥
॥योनिप्रदोषाच्चभवंतिशिश्नेपंचोपदंशाविविधप्रकाराः१॥

अर्थ- हात, नखें, दांत, यांचें घर्षण, शिश्न न धुणें, अतिमैथुन योनिदोष इतक्या कारणांनीं शिश्नाचे ठायीं पांच प्रकारचे उपदंश होतात. त्यांचे अनेक भेद आहेत.

॥सतोदभेदस्फुरणैःसकृष्णैःस्फोटैर्व्यवस्थेत्सवनोपदंशं॥
॥कालेनशोथकृमिदाहपाकैर्विशीर्णशिश्नोम्रियतेसतेन२॥

अर्थ- व्यथा, स्फुरण, काळेपणा यांणीं युक्त जे फोड त्याणीं वातो पदंश जाणावा. आणि कालें करून सूज कृमि, दाह, पाक, यांहीं करून ज्यांचें शिश्नपोकळ होऊन सडलें तो उपदंशानें मरतो.

॥परोलनिंबत्रिफलाकिरातैःक्वाथंपिबेद्वाखदिरासनाभ्यां॥
॥सगुग्गुलुंवात्रिफलायुतंवासर्वोपदंशापहरःप्रयोगः॥३॥

अर्थ- कडू पडवळ, कडूलिंब, हिरडा, बेहडा, आवळकाठी, काडेकिराईत यांचा काढा प्यावा. किंवा खैर असाणा यांचा काढा त्रिफलासहित किंवा गुग्गुळ सहित प्यावा. म्हणजे सर्व प्रकारचे उपदंश नाश पावतात.॥७॥

॥वटप्ररोहार्जुनजंबुपथ्यालोध्रंहरिद्रासहितःप्रलेपः॥
॥सर्वोपदंशेष्ववरोहणार्थंचूर्णंचतज्जंविमलाजलेन४॥

अर्थ- वडाचे अंकूर, अर्जुन, जांभूळ, हिरडा, लोध्र, हळद यांचें चूर्ण निवडुंगाचे चिकांत घालून लेप करावा. तेणें करून उपदंशाच्या जखमा बऱ्याहोत.

॥दहेत्कटाहत्रिफलांतांमषींमधुसंयुताम्॥कृ-
॥लोपदंशेलेपोयंसद्योरोपयतिव्रणम्॥ ५॥

अर्थ- हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं कढईंत जाळून त्याचे मशीचा मधांत लेप करावा. तो तात्काळ उपदंशाचा व्रण भरून आणतो. असें जाणावें.

॥सर्जिकातुत्थकासीसशैलेयंसरसांजनम्॥
॥मनःशिलासमैश्चूर्णंव्रणवीसर्पनाशनम्॥६

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- सज्जीखार, मोरचूत, हिराकस, शिलाजीत, रसांजन, मनशील यांचें चूर्ण व्रणवीसर्प नाशक आहे.

अश्वत्थोदुंबर प्लक्षवटवेतसजःशृतः॥ व्रणशोथोपदंशानांनाशकःक्षालनेस्मृतः॥७

अर्थ- पिंपळ, उंबर, पिंपरी, वड, वेत यांच्या काढ्यानें व्रण धुवावा. तेणेंकरून व्रणनाश होतो. आणि शोथ, उपदंश यांचाही नाशक आहे असें जाणावें.

शुद्धसूतंचभल्लातंपिप्पलीमूलपिप्पली॥ आकलुकंजातिपत्रीखुरकंदेवपुष्पकम्॥८॥ मर्दयेत्समभागेनपुराणगुडमिश्रितम्॥ उपदंशेषुसर्वेषुप्रमाणंरक्तिकाद्वयम्॥९

अर्थ- शुद्ध पारा, बिब्बा, पिंपळी, पिंपळमूळ, अकलकारा, जायपत्री, खुरासनी, लवंग हीं समभाग घेऊन जुन्या गुळांत खलून गुंजाप्रमाण खावें. तेणें करून सर्व उपदंश नष्ट होतात. इति उपदंशचिकित्सा॥ ७॥ ७॥॥

अथकुष्ठचिकित्सा.

कपालमौदुंबरमंडलाख्यजिह्वाख्यकुष्ठान्यथपुंडरीकं सिध्माभिधंकाकणनामधेयंचर्माख्यमन्यत्कदिभंतथैव १ वैपादिकंचैवकिलाससंज्ञं दद्रुस्तथाचर्मदलंचकंडुः॥ पामाचविस्फोटशतारुषीचविचर्चिकाचेति दशाष्टकुष्ठाः २

अर्थ- कपाल, १ औदुंबर २ मंडल ३ जिह्वाख्य ४ पुंडरीक ५ सिध्म ६ काकण ७ चर्म ८ कदिभ ९ वैपादिक १० किलास ११ दद्रु १२ चर्मदल १३ कंडू १४ पामा १५ विस्फोट १६ शतारुष १७ विचर्चिका १८ या प्र० १८ कुष्ठरोग जाणावे.

प्रक्षालनैर्वाजलौकोभिःशृंगालाबुशिराव्यधैः॥ स्निग्धस्यमोक्षयेद्रक्तंदुष्टंकुष्ठेपुनःपुनः॥३॥

अर्थ- पुष्कळ जळवा लावून किंवा तुंबडी, शिंग, शिरावेध यांही करून सशक्ताचें रक्त दुष्ट असेल तें कुष्ठरोगाचे ठायीं वारंवार काढावें.॥७

वमनंचयथादोषंकर्तव्यंचविरेचनम्॥ गुडूचीत्रिफलादार्वीक्वाथउष्णेश्चवारिभिः॥४॥ लग्नदोषघ्नशोथघ्नःपीतोमासंचगुग्गुलुः

अर्थ- जो दोष असेल त्याप्रमाणें वमन किंवा रेचन कुष्ठरोग्यास द्यावें. आ-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

णि गुळवेल त्रिफळा दारुहळद यांचा काढा किंवा ऊन पाण्याबरोबर गुग्गुळ एक महिनाभर कुष्ठरोगावर द्यावा. हा त्वग्दोष, व्रणशोथ यांचा नाशक आहे.॥

खदिरत्रिफलानिंबपटोलामृतवासकैः॥
अष्टकोयंजयेत्कुष्ठान्कंडूविस्फोटकादि-
कान्॥ ५॥

अर्थ- खैर, त्रिफळा, कडूलिंब, कडूपडवळ, गुळवेल, अडूळसा त्या आठ औषधांचा काढा कंडू विस्फोटकादिक कुष्ठरोग जिंकील असें जाणावें.

बीजानिवामूलकसर्षपाणांलाक्षारजन्योप्रपुनाटबी-
जम्॥ श्रीवेष्टकव्योषविडंगतुल्यंपिष्ट्वाजमूत्रेणवि-
लेपनंस्यात्॥ दद्रूणिसिध्मान्कटिभानिपामांकपा-
लकुष्ठंविषमंचहन्यात्॥६॥

अर्थ- मुळ्याचें बीं, शिरस, लाख, दारुहळद, हळद, रांकळ्याचें बीं, सरूचा डीक, सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, हीं समभाग घेऊन बोकडाच्या मुतांत वांटून लेप करावा. तो दद्रु, सिध्म, कटिभ, पामाकपाल हीं कुष्ठें नाशी.

आरग्वधदलैःपिष्टैर्लेपःकांजिकयुक्कृतः॥
करित्वक्दद्रुकुष्ठानिहंतिपामांविचर्चिकां॥७॥

अर्थ- बाहाव्याचीं पानें वांटून कांजींत मिश्र करून लेप करावा, तो महाकुष्ठ, दद्रु, पामा, विचर्चिका यांचा नाश करितो.

वेल्लव्योषवराब्दाग्निविषोग्रागुडतुल्यकाः॥
लेपाकुष्ठादिकान्घ्नंतित्रिवारंसकपालिकान्॥८॥

अर्थ- वावडिंग, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आंवळकाठी, नागरमोथे, चित्रक, बचनाग, वेरवंड, गुळ समभाग घेऊन यांचा तीन वेळां लेप केला असतां कपालिकासहित कुष्ठादिक रोगांचा नाशक आहे असें जाणावें.

बलिवेल्लाग्निभल्लातदंतिशम्याकनिंबजैः॥
कांजिकेपेषितैर्लेपःश्वेतकुष्ठविनाशकृत्॥९॥

अर्थ- गंधक, वावडिंग, चित्रक, बिब्बा, दांतिमूळ, बाहावा, लिंबोळ्या हीं कांजींत वांटून लेप करावा, तो श्वेतकुष्ठाचा नाशक आहे.

गंधकःसयवक्षारःसिध्मघ्नोयलेपतः॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥अहिल्वकृपयसापिष्ट्वालेपस्त्वकृकीलकापहः॥१०॥

अर्थ- गंधक, जवखार, पाण्यांत उगाळून लेप करावा. सिध्मनाशक आहे. सर्पाची कांत पाण्यांत खलून लेप करावा. चामखिळाचा नाशक आहे.

॥तालकाद्विगुणंगंधंबाकूच्यागोजलार्दितं॥
॥सिध्मंप्रलेपनाद्दाशहंतिमासप्रयोगतः॥११॥

अर्थ- एक भाग हरताळ, दोन भाग गंधक, चार भाग बांवच्या हीं गोमूत्रांत बांटून एकमहिनाभर लेप करावा. हा लेप सिध्मा (शिबें) चा नाशक आहे.

॥शङ्खस्यकरवीरस्यरसोवेल्लंचचित्रकम्॥
॥एभिःसुपाचितंतैलमभ्यंगात्कुष्ठजातिनुत्॥१२॥

अर्थ- पांढऱ्या कण्हेरीचा रस, वावडिंग, चित्रक, हें तेलांत टांकून तें तेल कढवावें आणि त्या तेलानें अभ्यंग करावा. कुष्ठजातिनाशक आहे असें सं०

॥वरावेल्लकणाचूर्णंलीढंसन्माक्षिकैःसदा॥
॥हंतिकुष्ठान्कृमीन्मेहान्नाडीव्रणभगंदरान्॥१३॥

अर्थ- त्रिफळा, वावडिंग, पिंपळी यांचें चूर्ण मधाबरोबर चाटलें असतां कुष्ठ, कृमि, मेह, नाडीव्रण आणि भगंदर यांचा नाश करितें. ॥७॥श्रीः

॥रसगंधकयोःपिष्टंकटुतैलेनभृंगजैः॥द्रवैः
संमर्द्यतल्लेपात्सर्वकुष्ठंविनश्यति॥१४॥

अर्थ- पारा, गंधक यांची कज्जली शिरसांच्या तेलांत खलून नंतर माक्याच्या रसांत खलून लेप करावा. हा लेप सर्व कुष्ठांचा नाशक होईल॥७

॥रसौषणंसैंधवंचविडंगंचामृतारसः॥कां-
॥जिकेनविमर्द्याथलेपःसिध्मविनाशनः॥१५॥

अर्थ- पारा, मिरें, सैंधव, वावडिंग, गुळवेलीचा रस हीं सर्व कांजींत खलून लेप करावा. सिध्मविनाशक आहे.

॥रसगंधकहेमंचसाभ्रकंकटुतैलतः॥मर्दि-
तंमर्दनात्तस्यकुष्ठजातंविनश्यति॥१६॥७

अर्थ- पारा, गंधक, धोत्र्याचें बीज आणि अभ्रक हीं शिरसाच्या तेलांत खलून अंगास चोळावीं. सर्व कुष्ठनाशक आहेत.

॥श्वेतश्वित्रादिकुष्ठानिद्व्यसाध्यानिप्रयत्नतः॥
॥तस्मात्तेषामुपायश्चनात्रैवलिखितोमया॥१७॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- पांढरें श्वित्र कुष्ठ इत्यादिक जीं कुष्ठें तीं प्रयत्नानें असाध्य ह्मणून विशेषें करून त्यांवर उपाय लिहिला नाहीं.

तालकः शाणमात्रः स्याच्चतुःशाणाच्चबाकुची
गोमूत्रयुक्तंतच्चूर्णलेपनाच्छ्वित्रनाशनम् १८

अर्थ- चारमासे हरताळ, १६ मासे बांवच्या गोमूत्रांत वांटून लेप करावा. श्वित्रनाशक आहे.

गुंजाफलाग्निचूर्णस्यलेपनंश्वेतकुष्ठनुत्
शिलापामार्गभस्मापिलेपाच्छ्वित्रविनाशनं १९

अर्थ- गुंजा, चित्रक यांचा लेप आणि मनशीळ व आघाड्याची राख यांचा लेप श्वित्रनाशक आहे.

अन्नपानंहितंकुष्ठेनत्वम्ललवणोषणम्
दधिदुग्धगुडाश्चापितिलमाषान्त्यजेन्नरः २०

अर्थ- आंबट, खारट, तिखट, खेरीज करून अन्नपान कुष्ठरोगावर हितकारक आहे. आणि दहीं, दूध, गूळ, तीळ, उडीद हे वर्ज करावे.

ललाटेहस्तपादेषुशिराश्चास्यविमोक्षयेत्
प्रच्छन्नमम्लकेकुष्ठेशृंगाद्यैश्चयथायथं २१

अर्थ- कपाळ, हात, पाय या ठिकाणीं शिरावेध करून रक्त काढावें. आणि कुष्ठाचे ठायीं फांसण्या टाकून रक्त आंबले म्हणजे शृंगादिकें करून ज्या ठिकाणीं जें उपयोगीं पडेल तसें रक्त काढावें.

मनःशिलालंमरिचानितैलमार्कपयःकुष्ठहरःप्रदेहः
करंजबीजैडगजंसकुष्ठंगोमूत्रपिष्टंचवरःप्रदेहः॥२२॥

अर्थ- मनशीळ, हरताळ, मिरें, तेल, रुईचा चीक, यांचा लेप कुष्ठहारक आहे. आणि करंजाचें बीं, टाकळ्याचें बीं, कोष्ठ कोलिंजन गोमूत्रांत वांटून लेप करावा. कुष्ठावर प्रशस्त आहे.

हयवेल्लाग्निभल्लातदंतिशम्याकनिंबजैः
कांजिकेपेषितैर्लेपःश्वेतकुष्ठविनाशकृत् २३

अर्थ- आस्कंद, वावडिंग, चित्रक, बिब्बा, दांतिमूळ, बाहावा, लिंबोळ्या हीं कांजींत वांटून लेप करावा. श्वेतकुष्ठाचा नाशक आहे असें जाणावें. ॥७

गुंजाकुष्ठवचानिंबैर्वारिपिष्टैःप्रलेपनात्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

श्वेतापराजितामूलं हंति श्वित्रमसंशयम् २४

अर्थ- गुंज, कोष्ठकोलिंजन, वेरवंड, कडूलिंब हीं पाण्यांत वांटून लेप करावा. अथवा श्वेतगोकर्णी, श्वेत निर्गुंडी यांच्या मुळांचा लेप श्वित्रनाशक आहे.

मंडलानि च घृष्ट्वाथ चित्रकेण प्रलेपयेत्॥
ततो वातारिबीजैश्च लेपो मंडलकुष्ठनुत् २५

अर्थ- मंडलकुष्ठावर घर्षण करून चित्रकाचा लेप करावा. नंतर निर्गुंडीच्या बीजाचा लेप करावा. म्हणजे मंडलकुष्ठाचा नाश होतो असें जाणा.

शक्रुतालं मृतं सूतं तुल्यं ताभ्यां चतुर्गुणम्॥ भर्जित्वा विजयायोज्या सर्वतुल्यं गुडं क्षिपेत्॥२६॥ श्वेतकुष्ठहरं निष्कं रसोयं विजयेश्वरः॥ दार्वीखदिरनिंबानां क्वाथं तमनुपाययेत्॥२७॥

अर्थ- शक्रु हरताळ, पाऱ्याचें भस्म हीं समभाग घेऊन त्या दोहोंचे चतुर्गुण भाजलेली भांग आणि सर्वांच्या बरोबर गूळ घालून एकत्र खलून चार मासे प्रमाणें खावा. हा श्वेतकुष्ठनाशक आहे. त्याला विजयेश्वर रस असें ह्मणतात. त्यावर दारुहळद, खैर, कडूलिंब यांचा काढा पाजावा.

शक्रुसूतं मृतं चाभ्रं मृतं ताम्रं समं समम्॥ मर्दयेद्बाकुचीतैलेयामैकं कृतगोलकम्॥२८॥ द्विगुणे पाचयेद्गंधे सतैले लोहपात्रके॥ गंधतैले विजीर्णे तु तद्गोलं शंमृतायसं॥२९॥ पंचांगनिंबसंयुक्तं मधुना गोलकीकृतम्॥ निष्कैकं कीटभं हंति वज्रपाणिर्महारसः॥३०॥

अर्थ- शक्रु पारा, अभ्रकभस्म, ताम्रभस्म हीं समभाग घेऊन बांवच्याच्या तेलांत प्रहरभर खलून गोळा करून लोखंडाचे पात्रांत दुप्पट गंधक आणि तेल घालून पक्का करावें. तें तेल, गंधक जळून गेल्यावर शेष गोळा उरेलत्या बरोबर लोहभस्म घेऊन दोन्ही कडुलिंबाचें पंचांग आणि मध यांबरोबर खलून गोळा करून चार मासे प्रमाणें खावा. कीटभ कुष्ठाचा नाश करील. याला वज्रपाणिरस असें म्हणतात.

भृंगराजहरीतक्योर्मूलमंतः पुटे दहेत्॥
आरनालेन तल्लेपाच्छ्वेतकुष्ठविनाशनम् ३१

अर्थ- माका, हिरडा, पोखरमूळ त्यांचा पुटपाक करून कांजींत खलून

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

लेप करावा॥ हा लेप श्वेत कुष्ठाचा नाशक आहे। इति कुष्ठचिकित्सा॥

॥अथ शीतपित्तलक्षणोपचारः॥

॥वरटीदंशसंस्थानः शोफः संजायते बहिः॥
॥सकंडू तोदबहुलश्छर्दिज्वरविदाहवान्१॥
॥उदर्दमितितं विद्याच्छीतवातमथापरे॥७

अर्थ॥ गांधील माशी चावल्याने जी गांध येते त्या प्रमाणें जो अंगावर शोफ उत्पन्न होतो, आणि तो कंड, व्यथा, ओकारी, ज्वर, दाह, याणीं युक्त असतो. त्याला उदर्द ह्मणतात. कोणी शीतवात असेंही ह्मणतात.

सिद्धार्थरजनीकुष्ठैः प्रपुन्नाटतिलैः सह॥
कटुतैलेन संमिश्रमेतदुद्वर्तनं हितम्॥२॥

अर्थः पांढरे शिरस, हळद, कोष्ठकोलिंजन, टाकळा, तील यांचें चूर्ण शिरसाचे तेलांत मिळवून अंगाला चोळावें. उदर्दावर प्रशस्त आहे.॥७॥

॥कुष्ठं हरिद्रे सुरसं पटोलं निंबाश्वगंधे सुरदारुशिग्रु
ससर्षपं तुंबरुधान्यकं त्वक्कंडूघ्नचूर्णानि समानि
कुर्यात्॥३॥ तैस्तक्रपिष्टैः प्रथमं शरीरं तैलाक्तमु-
द्वर्तयितुं यतेत॥ तथास्य कंडूः पिटिकाः सकोठाः
कुष्ठानि शोफश्च शमं व्रजंति४

अर्थः कोष्ठकोलिंजन, हळद, दारुहळद, तुळस, कडूपडवळ, कडूलिंब, आस्कंद, देवदार, शेवगा, शिरस, चिरफळ, धणे, दालचिनी यांचीं समभाग चूर्णें करून ताकांत वांटून पूर्वीं शिरसाचें तेल अंगास लाऊन नंतरहीं चोळावीं। तेणें करून कंडू, पिटिका, कोठ, कुष्ठें व शोफ हीं शांत होतात.

निंबस्य पत्राणि सदाघृतेन धात्रीविमिश्राण्यथवा
प्रयुंज्यात्॥ विस्फोटकोठक्षतशीतपित्तं कंडूरुपित्तं
सकलानि हन्यात्॥५॥

अर्थः कडूलिंबाचीं पानें वांटून तुपाबरोबर अथवा आंवळकाठीबरोबर खावीं. तेणें करून विस्फोट, उदर्दकोठ, क्षत, शीतपित्त, कंडू, रक्तपित्त, हीं सर्व नाश पावतात.

यष्टीमधुकपुष्पं च सरास्नं चंदनद्वयम्॥
निर्गुंडीसकणाक्वाथं शीतपित्तहरं पिबेत्६

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- ज्येष्ठमध मोहाचें फूल रास्ना श्वेतचंदन रक्तचंदन निर्गुंडी पिंपळी यांचा काढा शीतपित्तहारक आहे.

अन्यानेकानिलगदाः शीतवातादयस्मृताः।
हिमयंतीहगात्राणिरोमांचस्फुरितानिच।
शिरोक्षिवेदनालस्यंशीतवातस्यलक्षणं ७

अर्थ- ज्याचे ठायीं शीतवातादिक अनेक वायूंचे रोग शरीरास गारठा आणितात, रोमांच उभे राहतात मस्तक नेत्र यांच्याठायीं वेदना, आलस्य हें शीतवाताचें लक्षण जाणावें.

रसेनगंधंद्विगुणंप्रगृह्यपुनर्नवावन्हिरसैर्विमर्द्य॥
पक्वार्कपत्रोत्थरसेनतस्माद्विपाचयेदष्टगुणेनपश्चात्॥८॥रसार्धभागेनविषंचदद्याद्विपाचयेद्वन्हिजलैःक्षणंतत्॥शीतारिसंज्ञोहिरसोयभस्यवल्लंतदर्धंयदिवार्द्रकेन॥मरीचचूर्णेनघृतप्लुतेनसेवेतमासंसघृतंसपथ्यम्९॥

अर्थ- पारा १ गंधक २ घेऊन घेंटोळी, चित्रक यांच्या रसांत खलून नंतर पिकलेल्या रुईच्या पानांचा रस त्याच्या आठपट घेऊन त्यांत पक्व करून पाऱ्याचे निमें बचनाग घालून पुनः चित्रकाचे रसांत क्षणभर शिजवावें. म्हणजे हा शीतारिरस होतो. हा वाल किंवा अर्धवाल आल्याचे रसांत अथवा तूप मिरपुडींत एक मास पर्यंत खावा. तूप खावें. पथ्य करावें. ह्मणजे शीतवाताचा नाश करील. इति शीतवातारिः॥

अथस्पर्शवातलक्षणोप०

अंगेषुतोदनंप्रायोदेहस्पर्शनविंदति॥
मंडलानिचदृश्यंतेस्पर्शवातस्यलक्षणं १

अर्थ- अंगाला टोंचल्याप्रमाणें व्यथा, स्पर्शन कळणें, अंगावर मंडलें दिसणें हें स्पर्शवाताचें लक्षण जाणावें.

तालंरसेनाष्टगुणंजयांचविमर्द्ययत्नाद्गुटिकागुडेन॥निबद्धतांसेवयमासयुग्मंदिनोदयेस्पर्शविकारनुत्त्यै॥२॥

अर्थ- पारा १, हरताळ ८, भांग ८ भाग घेऊन गुळांत गोळी करून सू-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

योदयीं दोन मास पर्यंत खावी. स्पर्शवाताचा विकार दूर होईल. इ. ताले०

अष्टभागोरसःशुद्धोविषतिंदोर्दशैवतु॥ गंधकस्य दशाहौत्रिकटुत्रिफलयोस्त्रयः॥३॥ वह्निचित्रकमुस्तानांवचाश्वगंधयोरपि॥ रेणुकाविषकुष्ठानांपिप्पलीमूलनागयोः॥४॥ एकैकस्तुभवेद्भागइत्थंग्राह्याःक्रमेणच॥ गुडश्चतुर्विंशतिस्याद्गुटिकाबदराकृतिः॥ क्रमेणवानुसेवेतस्पर्शवातापनुत्तये॥५॥ इति शीतपित्तशीतवातस्पर्शवातचिकित्सा

अर्थः- शुद्ध पारा ८ भा० कुचला १० भाग, गंधक १२ भा०, सुंठ १, मिरें १, पिंपळी १, त्रिफळा ३, बिब्बा, चित्रक, नागरमोथे, वेरवंड, आस्कंद, रेणुका बीज, बचनाग, कोष्ठकोलिंजन, पिंपळमूळ, नागकेशर यांचा एकेक भाग, गूळ २४ भाग सर्व एकत्र खलून बोरा प्रमाणें गोळ्या करून क्रमानें एक, दोन, तीन अशा खाव्या. स्पर्शवाताचा नाश होईल. इतिस्पर्शवातचिकि०

॥अथाम्लपित्तलक्षणोपचारः॥०

॥अविपाकक्लमक्लेदतिक्ताम्लोद्गारगौरवैः॥
हृत्कंठदाहारुचिभिश्चाम्लपित्तंवदेद्भिषक्१॥

अर्थः- अपाचन, ग्लानी, तोंडास पाणी सुटणें, तिरबट, आंबट, ढेंकरा, जडपणा, घशांत उरांत जळजळ, अरुचि त्या लक्षणें करून अम्लपि० जा०

भुक्तेविदग्धेप्यथवाप्यभुक्तेकरोतितिक्ताम्लवमिंकदाचित्॥ उद्गारमेवंविधमेतिकंठंहृत्कुक्षिदाहाःशिरसोरुजश्च२॥

अर्थः- जेवतांक्षणीं किंवा अर्धीजेवणा जिरल्यावर किंवा जेवणा पूर्वी कडू, आंबट अशी ओकारी, कदाचित् कडू आंबट ढेंकर, असेंच घशाशीं यावें. हृदय, कुक्षि यांचा दाह, डोकें दुखणें हे उपद्रव जाणावे. ॥७॥ श्रीः

॥अम्लपित्तेतुवमनंपटोलारिष्टवारिणा॥
॥विरेचनंत्रिवृच्चूर्णंमधुधात्रीफलद्रवैः॥३॥

अर्थः- अम्लपित्तावर कडूपडवळ कडूलिंबा यांच्या काढ्याबरोबर ओकारीचें औषध द्यावें. आणि तेडाचें चूर्ण मध आंवळकाठीचा काढा हेंच रेचन द्यावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

त्रिकटुत्रिफलामुस्तंबीजंचैवविडंगजम्॥ एलापत्रंच सर्वाणिसमभागानिकारयेत्॥४॥ यावंत्येतानिसर्वाणिलवंगंतत्समंभवेत्॥ सर्वचूर्णाद्द्विगुणितंत्रिवृच्चूर्णं तुकारयेत्॥५॥ यावंत्येतानिसर्वाणितावतीशर्करा भवेत्॥ सर्वमेकीकृतंपात्रेस्निग्धेचैवनिधापयेत्॥६॥ भोजनादौततोभक्षेन्माषाष्टकमिदंशुभम्॥ शीततोयानुपानंचनारिकेरोदकंतथा॥७॥ ततोयथेष्टमाहारंकुर्यात्क्षीरोदनंचवै॥ अम्लपित्तंहरत्याशु शूलदुर्नामनाशनम्॥८॥ प्रमेहविंशतिंचैवमूत्राघातांस्तथाश्मरीम्॥ अविपत्त्यकरंचूर्णमगस्त्यमुनिभाषितम्॥९॥

अर्थः- सुंठ, मिरे, पिंपळी, त्रिफळा, नागरमोथे, वावडिंग, वेलदोडे, तमालपत्र हीं सर्व समभाग घेऊन सर्वांचे बरोबर लवंगा घेऊन जें चूर्ण होईल त्याचे दुप्पट तेडाचें चूर्ण घेऊन सगळे चूर्णा बरोबर सारवर घेऊन सर्व एकत्र करून राबलेल्या मडक्यांत ठेवून भोजनाचे पूर्वी आठमासे प्रमाण खावें. वर्ती थंड पाणी प्यावें. किंवा नारळाचें पाणी प्यावें. आहार यथेष्ट करावा. दूधभात जेवावा. म्हणजे अम्लपित्त, शूल, मुळव्याध, प्रमेह, मूत्राघात, मूत्राश्मरी यांचा नाश करितें. याला अविपत्त्यकर चूर्ण ह्मणतात. हें अगस्त्यमुनीनें सांगितलें आहे. इति अवि० चूर्णम्॥

॥पाठानिंबपटोलत्रिफलासनयासयोजितोजयति॥
॥अधिककफमम्लपित्तंप्रयोजितोगुग्गुलुःक्रमशः॥१०॥

अर्थः- पहाडमूळ, कडूलिंब, कडू पडवळ, त्रिफळा, असाणा, आणि धमासा यांचा काढा गुग्गुळ घालून द्यावा. तो अतिकफ व अम्लपित्त यांतें जिं०

॥सहिंस्राभृतभांडाकीक्वाथंकृत्वासमाक्षिकं॥
॥अम्लपित्तंहरेद्दुष्टंश्वासंकासंज्वरंवमीम्॥११॥

अर्थः- जटामांसी, गुळवेल, थोरा रिंगणी यांचा काढा मधासहित प्यावा. अम्लपित्त, श्वास, कास, ज्वर आणि ओकारी यांचें हरण करील अ० स०

॥पिप्पलीमधुसंयुक्ताअम्लपित्तविनाशिनी॥
॥जंबीरस्वरसःपीतःसायंहंत्यम्लपित्तकं१२

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- मध आणि पिंपळी अम्लपित्ताची नाशक आहे. लघु ईडलिंबाचा रस प्यालें असतां सायंकाळीं अम्लपित्ताचा नाश करितें असें जाणावें.

अम्लपित्तेप्रयोक्तव्यः कफपित्तहरोविधिः।
गुडकूष्मांडकंचैवतथाखंडामलक्यपि१३

अर्थ:- अम्लपित्तावर कफपित्तनाशक उपचार करावा. गूळ आणि कोंहळा किंवा खडीसाखर आणि आंवळकाठी हीं योजावीं॥ ७॥ श्रीशः

॥ज्वलंतमिवचात्मानंमन्यतेयोम्लपित्तवान्
तस्यैवशोधनंपथ्यंनशांतिःशोधनंविना१४

अर्थ:- जो अम्लपित्ती अम्लपित्तानें आपल्याला जळल्या प्रमाणें मानतो त्याला शोधन हितकारक आहे. त्या वांचून शांति ह्यावयाची नाहीं. ॥

॥गुडपिप्पलिपथ्याभिस्तुल्याभिर्मोदकःकृतः
॥पित्तश्लेष्मापहःप्रोक्तोमंदाग्निंचापिदीपयेत्१५

अर्थ:- गूळ, पिंपळी, हिरडा हीं समभाग घेऊन यांचा लाडू करून खावा. हा पित्त, कफ यांचा नाशक आणि मंदाग्नीचें दीपन करणारा असा आहे.

यवगोधूमविकृतिस्तीक्ष्णसंस्कारवर्जिता॥
यथास्वंलाजसत्तूंचासितामधुयुतान्पिबेत्१६

अर्थ:- सातूंचा किंवा गव्हांचा पदार्थ, त्याला तीक्ष्ण ह्मणजे तिखट वगैरे न घातलेला असा किंवा लाह्यांचें पीठ, मध तुपासहित जें ज्याला मानेल तें त्या०खावें.

॥निस्तुषयववृषधात्रीक्वाथंत्रिसुगंधमधुयुतं॥
॥पीत्वा॥अपहरतिचाम्लपित्तंयदिभुंक्तेमुद्गयूषेण१७॥

अर्थ:- कांडलेले सातु, अडूळसा, आंवळा, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, यांचा काढा मधयुक्त प्यावा. ह्मणजे अम्लपित्ताचा नाश करील. यावर पथ्य मुगांच्या कढणाशीं जेवण जेवावें.

॥यवकृष्णापटोलानांक्वाथंक्षौद्रयुतंपिबेत्॥
॥नाशयेदम्लपित्तंचत्वरुचिंचवमिंतथा१८॥

अर्थ:- सातु, पिंपळी, कडू पडवळ यांचा काढा मधयुक्त प्यावा. अम्लपित्त, अरुचि, ओकारी यांचा नाश करील.

भूनिंबनिंबत्रिफलापटोलीवासामृतापर्पटमार्कवाणां
क्वाथोहरेत्क्षौद्रयुतोम्लपित्तंचितंयथावारवधूकटाक्षः१९

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- काडेकिराईत, कडूलिंब, त्रिफळा, कडू पडवळ, अडूळसा, गळवेल, पित्तपापडा आणि माका यांचा काढा मध युक्त प्याला असतां आम्लपित्ताचें हरण करील. जसें वेश्यास्त्रीचा कटाक्ष चित्तहरण करितो त्याप्रमाः

कूष्मांडस्वरसोग्राह्यः पलानांशतमात्रकम्॥ रसतुल्यं गवांक्षीरंधात्रीचूर्णंपलाष्टकम्॥२०॥ लघ्वग्निनापचेन्नावद्यावद्भवतिपिंडितम्॥धात्रीतुल्यासितायोज्यामलाधंलेहयेदनु॥ खंडकूष्मांडकंख्यातमम्लपित्तंनियच्छति॥२१॥

अर्थ- कोंहळ्याचा रस ४०० तोळे, गायीचें दूध ४०० तो० आंवळकांठीचें चूर्ण ३२ तो० एकत्र करून मंदाग्नीनें गोळा होई तों पर्यंत शिजवावें. त्यांत ३२ तोळे साखर घालून दोन तोळे प्रमाणें खावें. अम्लपित्ताचें नाशक आहे. त्याला खंडकूष्मांड म्हणतात. इति खंडकूष्मांडकं॥ इ॰ अ॰ पि॰ चिकि॰

अथविसर्पविस्फोटलक्षणोपचारः

रक्तंलसीकात्वङ्मांसंदूष्यंतेत्रत्रयोमलाः॥
विसर्पणांसमुत्पत्तौसर्वत्रपरिसर्पणात्१

अर्थ- ज्यांत वातादिकांनीं रक्त, लस, त्वचा, मांस हीं दूषित होतात त्याला विसर्प ह्मणतात. तो सर्वत्र पसरतो. म्हणून त्याला विसर्प (विसाब) असें नांव आहे.

ज्वरोतिसारोवमथस्तृण्मांसदरणंक्लमः
अरोचकाविपाकौचविसर्पाणामुपद्रवाः२

अर्थ- ज्वर, अतिसार, ओकारी, तृषा, मांसभेद, ग्लानि, अरुचि, अपाचन हे विसर्पाचे उपद्रव जाणावे.

त्वचमाश्रित्यतेरक्तंमांसादीनिप्रदूष्यच॥घोरान्कुर्वंतिविस्फोटान्सर्वान्ज्वरपुरःसरान्३

अर्थ- वातादि दोष मांसादिक दूषित करून त्वचेचा आश्रय करून घोर विस्फोट म्हणजे फोड उत्पन्न करितात. त्याच्या पूर्वी ज्वर असतो.॥७

॥अग्निदग्धनिभास्फोटाःसरुजारक्तपित्ततः॥
क्वचित्सर्वत्रवादेहेविस्फोटाइतिसंस्मृताः४॥

अर्थ- अग्नीनें भाजून फोड येतो त्याप्रमाणें रक्तपित्तापासून क्वचित् ठिका-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

णीं किंवा सर्व देहाचे ठायीं जे फोड येतात त्यानां विस्फोट असें ह्मणतात.

भूनिंबवासाकटुकापटोलंफलत्रिकंचंदननिंबसिद्धः
विसर्पदाहज्वरशोफकंडूविस्फोटतृष्णावमिनुत्कषायः५

अर्थः किराईत, अडूळसा, कुटकी, कडू पडवळ, त्रिफळा, चंदन, कडूलिंब, यांचा काढा विसर्प, दाह, ज्वर, शोफ, कंडू, विस्फोट, तृषा, वमी यांचा नाशा करा॰

कनकझजगवल्लीमालतीपत्रसूर्वारसगदकुनटीभिर्मर्दितस्तैलयोगात्॥ अपहरतिरसेंद्रः कुष्ठकंडूविसर्पस्फुटितचरणरंध्रंश्यामलत्वंत्वचायाः॥६॥

अर्थः धोत्रा, नागवेल, जाई, मोरवेल, कपिला, कोष्ठकोलिंजन, मनशीळ इतक्यां बरोबर तेलयुक्त पारा खलून लावला असतां कुष्ठ, कंडू, विसर्प, फुटलेले पाय, त्वचेचा काळेपणा यांचा नाशा करितो.

एरंडतुंबीकटुनिंबचक्रमर्दोत्थबीजानिचसोमराजी॥
अंकोल्लबीजानिसमानिकृत्वापातालयंत्रेणसुतैलमेषां॥प्रगृह्यतेनाथविमर्दयेतविसर्पकादीन्विकृतिंप्रयांति७

अर्थः एरंड, कडू भोपळा, कडूलिंब, टांकळा यांचें बीं, बांवच्या, अंकोल्याचें बीं हीं सारखीं घेऊन पाताळयंत्रांत तेल काढून चोळावें म्ह॰ विसर्पादिक जातात.

पटोलामृतभूनिंबवासारिष्टकपर्पटैः॥खदिराष्टयुतैःक्वाथोविस्फोटज्वरशांतये॥८॥

अर्थः कडू पडवळ, गुळवेल, काडेकिराईत, अडूळसा, कडूलिंब, पित्तपापडा, खदिराष्टक यांचा काढा विस्फोटज्वर नाशार्थ प्यावा.

दूर्वावचोदुंबरजंबुशालसप्तच्छदाश्वत्थकषायकल्कैः
सिद्धंहिसर्वज्वरदाहपाकविस्फोटशोफान्विनिहंतिसर्पिः॥९॥

अर्थः दूर्वा, वेखंड, उंबर, जांबूळ, अर्जुन सादडा सांबिण, पिंपळ यांचा काढा आटवून त्याणें सिद्ध केलेलें तूप सर्वज्वर, दाह, पाक, विस्फोट, शोफ यांचा नाशा करितें. इतिविस्फोटचिकित्सा.

अथमसूरिकालक्षणोपचारः

स्फोटाःकृष्णारुणारूक्षास्तीव्रवेदनयान्विताः
मसूराकृतिसंस्थानाःपिटिकास्युर्मसूरिकाः१

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थः काळे,तांबडे,रूक्ष,तीव्र,वेदनेनें युक्त,मसूरा सारखे जे फोड त्यांस मसूरिका असें ह्मणतात.

तासांपूर्वज्वरः कंडूर्गात्रभंगोरुचिर्भ्रमः॥त्वचिशोफश्चवैवर्ण्यंनेत्ररोगश्चजायते॥२॥७

अर्थः मसूरिका उत्पन्न होण्या पूर्वी ज्वर,कंडू,आंग मोडून येणें,अरुचि,भ्रम,त्वचेला सूज,वैवर्ण्य,नेत्रपीडा इतकीं होतात.

निशाद्वयोशीरशिरीषमुस्तकैःसलोध्रभद्रश्रियनागकेसरैः॥पटोलमूलारुणतंदुलीयकैःपिबेद्धरिद्रामलकल्कसंयुतं॥मसूरिविस्फोटविसर्पशांतयेतथासरोमांतवमिज्वरापहः॥३॥

अर्थः दारुहळद,हळद,वाळा,शिरस,नागरमोथे,लोध्र,चंदन,नागकेशर,कडूपडवळ,पोरवरमूळ,तांबडा तांदुळजा यांचा काढा हळद आणि आंवळकाठी सहित प्यावा. तेणें करून मसूरिका,विस्फोट,विसर्प,गोंवर,वमि आणिज्वर यांचा नाश होतो.

पंचवल्कलचूर्णेनक्लेदनीमवचूर्णयेत्॥भस्मनाकेचिदिच्छंतितिलचूर्णैस्तथापरे॥४॥

अर्थः पंचवल्कलाचे चूर्णानें लस दडपावी. किंवा भस्मानें किंवा तिळांच्याचूर्णानें दडपावी इति मसूरिकाचिकित्सा.

अथस्नायुकलक्षणोपचारः

कुर्यात्तंतुनिभंसूत्रंश्वयथुंजनयत्यपि॥शनैःशनैःक्षताद्यानिपुनःस्थानांतरंभजेत्॥१॥सस्नायुकइतिख्यातःक्रियोक्तात्रविसर्पवत्

अर्थः जो तंतूसारखें सूत्र उत्पन्न करितो आणि सूज उत्पन्न करितो,हळूहळू क्षतापासून निघतो. पुनः दुसरे ठिकाणीं जातो. त्याला स्नायुक असें ह्मणतात. त्यावर विसर्पा प्रमाणें उपचार करावा.

गव्यंसर्पिस्त्र्यहंपीत्वानिर्गुंडीस्वरसंत्र्यहम्॥२॥पीत्वास्नायुकमत्यग्रंहंत्यवश्यंनसंशयः॥

अर्थः गाईचें तूप तीन दिवस पिऊन नंतर निर्गुंडीचा आंगरस तीन दिवस प्यावा. अतिकठिण स्नायुकरोगाचा नाश करील. यांत संशय नाहीं.७

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

कुष्ठरामठशुंठीभिः कल्कः शिग्रुसमन्वितः ३॥
पानालेपनयोगेन जंतुपीडाविनाशनः॥ ७॥

अर्थः कोष्ठकोलिंजन, हिंग, सुंठ, शेवगा यांचें चूर्ण वांटून पिणें, लेप त्या योगानें जंतुपीडा विनाशक आहे.

शिग्रुमूलफलैः पिष्टैः कांजिकेन ससैंधवैः ४
लेपनं लशुनं चाग्निराजिकापिंडिकादिके॥

अर्थः शेवग्याचें मूळ बीं वांटून सैंधव कांजीसहित एकत्र खलून लेप करावा. अथवा लसूण चित्रक मोहऱ्या यांचा लेप करावा. तेणें करून स्नायुक, पिंडिका म्हणजे पोटऱ्यांचे गोळे इत्यादिक शांत होतात असें जाणावें. ७

गुडूचीरसेन टंकणक्षारः पेयः॥ अथवा षणबीजं भागमेकं गोधूमपिष्टं भागमेकं द्वयमेकीकृत्य घृतेन पक्तव्यं गुडेन त्रिदिनं भक्षयित्वा स्नायुको न श्यति॥ ५॥ ७॥

अर्थः गुळवेलीच्या रसांत टंकणखार प्यावा. अथवा तागाचें बीं १ गव्हांचें पीठ १ हीं दोन्ही एकत्र करून तुपांत तळून गुळाबरोबर तीन दिवस खावें. म्हणजे स्नायुक नष्ट होईल. इति स्नायुचिकित्सा॥

अथ क्षुद्ररोगलक्षणोपचारः

स्निग्धाः सवर्णा ग्रथिताः सरुजा मुद्गसन्निभाः॥ ग्रंथयोऽष्टांगदेशेषु क्षुद्रास्तेत्र क्वचित्क्वचित्॥ १॥ दारुणश्चेंद्रलुप्तादिपलितं क्षुद्रसंज्ञितम्॥ सर्वेषां पंचकं चैव कुर्यादादौ यथाक्रमम्॥ २॥

अर्थः स्निग्ध, शरीराच्या त्वचे सारखा ज्यांचा वर्ण असे, पीडायुक्त, शरीराचे ठायीं मुगांप्रमाणें आठ ठिकाणीं जे ग्रंथि होतात त्यांनां क्षुद्र असें ह्मणतात. ते क्वचित् क्वचित् असतात. आणि दारुण इंद्रलुप्त ह्मणजे चाई इत्यादिक. पलित ह्मणजे केश पिकणें त्यानाही क्षुद्र ह्मणतात. सर्व क्षुद्ररोगांवर पूर्वी पांच उपचार क्रमानें करावे.

त्रिफलागुग्गुलुः सेव्यः पश्चाद्वात्र्यप्रलेपनम्
शस्त्रेणोत्कृत्य वल्मीकं क्षाराग्निभ्यां प्रसाधयेत् ३

अर्थः त्रिफळा गुग्गुळ खावा. नंतर लेप करावा. शस्त्रानें मांस वाढलेलें वगैरे कापून काढावें. खार किंवा अग्नि याणीं प्रसाधन म्हणजे जाळून साफ करावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

मनःशिलालंभल्लातसूक्ष्मैलागरुचंदनैः॥ जातिपल्लव
कल्कैश्चनिंबतैलंविपाचयेत्॥ ४॥ वल्मीकंनाशयेत्तै-
लंबहुच्छिद्रंबहुश्रुतम्॥

अर्थः मनशीळ, हरताळ, बिब्बा, कडूजिरें, वेलदोडे, अगरु, चंदन, जाईचे पल्लव यांच्या बरोबर लिंबोळ्यांचें तेल कढवावें. तें तेल वल्मीक म्हणजे वारुळा सारखें ज्यांत मांस वाढलेलें असतें त्यावर लावावें. म्हणजे पुष्कळ छिद्रांचें मोठें असें वल्मीक नाश पावतें.

प्रियंगुचंदनंलोध्रंकुष्ठंपांडुवटच्छदम्॥५
कालीयकान्वितंतैलंकुर्याच्चंद्रनिभंमुखे॥

अर्थः गहुला, चंदन, लोध्र, कोष्ठकोलिंजन, पांढरे वडाचीं पानें, दारुहळद यांचा लेप मुखाला केला असतां चंद्रासारखें मुख होतें असें जाणावें.॥७॥

लोध्रधान्यवचालेपस्तारुण्यपिटिकापहः॥ ६॥ तद्वद्गो-
रोचनायुक्तैर्मरिचैश्चप्रलेपनम्॥ सिद्धार्थकवचालो-
ध्रसैंधवैश्चप्रलेपनम्॥ ७॥ गव्येनचार्जुनत्वग्वामंजि-
ष्ठावासमाक्षिका॥ कंटकैः शाल्मलेयैश्चक्षीरपिष्टैर्वि-
लेपयेत्॥ मुखेतारुण्यपिटिकाःसंक्षयंयांत्यसंशयं॥

अर्थः लोध्र, धणे, वेखंड, यांचा लेप तसेंच गोरोचन, मिरें यांचा लेप, आणि श्वेत शिरस, वेखंड, लोध्र, सैंधव यांचा लेप; आणि गायीचें दूध, अर्जुनवृक्षाची साल यांचा लेप आणि मंजिष्ठ, मध यांचा लेप; आणि सांवरीचे कांटे दूध यांचा लेप हे सर्व लेप मुखावरील तारुण्यपिटिकांचे नाशक आहेत. इ पिटिका.

अथारूंषिकालेपः

पुराणमथपिण्याकंपुरीषंकुक्कुटस्यच॥ मू-
त्रेपिष्ट्वाप्रलेपोयंशीघ्रंहन्यादरुंषिकाम्॥१॥

अर्थः जुनी पेंड, कोंबड्याची विष्ठा गोमूत्रांत वांटून लेप करावा. म्हणजे अरुंषिका (खवडे) यांचा नाश लवकर करील.

खदिरारिष्टजंबूनांत्वग्भिर्वामूत्रसंयुतैः॥
कुटजत्वक्सैंधवैर्वाले पाद्वन्यादरुंषिकाम्॥२॥

अर्थः खैर, कडूलिंब, जांबूळ यांच्या साली गोमूत्रांत वांटून त्याचा लेप अथवा कुड्याची साल आणि सैंधव यांचा लेप अरुंषिका नाशक आहे असें समजा.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अरूंषिकांजलौकाभिर्बहुशोग्राहयेद्भिषक् ॥ प्रक्षालयेन्मुखंतक्रसैंधवक्वाथवारिभिः ॥ ३ ॥ मुहुर्मुहुस्ततोलिंपेत्पटोलारिष्टवासकैः ॥ निंबोदकेनलवणैस्ततोहन्यादरुंषिकाम् ॥ ४ ॥

अर्थ:- अरुंषिकेवर वारंवार जळवा लावाव्या. आणि ताक, सैंधव यांचा काढा व पाणी यानें वारंवार तोंड धुवावें. नंतर कडू पडवळ, कडूलिंब, अडूळसा, कडूलिंबाचा रस आणि सैंधव यांचा लेप करावा. म्ह० अरुंषिका नाशा हो० इ० अ०

अथ दारुणः

आम्रबीजस्यचूर्णंतुशिवाचूर्णंसमंद्वयम् ॥
दुग्धेपिष्ट्वाप्रलेपोयंदारुणंहंतिदारुणं १ ॥

अर्थ:- आंब्याच्या कोईचें चूर्ण, आंवळकाठीचें चूर्ण हीं दोन्ही समान दुधांत वांटून लेप करावा. म्हणजे दारुण (कपाळरोग) यांचा नाश करील

भृंगराजरसेनैवलोहकिट्टंपलत्रिकम् ॥ सारिवांचपचेत्कल्कैस्तैलंदारुणनाशनम् ॥ २ ॥ अकालपलितंकंडूमिंद्रलुप्तंचनाशयेत् ॥

अर्थ:- माक्याच्या रसांत लोहकीट १२ तोळे आणि उपळसरीचा कल्क करून त्यांच्या बरोबर तेल कढवून लावावें. म्हणजे दारुणा, अकाळीं केश पिकणें, कंडू आणि इंद्रलुप्त यांचा नाश करील. इतिभृंगराजतैलम् ॥

कंटकारीफलरसैस्तुल्यंतैलंविपाचयेत् ॥
जपापुष्पद्रवैर्वाथतल्लेपोदारुणप्रणुत् ३ ॥

अर्थ:- रिंगणीच्या फळांच्या रसांत त्याच्या बरोबर तेल घालून कढवावें अथवा जास्वंदीचे फुलांचे रसांत तितकेंच तेल घालून कढवावें आणि तें तेल चोळावें. दारुण नाशक आहे.

पारदंमर्दयेन्निष्कंकृष्णाधत्तूरकद्रवैः ॥ नागवल्लीद्रवैर्वाथवस्त्रखंडंप्रलेपयेत् ४ तद्वस्त्रंमस्तकेवेष्ट्यधार्यंयामत्रयंततः ॥ यूकाःपतंतिनिश्चेष्टाःपरीक्षानात्रसंशयः ॥ ५ ॥

अर्थ:- चार मासे पारा घेऊन काळे धोत्र्याचे किंवा नागवेलीच्या रसांत खलून फडक्याला लेप करावा. तें फडकें डोक्यास बांधावें. तीन प्रहर तसेंच ठे-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

वलें असतां उवा मरून पडतात या विषयीं परीक्षा पाहणें नको ॥७॥श्रीशः

कोद्रवाणांतृणक्षारपानीयंपरिधावने॥कु-
र्याद्दारुणिकेमूर्ध्निलेपोवामधुसंयुतः॥८॥

अर्थ- हरकांच्या गवताच्या क्षाराचें पाणी डोकें धुवायला घ्यावें. अथवा क्षार, मध यांचा लेप करावा. तेणें करून दारुणा जातो. इतिदारुणः

अथइंद्रलुप्तं

इंद्रलुप्तेमहालेपोमधुनाबृहतीरसः॥ गुं-
जामूलफलंवापिभल्लातकरसेपिवा॥१॥

अर्थ- रिंगणीचा रस, मध यांचा किंवा गुंजेचें मूळ अथवा फळ बिब्ब्याच्या रसांत उगाळून त्याचा लेप करावा. इंद्रलुप्तावर मोठा प्रशस्त आहे असें जा०

लेपःसनवनीतोवाश्वेताश्वखुरजामषी॥ हस्तिदंत-
मषींकृत्वाछागदुग्धंरसांजनम्॥ ॥रोमाण्यस्यप्र-
जायंतेलेपात्पाणितलेष्वपि२

अर्थ- पांढऱ्या घोड्याच्या खुराची मशेरी लोण्यांत खलून लावावी. अथवा हस्तिदंताची मशेरी, शेळीचें दूध, रसांजन एकत्र खलावें आणि त्याचा लेप करावा. तेणें करून हातांच्या तळव्यावर देखील केश येतात.

प्रियालबीजमधुककुष्ठमाषैःससैंधवैः॥
गुंजाफलैश्चिरंलिंपेत्केशाभूमिंसमंततः३

अर्थ- चारोळ्या, ज्येष्ठमध, कोष्ठकोलिंजन, उडीद, सैंधव आणि गुंजा यांचा पुष्कळ दिवस पर्यंत लेप करावा. ह्मणजे केंश येतात.

॥गुंजापत्रविषंतैलंलाक्षामधुककांजिकम्
॥पतंत्यनेननोकेशालेपाद्रोहंतिचद्रुतम्४

अर्थ- गुंजेचीं पानें, बचनाग, तेल, लाख, ज्येष्ठमध, कांजी यांच्या लेपानें केश गळत नाहींत. आणि नवे रुजतात. इति इंद्रलुप्तं॥

॥अथकेशकृष्णीकरणं॥

॥त्रिफलानीलिनीपत्रंलोहंभृंगरसैःसमम्
॥अविमूत्रेणसंमिश्रंकृष्णीकरणमुत्तमं॥१

अर्थ- त्रिफळा, लघुनीलीचीं पानें, लोहचूर्ण, माक्याचा रस, मेंढीचें मूत एकत्र खलून केशाला चोळावें. म्हणजे केश काळे होतात. असें जाणावें.॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥अयोरजो भृंगराजस्त्रिफला कृष्णमृत्तिका॥
॥स्थितमिक्षुरसेमासं लेपनात्पलितंजयेत्२॥

अर्थ- लोहचूर्ण माका त्रिफळा काळी माती हीं महिनाभर उंसाच्या रसांत ठेवून नंतर लेप करावा म्हणजे पलितानें जिंकील. म्हणजे पांढरे केंस काळे होतील.

धात्रीफलद्वयंपथ्येद्वेतथैकंबिभीतकम्॥पंचाम्रम-
ज्जा लोहस्यकर्षेकंचप्रदीयते॥ ३ ॥पिष्ट्वालोहमये
भांडेस्थापयेदुषितंनिशि॥लेपोयंहंतिनचिराद्का-
लपलितंमहत्॥४॥

अर्थ- दोन आंवळे, हिरडे २, बेहडा १, अंब्याच्या कोया ५, लोहचूर्ण एक तो; लोहाच्या पात्रांत खलून एकरात्र ठेवून लेप करावा. अकाळीं जें पलित होतें त्याचा लोकर नाश करील. इति कृष्णीकरणम्

॥अथपामाचिकित्सा॥

प्रपुन्नाटस्यबीजानिबाकुचीसर्षपास्तिलाः॥कुष्ठंनि-
शाद्वयंमुस्तंपिष्ट्वातक्रेणचैकतः॥०प्रलेपाद्दस्यनश्यं-
तिकंडूपामाविचर्चिकाः॥१॥

अर्थ- टांकळ्याचें बीं, बांवच्या, शिरस, तीळ, कोष्ठकोलिंजन, दारुहळद, हळद, नागरमोथे हीं एकत्र ताकांत खलून लेप केला तर कंडू, खरूज, आणि विचर्चिका यांचा नाश होतो.

रसद्विजीरद्विनिशामरीचदैत्येंद्रसिंदूरमनःशिलानां
चूर्णीकृतानांघृतमिश्रितानांत्रिभिःप्रलेपैरपयातिपा-
मा॥२॥

अर्थ- पारा काळें जिरें, कडूजिरें, दारुहळद, हळद, मिरें, गंधक, शेंदूर, मनशीळ हीं तुपांत खलून त्याचा तीन वेळा लेप करावा म्हणजे खरूज जाते.

अर्कपत्ररसेपक्वंहरिद्राकल्कसंयुतम्॥ना-
शयेत्सार्षपंतैलंपामाकंडूविचर्चिकाः॥३॥

अर्थ- रुईच्या पानांच्या रसांत हळदीच्या चूर्णासहित शिरसाचें तेल कढवून लावावें. तें खरूज, कंडू आणि विचर्चिका यांचा नाश करील.॥७

अश्वत्थस्यत्वचोभस्मचूर्णेनसहमिश्रितम्॥नवनीतं

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

द्वयोस्तुल्यंमर्द्धंतेनप्रलेपयेत्॥ आसनेगुदपार्श्वेचक-
टिस्थांपिटिकांजयेत्॥४॥

अर्थः पिंपळाच्या सालीची राख आणि चुना यांच्या बरोबर लोणी घेऊन एकत्र खलून लेप करावा. म्हणजे कुले गुद, कुशी आणि कंबर या ठिकाणची खरूज नाशील. इतिपामा.

॥अथाग्निदग्धे॥

यवान्दग्ध्वामषीकार्यातैलेनयुतयातया॥
दद्यात्सर्वाभिदग्धेषुप्रलेपंव्रणरोपणं॥१॥

अर्थः सातूंची मशोरी तेलांत खलून भाजलेले ठिकाणीं लेप करावा ह्मणजे बरा होईल.

सिक्थंसर्जरसोजीरंघृतपक्वंत्र्यहंहरेत्॥
लेपतोवह्निदग्धस्यदुःखंमृत्यंजयोयथा२

अर्थः मेण, राळ, शेरवजिरें हीं तुपांत घालून कढवावें. नंतर याचा लेप भाजलेल्या ठिकाणचें दुःख तीन दिवसांत हरण करितो. जसा सांब दुःखातें हरण करितो तद्वत्.

मधूच्छिष्टंसमधुकंरोध्रंसर्जरसंतथा॥ मंजिष्ठाचंदनंमूर्वापिष्ट्वासर्पिर्विपाचयेत्॥ सर्वेषामग्निदग्धानामेतद्रोपणमुत्तमम्॥३॥

अर्थः मेण, ज्येष्ठमध, लोध्र, राळ, मंजिष्ठ, चंदन, मोरवेल हीं कुटून तुपांत कढवून लेप करावा. म्हणजे भाजलेलें बरें होईल. इत्यग्निदग्धव्रणचि०।

॥अथांगस्रगंधकरणम्॥

तांबूलपत्रचूर्णंतुचूर्णंकुष्ठशिवाभवम्॥वारिणालेपनंकुर्यात्गात्रदौर्गंध्यनाशनम्॥१॥

अर्थः नागवेलीचीं पानें, कोष्ठ, कोलिंजन, आंवळकाठी हीं पाण्यांत वांटून अंगास चोळावीं म्हणजे अंगाची दुर्गंधि नाश होईल. इ॰स्रगं॰कर॰

॥इत्यादिबहवोयोगाःक्षुद्ररोगास्त्वनेकधा
तेनात्रकथिताभिथ्याउक्ताःकारणिकामया२

अर्थः असे पुष्कळ योग आहेत आणि क्षुद्ररोगही अनेक प्रकारचे आहेत ते सर्व लिहिले नाहींत. कारणीक मात्र लिहिले आहेत. इतिक्षुद्ररोगः

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथमुखरोगचिकि०॥

मुखवेष्ट्योष्ठगतादंतवेष्टगादंतगास्तथा॥ हनुजिह्वागतास्तालुगतागलगतास्तथा॥ १॥ मुखरोगाः पंचषष्टिः संप्रस्वायतनेषुच॥ पृथक्लक्षणमेतेषांविस्तरान्नात्र लेखितम्॥२॥

अर्थ- ओंष्ठ, दंतवेष्ट म्हणजे हिरड्या, दांत, हनवटी, जिह्वा, तालु, गळा, इतके स्थानीं मुखाचे ठायीं ६५ मुखरोग होतात, त्यांचा विस्तार होईल, म्हणून निरनिराळीं लक्षणें लिहिलीं नाहींत.

॥श्रीवेष्टकंसर्जरसंसरदारुंसगुग्गुलुम् ॥
यष्टीमधुकसंचूर्णमोष्ठजेप्रतिसारणम्३॥

अर्थ- विशेषनामक धूप, राळ, देवदार, गुग्गुळ, ज्येष्ठमध यांचें चूर्ण बारीक करून ओष्ठाला चोळावें.

शीतादेर्द्दतरक्तंचतोयेनागरसर्षपान्॥ निष्काथ्यत्रिफलांमुस्तांगंडूषःसरसांजनः॥ प्रियंगवश्चमुस्ताचत्रिफलाचप्रलेपनम्॥४॥

अर्थ- थंडीवारा याणीं ओंठ फुटून रक्त निघालें असतां सुंठ, शिरस, त्रिफळा आणि नागरमोथे यांचा काढा करून त्यांत रसांजन घालून चूळ भरूं टाकावें. राळे, नागरमोथे आणि त्रिफळा यांचा लेप करावा.॥७॥

जातीपत्रामृताद्राक्षायासदार्वीफलत्रिकैः॥
क्वाथःक्षौद्रयुतश्चोक्तोगंडूषैर्मुखपाकजित्५॥

अर्थ- जाईचीं पानें, गुळवेल, मनुका, धमासा, दारुहळद आणि त्रिफळा यांच्या काढ्यांत मध घालून चूळ भरावी. म्हणजे मुखपाकानें जिंकील.॥

पटोलशुंठीत्रिफलाविशालात्रायंतितिक्ताद्विनिशामृतानाम्॥ पीतःकषायोमधुनानिहंतिचिरस्थितानास्यगदानशेषान्॥६॥

अर्थ- कडूपडवळ, सुंठ, त्रिफळा, कडुइंदावन, मेंदी, कुटकी, दारुहळद, हळद, गुळवेल यांचा काढा मध घालून प्यालें असतां फार दिवसांचे व सर्व प्रकारचे मुखरोगांचा नाश करील.

कटुकातिविषादारुपाठामुस्तकलिंगकैः॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

गोमूत्रक्वथितःपेयःकंठरोगविनाशनः॥७॥

अर्थः- कुटकी, अतिविष, देवद्वार, पाहाडमूळ, नागरमोथें, इंद्रजव यांचा गोमूत्रांत काढा करून प्यावा. कंठरोगाचा नाशक आहे. असें जाणावें॥७

गृहधूमोयवक्षारःपाठाव्योषंरसांजनम्॥तेजोव्हाभि-
फलालोध्रंचित्रकश्चेतिचूर्णितम्॥सक्षौद्रंधारयेदेत-
द्गलरोगविनाशनं८॥

अर्थः- घेरोसा, जवखार, पहाडमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, रसांजन, तेजबळ, त्रिफळा, लोध्र, चित्रक यांचें चूर्ण करून मधांत गोळी करून तोंडांत धरावी. गलरोगाची नाशक आहे.

यष्टीशुंठीतिलक्वाथोगंडूषंतेनकारयेत्॥भो-
जनंमुद्गमिश्रंचमुखपाकप्रशांतये॥९॥७॥

अर्थः- ज्येष्ठमध, सुंठ, तीळ यांच्या काढ्यानें चूळ भरावी. मुगांची खिचडी खावी. म्हणजे मुखपाकाची शांति होईल.

॥क्वाथोदार्व्यायुतःक्षौद्रैर्गंडूषैर्मुखपाकजित्
॥आस्यरोगहरंखादेन्मधुनापापटंरसम्॥१०॥

अर्थः- दारुहळदीच्या काढ्यांत मध घालून गुळण्या कराव्या. मुखपाकानें जिंकील. आस्यरोगाचा नाशक पित्तपापड्याचा रस मधयुक्त खावा.॥७॥

॥स्वरसोमातुलिंगस्यसंयुतोमधुसर्पिषा॥
॥तालुशोषेप्रलेपोयंमूर्ध्निदेयःससैंधवः॥११॥

अर्थः- महाळुंगाच्या स्वरसांत मध, तूप आणि सैंधव घालून मस्तकावर लेप करावा. म्हणजे तालुशोष शांत होतो.

॥लाजाजाजीफलंपूगंतुल्यंभक्ष्यंपिबेदनु॥
॥शीततोयंपलार्धंचत्द्यास्यवैरस्यशांतये१२

अर्थः- लाह्या, जायफळ, सुपारी हीं समान घेऊन खावीं. वर्ती थंड पाणी दोन तोळे प्यावें. तेणें करून मुखाला रुचि येते.

कटुतिक्तकषायेणदंतकाष्ठेननित्यशः॥दु-
र्गंधिंहंतिनोचित्रंक्षौद्रैर्वाकुष्ठचूर्णकम्१३

अर्थः- कडू, तिखट, तुरट, अशा काष्ठांनीं दांत घांसले किंवा कोष्ठकोलिंजन आणि मधयाणीं दांत घांसले तर दुर्गंधीचा नाश होतो असें जा-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

जातीनिंबपटोलंचमालतीनवपल्लवाः॥ पं-
चपल्लवकः श्रेष्ठः कषायोमुखधावने॥१४

अर्थ:- जाई, पिंवळी जाई, चमेली, कडूलिंब, कडू पडवळ यांच्या कोंवळ्या पल्लवाचे काढ्यानें मुख धुवावें. म्हणजे चांगलें होतें.

मुखदंतभवागलजारोगाःप्रायःकफेनभूयिष्ठाः
तस्मात्तेषामसकृद्रुधिरंसंस्रावयेद्दुष्टम्॥ १५॥

अर्थ:- मुख दांत, गळा या ठिकाणचे रोग बहुतकरून फार कफानें युक्त असे असतात. म्हणून वारंवार दुष्टरक्त काढलें असतां बरे होतात. ॥७॥

जातिप्रवालत्रिफलायवासदारुत्रियामामृत-
गोस्तनीनाम्॥ कषायकः क्षौद्रयुतोनिहंति
नरस्यपाकंमुखपंकजस्थम्॥ १६॥ ७॥ ७॥

अर्थ:- जाईचे कोंवळे पल्लव, त्रिफळा, धमासा, दारुहळद, गुळवेल, काळीं द्राक्षें यांचा काढा मधयुक्त प्यावा. म्हणजे मुखपाकाचा नाश करील. ॥७

खदिरस्यतुलांसम्यग्जलद्रोणेविपाचयेत्॥ शेषाष्ट-
भागेक्वाथेस्मिन्नेतानिप्रतिवापयेत्॥१७॥ जातीकर्पू-
रपूगानिकंकोलकफलानिच॥ एतेषांगुटिकाकार्या मु-
खसौभाग्यवर्धिनी॥१८॥ दंतोष्ठमुखरोगेषुजिह्वाता-
ल्वामयेषुच॥१९॥

अर्थ:- खैर ४०० तो० पाणी १०२४ तो० घेऊन अष्टमांश काढा करून त्यांतजायपत्री, कापूर, सुपारी, कंकोळ, यांचें चूर्ण टाकून गोळ्या कराव्या. त्या मुख, दांत, ओंठ, जिव्हा, तालु, यांचे रोगावर प्रशस्त आहेत. ॥ इति-खद-गु-चिकित्सा.

उपजिह्वांतुसंलिख्यक्षारेणप्रतिसारयेत्
दोषक्षाराभयावह्निचूर्णमेतत्प्रघर्षणं२०

अर्थ:- पडजिभेला क्षार लाऊन सुंठ, मिरें, पिंपळी, जवखार, हिरडा, चित्रक, यांच्या चूर्णानें दडपावी. म्हणजे बरी होते.

गृहधूमारनालेनक्वाथंसमधुसैंधवम्॥पा-
णिनामर्दयेच्चास्यमुपजिह्वाप्रशांतये॥२१

अर्थ:- घेरोसा कांजीत घालून ऊन करून मधसैंधवयुक्त तोंडाला आंतून चोळावा म्हणजे पडजीभ बरी होते.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

निर्गुंडीमुत्पलंकंदंचर्वयेदुपजिह्वजित्॥

अर्थः निर्गुंडीचा आणि कमळाचा कांदा चावावा म्हणजे पडजीभ बरी होते.

बकुलस्यफलंरोध्रंवज्रवल्लीकुरंटकम्॥ चतुरंगुलब-
ब्बूलमिदंसर्वंसमंस्मृतम्॥२२ एषांकल्कैःकषायैर्वातैलं
पक्वंमुखेधृतं॥स्थैर्यंकरोतिचलितदंतानांधावनेनच२३

अर्थः बकुळीचीं फळें, लोध्र, वाळा, काळी गोकर्णी, कोन्हांटा, बाहवा, बाभूळ हीं सर्व समभाग घेऊन यांचा काढा किंवा कल्क करून त्याच्या बरोबर तेल कढवून निवबून तोंडांत धरावें तेणें करून हालणारे दांत बळ० होः

तुत्थलोध्रकणापथ्यापटुविश्वावघर्षणात्
अपिप्रचलितादंताजायंतेवज्रसन्निभाः२४

अर्थः मोरचूत, लोध्र, पिंपळी, हिरडा, मीठ, सुंठ यांच्या चूर्णानें दांत घांसावे. म्हणजे दांत हालत असले तरी वज्रासारिखे होतात असें जाणावें.

कुष्ठंदार्वीलोध्रपाठासमंगामुस्तातिक्तातेजिनीपीतिका
च॥चूर्णंशस्तंघर्षणंतद्विजानांरक्तस्रावंहंतिकंडूंरुजंच२५

अर्थः कोष्ठकोलिंजन, दारुहळद, लोध्र, पाहाडमूळ, मंजिष्ठ, नागरमोथे, कुटकी, तेजबळ, जुई यांच्या चूर्णानें दांत घांसावे. रक्तस्राव, कंडू, ठणका यांचें नाशक आहे.

दंतपुप्पुटकेकार्यंतरुणेरक्तमोक्षणं॥सपं-
चलवणाक्षारंसक्षौद्रंप्रतिसारणम्॥२६॥७

अर्थः नूतन दंतपुप्पुट रोगावर रक्तमोक्षण करावें आणि पंचलवणाक्षार व मध यांणीं दांत घांसावे.

कासीसहिंगुसौराष्ट्रीदेवदारुसमंजलैः॥
गुटिकांधारयेद्दंतकृमिशूलहरांपराम्॥२७

अर्थः हिराकस, हिंग, तुरटी, देवदार, यांची गोळी पाण्यांत वांटून करावी आणि मुखांत धरावी. ही दंत, कृमि आणि दंतशूल यांची नाशक आहे.

यवाग्रजंतेजवतीसपाठांरसांजनंदारुनिशांसकृष्णाम्
क्षौद्रेणकुर्याद्गुटिकांमुखेनतांधारयेत्सर्वगलामयेषु॥२८

अर्थः जवखार, तेजबळ, पहाडमूळ, रसांजन, दारुहळद, पिंपळी, हीं घेऊन मधांत कालवून गोळी करून तोंडांत धरावी. सर्व गलरोगांवर प्रशस्त आहे. इ॰मु॰चि॰

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथकर्णरोगलक्षणोपचारः॥

समीरणःश्रोत्रगतोयदाचरेत्समंततःशूलमतीवकर्णयोः॥
करोतिदोषैःश्वयथुंसमावृतःसकर्णरोगःकथितोदुरासदः१

अर्थः- जेव्हां दोषांनीं युक्त असा वायु कानांत संचार करितो आणि कानाचे ठायीं शूल,शोफ उत्पन्न करितो त्याला कर्णरोग असें ह्मणतात. तो दुःसाध्य.॥

बधिरत्वंकर्णपूतिलूताकर्णरुजा बहुः॥२॥

अर्थः- बहिरेपणा,कर्णपूति म्हणजे कानांतून पू वाहतो. कर्णलूता म्हणजे कानांतून किरूळ वगैरे तो कर्णरुजा म्हणजे कानांत ठणका असे अनेक कर्णरोगांचे भेद आहेत.

तीव्रशूलातुरेकर्णेसशब्दे क्लेशवाहिनी॥ब-
स्तमूत्रंक्षिपेत्कोष्णंसैंधवेनसमन्वितम्॥२॥

अर्थः- तीव्र शूलानें व्याप्त शब्दयुक्त पूवाहणारा अशा कर्णाचे ठायीं सैंधवयुक्त बोकडाचें मूत किंचित् उष्ण करून तें कानांत घालावें.

जंब्वाम्रपत्रंतरुणंसमांशंकपित्थकापीसफलंचसार्द्रम्
कृत्वारसंतन्मधुनाविमिश्रंस्रावापहंसंप्रवदंतितज्ज्ञाः॥३

अर्थः- जांभळीचीं आणि अंब्याचीं कोंवळीं पानें,ओलें कापशीचें फळ आणि कंवठ हीं समभाग घेऊन रस काढून मधयुक्त कानांत घालावा. म्हणजे स्राव बंद होईल.

कुष्ठंहिंगुवचादारुशताह्वाविश्वसैंधवैः॥पू-
तिकर्णापहंतैलंबस्तमूत्रेणसाधितम्॥४॥

अर्थः- कोष्ठकोलिंजन,हिंग,वेखंड,देवदार,शतावरी,सुंठ,सैंधव आणि बोकडाचें मूत याणीं सिद्ध केलेलें तेल कानांत घालावें. म्हणजे कानांतील पुवाचा नाशक आहे.

गवांमूत्रेणबिल्वानिपिष्ट्वातैलंविपाचयेत्॥
सक्षारंतच्चवितरेद्बाधिर्येकर्णपूरणम्॥५॥

अर्थः- गायीच्या मूत्रांत बेलफलें वांटून त्याच्या बरोबर तेल कढवून क्षारयुक्त कानांत घालावें म्हणजे बाधिर्य जाईल.

कपित्थमातुलिंगाम्रशृंगबेरसैःशुभैः॥सु-
खोष्णैःपूरयेत्कर्णंकर्णशूलोपशांतये॥६॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- महाळुंग, आंबा, आणि आलें यांचा रस किंचित् उष्णा करून कानांत घालावा. तेणें करून कर्णशूल शांत होईल.

कर्णशूलहरंक्षिप्त्वा लवणार्द्रकयोरसम्॥ दंतेनचर्वयेन्मूलंनद्यावर्त्तपलाशयोः॥०॥ तल्लालपूरितेकर्णेध्रुवंगोमक्षिकांजयेत्७

अर्थ- कर्णशूलहारक सैंधवयुक्त आल्याचा रस कानांत घालावा आणि नंद्यावर्त, पळस याचें मूळ दांतानें चावावें आणि ती ठंकी कानांत घालावी. ह्मणजे गोमाशीचा नाश करील.

हिंग्वब्ददारुमिसिमूलकभस्मभृंगरुक्क्षारसिंधुरुचकोद्भिदशिग्रुविश्वैः॥ स्रुक्कसर्जिकाबिडवचांजनमातुलिंगरंभांभसासमधुसूक्ष्मिदंविपक्कम्॥८॥ तैलंप्रसिद्धमितितच्छ्रवणामयघ्नंकर्णव्रणादिबधिरत्वहरंनराणाम्॥भ्रूमस्तकश्रवणशष्कुलिकांतरेषुशूलापहंचरकशास्त्रचिकित्सितोक्तम्९

अर्थ- हिंग, नागरमोथे, देवदार, बडिशेप, मुळ्याची राख, कोष्ठ, भाका, जवखार, सैंधव, पादेलोण, सोरा, शेवगा, सुंठ, निवडुंग, सज्जीखार, बिडलोण, वेखंड, सुरमा, महाळुंग, केळीचें पाणी, मध, कांजी यांच्या बरोबर कढवून सिद्ध केलेलें तेल कर्णरोगाचें नाशक आणि शिवया, मस्तक, कान या ठिकाणच्या शूलाचें नाशक आहे असें चरकोक्त चिकित्सेंत सांगितलें आहे.॥७॥८

सद्रससैंधवमागधिमुस्ताहिंगुवचालशुनंतिलतैलम्॥ अर्कसुपक्वपलाशरसेनकर्णरुजंबधिरंविनिहंति॥१०॥

अर्थ- बोळ, सैंधव, पिंपळी, नागरमोथे, हिंग, वेखंड, लसूण, आणि तिळांचें तेल हीं रुईच्या पिकलेल्या पानांचा रस काढून त्याच्या बरोबर कढवून तें तेल कानांत घातलें असतां कर्णरोग, बहिरेपणा यांचा नाश करील. इ. क०

अथनासारोगचिकित्सा॥०

अपीनसंपूतिनासानासापाकस्तथैवच॥ तथाशोणितपित्तंचपूयशोणितमेवच॥१॥ क्षवथुभ्रंशमुद्दीसोनासानाहःपरिस्रवः॥नासाशोषेणसहितादशैकाश्चेरितागदाः२

अर्थ- अपीनस १ पूतिनासा २ नासापाक ३ शोणितपित्त ४ पूयशोणित ५ क्षवथु

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

६ भ्रंश ७ उद्दीस ८ नासानाह ९ परिस्रव १० नासाशोष ११ या प्रमाणें अकरा प्रकारचे नासारोग जाणावे.

रक्तकरवीरपुष्पंजात्यंवाथचमल्लिका॥ एतैःसमंतिलंतैलंनासार्शोनाशनंपरम्३॥

अर्थः- तांबडा कण्हेर, जाई, मोगरी यांच्या फुलांचा रस आणि त्यांच्या बरोबर तिळांचें तेल एकत्र मिश्र करून नाकांत घालावें. नासार्शाचें नाश. आ०

गृहधूमकणादारुक्षाररक्तैःससैंधवैः॥ सिद्धंशिरवरिबीजेश्चतैलंनासार्शसांहितं॥४॥

अर्थः- घेरोसा, पिंपळी, देवदार, जवखार, लाख, सैंधव, आघाड्याचें बीं यांणीं सिद्ध केलेलें तेल नासार्शावर प्रशस्त आहे.

कलिंगहिंगुमरिचंलाक्षासूरसकट्फलैः॥ कुष्ठोग्रशिग्रुजंतुघ्नैरवपीडःप्रशस्यते॥५॥ तैरेवमूत्रसंयुक्तैः कटुतैलंविपाचयेत्॥ अपीनसेपूतिनासेशमनंकीर्तितं परम्॥६॥॥

अर्थः- इंद्रजव, हिंग, मिरें, लाख, निर्गुंडी, कायफळ, कोष्ठकोलिंजन, शेण्या खेर, शेवगा, वावडिंग हीं वांटून गोळी करून जेवणापूर्वीं खावी. आणि हींच गोमूत्रांत घालून त्याच्या बरोबर शिरसाचें तेल कढवून ठेवून नाकांत घालावें म्हणजे अपीनस, पूतिनासा यांचा नाश करील. अ० जा०

शुंठीकुष्ठकणाबिल्वद्राक्षाकल्ककषायवत्
साधितंतैलमाज्यंवानस्यात्क्षवथुरुक्प्रणुत्७

अर्थः- सुंठ, कोष्ठकोलिंजन, पिंपळी, बेलफळ, द्राक्ष, यांच्या कल्कानें सिद्ध केलेलें तेल किंवा तूप नस्ययोगानें क्षवथुरोगाचें नाशक आहे.॥७

पूयःस्रवतिदुर्गंधोनासायाअतितापकृत्
कृतेनस्येचतंहन्याच्छ्वेतंजीरंसितायुतं८

अर्थः- नाकापासून दुर्गंधियुक्त अतिदाह करणारा पू पाझरतो. त्याचा पांढरें जिरें आणि सारवर यांचें नस्य केलें असतां नाश होतो. अ० स०

घृताक्तकुंकुमंनस्येसृष्टंपीनसजिद्भवेत्॥

अर्थः- केशर तुपांत खलून नस्य केलें असतां पीनस जिंकणारें आहे.॥

इतिनासारोगचिकित्सा॥७॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अथनेत्ररोगचिकित्सा.

ऊर्ध्वंगमाभिरुपगम्यशिरःशिराभिर्दोषाःस्व
हेतुकुपिताःकफपित्तवाताः॥कंठोष्ठतालुरसना-
रदमूलकर्णनासास्यलोचनशिरःस्फुरुजःसृ-
जंति॥१॥

अर्थ- आपापल्या कारणांनीं कुपित झालेले वात, पित्त, कफ ऊर्ध्ववाहि शिरांच्या योगानें मस्तकाप्रत प्राप्त होऊन कंठ, ओष्ठ, तालु, जिह्वा, दंतमूल, कर्ण, नासिका, मुख, डोळे, डोकें यांचे ठायीं रोग उत्पन्न करतात.॥१

षट्सप्रतिलोचनजाविकारास्तेषामभिष्यंदसमुद्भवा-
नाम्॥श्लेष्माश्रयत्वादतिलंघनंप्राक्प्रशस्यतेमुद्गर-
सोदनंच॥२॥

अर्थ- नेत्ररोग साहत्तर त्यामध्यें अभिष्यंदापासून उत्पन्न होणारे कफाश्रित असतात. ह्मणून त्यांवर पूर्वीं पुष्कळ लंघनें करावीं. नंतर मुगांचा मंड आणि भात खावा.

आश्च्योतनेचत्रिफलासलोध्रासगैरिकादारुनिशाप्र-
शस्ता॥आलेपनेगैरिकचंदनंचसताक्ष्र्यशैलंमुनिभिः
प्रदिष्टम्॥३॥

अर्थ- आश्च्योतन ह्मणजे पाणी शिंपडून डोळे धुणें या विषयीं कादाकरण्यास त्रिफळा, लोध्र, तुरटी, दारुहळद हीं प्रशस्त आहेत. लेपाविषयीं तुरटी, चंदन, रसांजन हें मुनींनीं सांगितलें आहे.

दध्नाससैंधवंलोध्रंमधूच्छिष्टयुतंघृतम्
पिष्टमंजनलेपाभ्यांसद्योनेत्ररुजापहं॥४

अर्थ- सैंधव, लोध्र, मेण, तूप हीं दह्यांत खलून लेप आणि अंजन केलें असतां नेत्ररोगाचा नाश होतो.

बृहत्येरंडमूलत्वक्शिग्रुमूलंससैंधवम्
अजाक्षीरेणसंपिष्टावर्तिर्वाताक्षिरोगजित्५

अर्थ- रिंगणी, एरंडमुळाची साल, शेवग्याचें मूळ, सैंधव हीं शेळीच्या दुधांत खलून त्याची वात करून डोळ्यांत फिरवावी. म्हणजे वायु, अक्षिरोग यांतें जिंकील.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्जुनेशर्करामस्तुक्षौद्रैश्चाश्च्योतनंहितम् ॥ शंखक्षौद्रेणसंयुक्तंकतकंसैंधवेनवा ॥ सितयार्णवफेनंवा पृथगंजनमर्जुने ॥६

अर्थः- अर्जुन (कवडा) रोगावर दह्यांचा मंड, साखर आणि मध यांचें आश्च्योतन (सेचन) हितकारक आहे. अथवा शंख, मध, किंवा निवळीचें बीं, सैंधव आणि समुद्रफेन हीं तीन पृथक् अंजनें आहेत असें जाणावें ॥७॥

चंदनंगैरिकंलाक्षामालतीकलिकाःसमाः
व्रणशुक्रहरीवर्तिःशोणितस्यप्रसादनी ७॥

अर्थः- चंदन, तुरटी, लाख जाईच्या कळ्या हीं समान घेऊन यांची वात करून नेत्रांत फिरवावी. व्रण शुक्र यांची हरण करणारी, रक्तशोधक अशी आहे.

कतकस्यफलंशंखंसैंधवंत्र्यूषणंसिता ॥ फेनंरसांजनंक्षौद्रंविडंगानिमनःशिला ॥८॥ कुक्कुटांडत्वक्फलानिवर्तिरेषांस्रस्रावहा ॥ तिमिरंपटलंकाचंमलंचाशुव्यपोहति ॥९

अर्थः- निवळीचें बीं, शंख, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, साखर, समुद्रफेण, रसांजन, मध, वावडिंग, मनशीळ, कोंबड्याच्या अंड्याची त्वचा, जायफळ यांची वात स्रवावह आहे. आणि तिमिर, पटल, कांचबिंदु (सारा) यां० दूर करी०

व्योषोत्पलाभयाकुष्ठताक्ष्यैर्वर्तिःकृताहरेत्
अर्बुदंपटलंकाचंतिमिरार्मादिकान्यदान् १०

अर्थः- सुंठ, मिरें, पिंपळी, कमळ, हिरडा, कोष्ठ कोलिंजन आणि रसांजन यांची वात, अर्बुद, पटल, काच, बिंदु, तिमिर, अर्म इत्यादिक रोगांचें हरण करील.

हंत्यर्जुनंशर्करयाब्धिफेनोशाव्यंधतांगोशकृताचकृष्णा।
दध्नाविघृष्टंमरिचंनिशाध्यंविनाशयेदंजनमुत्तमंच ११॥

अर्थः- साखर, समुद्रफेन अर्जुननाशक आणि गायीचें शेण, पिंपळी रात्र्यंधपणाची नाशक तसेंच दहीं, मिरें यांचें अंजन उत्तम आहे. असें जाणावें.

अजापित्तगतंव्योषंधूमस्थानेनियोजयेत्
चिरबिल्वरसैर्घृष्टंरात्र्यांध्यहरमंजनम् ॥१२

अर्थः- शेळीच्या पित्तांत सुंठ, मिरें, पिंपळी यांचें चूर्ण घालून धुराचे ठिकाणीं ठेवून कांहीं दिवस गेल्यावर करंजाचे रसांत उगाळून अंजन करावें.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

रात्र्यंधपणाचें नाशक आहे.

स्वर्णवरादिकासूतंसारपूतिजपत्रकम् ॥
नवनीतेनसंयुक्तंहंतिपुष्पंचिरंतनम् ॥१३

अर्थः- सोनकवडी, पारा, कात, मध, तालीसपत्र हीं लोण्यांत खलून अंजन करावें. फार दिवसांच्या फुलांचें नाशक आहे.

रसकेशाश्मसिंधूत्थंव्योषंतुत्थंसटंकणम्
क्षौद्रेघृष्टावटीपुष्पंसर्वनेत्रामयान्जयेत्१४

अर्थः- कलखापरी, केंश, सुवर्णमाक्षिक, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, मोरचूत, टांकणखार यांची मधांत खलून गोळी करावी. ती अंजनाच्या योगानें सर्वनेत्ररोग जिंकील. इति नेत्ररोगचिकित्सा.

अथशिरोरोगलक्षणो०

भ्रमोदाहोजडत्वंचवातेपित्तेकफेक्रमात्
शिरोरोगस्यविज्ञेयंलक्षणंचपृथक्पृथक्१

अर्थः- वात, पित्त, कफ हे दोष असतां शिरोरोगाचें क्रमें करून भ्रम, दाह, जडपणा हें निरनिराळें लक्षण जाणावें.

शिरोरोगास्तुजायंतेवातपित्तकफैस्त्रिभिः
सन्निपातेनरक्तेनक्षयेणकृमिभिस्तथा ॥२

अर्थः- वात, पित्त, कफ आणि सन्निपात, रक्त, क्षय, कृमि इतक्यांनीं शिरोरोग होतात.

पथ्याक्षधात्रीभूनिंबैर्निशानिंबामृतायुतैः॥ कृतैः क्वाथः
षडंगोयंसगुडःशीर्षशूलहा॥३॥भ्रूशंखकर्णशूला-
नितथाक्ष्णांशिरसोरुजाम् ॥ सूर्यावर्त्तशंखकंचदंत-
पातंचतद्रुजः॥नक्तांध्यंपटलंशुक्रंचक्षुःपीडांव्यपोहति४

अर्थः- हिरडा, बेहडा, आंवळकाठी, किराईत, हळद, कडूलिंब, गुळवेल यांचा काढा करून त्यांत ६ वा भाग गूळ घालून प्यावा म्हणजे भ्रूकुटि, आंख, कान या ठिकाणचा शूल, अर्धें मस्तक दुखणें, सूर्यावर्त्त, शंखक, दंतपात, दंतशूल, रातांधळें, पटल, शुक्र आणि डोळे दुखणें यांचा नाश करील. अ० जा०

॥करंजशिग्रुबीजानिपत्रकंसर्षपत्वचः ॥
सर्वेषांशीर्षरोगाणामेतच्छीर्षविरेचनं५॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- करंज, शेवगा यांचें बीं तमालपत्र, शिरस, दालचिनी यांचें शिरोविरेचन सर्व शिरोरोगांवर प्रशस्त आहे.

नावनंसगुडंविश्वंपिप्पलीसैंधवांबुना॥ भुजस्तंभादिरोगेषुसर्वमूर्द्धगदेषुच॥६॥७

अर्थ:- गूळ, आल्याचा रस, पिंपळी आणि सैंधव हीं पाण्यांत उगाळून यांचें नस्य करावें म्ह० भुजस्तंभादिक रोग व सर्व शिरोरोग यांवर प्रशस्त आहे.

सशर्करंकुंकुमभाज्यभृष्टंनस्यंविधेयंपवनासृगुत्थे॥ भ्रूशंखकर्णाक्षिशिरोर्धशूलेदिनाभिवृद्धिप्रभवेचरोगे७

अर्थ:- साखर आणि केशर तुपांत तळून त्याचें नस्य करावें. तेणें करून वायु, रक्त यांपासून झिवया, आंख, कर्ण, डोळे या ठिकाणचा शूल, अर्धमस्तकाचा शूल, दिवस वाढेल त्या प्रमाणें वाढणारा शूल शांत होतो असें जाणा॥

कुष्ठमेरंडजंमूलंलेपःकांजिकपेषितः॥ शिरोर्त्तिनाशयत्याशुपुष्पंवामुचुकुंदजम् ८॥

अर्थ:- कोष्ठकोलिंजन, एरंडमूळ त्यांचा कांजींत वांटून लेप करावा. अथवा मुचुकुंदाचें फूल वांटून लेप करावा. मस्तकशूलाचा लवकर नाशक॥

देवदारुनतंविश्वंनलदंविश्वभेषजम्॥ लेपःकांजिकसंपिष्टस्तैलयुक्तःशिरोर्त्तिनुत्९

अर्थ:- देवदार, तगर, कोष्ठकोलिंजन, वाळा, सुंठ हीं कांजींत वांटून त्यांत तेल घालून लेप करावा. म्हणजे मस्तकशूलाचा नाश करील.॥७

गिरिकर्णिकाफलंमूलंसजलंनस्यमाचरेत् मूलंवाबंधयेत्कर्णेनिहंत्यर्धशिरोरुजं॥१०॥

अर्थ:- श्वेत गोकर्णाचें फळ किंवा मूळ पाण्यांत उगाळून नस्य करावें. अथवा मूळ कानावर बांधावें म्हणजे मस्तकशूलाचा नाश करील.॥॥

मरीचंभृंगजेर्द्रावैर्मरीचंशालितंदुलैः॥ अर्धशीर्षव्यथांहंतिलेपोवाशुंठिवारिणा११

अर्थ:- माक्याच्या रसांत किंवा साळीच्या तांदुळा बरोबर मिरें वांटून लेप करावा. अथवा पाण्यांत सुंठ उगाळून लेप करावा. म्हणजे अर्ध्या मस्तकाचा शूल शांत होईल.

अत्ररसायनभैरवं नस्येलेपेयोजयेत्

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ:- मस्तकशूलावर रसायनभैरवाची नस्य, लेप याविषयीं योजनाक०

अथस्त्रीरोगलक्षणोपचारः

अस्रग्दरंयोनिदोषःस्कंदोथमूढगर्भजः॥
सूतिकास्तनरोगश्चस्तन्यरोगाश्चसप्तधा१॥

अर्थ:- अस्रग्दर, योनिदोष, स्कंद, मूढगर्भज, सूतिकारोग, स्तनरोग, स्तन्यरोग असा सात प्रकारचा स्त्रीरोग आहे.

योनेःस्रवतिरक्तंचशोणंपीतासितंसितम्॥
अस्रग्दरंभवेत्सर्वंसांगमर्दंसवेदनम्॥२॥

अर्थ:- योनीपासून तांबडें, पिवळें, काळसर, पांढरें असें जें रक्त पाझरतें त्याला अस्रग्दर असें ह्मणतात. आणि तें आंगमोडून येणें व तिडीक त्या उपद्रवानीं युक्त असतें.

अंगमर्देज्वरःकंपःपिपासागुरुगात्रता॥
शोफःशूलातिसारोचसूतिकारोगलक्षणं३

अर्थ:- आंग मोडून येणें, ज्वर, कंप, तहान, आंग जड, सूज, शूल, अतिसार हें सूतिका रोगाचें लक्षण जाणावें.

अन्येषांपंचदोषाणांलक्षणंनात्रभाषितं

अर्थ:- आणखी दुसरे पांच रोग आहेत त्यांचें लक्षण त्यांत सांगितलें नाहीं.

देवदारुवचाकुष्ठंपिप्पलीविश्वभेषजम्॥४॥कट्फलं
मुस्तभूनिंबतिक्ताधान्यंहरीतकी॥गजकृष्णाचदुस्प-
र्शागोक्षुरंधन्वयासकम्॥५॥बृहत्यतिविषाछिन्ना
कर्कटंकृष्णाजीरकं॥समभागान्वितैरेतैःसिंधुरामठसं-
युतैः॥६॥क्वाथमष्टावशेषंतुप्रसूतांपाययेत्स्त्रियम्॥
शूलकासज्वरश्वासमूर्छाकंपशिरोर्तिभिः॥७॥युक्तप्र-
लापतृट्दाहतंद्रातीसारवांतिभिः॥निहंतिसूतिकारोगं
वातपित्तकफान्वितं८॥

अर्थ:- देवदार, वेरवंड, कोष्ठ कोलिंजन, पिंपळी, सुंठ, कायफळ, नागरमोथे, किराईत, कुटकी, धणे, हिरडा, गजपिंपळी, रिंगणी, गोखरू, धमासा, डोरली, अतिविष, गुळवेल, बेल, काळें जिरें यांचा काढा करून त्यांत सैंधव, हिंग, टाकून बाळांतिणीला पाजावा ह्मणजे शूल, कास, ज्वर, श्वास, मूर्छा, कंप, मस्तकपी-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

डा, बडबड, तृषा, दाह, तंद्रा, अतीसार, आणि ओकारी इतक्या उपद्रवांनीं युक्त त्रिदोषात्मक अशा सूतिका रोगाचा नाश करील. इति देवदार्वादिः ॥

दार्वीरसांजनवृषाब्दकिरातबिल्वभल्लातकैरवकृतो मधुनाकषायः॥पीतोजयत्यतिबलंप्रदरंसशूलंपीतासितारुणविलोहितनीलयुक्तम् ९

अर्थः- दारुहळद, रसांजन, अडूळसा, किराईत, बेल, बिब्बे यांचा काढा मध घालून प्यावा. अतिप्रबल शूलयुक्त पिवळें, पांढरें, पिंगट, तांबडें, काळें कसेंही प्रदर असलें तरी बरें होतें.

मधुनातार्क्ष्यसंयुक्तंमूलंस्यात्तंदुलीयकम्॥ तंदुलांबुयुतंपानात्सर्वप्रदरनाशनम् १०॥

अर्थः- तांदुळज्याचें मूळ तांदुळांचे धुणांत उगाळून त्यांत मध, रसांजन घालून प्यावें. सर्व प्रदरांचें नाशक आहे.

आरग्वोःपुरीषंधातक्याःपुष्पंबोलंतथैवच॥ समभागानिसंचूर्ण्यटंकमेकंचभक्षयेत्॥ ११॥ दिनसप्तप्रयोगेण सर्वप्रदरनाशनम्

अर्थः- उंदराचें, पुरीष, धायटीचीं फुलें रक्त्याबोळ हीं समभाग घेऊन चूर्ण करून एक तोळा खावें. सात दिवसांत सर्व प्रदरांचा नाश होईल ॥ ७॥

कुशमूलंसमुद्धृत्यपेषयेत्तंदुलांबुना १२ एतत्पीत्वात्र्यहान्नारीप्रदरात्परिमुच्यते॥ रास्नाश्वदंष्ट्रामृतकैःशृतंशूलहरंपयः॥ १३॥

अर्थः- दर्भाचें मूळ तांदुळांचे धुणांत वांटून तीन दिवस प्यावें. प्रदरापासून स्त्री मुक्त होईल. अथवा रास्ना, लघुसरांटे, अडूळसा यांचा काढा प्यालें असतां शूलाचा नाश होईल.

गुडूचीत्रिफलादंतीक्वाथेनपरिपेषितैः॥ पिप्पलीमरिचैर्माषैःशतावाकुष्ठसैंधवैः १४ वर्तिस्तल्याग्रदेशिन्याधार्यायोनिविशोधिनी

अर्थः- गुळवेल, त्रिफळा, दांतिमूळ यांच्या काढ्यांत पिंपळी, मिरें, उडीद, शतावरी, कोष्ठ कोळिंजन, सैंधव हीं वांटून त्याची वात आंगठ्या जवळच्या बोटाप्रमाणें करून योनींत धरावी. योनींतलें दर्द काढून योनि स्वच्छ करील.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

पिष्टजंबूकसंपिष्टंपक्वंतिन्तिडिसंयुतम् ॥
लेपमात्रेणनारीणांयोनिकंदहरंपरम् ॥१५

अर्थः- नांदुरकी, पीतलोध्र, हीं कुटून चिंचे बरोबर पक्व करून लेप करावा. म्हणजे योनिकंदाचा नाश करील.

कुशकाशोरुबूकाणांमूलेगोक्षुरकस्यच
शृतंक्षीरंसितायुक्तंगर्भिण्याःशूलनुत्परं १६

अर्थः- कुश, काश, एरंड, गोखरू यांच्या मुळाचा काढा दुधांत करून साखर घालून प्यावा. म्हणजे गर्भिणीचा शूल दूर करील असें जाणावें.

मातुलुंगस्यमूलानिमधुकंमधुसंयुतम् ॥
घृतेनसहभोक्तव्यंसुखंनारीप्रसूयते ॥१७

अर्थः- महाळुंगीचीं मुळें, ज्येष्ठमध हीं तुपाबरोबर खावीं. नारी सुखें करून प्रसूत होईल.

पिप्पलीपिप्पलीमूलंचव्यंशुंठीयवानिका ॥ जीरकेद्वे
हरिद्रेचबिडंसौवर्चलंतथा १८ एतैरेवौषधैः पिष्टैरा-
रनालंविपाचयेत् ॥ आमवातहरंवृष्यंकफघ्नंवन्हि
दीपनं १९ वज्रकंकांजिकंनामस्त्रीणामग्निविवर्धन-
म् ॥ सूतिकारोगशमनंशूलघ्नंक्षीरवर्धनम् ॥२०॥

अर्थः- पिंपळी, पिंपळमूळ, चवक, सुंठ, ओंवा, जिरें, शाहजिरें, हळद, दारुहळद, बिडलोण, पादेलोण, हीं औषधें कुटून त्यांच्या बरोबर कांजी शिजवावी. ती कांजी आमवात नाशक, वृष्य, कफघ्न, अग्निदीपक, अशी आहे. त्याला वज्रकांजी असें ह्मणतात. स्त्रियांचा अग्नि वाढविणारी, बाळंतरोग शमविणारी, शूलनाशक, दूध वाढविणारी अशी आहे ॥ ७॥॥

वातव्याधिविधानेनसूतिकांसमुपाचरेत् ॥
जलौकाभिर्हरेद्रक्तंबस्तिनाचोपनाहयेत् २१

अर्थः- वातव्याधीवर जसा उपचार करतात त्यारीतीनें सूतिका रोगावर उपचार करावा. जळवानीं रक्त काढावें. बस्तिकर्म करावें. व पेंड बांधावे.

लेपोविशालमूलेनहंतिपीडांस्तनोत्थिताम्
वनकार्पासिकेक्ष्वाकुमूलंसौवीरकेनवा ॥२२

अर्थः- कंवडळाचें मूळ उगाळून लेप करावा. अथवा वनकापशी आणि दुध्या-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

भोंपळ्याहीं गव्हांचे कांजींत वांटून लेप करावा. स्तनसंबंधि पीडा दूर करील.

विदारिकंदंस्फुरयापिबेत्स्तन्यविवर्धनम् ॥
पाठामूर्वाब्दभूनिंबदारुशुंठीकलिंगकैः ॥
सारिवामृततिक्तारग्वैः क्वाथः स्तन्यविवर्धनः २३

अर्थः भुयकोंहळ्या मध्यांत वांटून प्यावा. अथवा पहाडमूळ, मोरवेल, नागरमोथे, किराईत, देवदार, सुंठ, इंद्रजव, उपळसरी, गुळवेल, कुडकी यांचा काढा प्यावा. स्तनांतलें दूध वाढविणारा आहे. इति स्त्रीरोगचिकित्सा.

॥ अथ बालरोगचिकित्सा. ॥

ज्वरातिसारादय एव रोगा बालस्य देहे प्रवदंति सर्वे ॥
स्तनादिदंतादिच भूतबाधा तेषांतु पूर्वोक्तमिदं समाचरेत् ॥ १ ॥

अर्थः ज्वर अतिसारादिक जे रोग आहेत तेच बाळाच्या शरीरांत होतात. आणि स्तनादिक, भूतबाधा असेही आहेत त्यांनां पूर्वोक्त उपचार करावे.

भैषज्यं सर्वमुद्दिष्टं महतां यज्ज्वरादिषु ॥
कार्यं गदेषु बालानामत्र मात्रा लघीयसी २ ॥

अर्थः मोठ्या मनुष्यास जें ज्वरादिकांचे ठायीं औषध सांगितलें तेंच बाळांस त्या त्या रोगावर द्यावें. परंतु बाळांस औषधांचें प्रमाण मात्र थोडें योजावें.

शृंगीकणारुणाब्दानां चूर्णं लीढं समाक्षिकं
कासश्वासातिसारांश्च वमिं च नाशयेच्छिशोः ३

अर्थः कांकडशिंगी, पिंपळी, चित्रक, नागरमोथें यांचें चूर्ण मधाबरोबर चाटलें असतां बाळांचे कास, श्वास, अतिसार, ओकारी यांचा नाश करी.

गृहधूमनिशाकुष्ठराजिकेंद्रयवैः शिशोः ॥
लेपस्तक्रेण हंत्याशु कृमिध्मापामाविचर्चिकाः ४

अर्थः घेरोसा, हळद, कोष्ठ कोलिंजन, मोहऱ्या, इंद्रजव हीं ताकांत वांटून लेप करावा. म्ह० बाळांचे अंगावरचें शिबें, खरूज, विचर्चिका यांचा नाश करी.

वचाकुष्ठविडंगास्यकोष्णक्वाथावगाहनात् ॥
दद्रूविचर्चिकाकंडूकृमिभिर्मुच्यते शिशुः ॥ ५

अर्थः वेरवंड, कोष्ठ कोलिंजन, वावडिंग यांचा काढा करून त्या मंदोष्ण-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

काढ्यानें स्नान घालावें. म्हणजे दद्रु, विचर्चिका, कंडु, कृमि या रोगांपासून बालक मुक्त होईल.

॥ मुखपाके तु बालानां ताम्रसारमयो रजः ॥
गैरिकं क्षौद्रसंयुक्तं भैषज्यं सरसांजनम् ६॥

अर्थः- बालाचे मुखपाकावर रक्तचंदन, लोहभस्म, काव आणि मध एकत्र खलून तोंडाला चोळावें.

गुदपाके तु बालानां पित्तघ्नीं कारयेत् क्रियाम्
रसांजनं विशेषेण पानालेपनयोर्हितम् ७

अर्थः- बालांचे गुदपाकावर पित्तशामक क्रिया करावी. आणि रसांजन विशेषेंकरून पान, लेप या विषयीं हितकारक आहे.

कणोषणासिताक्षौद्रसूक्ष्मैलासैंधवैः कृतः
मूत्रग्रहे प्रयोक्तव्यः शिशूनां लेह उत्तमः॥ ८

अर्थः- पिंपळी, मिरें, साखर, मध, कडू जिरें आणि सैंधव यांचा लेह बालकांच्या मूत्रकृच्छ्रावर उत्तम आहे.

अश्वत्थत्वक्कबलाक्षौद्रैर्मुखपाके प्रलेपनं

अर्थः- पिंपळाची साल, चिकणा, मध, यांचा लेप मुखपाकावर करावा॥ ७

सर्पत्वक्कलशक्रनं मूर्वासर्षपारिष्टपल्लवाः ९
बिडालबिडजालोमं मेषशृंगं वचा मधु॥ धूपः शिशोर्ज्वरघ्नोयमशेषग्रहनाशनः॥ १०॥

अर्थः- सर्पाची कांत, लसूण, मोरवेल, शिरस, कडूलिंबाचीं पानें, मांजराची विष्ठा, शेळीचे केंश, मेढशिंगी, वेखंड आणि मध यांचा धूप बालांचा ज्वर, अशेष ग्रहपीडा यांचा नाशक आहे.

तद्वन्निर्मल्यसिद्धार्थसर्पत्वक्केशसंयुतं
सप्तपर्णत्वचं पिष्ट्वा मूर्वातिक्तासमन्वितम्
शिशोरुद्वर्तनं कुर्यात्सर्वग्रहनिवारणम् ११

अर्थः- वेलाचीं पानें, श्वेतशिरस, सर्पाची कांत, केंश, सातिणीचा साल, मोरवेल आणि कुटकी हीं सर्व वांटून मुलांचे अंगाला लावावें. सर्व ग्रहांचें निवारण होतें.

इति बालरोगचिकित्सा.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

॥अथविषोपचारः॥

स्थावरंजंगमंचैवद्विविधंविषमुच्यते॥मूला-
त्मकंस्थावरंस्यात्सर्पादीनांतुजंगमम्॥१स्था-
वराणांचसर्वेषांवमनंकारयेद्भिषक्॥७॥

अर्थः- स्थावर आणि जंगम या भेदें करून दोन प्रकारचें विष आहे. बचना-
ग इत्यादिक जीं मुळें वगैरे तें स्थावर विष. आणि सर्पादिकांचें जें तें जंगम
विष जाणावें, सर्व स्थावर विषांवर वमन द्यावें.

रजनीसैंधवयुतंसक्षौद्रंघृतमुत्तमम्॥२॥
पानंमूलविषार्त्तस्यविषविद्भ्यश्चक्षते॥७

अर्थः- हळद, सैंधव, मध, तूप, हीं एकत्र करून मूळाचे विषानें पीडित आ-
णि व्यापलेला असेल त्याणें प्यावीं.

सैंधवंमरिचंतुल्यंनिंबबीजंसमीकृतम्३
मधुसर्पिर्युतंहंतिविषंस्थावरजंगमम्॥

अर्थः- सैंधव, मिरें समभाग. या दोघांच्या बरोबर लिंबोळ्या घेऊन वांटून
मध, तुपा बरोबर रव्यावा. म्ह० स्थावर जंगम विषाचा नाश करितात.

तिक्तकोशातकीक्वाथंमध्वाज्यसंयुतंपिबे
त्॥४॥कटुकालाबुमूलंवातत्पत्रंवापिबेज्ज-
लैः॥तत्क्षणाद्दूमनाद्धंतिविषयोगाद्विमुच्यते५

अर्थः- कडू दोडकीचा काढा मध, तूप घालून प्यावा. अथवा कडू भोंपळ्याचें
मूळ किंवा पानें पाण्यांत वांटून प्यावीं. म्हणजे विषाचा नाश होऊन वि-
षयोगापासून मुक्त होतो.

रजनीचूर्णधूपेनविषंवृश्चिकजंहरेत्॥व-
स्त्रेणाशक्यमासाद्यधूपंधूपंचपाययेत्॥६
दंशेचधूपयेच्चूर्णंसर्वधूपेष्वयंविधिः॥७॥

अर्थः- हळदीच्या चूर्णाचा धूप विंचवाचें विष हरण करितो. धूप घेण्यास
अशक्य असला तर मध्यें वस्त्र करून प्यावा. म्हणजे कडू, तिखट असा
धूप म्हणजे धूर असतो तो पिवत नाहीं. म्हणून वस्त्र आडे धरून युक्ती-
नें प्यावा. आणि दंश झालेल्या ठिकाणीं धूप द्यावा. सर्व धूपां विषयीं हा-
विधि करावा प्रशस्त आहे.

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

तोयेवानागरंनस्यंपिबेद्वासैंधवंघृतम्॥७
अर्कधत्तूरमूलंवाजलपानैर्विषापहम्॥

अर्थ:- सुंठ पाण्यांत उगाळून नस्य करावें. अथवा तुपांत सैंधव घालून प्यावें. अथ० रुईचें मूळ किंवा धोत्र्याचें मूळ पाण्यांत उगाळून प्यावें. विषनाशः

हिंगुर्वाजललेपेनविषहावृश्चिकस्यतु॥८
धत्तूरार्कजटालेपोनिहंतिवाश्चिकंविषं॥

अर्थ:- हिंग पाण्यांत उगाळून लेप करावा. अथवा धोत्र्याचें मूळ किंवा रुईचें मूळ उगाळून लेप करावा. म्हणजे विंचवाचें विष उतरेल.

वंध्याकर्कोटकीकंदंजलैःपिष्ट्वापिबेल्लिपेत्९
सर्पमूषकमार्जारवृश्चिकादिविषापहम्॥

अर्थ:- वांझ कर्टोलीचा कांदा पाण्यांत उगाळून प्यावा. आणि लेप करावा. सर्प, उंदीर, मांजर आणि विंचु इत्यादिक विषांचा नाशक आहे॥७॥

श्वानदंष्ट्राविषंहंतिलेपात्कुक्कुटविष्ठया १०

अर्थ:- कुत्र्याच्या दाढेचें विष कोंबड्याच्या विष्ठेचा लेप केला असतां उतरतें.

तैलंतिलानांपललंगुडंचक्षीरंतथार्कस्यसमंहिपीतं
आलर्कमुग्रंविषमाशुहंतिसद्योद्भवंवायुरिवाभ्रवृंदं११

अर्थ:- तिळांचें तेल, तिळकूट, गूळ, रुईचा चीक हीं समभाग घेऊन एकत्र करून प्यालें असतां कुत्र्याचें विष नूतन उत्पन्न झालेलें लवकर नाश पावतें. जसें वायूनें अभ्र नाश पावतें.

सूतंचूर्णमगारधूममसमंप्रत्येकगद्याणकंधत्तूरस्य
रसेनमर्दितमलंपश्चाच्छतंभास्करम्॥जेपालंमरिचं
चतुःशतयुतंवातारिबीजंलसद्यक्तंषष्टिभिरन्वि-
दंदृढतरंजंबीरनीरैर्वरैः॥१२॥कुर्यान्माषवदाकृतिंच
वटिकांछायासुशुष्कीकृतांराज्यंधंग्रहसर्पसंधिसक-
लंशीतज्वरंदुर्जरं॥सन्नेत्रांजनमौषधंचभुवनेचाजी-
र्णदोषापहंसेव्यंतत्प्रबलंमहागुणयुतंश्रीपूज्यपादो-
दितम्॥१३॥

अर्थ:- पारा ६ मासे, चुना ६ मासे, घेरोसा ६ मासे, या प्रमाणें घेऊन धोत्र्याच्या रसांत पुष्कळ खलावें. नंतर शुद्ध जेपाळाच्या बिया १००, मिरें ४००, एरं-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

ड्या ६१ त्यांत घालून ईडलिंबाच्या रसांत बळकट खलावें आणि उडदा-
प्रमाणें गोळ्या करून सावलींत वाळवून नंतर उगाळून डोळ्यांत घाला-
वें म्हणजे रात्र्यंधत्व ग्रह सर्प संधिवात सर्व शीतज्वर यांचा नाश करील.
हें नेत्रांजन रूप औषध लोकांमध्यें उत्तम आहे. अजीर्णनाशास सेवन क-
रावें हें महागुणानें युक्त आहे. हें वंद्यपुरुषांनीं सांगितलें आहे. इ.ग.ज.

श्वेतापुनर्नवामूलं रविवारे समुद्धरेत् ॥ का-
र्पासमूलं चर्वित्वा विषं वृश्चिकजं हरेत् ॥ १४ ॥

अर्थ:- श्वेत (पांढरी) घेंटोळीचें आणि कापशीचें मूळ रविवारीं आणून
ठेवावें. मग तें चावलें असतां विंचवाचें विष हरण करील असें जा०

॥ अथ कृत्रिमविषचिकित्सा ॥

अन्नेन विषजीवानां चूर्णैर्विषयुतैर्युतम् ॥
मिश्रितं नखकेशैश्च लोहानां चूर्णसंचयैः १ ॥
कृत्रिमं तु विषं ख्यातं पक्षान्मासाद्विबाध्यते ॥

अर्थ:- सविषप्राण्याच्या शरीराच्या चूर्णानीं युक्त जो भक्ष्य पदार्थ अथ-
वा विषयुक्त पदार्थानें युक्त किंवा नख केश याणीं मिश्रित किंवा अश-
ह्य कच्चीं अशीं लोखंडादिक त्यांच्या चूर्णानें मिश्रित त्याला कृत्रिमविष
ह्मणतात. तें पक्षानें किंवा मासानें बाधा करितें ॥

आलस्यं कुरुते जाड्यं कासश्वासबलक्षयं २ ॥
रक्तस्रावो ज्वरः शोफः पीतचक्षुश्च लक्षयेत् ॥

अर्थ:- आळस, जडपणा, कास, श्वास, बल, हानि, रक्तस्राव, ज्वर, शोफ, पि-
वळे डोळे हीं लक्षणें जाणावीं.

तुल्येन टंकणेनैव म्रियते भक्षणाद्विषं ३ ॥
अतिमात्रं यदा भुक्तं तदा ज्यं टंकणं पिबेत् ॥

अर्थ:- जितकें विष पोटांत गेलें असेल तितका टांकणखार खावा. ह्म-
णजे विष उतरतें. आणि जर फार खाल्लें असेल तर तूप आणि टांकण
खार प्यावा. ह्मणजे विष उतरतें.

पुत्रजीवस्य मज्जा च निष्कमात्रं गवां पयः ४ ॥
पिष्ट्वा चोग्रतरं हन्यान्नानायोगकृतं विषम् ॥

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

अर्थ- पुत्रजीव वृक्षाचा नार चार मासे गायीच्या दुधांत वांटून प्यावा म्हणजे नानाप्रकारच्या योगांनीं केलेल्या अशा अतिउग्र विषाचा नाशकरी.

गृहधूमंजलेपिक्षातंदुलीमूलतुल्यकम् ५
कल्काच्चतुर्गुणंचाज्यंतस्मात्क्षीरंचतुर्गुणं
घृतशेषंपचेत्सर्वंपिबेत्सर्वगरापहम् ॥६॥

अर्थः घेरोसा तांदुळज्याचीं मुळें दोन्ही समान पाण्यांत वांटून त्यांत त्याचे चौपट तूप घालून त्याचे चौपट दूध घालून तूप शेष राहीलतों पर्यंत आटवावें आणि प्यावें सर्व कृत्रिमविषांचा नाशा करील. ॥७॥

शुद्धसूतंमृतंस्वर्णंसंशुद्धंहेममाक्षिकम् ॥ त्रयाणां गंधकंतुल्यंमृद्घाल्कन्याद्रवैर्दिनम् ॥७॥ तच्छुष्कंसमितंक्षौद्रैर्माषैकंभक्षयेत्सदा ॥ वन्हिमूलंघृतंक्षीरैरनुस्याद्गरनाशनं ८॥

अर्थः शुद्ध पारा, सुवर्णभस्म, सुवर्ण माक्षिक भस्म तिन्ही समभाग. तिहींच्या बरोबर गंधक घेऊन कोरफडीच्या रसांत एक दिवस मर्दन करावें. शुष्क झाल्यावर एक मासाभर मध सारखे बरोबर खावें. नंतर चित्रक दुधांत शिजवून तें दूध प्यावें म्हणजे विषाचा नाश होतो.

अथसर्पदंशचिकित्सा

कपोतविण्मर्त्यशिरोरुहाश्वसगोविषाणंशिखिपिच्छकाग्रम् ॥ यवश्चधान्यंचतुषाश्चबीजंकार्पासजंवाप्युषिताश्चमालाः ॥१॥ इत्यौषधीभिःपरिकल्पितोयंधूमोगदस्याद्भुजगैरयुक्तः ॥ गृहेविधेयः कुशलैरनेननश्यंतिसर्पाश्चतथारवश्च ॥ २ ॥

अर्थः कपोतपक्ष्याची विष्ठा, मनुष्याचे केश, गायीचें शिंग, मोराच्या पिसांचा शेंडा, सातू, धणे, तूस, कापसाच्या सरक्या, शिळ्या माळा यांचा धूप घरामध्यें करावा. तेणें करून सर्प लांब पळतात. इति धूपः ॥७॥

त्वक्सप्तपर्णाकुटजात्सनिंबाद्दग्धामयोशीरनतानि ताप्यम् ॥ रोध्रंविदध्यान्नवमंनवांगंप्राचेतसंचूर्णमुदाहरंति ॥ ३ ॥ लौहेयहैमेत्वथराजतेवास्थितंस-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

दासद्मनिभूपतीनाम्॥ क्षौद्रेणलीढंसचराचराणि
विषाणिहन्याद्भुविमानवानां॥४॥

अर्थ- सालिण, कुडा, कडूलिंब, यांची साल, नागरमोथे, कोष्ठ कोलिंजन वाळा, नगर, सुवर्ण माक्षिक, लोध्र यांचें चूर्ण करावें. त्याला प्राचेतस-चूर्ण असें ह्मणतात. हें लोहाचे किंवा सुवर्णाचे किंवा रुप्याचे पात्रांत राजे यांच्या घरीं नेहेमीं असतें. मधा बरोबर चाटलें असतां मनुष्याचीं स्थावर जंगम विषें नाश पावतात. इति प्राचेतसंचूर्णम्॥७॥

श्लेष्मांतकत्वक्क्षवकंगुडूचीनृपद्रुमत्वक्बृहतीद्वयंच॥ एषोऽगदः सर्वविषाणिहन्यादास्तीकनाम्ना
मुनिनाप्रदिष्टः॥५॥

अर्थ- भोंकरीची साल, पांढरा अघाडा, गुळवेल, बाहव्याची साल, रिंगणी, डोरली याचें चूर्ण करावें. हें औषध सर्व विषांचा नाशा करील. हें आस्तीक मुनीनें सांगितलें आहे.

कृकलासपदंयस्तुसितवस्त्रेणवेष्टयेत्॥
बाहौबध्वाविषंहंतिविषंभुक्त्वानबाध्यते॥६॥

अर्थ- सरड्याचा पाय श्वेत वस्त्रांत गुंडाळून दंडाला बांधावा. म्हणजे विष उतरतें. आणि जों पर्यंत दंडाला बांधलें आहे तों पर्यंत विष खाल्लें तथापि बाधत नाहीं.

पारदंगंधकंतुल्यंटंकणंरजनीसमम्॥ दे-
वदाल्याद्रवैर्मर्द्यंदिनंशुष्कंतुभक्षयेत्॥७॥
कालवज्राशनिर्नामरसःसर्वविषापहः॥
नरमूत्रंपिबेच्चानुकालदष्टोपिजीवति॥

अर्थ- पारा, गंधक, मोरचूत, टांकण खार, हळद हीं समभाग घेऊन देवडांगरीच्या रसांत एक दिवस खलून भक्षण करावें. त्याला कालवज्राशनिरस असें ह्मणतात. हा सर्व विषांचा नाशक आहे. त्यानंतर मनुष्यांचें मूत्र प्यावें. काळ डसला तरी वांचेल. इति कालवज्राशनिरः

जलेनलांगलीकंदंनस्यंसर्वविषापहम्॥८॥

अर्थ- कळलावीचा कांदा पाण्यांत उगाळून नस्य करावें. सर्वविषनाशः

कुष्ठंवचामदनकोशवतीफलेनसंयोजितंतदितिचू-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

र्णमिदंचतुर्णाम्॥ गोमूत्रपीतमखिलाखुविषंनिहंति
कोशातकीकथनमापिबतोथवापि ९॥

अर्थः कोष्ठकोलिंजन वेरखंड गेळफळ कडू दोडकी यांचें चूर्ण गोमूत्रांत घालून प्यावें. सर्व प्रकारचे उंद्रांचें विष नाश पावतें. तसाच कडू दोडकीचा काढा प्यालें असतां विषनाशक आहे.

रसगंधंनिशाबंधुंगृहधूमंशिरीषजम्॥ बीजंदिनकरक्षीरैर्मर्दयित्वाविलेपनम्॥ विशेषान्मूषकविषंहन्यादन्यान्विषोद्भवान् १०॥

अर्थः पारा गंधक कापूर घेरोसा शिरस हीं रुयीच्या चिकांत वांटून लेप करावा म्हणे सर्वविषांचा नाशक आणि विशेषें करून उंद्राच्या वि० ना० आहे.

॥शिलातालककुष्ठानिपिष्ट्वानिर्गुंडिजद्रवैः
॥पानंमूषकदंष्ट्राणांदत्वातीव्रविषंहरेत् ११

अर्थः मनशील हरताळ कोष्ठ कोलिंजन हीं निर्गुंडीच्या रसांत खलून प्यावीं. उंद्राचें तीव्र विष हरण करतील.

॥चिंचाफलसमायुक्तंगृहधूमंपलार्धकम्॥
॥पुराणाज्येनसप्ताहंलीढ्वाचाखुविषंहरेत्१२

अर्थः चिंचेच्या बलखांत घेरोसा २तो० जुन्या तुपांत खलून सात दिवस खावा म्हणजे उंद्राचें विष उतरेल.

॥अथश्वानदंष्ट्राविषहरणम्॥

॥पिष्ट्वापामार्गमूलंतुकर्षैकंमधुनापिबेत्॥
॥श्वानदंष्ट्राविषंहन्यात्कुमारीदलसैंधवम् १॥
॥दंशस्थानेबंधयेत्तुत्रिदिनांतेस्फुरवावहम्॥

अर्थः आघाड्याचें मूळ एक तोळा कुटून मधा बरोबर खावें. आणि दंशाचे ठिकाणीं कोरफडीचें पान सैंधव बांधावें तीन दिवसांत कुत्र्याचे विषाचा नाश होऊन स्फुरव होईल.

॥अथरोगगणना॥

ज्वरोतिसारग्रहणीचाशोर्जीर्णंविषूचिका॥ कृमिरुक्-

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

चतथापांडुःकामलारक्तपित्तकम्॥ १ राजयक्ष्माथकास-
श्चहिक्काश्वासस्तथैवच॥ स्वरभेदारोचकेचछर्दिस्तृष्णा-
चमूर्छनम्॥२॥ पानात्ययस्तथादाहोन्मादभूतारव्यउन्म-
दाः॥ अपस्मारोवातरोगोवातरक्तंतथैवच॥ ३॥ ऊरु-
स्तंभामवातौचशूलोन्यःपरिणामजः॥ आध्मानश्चत्यु-
दावर्त्तंगुल्मोहृद्रोगएवच॥ ४॥ मूत्रकृच्छ्रंतथामूत्राघा-
ताश्मर्यौचशर्करा॥ प्रमेहोमधुमेहश्चपिटिकामेदएव-
च॥ ५॥ उदरंचतथाशोफोंत्रमुष्कवृद्धिरेवच॥ गल-
गंडंगंडमालापचिग्रंथ्यर्बुदानिच॥ ६॥ श्लीपदंविद्र-
धिश्चैवव्रणशोथस्तथैवच॥ भग्नव्रणंनाडीव्रणंभगंद-
रोपदंशकौ॥७॥ शुक्रदोषश्चकुष्ठंचशीतपित्तंतथैव-
च॥ शीतवातःस्पर्शवातस्तथाम्लंपित्तमेवच ८ विस-
र्पश्चसविस्फोटोमसूरीस्नायुनामकौ॥ क्षुद्रास्यकर्ण-
नासाक्षिशिरःस्त्रीबालकामयाः॥ विषंचसंग्रहेत्वस्मि-
न्नसचिकित्सं पृथक्पृथक्॥९

अर्थः- ज्वर १ अतिसार २ ग्रहणी ३ अर्श ४ अजीर्ण ५ विषूचिका ६ कृमि ७ पांडु ८ कामला ९ रक्तपित्त १० राजयक्ष्मा ११ कास १२ हिक्का १३ श्वास १४ स्वरभेद १५ अरोचक १६ छर्दी १७ तृष्णा १८ मूर्छा १९ पानात्यय २० दाह २१ उन्माद २२ भूतोन्माद २३ अपस्मार २४ वातरोग २५ वातरक्त २६ ऊरुस्तंभ २७ आमवात २८ शूल २९ परिणामशूल ३० आध्मान ३१ उदावर्त्त ३२ गुल्म ३३ हृद्रोग ३४ मूत्रकृच्छ्र ३५ मूत्राघात ३६ मूत्राश्मरी ३७ मूत्रशर्करा ३८ प्रमेह ३९ मधुमेह ४० पिटिका ४१ मेद ४२ उदर ४३ शोफ ४४ अंत्रवृद्धि ४५ मुष्कवृद्धि ४६ गलगंड ४७ गंडमाला ४८ अपची ४९ ग्रंथी ५० अर्बुद ५१ श्लीपद ५२ विद्रधि ५३ व्रणशोथ ५४ भग्नव्रण ५५ नाडीव्रण ५६ भगंदर ५७ उपदंश ५८ शुक्रदोष ५९ कुष्ठ ६० शीतपित्त ६१ शीतवात ६२ स्पर्शवात ६३ अम्लपित्त ६४ विसर्प ६५ विस्फोट ६६ मसूरिका ६७ स्नायुक ६८ क्षुद्र रोग ६९ मुखरोग ७० कर्णरोग ७१ नासारोग ७२ अक्षिरोग ७३ स्त्रीरोग ७४ बालरोग ७५ आणि विष ७६ इतके या ग्रंथांत चिकित्सासहित पृथक् पृथक् रोग सांगितले आहेत. इति रोगनामानि॥ ७॥ श्रीशोजयः

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

चिकित्सासारनामायंग्रंथःपरमदुर्लभः॥ श्रीमद्गोपालदा-
सेनवादींद्रेणचधीमता॥१॥ परोपकारपुण्याय प्रया-
सेनचनिर्मितः॥ आलोक्यसुश्रुतंवृंदंहारितंचरकंतथा
॥२॥ आत्रेयंवाग्भटंसिद्धंसारसार्णववादिकम्॥ बहूनां
ग्रंथरत्नानांसारमुद्धृत्ययत्नतः॥३॥ श्रुतंदृष्टंचानुभूतं
तत्सर्वंलिखितंमया॥ ग्राह्यंतत्कुशलैर्येषांसद्यःसारो-
पयोगिकम्॥नदूषयेद्ग्रंथरत्नंसमयेदृष्टिरक्षकम्॥४

अर्थ- चिकित्सासार या नामें करून अत्यंत दुर्लभ. श्रीमद्गोपाल दासवा-
दींद्र बुद्धिमान् त्याणें परोपकारार्थ, पुण्यार्थ प्रयासें करून निर्माण
केला. आतां ते प्रयास सांगतों:-

सुश्रुत, वृंद, हारित, चरक, आत्रेय, वाग्भट, सिद्ध, सारसार्णव इ-
त्यादिक रत्नभूत बहुत ग्रंथ अवलोकन करून त्यांतील सारभूत ते-
वढें यत्नानें काढून जें ऐकिलेलें, पाहिलेलें आणि अनुभूत तें सर्व लि-
हिलें आहे; तस्मात् कुशल असतील त्याणीं सर्व ग्रहण करावें. ताला-
ळ त्यापासून चांगला उपयोग घडेल. असें आहे.

त्या ग्रंथास दूषण ठेवूं नये. कारण कीं, हा रत्नभूत आहे. आणि
वेळेस पाठ राखणारा आहे. इतिश्रीमद्गोपालदासविरचितश्चिकि-
त्सासारः समाप्तः॥७॥

कांचकाइलाजी
टटपुराणमा॰ ६
फटकडीमा॰ ६
माहीमा॰ ६ बुरकी
रोगनगुलचोपडक
दुधसेरआध
सुठमा॰ ३ अप
मुरति ४ वदाम
कीजीरी मलोइचन

समाप्तम्

यहपुस्तक लालागीर्द्धारीलालवंवइसहरहारीऋषिजी
प्रोहतकोदई माघकृष्णा १ संवत्
१९४६

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection

Digitization by Agam Nigam Digital Preservation Trust, Chandigarh. Funding by IKS-MoE

CC-0. All India Ayurvedic Congress (A.I.A.C), Dhanwantri Bhawan New Delhi Collection